अर्वाचीन मराठी गद्याची
पूर्व पीठिका

गं. बा. सरदार

अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका

(इ. स. १८००–१८७४)

गंगाधर बाळकृष्ण सरदार

☆

तिसरी आवृत्ति

सन १९७१

किंमत १२ रुपये

मॉडर्न बुक डेपो प्रकाशन

प्रकाशक :
श्री. कमलाबाई भिडे,
मालक, मॉडर्न बुकडेपो,
बाजीराव रस्ता, पुणें ३०.

* * *

आवृत्ति पहिली
१९३७
दुसरी आवृत्ति
१९५६
तिसरी आवृत्ति
१९७१

* * *

* * *

मुद्रक :
श्री. प्रल्हाद गणेश काळे,
व्यवस्थापक, अजित मुद्रणालय,
१००५, सदाशिव पेठ, पुणें ३०.

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

फोडिलें भांडार धन्याचा हा माल ।
मी तंव हमाल भारवाही ।
—तुकाराम

' अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका ' हा ग्रंथ वाचकांच्या हातीं सादर करतांना मला अत्यंत समाधान वाटत आहे. मराठी गद्य—वाङ्मयाच्या बाल्यावस्थेंत ज्या अनेक व्यक्तींनीं त्याचें परिश्रमपूर्वक संवर्धन केलें, त्यांची स्मृति महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांत निरंतर जाग्रत ठेवावी या भावनेनें मी हा ग्रंथ लिहिण्यास प्रवृत्त झालों. एकोणिसाव्या शतकांतील पहिल्या पाऊणशें वर्षांत प्रसिद्ध झालेल्या मराठी गद्य ग्रंथांचें विषयवार विवेचन करण्याचा मी या पुस्तकांत प्रयत्न केला आहे. हे ग्रंथ दिवसानुदिवस दुर्मिळ होत चालले आहेत, आणि त्यासंबंधीं जी थोडीबहुत माहिती आज उपलब्ध होण्याचा संभव आहे, तीहि पांचपंचवीस वर्षांनंतर मिळणें कठीण जाईल असें वाटल्यावरून मी हें काम प्रथम हातीं घेतलें. दोनतीन वर्षांच्या परिश्रमानें संपादिलेली माहिती सुव्यवस्थित रीतीनें लोकांसमोर मांडावी एवढ्याच उद्देशानें हा ग्रंथ लिहिला आहे. तो उद्देश कितपत सफळ झाला आहे याचा निर्णय वाचकांवर सोपविणेंच इष्ट आहे.

माझे मित्र श्री. शंकर गणेश दाते यांनीं मला प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याच्या कामीं निरपेक्ष बुद्धीनें साह्य केलें, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांचा अमूल्य ग्रंथसंग्रह पाहूनच मला हें पुस्तक लिहिण्याची इच्छा झाली. त्यांनीं आपल्या संग्रहांतील ग्रंथांचा व ' मराठी—ग्रंथ—सूचि ' या पुस्तकासाठीं मिळविलेल्या माहितीचा मला भरपूर उपयोग करूं दिल्यामुळें माझे बरेच श्रम वाचले.

हा ग्रंथ लिहिताना मला ज्यांच्या पुस्तकांचा व लेखांचा आधार घ्यावा लागला, त्या पुस्तकांचा, लेखांचा व मिळेल तेथें ग्रंथकर्त्यांच्या नांवाचा उल्लेख टीपांतून केलेला आहे. त्या ज्ञात व अज्ञात लेखकांचा मी अत्यंत ऋणी आहे.

याशिवाय पुणें मराठी ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथालय, ठाणें मराठी ग्रंथालय, भा. इ. सं. मंडळाचा ग्रंथसंग्रह, फर्ग्युसन कॉलेजच्या ग्रंथालयांतील मंडलीक विभाग

या ग्रंथालयांचाहि मला पुष्कळ फायदा झाला. वरील संस्थांच्या चिटणीसांनीं मला माझ्या सोयीप्रमाणें त्यांतील ग्रंथांचा उपयोग करून दिला याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तसेंच ' केसरी ' व ' मराठा ' पत्रांचे सहसंपादक श्री. मा. पं. सोमण, एम्. ए., श्री. चिं. ग. कर्वे, श्री. पु. म. जुवळे, श्री. एम्. जी. नाडकर्णी, डॉ. ग. त्र्यं. कारखानीस, एल्. सी. पी. एस्., श्री. वा. गो. गोखले, यांनींहि मला स्नेह-भावानें जरूर तें साह्य केलें, याबद्दल त्यांचे आभार मानणें हें माझें कर्तव्यच आहे.

' **मॉडर्न प्रिंटिंग प्रेस** ' चे व्यवस्थापक श्री. भ. पं. सोमण यांनीं छपाईचें काम परिश्रमपूर्वक थोड्या अवधींत, शुद्ध व सुबक रीतीनें करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

पुणें—विजयादशमी
शके १८५९ }

गंगाधर बाळकृष्ण सरदार

ॐ

॥ पितृदेवो भव ॥

ज्यांच्या कृपाछत्राखालीं

सरस्वतीदेवीची निश्चिंतपणें उपासना करण्याची

मला संधि मिळाली त्या



परमपूज्य पितृचरणीं

सादर समर्पण

— गंगाधर.

संपल्यानें हे दोन्ही बाजारांत विकत मिळत नाहींत. पदवी-परीक्षेसाठीं 'मराठी' विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांची नेहमी गरज पडते. म्हणून उल्लेखिलेल्या सर्व गोष्टींची जाणीव असूनहि केवळ विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं प्रस्तुत ग्रंथाचें पुनर्मुद्रण करण्याचें मी ठरविलें. कांहीं किरकोळ दुरुस्त्यांखेरीज ग्रंथांतील मजकुरांत कोठेंहि फरक केलेला नाहीं. मात्र अभ्यासकांच्या उपयोगासाठीं शेवटीं एक संदर्भ-साहित्य-सूचि जोडलेली आहे. बहुतेक सर्व ग्रंथांचा तिच्यांत समावेश करण्याची दक्षता घेतलेली आहे. तरी देखील कांहीं ग्रंथ अनवधानानें राहिले असण्याचा संभव आहे. नियतकालिकांतील लेखांच्या बाबतींत मात्र ही सूचि बरीच अपुरी आहे. या कालखंडांतील ग्रंथहि जेथें दुर्मिळ झालेले आहेत, तेथें नियतकालिकांच्या अंकांची किती वाताहत झाली असेल, त्याची सहज कल्पना करतां येईल. प्रस्तुत ग्रंथाच्या ह्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वयंस्फूर्तीनें स्वीकारून ती तत्परतेनें पार पाडल्याबद्दल मी मॉडर्न बुकडेपोच्या चालकांचे मनःपूर्वक आभार मानतो. माझे स्नेही श्री. रा. प्र. कानिटकर यांनीं वेळोवेळीं मला ज्या सूचना केल्या, आणि मुद्रितें तपासण्याच्या कामीं अगत्यपूर्वक जें साहाय्य केलें, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

पुणें, ता. २-१०-१९५६ **गंगाधर बाळकृष्ण सरदार**

* * *

आभार

'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' या माझ्या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाची संपूर्ण जबाबदारी अगत्यपूर्वक स्वीकारल्याबद्दल मी मॉडर्न बुकडेपोच्या चालकांचा फार आभारी आहे. माझे स्नेही श्री. रा. प्र. कानिटकर यांनीं मुद्रितें शुद्ध करण्याच्या बाबतींत व संदर्भ-साहित्य-सूची तयार करण्याच्या कामांत मला आत्मीयतेनें जें बहुमोल साह्य केलें त्याबद्दल मी त्यांचा खरोखरीच ऋणी आहे.

पुणें, ता. १४-१-७१ **गंगाधर बाळकृष्ण सरदार**

अनुक्रमणिका

* * *

रा. श्री. कानिटकर

न मिळाल्यामुळें फार परिश्रम करूनहि त्यांचें सुरवातीचें लिखाण अगदीं निकृष्ट प्रतीचें उतरलें. त्याचा सविस्तर वृत्तान्त यथाक्रम येईलच. अर्वाचीन गद्याच्या घटनेंत प्राचीन गद्यवाङ्मयाचा प्रत्यक्ष संबंध फार थोडा आहे एवढेंच या ठिकाणीं दाखवावयाचें आहे.

[२]

(इ. स. १८००–१८२२)

मराठी मुद्रण कलेचा प्रारंभ : श्रीरामपूर मिशन

अर्वाचीन मराठी गद्यवाङ्मयाच्या पूर्वपीठिकेचा विचार करतांना हिंदुस्थानांतील मुद्रणकलेचा इतिहास लक्षांत घेणें अवश्य आहे. गेल्या सव्वाशें वर्षांच्या काळांत पद्यात्मक लेखनाची प्रथा मागें पडून गद्यरचनेच्या प्रवृत्तीला जोर चढण्याचें मुख्य कारण म्हणजे मुद्रणकलेचा प्रसार हें होय. एतद्देशीय भाषांत ग्रंथ छापण्याची कल्पना प्रथमतः मिशनरी लोकांस आली. हिंदी, बंगाली, मराठी, तामीळ, तेलगू इत्यादि निरनिराळ्या भाषांतून खिस्ती धर्मग्रंथांचीं भाषांतरें प्रसिद्ध करण्यासाठीं बंगदेशांतील ' बॅप्टिस्ट मिशन ' या खिस्ती धर्मप्रसारक मंडळीनें श्रीरामपूर येथें इ. स. १८०० त आपला स्वतःचा छापखाना काढला, व प्रांतोप्रांतींचे पंडित बोलावून त्यांच्याकडून हिंदुस्थानांतील प्रत्येक भाषेंत बायबलाचें भाषांतर करविण्याचा उपक्रम केला. या धर्मप्रसारक मंडळीचें नेतृत्व डॉ. विल्यम केरी या महापंडिताकडे होतें. एतद्देशीय पंडितांच्या साहाय्यानें त्यांनीं हिंदुस्थानांतील अनेक भाषांचें परिश्रमपूर्वक अध्ययन करून, चाळीस भाषांत बायबलाचीं भाषांतरें प्रसिद्ध केलीं व श्रीरामपुर मिशनचा संकल्प सिद्धीस नेला. ह्या प्रचंड योजनेंतूनच अर्वाचीन मराठी गद्यवाङ्मयाचा प्रवाह उगम पावला. डॉ. केरी यांनीं इ. स. १८०५ सालीं इंग्रजींत लिहिलेलें ' मराठी भाषेचें व्याकरण ' व ' सेंट मॅथ्यू ' हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध करून मराठी मुद्रणकलेचा पाया घातला.

डॉ. विल्यम केरी

डॉ. केरी यांचा जन्म इ. स. १७६१ त इंग्लंडमधील पालर्स्परी या लहानशा खेड्यांत झाला. यांचे वडील ह्या खेड्यांतील पॅरिश क्लार्क व शिक्षक होते. लहानपणापासून केरीला शास्त्रीय व ऐतिहासिक पुस्तकें वाचण्याची आवड होती. बालवयांतहि जलपर्यटनाच्या कल्पनेनें त्याला आनंद होई. घरच्या गरिबीमुळें वयाच्या चवदाव्या वर्षीं केरी यांनीं जोडे शिवण्याचा धंदा पत्करला. पोटासाठीं दिवसभर काबाडकष्ट करूनहि त्यांनीं आपला विद्याव्यासंग अखंड चालू ठेवला होता. याच

सुमारास त्यांनीं लॅटिन, डच, हिब्रू, ग्रीक, फ्रेंच इत्यादि भाषांचें ज्ञान संपादन केलें व खिस्ती धर्मग्रंथांचा मननपूर्वक अभ्यास केला. इ. स. १७९२ त केरी यांच्या धर्ममंदिरांतील उपदेशानंतर 'असत्यधर्मी मूर्तिपूजकांत पवित्र शास्त्राचा उपदेश 'बॅप्टिस्ट सोसायटी' (The Baptist Society for Propagating the Gospel Among the Heathen) या नांवाची संस्था स्थापन झाली व तिच्या विद्यमानें ईस्ट इंडिया कंपनीचे शिप-सर्जन डॉ. थॉमस व मि. केरी हे इ. स. १७९३ त शुभवर्तमानाचा प्रसार करण्यासाठीं हिंदुस्थानांत दाखल झाले. जहाजांत असतांनाच डॉ. थॉमस यांच्या साहाय्यानें केरी यांनीं बंगाली भाषेचा अभ्यास केला. हिंदुस्थानांत आल्यानंतर हे बंगालमध्यें मदनाबत्ती येथें निळीची लागवड करणारे शेतकरी म्हणून राहिले. त्यांनीं आपला मिशनरी पेशा उघड केला असता तर त्यांस कंपनी सरकारनें लागलीच हद्दपार केलें असतें. पांच-सहा वर्षांनंतर केरी यांस निळीचा कारखाना सोडावा लागला. पुढें काय करावें याचा विचार करीत असतांनाच त्यांना मि. मार्शमन, वॉर्ड व इतर कांहीं मिशनरी हिंदुस्थानांत आल्याची आनंददायक बातमी समजली. ब्रिटिश मुलखांत तर धर्मप्रचाराच्या कार्याला मनाई होती. यामुळें त्यांनीं डयानिश सत्तेखालीं असलेल्या श्रीरामपुर शहरीं आपलें ठाणें दिलें. श्रीरामपुर येथील गव्हर्नर कर्नल बाय यांची त्यांना पूर्ण सहानुभूति व पाठिंबा मिळाल्यामुळें त्यांचें कार्य पुष्कळच सुकर झालें. इ. स. १७९८ त त्यांनीं एक जुना लांकडी छापखाना व बंगाली टाईप विकत घेतले आणि सेंट मॅथ्यूचें शुभवर्तमान छापून प्रसिद्ध केलें.

फोर्ट विल्यम कॉलेज

इ. स. १८०० त लॉर्ड वेलस्ली यांनीं हिंदुस्थानांतील सनदी नोकरांस शिक्षण देण्यासाठीं कलकत्ता येथें 'कॉलेज ऑफ फोर्ट विल्यम' या नांवाचें महाविद्यालय स्थापिलें. त्यांत केरी यांस संस्कृत व बंगाली भाषांचे अध्यापक नेमले होते. या विद्यालयांत आरबी, फारशी, संस्कृत, बंगाली, हिंदी, तेलगू इत्यादि अनेक पौर्वात्य भाषा शिकविण्याची व्यवस्था करण्यांत आली होती.

> "In that institution more than fifty of the most eminent scholars of the East were collected together, and it was in this association that he (Dr. Carey) was enabled to discover the genius of Oriental philology and the true principles of translation." §

---

§ **John Clark Marshman—** *The History of Serampore Mission Vol. 1*–P. *180*.

इ. स. १८०३ त वसईचा तह होऊन मराठ्यांचे व इंग्रजांचे राजकीय संबंध जास्त दृढ झाले. यामुळें फोर्ट विल्यम कॉलेजांतील शिक्षणक्रमांत मराठी भाषेचाहि अंतर्भाव होऊन शिक्षकाच्या जागीं डॉ. केरी यांचीच नेमणूक झाली.

"The political relations that arose between the British Government and the Mahratta States, about the date of the institution of the College of Fort William, recommended the introduction of the study of the Mahratta tongue, and to Dr. Carey was assigned the office of teaching it. In this, as in the other dialects, elementary books were wanting, and Dr. Carey to use his own expressions, 'thought it his duty to do the utmost in his power towards facilitating its acquisition by attempting a grammar." †

मराठी भाषेचा पहिला वर्ग इ. स. १८०४ त सुरू झाला. ता. ९ फेब्रुवारी इ. स. १८०५ रोजीं कॉलेजचा चवथा बक्षीससमारंभ झाला, त्या वेळीं मराठी भाषेच्या परीक्षेंत उत्तीर्ण झालेला पहिला विद्यार्थी मि. ट्रावर यास एक सुवर्णपदक व १००० रुपये बक्षीस देण्यांत आले.

पंडित वैजनाथ शर्मा

यापूर्वींच श्रीरामपूर येथील मिशनऱ्यांचें मराठी भाषेकडे लक्ष गेलें होतें. ७ सप्टेंबर १८०३ च्या पत्रांत डॉ. केरी म्हणतात —

"We have also some thoughts of the Mahrattas. A Mahratta Pundit, whom we have retained, has made a beginning of some small portions of the scripture in that language, and the Devnagur letter will answer for that tongue, and the Hindustani as well as the Sanskrit." ‡

या पत्रांत ज्यांचा उल्लेख आला आहे, ते महाराष्ट्रीय पंडित वैजनाथ शर्मा हे होत. यांच्याच साह्यानें डॉ. केरी यांनी पंचपंत्र–हितोपदेशादि मराठी गद्यग्रंथ प्रसिद्ध केले. पंडित वैजनाथ हे कलकत्ता येथील नागपुरकर भोसल्यांचे वकील वेणीरामपंत यांचे आश्रित होते. हे मोठे संस्कृतज्ञ असून महाराष्ट्र भाषेंत निष्णात होते. डॉ. केरी यांचे सहाध्यापक म्हणून यांनीं फोर्ट विल्यम कॉलेजांत काम केलें. यांच्या हाताखालीं कित्येक युरोपियन गृहस्थ मराठी भाषेंत प्रवीण होऊन हिंदुस्थानांत प्रसिद्धीस आले. त्यांपैकीं नागपूरचे रेसिडेंट सर रिचर्ड जेन्किन्स हे होत. बायबलाच्या

---

† **E. Carey**— *Memoris of W. Carey. P. 564.*

‡ *Memorirs of W. Carey. P. 425.*

मराठी भाषांतराची तरफदारी करतांना श्रीरामपूर मिशनच्या इतिहासांत पंडित वैजनाथ यांच्या भाषाशास्त्राच्या ज्ञानाबद्दल खालील उल्लेख आढळतो.

"But the Mahratta version was more likely to be free from such inaccuracies than several others. It was executed under the eye of the Mahratta Pundit attached to the college of Fort William, who had been selected for the office, amid many competitors, for his superior attainments in Oriental philology." *

अर्वाचीन मराठी गद्यरचनेच्या ह्या आद्यप्रवर्तकाची यापेक्षां जास्त माहिती मिळूं नये हें आपलें दुर्दैव होय.

मराठी–ग्रंथ–प्रकाशन

श्रीरामपूर येथें इ. स. १८०५ त सेंटमॅथ्यू व मराठी भाषेचें व्याकरण (Grammar of the Mahratta Language to which are added—Dialogues On Familiar Subjects) हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. हींच मराठी भाषेंतील पहिलीं छापील पुस्तकें होत. हीं देवनागरी लिपींत छापलीं आहेत. यांपैकीं सेंट मॅथ्यूची एक प्रत फोर्ट विल्यम कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं महाराजा दौलतराव शिंदे यांच्याकडे ब्रिटिश रेसिडेंटमार्फत पाठविली होती. मराठी भाषेचें व्याकरण हें डॉ. केरी यांनीं इंग्रजींत लिहिलें होतें. स्टिफेन्स यांनीं लिहिलेल्या मराठी व्याकरणाची त्यांना माहिती होती, परंतु त्या वेळीं तें हिंदुस्थानांत उपलब्ध नसल्यामुळें या व्याकरणाची रचना डॉ. केरी यांना स्वतंत्रपणें करावी लागली. त्यानंतर इ. स. १८१० त त्यांनीं आपला मराठी-इंग्रजी कोश प्रसिद्ध केला. हा मोडी लिपींत छापला आहे. यांत सुमारें दहा हजार मराठी शब्दांचा समावेश केला आहे. या कोशाच्या इंग्रजी प्रस्तावनेंत डॉ. केरी यांनीं मराठी भाषेच्या अभ्यासाचें महत्त्व निवेदन केलें आहे. तसेंच ग्रंथाच्या अपूर्णतेची जाणीव व्यक्त करून शेवटीं पंडित वैजनाथ यांच्या साह्याचा निर्देश केला आहे.

श्रीरामपुर मिशनच्या विद्यमानें डॉ. केरी व पंडित वैजनाथ यांनीं प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें :—

१. सेंट मॅथ्यू (The Gospel of St. Matthew) पृ. १०८ इ. स. १८०५

२. मराठी भाषेचें व्याकरण (Grammar of The Mahratta Language to which are added Dialogues on Familiar Subjects) इ. स. १८०५

---

* *History of Serampore Mission Vol. II P. 445*

३. बायबल पांच भाग	इ. स. १८०७–२१	
४. मराठी-इंग्रजी कोश	इ. स. १८१०	पृ. ६५२
५. मंगळसमाचार (New Testament)	इ. स. १८११	
६. सिंहासनबत्तीसी	इ. स. १८१४	पृ. १८३
७. पंचतंत्र	इ. स. १८१५	पृ. २४९
८. हितोपदेश	इ. स. १८१५	पृ. २४८
९. राजा प्रतापादित्याचें चरित्र	इ. स. १८१६	पृ. १२८
१०. रघुजी भोसल्याची वंशावळी	इ. स. १८१६	पृ. १०३
११. मराठी भाषेंतील अस्सल पत्रसंग्रह	इ. स. १८१६	
१२. न्यू टेस्टॅमेंट (कोंकणी)	इ. स. १८१८	पृ. ७०६

याप्रमाणें डॉ. केरी व पंडित वैजनाथ यांनीं अर्वाचीन मराठी गद्यवाङ्मयाचा पाया घातला. यांतील बहुतेक पुस्तकें बंगाली भाषेंत प्रथम प्रसिद्ध झालीं होतीं. यांची भाषा आपल्या रोजच्या व्यवहारांतील भाषेप्रमाणें साधी व सुटसुटीत आहे. व्याकरणाच्या दृष्टीनें तिच्यांत पुष्कळ दोष आहेत. सिंहासनबत्तीशींतील खालील गोष्टीवरून श्रीरामपूर येथें प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांतील भाषेची कल्पना येईल.

" अवंती पुरींत् राजा विक्रमादीत्य साम्राज्य करीत् असे. यके दीवसीं राज्यानें सेवकांस आज्ञा केली तुम्ही कोणते देशाची कशी चरीत्र समझून या. चाकर राजाज्ञा पावून अवघे देशांत् भ्रमण करून् काश्मीर देशांत् पावलेत्. त्या देशांत धनवान् यके मनुष्याने मोट यक तळ केल आहे परंतु त्यांत् पाणी नसे. तदनंतर यके दिवसीं आकाशवाणी झाली उत्तम पुरुष कोण्ही जर आपल शरीर बळी दे तर या तळ्यांत् पाणी होईल् नाहीं तर होणार नाहीं. हे आकाशवाणी आयकून् त्या धनी मनुष्यानें दहा भार सोन्याचा यक पुरुष करून त्या तळ्याचे जवळ ठेवला. त्या स्थानी पाथरावर लीहून ठेवूल जो बळीचेसाठीं आपल शरीर देईल हा स्वर्ण पुरुष त्यास् देईन. अन्य देशाहून जे माणसं येतेत ते आपल शरीर बळी द्यायास स्वीकार करीत नाहीं. तो न सकून् परतून जातेत राजा विक्रमादित्याचे चाकराहीं हे अवूघ पाहून अवंती नगरांत् येऊन् राज्याचे समोर निवेदन केल. राजा हे अवूघी गोष्ट आयकून कौतुकास्तव काश्मीर देशास गेला. संध्याकाळीं तळ्याजवळ प्रच्छन्नवेश होऊन ईष्ट देवतेच चिंतन केल. तदनन्तर अर्धे रात्रीं राजा विक्रमादित्य कृतांजली होऊन् बोल्ला. अहो अवूघे देवता मी विनयपूर्वक निवेदन करीत आहे. नरबळीच रक्त पिऊन ज्या देवाची तृप्ती होते

तो देव माझ रक्त पिऊन तुष्ट होवो. हें म्हणून आपल शिर कापल. देवीने त्या क्षणी मस्तक शरीरावर ठेवून राज्यास् वांचवील आणि म्हटल अरे राजा तुला प्रसन्न झाले. वरप्रार्थना कर. राज्याने म्हटल अग देवी जर माझ्यावर प्रसन्न झालीस तर अवघे प्राणीचे उपकारासाठीं हे तळ पाण्याने पूर्ण कर. देवताने म्हट्ल अरे विक्रमादित्य तुझ अतिशय धार्मिकपण. तुझ्यावर अनुग्रह केला. हे म्हणून प्रत्यक्ष झाली. राजा आपले देशास् आला. काश्मीर देशाचे लोक प्रातःकाळी पाणीनें पूरल तळ पाहून विस्मीत् झालेत्. " ● ....

बालबोध मुक्तावलि–तंजावर

मराठी ग्रंथप्रकाशनाचा दुसरा अल्पसा प्रयत्न तंजावर येथील राजाश्रयाखालीं झाला. सरफोजी राजे यांनीं इ. स. १८०६ त सख्खन पंडिताकडून इसापनीतीचें मराठी भाषांतर करवून ' बालबोध मुक्तावलि ' या नांवानें छापलें. याची एक प्रत ब्रिटिश म्युझियममधील ग्रंथालयांत आहे. सरफोजींना दत्तक घेतल्यानंतर तुळाजी राजे यांनीं त्यांना डेनिश मिशनरी रेव्हरंड स्वार्त्झ यांच्या स्वाधीन केलें होतें. रेव्हरंड स्वार्त्झ यांनीं बालराजांचें पुत्रवत् पालन करून त्यांच्या सर्वांगीण उन्नतीला पोषक अशा तऱ्हेचें त्यांना शिक्षण दिलें. ते इंग्रजी अस्खलित बोलत. विविध विषयांवरील ग्रंथ प्रकाशित करण्यासाठीं त्यांनीं एक छापखानाहि काढला होता. त्यांतच वरील मराठी पुस्तक छापलें गेलें. " त्यांनीं आपली सर्व कारकीर्द, विद्याप्रसार, ग्रंथसंग्रह आणि विद्वत्समागम यांमध्यें घालविली असें म्हटलें तरी चालेल. त्यांनीं तंजावर येथें मोठमोठे विद्वान् पंडित जमवून व त्यांना उत्तेजन देऊन, त्यांच्याकडून कित्येक संस्कृत ग्रंथ, काव्यें व नाटकें तयार करविलीं. तंजावर येथील बृहदीश्वराच्या देवालयामध्यें प्राचीन चोल राजांनीं लिहिलेल्या शिलालेखाप्रमाणें सरफोजीराजे यांनीं आपल्या राजघराण्याचा संपूर्ण इतिहास मराठी शिलालेखामध्यें कोरून तयार केला आहे. तंजावरच्या राजवाड्यांत एक सरस्वतीमंदिर निर्माण करून, तेथें अनेक विषयांवरील प्राचीन ग्रंथ, ताम्रपत्रें, भूर्जपत्रें इत्यादि जमवून, प्रत्यक्ष विद्यादेवीस तेथें सदैव विहार करावयास लाविलें होतें. सरफोजीराजांचा तंजावर येथील ग्रंथसंग्रह पाहून पाश्चात्य विद्वान् थक्क होऊन गेले. डॉ. बर्नेलसारख्या जर्मन पंडितांनीं वर्षांच्या वर्षें खर्च करून त्या ग्रंथांच्या नामावली तयार केल्या आहेत. असा अपूर्व ग्रंथ-संग्रह करणाराची विद्याभिरुचि अवर्णनीय असली पाहिजे हें उघड आहे. " †

● सिंहासनबत्तीसी पृष्ठ ५९ – ६१

† **द. ब. पारसनीस**—तंजावरचें राजघराणें, पृ. ११६

डॉ. रॉबर्ट ड्रमंडकृत मराठीचें व्याकरण

मराठी–ग्रंथ प्रकाशनाचे वरील दोन्ही प्रयत्न बंगाल व मद्रास या परप्रांतांत झाल्यामुळें महाराष्ट्रांतील लोकांना त्याबद्दल माहिती असण्याचा संभव नव्हता. "Illustrations of the grammatical parts of the Guzerattee, Mahratta and English languages." इ. स. १८०८ त डॉ. रॉबर्ट ड्रमंड यांनीं हें पुस्तक मुंबईस कुरियर छापखान्यांत छापलें. हें इंग्रजींत लिहिलें असून मधूनमधून येणारा मराठी मजकूर मोडी लिपींत छापला आहे. डॉ. केरी यांचें व्याकरण या प्रांतांतील लोकांना दुर्मिळ असल्यामुळें आपण हें पुस्तक लिहिलें आहे, असें ड्रमंडसाहेबानें प्रस्तावनेंत म्हटलें आहे. या पुस्तकांत गुजराथी भाषेवर जास्त भर देऊन मराठी व्याकरण अगदीं थोडक्यांत लिहिलें आहे. संस्कृत व्याकरणाची परिभाषा सर्रास उपयोगांत आणिली आहे. उदा० अच्, हल्, तिगंत, सुबंत इत्यादि. शेवटीं लहानसा शब्दकोशहि जोडला आहे. मुख्यतः युरोपियन लोकांना मराठी शिकण्याच्या कामीं मार्गदर्शक म्हणून हें पुस्तक लिहिलें आहे.

ख्रिस्ती धर्मप्रसार व मराठी ग्रंथप्रकाशन

याच सुमारास ख्रिस्ती धर्मप्रसारकांची दृष्टि मुंबई इलाख्याकडे वळली. प्रथमतः लंडन मिशनरी सोसायटीचे दोन प्रचारक मुंबईस आले. त्यानंतर इ. स. १८१२ त हॅरिएट् न्युवेल (Harriet Newell) व ज्युडसन (Judson) हे अमेरिकन मिशनचे दोन प्रचारक कलकत्त्यास उतरले, व त्यांनीं इ. स. १८१५ च्या सुमारास मुंबईत आपलें कार्य सुरू केलें. इ. स. १८२२ त स्कॉटिश मिशनरी सोसायटीच्या लोकांनींहि मुंबईस ठाणें दिलें. अर्वाचीन महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व वाङ्मयीन इतिहासांत ह्या मिशनरी लोकांच्या चळवळीचें स्थान अत्यंत महत्त्वाचें आहे. त्यांनीं आपल्या कार्याची आंखणी फार दूरदर्शीपणानें केली होती. त्यांचें कार्यक्षेत्र व्यापक व बहुविध होतें. सामान्य लोकांच्या मनावर आपल्या उपदेशाचा परिणाम व्हावा म्हणून आपल्याला त्यांच्या मातृभाषेचाच अवलंब केला पाहिजे, हें लक्षांत घेऊन या धर्मोपदेशकांनीं मराठी भाषेचा अभ्यास केला. ख्रिस्ती धर्माची थोरवी पटवून देतांना ज्या धर्मविषयक कल्पनांचा ऊहापोह करावा लागणार त्यांचें आकलन होण्यासाठीं एतद्देशीय बहुजनसमाजाचा शैक्षणिक दर्जा वाढविणें जरूर होतें. यासाठीं मिशनरी लोकांनीं खेड्यापाड्यांतून शाळा स्थापन करून साक्षरता–प्रसाराचें कार्य प्रथम हातीं घेतलें. सामुदायिक शिक्षणाचा हा पहिला संघटित प्रयत्न कल्पनेबाहेर यशस्वी झाला. हळूहळू लोकांना शिक्षणाची गोडी लागत चालली व

मुलांमुलींची संख्या वाढत जाऊन लोकांकडून जास्त शाळांसाठीं तगादा सुरू झाला. विद्यार्थ्यांसाठीं लहान लहान क्रमिक पुस्तकांची उणीव भासूं लागली. ती तयार करण्याचें कामहि या धर्मोपदेशकांनाच करावें लागलें. तसेंच देशी भाषांत बायबलच भाषांतर करून त्याच्या प्रती खेड्यापाड्यांतून वांटणें हें मिशनरी लोकांच्या कार्याचें एक प्रमुख अंग होतें. यासाठीं अमेरिकन मिशनच्या लोकांनीं श्रीरामपूरहून देवनागरी टाइप आणविले व इ. स. १८१७ त बायबलच्या कांहीं भागांचें मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें. त्यांतील एका पृष्ठावरील मजकूर नमुन्यादाखल खालीं देत आहें.

पर्व ॥ १२ ॥ मात्थी २९

र माझे जोकड घ्या आणि मजपासीं शिका कां तर अंतःकरणामध्यें मी नम्र आणि लीन आहे आणि तुम्ही आपलें मनामध्यें विसांवा पावाल ॥ यास्तव कीं माझें जोकड सोपें आणि माझें वोझें हलकें आहे. ॥

पर्व ॥ १२ ॥ त्यासमई येशू शब्बाथामध्यें दाण्याचें शेतांतून जात असतां त्याचे शिष्ये भुकेले होऊन कणसें मोडून खाउं " §

याप्रमाणें मिशनरी लोकांनीं शिक्षणप्रसाराचें व शालोपयोगी आणि धार्मिक मराठी ग्रंथ प्रकाशित करण्याचें कार्य आरंभिलें. त्यांचा हेतु कसाहि असला तरी त्यांच्या या उपक्रमामुळें मराठी गद्यवाङ्मयाचें पाऊल पुढें पडण्याला थोडीफार मदतच झाली, हें मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं.

[३]

(इ. स. १८२२–१८३६)

विद्यादानाचा उपक्रम; बॉ. ने. ए. सोसायटी

मिशनरी लोकांची ही शैक्षणिक चळवळ यशस्वी होत आहे असें पाहून सरकारनेंहि त्या कामीं अधिक लक्ष घालण्यास सुरवात केली.* यापूर्वींच इ. १८१३ सालीं ब्रिटिश पार्लमेंटनें ईस्ट इंडिया कंपनीला नवी सनद देतांना तिच्या ४३ व्या कलमांत हिंदुस्थानांतील रयतेला शिक्षण देण्यासंबंधीं खालीलप्रमाणें स्पष्ट खुलासा केला होता.

---

§ **सुंदरराव भास्करराव वैद्य**—टॉमस ग्रॅहॅम पृ. ६४३. नवयुग जुलै १९१४

* **Rev. J. Murray Mitchell**— Recollections of my early missionary life. " *It was the success of mission schools that by and by led the Government to attend to the education of the masses.* "

" A sum not less than 1,00,000. Rs. should be spent every year for the revival and improvement of oriental literature, for the encouragement of the learned natives of India and for the introduction and promotion of the knowledge of the sciences among the inhabitants of the territories of British India. " †

या कलमांतील वार्षिक खर्चाची मर्यादा फक्त एक लक्ष रुपयांचीच असल्यामुळें शिक्षणप्रसाराच्या कार्याला विशेष जोर चढणें शक्य नव्हतें. इ. स. १८१५ सालीं गरीब लोकांमध्यें विद्याभिवृद्धि करावी, म्हणून एक 'विद्योत्तेजक सभा' (The society for promoting the education of the poor within the Government of Bombay) स्थापन झाली. परंतु तिच्या हातून चारपांच वर्षेंपर्यंत म्हणण्यासारखें कांहीं कार्य झालें नाहीं. यानंतर मुंबई इलाख्यांतील लोकप्रिय गव्हर्नर नामदार मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीं हा प्रश्न मोठ्या आस्थेनें हातीं घेतला. त्यांच्या प्रेरणेनें इ. स. १८२० सालीं बंगालमधील एज्युकेशन सोसायटीच्या धर्तीवर मुंबईत 'नेटिव स्कूल बुक आणि स्कूल सोसायटी' ही संस्था स्थापन झाली. तिचा मुख्य उद्देश देशी भाषांच्या द्वारें एतद्देशीय लोकांना शिक्षण द्यावें असा होता. लवकरच या सोसायटीला सालीना ५,००० पौंडांचें सरकारी साह्य मिळून तिचें कार्य सुरळीत चालूं झालें. मुंबई इलाख्यांत ठिकठिकाणीं मराठी व इंग्रजी शाळा स्थापन झाल्या आणि लोकांमध्यें विद्येची गोडी उत्पन्न व्हावी म्हणून सर्व बाजूंनीं प्रयत्न करण्यांत येऊं लागले. एल्फिन्स्टन साहेबांचें शिक्षणविषयक धोरण किती उदार आणि व्यापक होतें, हें त्यांच्या खलित्यांतील (minute) खालील उताऱ्यांवरून लक्षांत येईल.

" एतद्देशीय लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार होण्यास उपाय म्हटले तर असे आहेत. पहिला—त्यांच्या शाळांतून शिकविण्याची जी तऱ्हा आहे ती सुधारावी आणि शाळांची संख्या वाढवावी. दुसरा—शालोपयोगी पुस्तकें पुरवावीं. तिसरा—याप्रमाणें शिक्षणाची सोय करून दिली म्हणजे त्यांच्यांत खालच्या प्रतीचे जे लोक आहेत त्यांच्या मनांत आपण शिकावें असें यावें म्हणून त्यांना कांहीं तरी उत्तेजन द्यावें. चौथा—युरोपियन शास्त्रें आणि उच्च प्रतीच्या विद्येंत ज्या सुधारणा आहेत त्या शिकविण्याकरितां शाळा स्थापाव्या. पांचवा—नीतिशास्त्र आणि पदार्थविज्ञानशास्त्र यांवर देशभाषांत पुस्तकें तयार व्हावीं आणि तीं छापून प्रसिद्ध व्हावीं अशी तजवीज करावी. सहावा—इंग्रजी ही अभियुक्त भाषा (Classical language) म्हणून आणि युरोपमध्यें जे नवे नवे शोध लागतात त्यांचें ज्ञान संपादन करण्यास साधन म्हणून

---

† वि. ज्ञा. वि. पु. ४७, अं. १

ज्यांच्या मनांत ती शिकावें असें येईल त्यांना शिकविण्यास शाळा स्थापाव्या. सातवा–ह्या ज्या ज्ञानाच्या शाखा सांगितल्या त्या शिकविण्याविषयीं एतद्देशीय लोकांस उत्तेजन द्यावें. " *

पुणें–पाठशाळा

याच सुमारास पुणें येथेंहि विद्यादानाचें पवित्र कार्य आरंभिलें गेलें. " मेहेरबान मिस्तर चापलेनसाहेब, चीफ कमिशनर (मुख्य कारभारी) यांस असें वाटलें कीं, कांहीं तरी पुण्यांतील लोकांस विद्याधन द्यावें, म्हणून त्यांनीं सरकारांत असें लिहिलें कीं, " हिंदूंच्या विद्येचे जे उपयोगी भाग आहेत ते चांगल्या रीतीनें वृद्धिंगत करण्याकरितां एक विद्यालय घालावें. त्यास पैसे दक्षिणेसाठीं जे पन्नास हजार ५०,००० रुपये आहेत त्यांपैकीं वीस हजार रुपये निराळे काढून विद्याखात्याकडे द्यावें. " हें मंजूर होऊन आल्यावर सन १८२१ म्हणजे शा. शके १७४३ या सालीं येथें पाठशाळा स्थापिली. † या पाठशाळेंत ऋग्वेद, यजुर्वेद, न्यायशास्त्र, धर्मशास्त्र, व्याकरण, वैद्यक, अलंकार इत्यादि विषय शिकविण्यासाठीं गुरु व उपगुरु नेमिले होते. मुख्य अध्यापकाच्या जागीं न्यायशास्त्राचे गुरु राघवाचार्य यांची योजना करण्यांत आली होती. कालांतरानें वेदशाळा मोडून तिचें शास्त्रशाळेंत रूपांतर झालें. मराठी व इंग्रजी भाषांचे वर्गहि या पाठशाळेला जोडण्यांत आले. इ. स. १८३७ त या विद्यालयाच्या व्यवस्थापकाच्या जागीं मेजर क्यांडी साहेबाची नेमणूक झाली. कृष्णशास्त्री चिपळूणकर, नानाशास्त्री आपटे, महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री राजवाडे वगैरे याच पाठशाळेंतील विद्यार्थी पुढें महाराष्ट्रांत नांवारूपास आले.

सातारा विद्यालय

याच सुमारास सातारचे महाराज यांनींहि एक विद्यालय स्थापन केलें होतें. त्यांत इंग्रजी, मराठी, संस्कृत, आरबी, फारशी इत्यादि भाषा शिकविल्या जात. विद्यार्थ्यांची संख्या २४० (इ. १८३३–३४) होती. मुख्य अध्यापक माधवराव हे होते. हिंदुधर्मप्रकरणीं विल्सन साहेबांशीं ज्यांचा वाद झाला ते नारायणरावहि याच विद्यालयांत शिक्षक होते. ● महाराष्ट्राच्या इतर भागांतहि याप्रमाणेंच खासगी, सरकारी व मिशनरी लोकांच्या शाळा निघूं लागल्या होत्या. शिक्षणप्रसाराच्या या

---

* **कृ. ब. गोडबोले**—मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनसाहेब यांचें चरित्र उत्तरार्ध पृ. १२३

† **ना. वि. जोशी**—पुणें शहरचें वर्णन, पृ. ७४

● *Oriental Christian Spectator Vol. V (1834)*

उपक्रमाचा मराठी भाषेंतील तत्कालीन ग्रंथनिर्मितीशीं अत्यंत निकटचा संबंध असल्यामुळें त्याचा वृत्तान्त थोडक्यांत वर्णिला आहे.

मुंबई-शिक्षा-मंडळीचें जाहीर पत्रक

सामुदायिक शिक्षणप्रसाराचा हा प्रयत्न अगदीं नवीन असल्यामुळें शाळेंतील विद्यार्थ्यांसाठीं सुबोध पुस्तकें तयार करण्याचें कामहि ओघानेंच प्राप्त झालें. ' मुंबईच्या हैंद शाळा–शाळा पुस्तक मंडळी'नें मराठी व गुजराथी भाषांत स्वतंत्र किंवा भाषांतरात्मक ग्रंथ लिहिणाऱ्या उदयोन्मुख लेखकांना बक्षिसाच्या द्वारें उत्तेजन देण्याचें ठरवून ता. ८ एप्रिल १८२५ रोजीं इंग्रजी–मराठी–गुजराथी असें त्रैभाषिक पत्रक प्रसिद्ध केलें. त्यांत परभाषेंतील प्रौढ ग्रंथांचीं सुरस भाषांतरें, स्वतंत्र काल्पनिक ग्रंथ, आणि शालोपयोगी ग्रंथांचीं बालबोध भाषांतरें बक्षिसासाठीं मागविलीं होतीं. ' बालबोध ग्रंथ करणारांस शंभर रुपयांपासून चारशें रुपयेपर्यंत प्रतिपुस्तकी बक्षीस मिळेल व प्रौढ ग्रंथांचीं भाषांतरें करणारांस दोन हजार रुपयांपासून पांच हजार रुपयेपर्यंत बक्षीस मिळेल ' असें या पत्रकांत जाहीर केलें आहे. त्याबरोबरच पुस्तकांचे विषय आणि नांवेंहि सुचविलीं आहेत. शिवाय " इंग्रजी भाषेच्या पुस्तकांचें भाषांतर जे करितील त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं या देशांतील लोकांच्या चालीस व समजुतीस जसें नीट येईल तसें कोठें कोठें मूळ ग्रंथ थोडा फिरवून अर्थ संपूर्ण येईल असें केलें पाहिजे. " अशा तऱ्हेची सूचना केली आहे. भाषांतर करतांना प्रथमतः नेहमींच्या प्रचारांतील देशी शब्द वापरावे, त्यानंतर संस्कृत व फारशी भाषेंतील शब्द योजावे आणि शेवटीं जरूर तर इंग्रजी शब्द उपयोगांत आणावे असा शब्दयोजनेचा क्रमहि सांगितला आहे. या पत्राच्या प्रसिद्धीकरणाचा फार उपयोग झाला. बक्षिसाच्या आशेनें नवीन नवीन लेखक निर्माण होऊं लागले आणि त्यामुळें मराठी भाषेंत निरनिराळ्या विषयांवरील गद्यग्रंथांची भर पडत चालली.

मराठी व्याकरण

कोणत्याहि भाषेचा सांगोपांग व पद्धतशीर अभ्यास करणें, कोश आणि व्याकरण यांच्या साह्यानें पुष्कळ सुलभ होतें. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं मराठी भाषेंत या दोन्ही प्रकारच्या ग्रंथांची उणीव होती. डॉ. केरी व रॉबर्ट ड्रमंड यांनीं मराठी भाषेचीं व्याकरणें लिहिलीं होतीं, पण तीं इंग्रजींत असल्यामुळें निव्वळ मराठी जाणणाऱ्यांना त्यांचा फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता. यास्तव मुंबईच्या शिक्षा मंडळीचे सेक्रेटरी जॉर्ज जर्व्हिस यांनीं जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके आणि बाळशास्त्री घगवे या तिघां पंडितांना मराठी भाषेचें व्याकरण करण्याविषयीं आज्ञा केली. " त्याजवरून संस्कृत व्याकरणाध्ययनबलेंवरून (त्यांनीं) एक वर्षांत व्याकरण तयार केलें. परंतु तें केवळ बरोबर झालें नाहीं.

तथापि राहिल्ये विषयांस सूचक झालें." * रामचंद्रशास्त्री जान्हवेकर यांनीं या व्याकरणाचा प्रश्नोत्तररूप सारांश तयार केला. हीं दोन्ही व्याकरणें छापलीं गेलीं नव्हतीं. त्यांच्या हस्तलिखित प्रतीवरूनच बारा वर्षेपर्यंत काम चाललें. इ. स. १८३६ सालीं बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री फडके आणि दादोबा पांडुरंग या तिघां पंडितांनीं आपलीं तीन व्याकरणें प्रसिद्ध केलीं. या सर्वांत दादोबांचें व्याकरण उत्कृष्ट उतरलें आहे व तेंच पुष्कळ वर्षेपर्यंत शाळांतून चालू होतें.

महाराष्ट्र भाषेचा कोश

इ. स. १८१० सालीं डॉ. केरी यांनीं आपला मराठी–इंग्रजी कोश प्रसिद्ध केला; परंतु महाराष्ट्रांत त्याचा फारसा प्रसार झालेला नव्हता. कर्नल केनेडीसाहेबांचा कोशहि (इ. स. १८२४) लहान व अनेक दृष्टींनीं अपुरा होता. मुंबई येथें शिक्षामंडळीची स्थापना झाल्यानंतर लवकरच तिनें हें काम हातीं घेतलें. त्यासाठीं बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखाराम जोशी, दाजीशास्त्री शुक्ल आणि परशुरामपंत गोडबोले या पांच पंडितांची नेमणूक करण्यांत आली. त्यांनीं मोठ्या परिश्रमानें महाराष्ट्र भाषेचा सर्वांगसुंदर कोश तयार केला. हा इ. स. १८२९ सालीं प्रसिद्ध झाला. त्यानंतर इ. स. १८३१ त मोलस्वर्थ यांनीं आपला मराठी–इंग्रजी कोश छापला. अशा रीतीनें मराठी भाषेंतील महत्त्वाची उणीव अल्पावकाशांतच भरून निघाली.

संस्कृत व इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें

यानंतर सरकारी उत्तेजनानें व खासगी प्रयत्नानें संस्कृत आणि इंग्रजी भाषेंतील निरनिराळ्या ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें होऊं लागलीं. इंग्रजी गद्यालाहि प्रथमतः समर्थ व संपन्न होण्यासाठीं ग्रीक, लॅटिन, फ्रेंच वगैरे भाषांतील ग्रंथांचा आश्रय घ्यावा लागला. त्याप्रमाणेंच मराठी गद्य प्रारंभीं परभाषांतील वाङ्मयाच्या जोरावरच धष्टपुष्ट बनलें. विदुरनीति, सिंहासनबत्तीसी, वेताळपंचविशी इत्यादि ग्रंथांचे मराठी तर्जुमे तयार झाले. बाळमित्राच्या दोन्ही भागांचें मराठी भाषांतर प्रसिद्ध झालें. भाषांतरित ग्रंथांत मूळ ग्रंथांतील भाषासरणीचें प्रतिबिंब उमटणें अपरिहार्य आहे. संस्कृत पुस्तकांच्या भाषांतरांत मधून मधून सामासिक शब्द व संस्कृत भाषेच्या धर्तीवर शब्दप्रयोग आढळतात. संस्कृत पुस्तकांचीं भाषांतरें करणें एका दृष्टीनें बरेंच सुलभ होतें, परंतु इंग्रजीचें मराठीशीं फार कमी सादृश्य असल्यामुळें त्या भाषेंतील ग्रंथांचीं भाषांतरें करतांना मोठी अडचण पडे.

---

* **गंगाधरशास्त्री फडके**—प्रस्तावना. महाराष्ट्र भाषेचें व्याकरण (आवृत्ति चौथी.)

लिहिण्याची स्वतंत्र व सर्वमान्य अशी मराठी गद्यशैली अद्याप तयार झालेली नव्हती. त्यामुळें सामान्य व्यवहारांतील बोलण्याच्या भाषेचाच ग्रंथरचनेसाठीं उपयोग करावा लागला.

"So the only prose style which they had for a model was that of everyday speech. Now, the structure of speech is synthetic; that is, the speaker is always inclined to build up his sentences in the exact order in which his thoughts come into his mind. In conversation there is no time to consider and rearrange words, phrases, and clauses, one speaks as one thinks, and no one invariably thinks in correct complex sentences, nor speaks in such a way that improvement is unnecessary." †

कथाग्रंथ

इंग्रजीवरून केलेले बाळमित्र (दोन्ही भाग) व इसापनीति हे दोन्ही ग्रंथ फार चांगले उतरले आहेत. शब्दयोजना नेहमींच्या प्रचारांतील आहे. अगो ऑड, आगोतल्या, सांज, मातक्यान् इत्यादि कोंकणी शब्द मुबलक आहेत. शब्द-योजनेंत क्वचित् ग्राम्यताहि आढळते. दिव्याउजेडीं, जेवणघर, नेसूपंचा, पांखरें-विक्या इत्यादि सामासिक शब्द सुटसुटीत, गोड व अर्थपूर्ण आहेत. वाक्यरचना शिथिल स्वरूपाची आहे. वाक्यें लहान लहान पण अव्यवस्थित आहेत. शब्दांच्या क्रमाकडे जागोजाग दुर्लक्ष झालें आहे. कांहीं अध्याहृत शब्दांची जरूरी भासते, तर कांहीं ठिकाणीं अनावश्यक शब्दांच्या योजनेमुळें घोटाळा होतो. भाषा एकंदरींत साधी, अकृत्रिम, मनोहर व रसाळ आहे. परंतु तिच्यांत संस्कारशुद्धतेचा अभाव असून कमावलेलें कौशल्य व सफाई यांचा मागमूसहि नाहीं. पुष्कळ ठिकाणीं वाक्य-रचना व शब्दप्रयोग इंग्रजी भाषेच्या धर्तीवर गेले आहेत. उदा० १ माझे लहानगे धन्या, २ माझे लाडके मुलांनो ! काय सुखाचा दिवस आजचा होता, जर पोराचे द्वाड गुण याला विरजण नसते, ३ ईश्वरें मला तुजमध्यें दुसरा लेंक दिला आहे, ४ तूं आपल्ये उदार बापाची प्रतिमा आहेस, म्हणून माझें अत्यंत प्रीतिपात्र आहेस, जसा तो मला गुरुस्थानीं होता, इ. इत्यादि. मराठी गद्याच्या बाल्यदशेंत निर्दोष ग्रंथलेखनाची अपेक्षा करणें चुकीचें होईल. त्या काळाच्या मानानें बाळमित्र व इसापनीति यांची भाषाशैली 'सरळ, सुबोध व सुरम्य' होती, यांत शंका नाहीं. बाळमित्रांतील खालील उताऱ्यावरून त्या वेळच्या मराठी गद्यशैलीची कल्पना येईल.

---

† **C. Bullock—** *Introduction* — '*English Literary Prose in the making.*'

" एके आदितवारीं प्रातःकाळीं, अमृतराव, बापाबरोबर माहिमास मौज मारायासाठीं जावयास, सजून तयार झाला होता. तेथें जायाचें तें पूर्वी पंधरा दिवस त्याचे मनांत सर्वदा घोळत होतें. तो लवकर निजून उठत नसे, तो त्या दिवशीं कोंबडे आरवणी उठला. घरचे सगळये माणसांस उठविले; गाडीवानास ताकीत केली, आणि आपण न्हाऊन धुऊन सिद्धतेंत आहे; इतक्यांत आकस्मात् आकाश काळें झालें; अभ्रें दाट झालीं; मोठा वारा सुटला, त्याणें सर्व झाडें डोलूं लागलीं; आणि चोहोंकडे धुळीनें दिशा धुंद झाल्या. अमृतराव क्षणाक्षणां आंगण्यांत जाऊन आकाशाकडे पाही; फिरून माडीवर जाई तो तीन तीन पायऱ्या उडे, आणि सोकाजी आपला बाप, यास आशा देई किं, बाबा, कांहीं चिंता नाहीं, हें आतां सगळें जिकडे तिकडे जिरेल; आणि दिशा निर्मळ होतील. मला वाटतें किं आपण निघालों तरी चिंता नाहीं.

सोकाजीनें मुलाचीं भविष्यें ऐकून तसें केलें नाहीं. तो म्हणाला, बाबा, अंमळ वाट पाहिली पाहिजे; इतकें म्हणतो आहे तों विजा कडकडूं लागल्या; आणि मोठा पाऊस कोसळला. तेव्हां अमृतरावाचा पस्तावा जो झाला आहे, तो सांगतां येईना. तो म्हणाला हा जळला आजच कशास लागला. संध्याकाळचा प्रहर दिवसपर्यंत पाऊस पडून, मग जिकडे तिकडे निरभ्र झालें, आणि ऊन पडलें; झाडें पानें सगळीं टवटवीत दिसूं लागलीं. मग अमृतराव बहूत दिक होऊन राहिला होता; तो अंमळ हुशारींत आलासा पाहून बापानें त्यास महालक्ष्मीपर्यंत बाहेर फिरायास नेलें. तेव्हां हवेची स्वच्छता पाहून, पक्षांचे शब्द ऐकून, जिकडून तिकडून सुगंध येतो आहे तो घेऊन, त्याचा हृदयांस समाधान झालें. त्यास सोकाजी म्हणतो; पाऊस पडल्यानें सर्वत्र काय फेरफार झाला तो तूं पाहिलास ना ? कालच जिकडे तिकडे धुंद कसें दिसत होतें ? उष्मा काय होत होता ? सर्व व्याकुळ कसें झालें होतें ? इतकी जिकडे तिकडे टवटवी दिसायास काय प्रयोजन बरें ?

अमृतराव म्हणाला, " आजचा पाऊस. "

तो पाऊस भरून आला म्हणून सकाळीं चडफडत होता; त्यास ते शब्द उच्चारतां बहुत जाचले. तो लज्जित झाला; ते वेळेस बापाचे लक्षांत आले किं, यास ही गोष्ट समजली किं, जांत बहुतांचें कल्याण, ती गोष्ट आपलें अकल्याण होऊनहि झाली, तरी चांगली. ती करायाची आपल्ये वांट्यास जरी आली, तरी मोठे हौसेनें करावी, चडफडूं नये. " ×

× बाळमित्र भाग १ (आशाभंग) पृ. ३५५–५७

इतिहास

' मराठ्यांची बखर ', ' इंग्लंड देशाची बखर ', ' इंग्लंड देशाचें वर्णन ' वगैरे भाषांतरात्मक इतिहासग्रंथ याच सुमारास प्रसिद्ध झाले. ऐतिहासिक बखरींची परंपरा मराठी भाषेंत पूर्वींपासूनच चालू असल्यामुळें हीं भाषांतरें इतर ग्रंथांच्या मानानें सरस उतरलीं आहेत. विशेषतः मराठ्यांच्या बखरीची भाषा प्रौढ व भारदस्त आहे. या ग्रंथामधील एक उतारा खालीं सादर करितोंः—

" रायगडाहून तानाजी मालुसरे, माघ कृष्ण नवमीस, एक हजार मावळे लोक बरोबर घेऊन चोर वाटेनें रात्रीस सिंहगडाजवळ येऊन पोंहचतांच, त्या हजार लोकांचे दोन भाग करून, एका भागाचे पुढें चालविले, ते जेथें भिंतीसारिखा काळा दगड तीसतीस हात उंचीचा आहे तेथें जाऊन पोंहचले, आणि दुसऱ्या भागाचे अंमळसे मागून चालविले; ते कांहींसे मागें राहिले. जे पुढें जाऊन पोंहचले, त्यांतील कोणी एक चतुर माणूस आपल्ये कमरेस दोरीची शिडी बांधून घेऊन वर चढला, मग त्या शिडीवरून एकएक माणूस जाऊन तीनशें लोक चढले; आणि लपून राहिले; आणखी लोक चढत होते तों किल्ल्यांत कांहीं तयारीची गडबड होत आहे, असें समजून ते मावळे लोक एक माणूस आपलेकडे येतो आहे असें दृष्टीस पडतांच, त्याला आपल्ये लोकांस कांहीं शब्दादि खुणेनें वर्तमान कळवावयास वेळ न सांपडूं देतां मावळे यांणीं तत्काळ मारिला. असें अस्तांही किल्लेकरी अधिक सावधगिरींत आहेत असें मावळ्यांस वाटलें. तेव्हां जे जवळ मावळे होते ते येऊन तानाजी मालुसरा जिकडे ती गडबड होत होती तिकडे चालिला; तो कांहींसा पुढें गेला तों त्या किल्लेकऱ्यांनीं अकस्मात हिलालांचा व चुडीचा मोठा उजेड केला. तेव्हां ते रजपूत लोक तयार होऊन येतात, व कित्येक कंबरा बांधितात व मावळे त्यांवर चालून जातात, तों ते सारे एकसमयावच्छेदेंकरून, दृष्टीस पडले, तेव्हां तें युद्ध मोठ्या निकराचें झालें. त्यांत मावळ्यांपेक्षां रजपूत फार होते तरी मावळ्यांचा जय होईलसें दिसूं लागलें; इतक्यांत तानाजी मालुसरा पडला. तेव्हां मावळे लोक जिकडे दोरीची शिडी होती तिकडे पळून गेले, ते त्या भिंतीशीं जाऊन पोहचतात तों सुऱ्याजी मालुसरा तानाजीचा भाऊ, बाकी मावळे लोकांसहित येऊन पोहचला, तों हे लोक पळतात असें पाहून मोठ्यानें ओरडून निषेध करून बोलिला, कीं तुमचा बापाचें प्रेत महार नेऊन अमंगळ जागीं टाकतील; त्या दोषाचे अधिकारी मात्र तुम्ही व्हाल; आम्ही तर दोरीची शिडी तोडिली, आतां मोंगल तुम्हांला मारितील किंवा तुम्ही त्यांला माराल. असें म्हणून आपल्या बरोबरचे लोकांसहित त्या लोकांस पुनः युद्धास नेलें;

तेव्हां ते लोक एकदांच हरहर महादेव म्हणून मोंगलांचा पराभव करिते झाले, असा तो किला घेतला. मग दिवस उगवल्यावर असा ठिकाणा लागला कीं मावळे लोक तीनशें पडले; व रजपूत पांचशें पडले, यांखेरीज दोन तीनशें पडले; व रजपूत व पांचशे पडले; यांखेरीज दोन तीन तीनशें सुमारें रजपूत जीव घेऊन पळाले, ते किल्ल्याचे भिंतींवरून बाहेर उड्या टाकून मृत्यु पावले. " †

शास्त्रीय विषयांवरील प्राथमिक ग्रंथ

वैद्यक, ज्योतिष, खगोल इत्यादि विषयांवरील टिपणवजा पुस्तकें वगळलीं, तर मराठी भाषेत शास्त्रीय वाङ्मय मुळींच नव्हतें, असें म्हटलें तरी चालेल. प्रत्येक शास्त्राची परिभाषा नवीन बनविल्यावांचून गत्यंतर नव्हतें. इ. स. १८२८ त डॉ. मॅक्मेलन् यांनीं ' निदान ', व 'औषधकल्पनाविधि' हे दोन वैद्यकीय ग्रंथ इंग्रजीवरून तयार केले. त्यानंतर क्यापटन जॉर्ज जर्व्हिस यांनीं जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांच्या साह्यानें ' विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष या विषयांचे वाद ' (Preliminary treaties on the objects, advantages and pleasures of science) हें पुस्तक प्रसिद्ध केलें. ' यांत कित्येक विद्यांतील कांहीं विषयांची संक्षेपेंकरून दिशा मात्र दाखविली आहे. ' या ग्रंथांतहि परिभाषेची अडचण व्यक्त केलेलीच आहे. गौझाड, ज्वालाग्राही, भारमान, लंबपातळी, शीतोष्णतामापक यंत्र, हिमडोंगर, चेपण इत्यादि नवीन बनवलेले शब्द या पुस्तकांत आढळतात. याशिवाय सिद्धपदार्थ-विज्ञान (Physics) व शिल्पविद्या (Mechanics) या विषयांवरहि दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. अशा रीतीनें मराठी भाषेतील शास्त्रीय वाङ्मयाचा पाया घातला गेला. ह्या काळांतील शास्त्रीय ग्रंथांची भाषा फारच क्लिष्ट व बोजड आहे. ' विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष ' या ग्रंथामधील खालीं दिलेल्या उताऱ्यांवरून या विधानाची सत्यता पटेल.

" जिज्ञासेची केवळ पूर्ति; कालचेपेक्षां आज अधिक जाणणें; जें पूर्वीं गूढार्थ आणि दुर्बोध भासलें तें स्पष्ट समजणें; सामान्य सत्यतांचा विचार करणें; आणि वेगळाल्या पदार्थांस परस्परांशीं ताडणें, — ह्राच मनाचा संतोषकारी उद्योग आहे, आणि हा उद्योग तत्कालीन भोगावांचून, सर्व इंद्रियांचे वृत्तीस नीच कर्मासक्ततेंतून सोडवून, मोठ्या आणि उत्कृष्ट कर्मासक्त अशा करितो, स्वभावास पवित्र आणि निर्मळ करितो, आणि त्या स्वभावाचे उद्वृत्ततेचा दमनाविषयीं आत्म्यास सहाय होतो. " §

---

† मराठ्यांची बखर पृ. ६९ – ७०

§ विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष पृ. ४–५

" विद्येचे प्रथम पाठ बहुतजनास पहिल्यानें भयंकरस्वरूप दिसतात, हें सत्य आहे, कां किं, नित्याचें व्यवहारकर्म समजण्याविषयीं मनास जो यत्न पडतो, त्याहून विद्येचा पाठ समजायास कांहीं अधिक यत्न पाहिजे, परंतु बहुतच अधिक नको; आणि त्याच कारणास्तव विद्येचे अत्यंत उपयोगी भाग, म्हणजे जे बहुतकरून व्यवहारकामांवर लावितां येतात, त्यांचे शिकण्यास सुगमपणा न्यून आहे; आणि ते भाग मनास विशेषतः असंमिश्र उद्देश थोडे दाखवितात, याजकरितां ते शिकल्यावर हर्षहि न्यून आहे. त्याची गोष्ट सांगत्ये समयीं कल्पनेस सहाय्य करण्याविषयीं सांप्रत कांहीं आकृति द्यावयाची नाहीं; इंद्रिय-व्यापाराचे सहाय्यावांचून चित्ताचीच प्रार्थना करितों. परंतु जा सत्यता, विद्येकरून उघड होतात त्यांपासून जो हर्ष होतो तो अमूल्य आहे, हें मत विचार केल्यावांचून तिरस्कारूं नये. जे आधारविषय उघडून सांगितले आहेत, त्यांजकडे स्वस्थपणें केवळ अवधान मात्र द्यावें; आणि जांत व्यावहारिक कामाशीं किंवा कांहीं सिद्ध गोष्टीशीं संबंध नाहीं, असें कांहीं आम्ही सांगत नाहीं, असा विश्वास ठेविला असतां, जे पाठ तुम्ही शिकतां ते किती उपयोगी आहेत हें सत्वर तुमच्या ध्यानांत येईल, आणि ते समजायाविषयीं आणि स्मरणांत ठेवायाविषयीं तुमचें मन लागूं लागेल;" ‡

बॉम्बे बुक आणि ट्राक्ट सोसायटी

खिस्ती-धर्मप्रसारक चळवळीचें एक प्रमुख अंग म्हणून देशी भाषांत पुस्तकें प्रकाशित करण्यासाठीं इ. स. १८२७ त 'बॉम्बे बुक आणि ट्राक्ट सोसायटी'ची स्थापना झाली. तिच्या विद्यमानें पुढील पन्नास वर्षांत अनेक लहानमोठे ग्रंथ प्रसिद्ध झाले. याच सुमारास मुंबईचे प्रासिद्ध खिस्ती-धर्मप्रचारक जॉन् विल्सन व सातारा विद्यालयांतील अध्यापक नारायणराव यांचा हिंदुधर्मप्रकरणीं कडाक्याचा वाद झाला. नारायणरावांच्या मतांचें खंडन करण्यासाठीं विल्सनसाहेबानें हिंदुधर्मप्रसिद्धीकरणाचे दोन भाग प्रसिद्ध केले.

[४]

(इ. स. १८३६-१८५७)

मागील चौदा वर्षांच्या काळांत गद्यवाङ्मयाच्या वाढीला बरीच अनुकूल परिस्थिति निर्माण झाली. सरकारी व मिशनरी लोकांचे छापखाने निघाले. गांवोगांवीं इंग्रजी व मराठी शाळा स्थापिल्या गेल्या. व्याकरण आणि कोश यांची रचना झाली.

‡ विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष पृ. ५

अनेक लहानमोठीं शालोपयोगी पुस्तकें लिहिलीं गेलीं. इंग्रजी भाषेंतील शास्त्रीय ग्रंथांचीं भाषांतरें होऊं लागलीं. नवीन शिक्षण घेतलेल्या लोकांत मराठी भाषेविषयीं आस्था उत्पन्न झाली आणि त्यांपैकीं कित्येकांनीं आपल्या मगदुराप्रमाणें मायभाषेच्या वाङ्मय-संपत्तींत भर घालण्याचाहि प्रयत्न केला.

नियतकालिकांचा उगम

अर्वाचीन काळांत वृत्तपत्रांचा व मासिकांचा मान फार मोठा आहे. प्रत्यहीं चालू असलेल्या जगांतील घडामोडींची सामान्य जनतेला वेळोवेळीं माहिती करून देण्याला वृत्तपत्र हेंच एकमेव साधन आहे. लोकशिक्षणाच्या भरीव कार्याला आजपर्यंत मराठी मासिकांनीं पुष्कळच हातभार लाविला आहे. मराठी भाषेंत प्रथम बाळशास्त्री जांभेकर यांनीं हा उपक्रम सुरू केला. त्यांनीं ' दर्पण ' या नांवाचें साप्ताहिक व ' दिग्दर्शन ' या नांवाचें मासिक सुरू केलें. मराठी भाषेची प्रगति आरंभीं आरंभीं तरी बंगालीच्या पावलांवर पाऊल टाकून चालली होती असें दिसतें. पहिलें बंगाली मासिक इ. स. १८१८ त निघालें; व त्याचें नांवहि ' दिग्दर्शन 'च होतें. यानंतर गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन यांनीं इ. स. १८४० त ' प्रभाकर ' पत्र काढिलें. हें दर रविवारीं निघत असे. उत्तम मराठी लिहिण्याविषयीं भाऊ महाजन यांची फार ख्याति होती, त्यामुळें ' प्रभाकर ' पत्र लवकरच फार लोकप्रिय झालें. इ. स. १८४२ त मिशनरी लोकांनीं ' ज्ञानोदय ' नामक इंग्रजी-मराठी पाक्षिक सुरू केलें. त्यामधून वारंवार होणाऱ्या हिंदुधर्मावरील हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठीं ' उपदेश-चंद्रिका ', ' विचारलहरी ', ' धूमकेतु ' इत्यादि नियतकालिकें निघालीं. याशिवाय ' ज्ञानप्रसारक ', ' चंद्रिका ', ' त्रैमासिक ज्ञानदर्शन ', ' वर्तमानदीपिका ', ' सत्य-दीपिका ' इत्यादि अनेक मासिकें व वृत्तपत्रें त्या काळीं प्रसिद्ध होऊं लागलीं. अशा रीतीनें मराठी गद्यांत एका नवीन वाङ्मय-प्रकाराची भर पडली.

मराठी गद्य इ. स. १८२२–१८४०

इ. स. १८४० सालीं मुंबईची शिक्षामंडळी मोडून ' बोर्ड ऑफ् एज्युकेशन ' या नांवाची एक सभा सरकारनें स्थापन केली. बॉंबे नेटिव एज्युकेशन सोसायटी स्थापन झाल्याला अठरा वर्षें होऊन गेलीं. " इतक्या मुदतींत महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ-संग्रह जेवढा व्हावा तेवढा जरी झाला नाहीं तरी गद्यात्मक लेखनपद्धतींत बरीच सुधारणा झाली आणि अनेक विषयांवर उपयुक्त ग्रंथहि झाले. "* गणित, इतिहास, भूगोल, खगोल, वैद्यक इत्यादि विविध विषयांची माहिती पुस्तकरूपानें प्रसिद्ध होऊं लागली. मराठी गद्याचें क्षेत्र वाढत चाललें. नवीन नवीन शास्त्रीय व व्यावहारिक

* वि. ज्ञा. वि. पु. १० अंक ३

विषयांचें ज्ञान, महाराष्ट्राला मराठींतून मिळूं लागलें. ललित वाङ्मयापेक्षां प्रज्ञाप्रधान व विशेषत: शास्त्रीय ग्रंथलेखनावरच या काळांत जास्त भर दिला गेला.

प्राचीन मराठी कवितेचें प्रकाशन

प्राचीन मराठी कवितेचा संग्रह करून ती प्रकाशित करणें, गद्यवाङ्मयाच्या विकासाच्या दृष्टीनेंहि अत्यंत आवश्यक होतें. या बाबतींत पांडुरंग बापू जोशी पावसकर यांनीं प्रथम प्रयत्न केला. इ. स. १८४० त 'ज्ञानचंद्रोदय' मासिकाच्या द्वारें त्यांनीं जुनीं मराठी काव्यें प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला. त्यानंतर परशुरामपंत गोडबोले यांनीं इ. स. १८५४ त प्राचीन मराठी काव्यांतील निवडक वेंच्यांचा संग्रह करून 'नवनीत' या नांवानें प्रसिद्ध केला. ह्या 'काव्यामृताच्या भेल्याची' लोकांना किती चटक लागली हें त्या पुस्तकाच्या आजपर्यंत निघालेल्या अनेक आवृत्त्यांवरून लक्षांत येण्यासारखें आहे.

पतितपरावर्तन, पुनर्विवाह

इ. स. १८४० नंतर पतितपरावर्तन आणि पुनर्विवाह ह्या दोन महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांची चर्चा सुरू झाली. बाळशास्त्री जांभेकर यांनीं त्या काळाच्या समंजस शास्त्रीपंडितांच्या साह्यानें श्रीपत शेषाद्रि या खिस्ती झालेल्या इसमाला प्रायश्चित्त देऊन पुन: हिंदुधर्मांत घेतलें. या शुद्धीकरणाला जगद्गुरु श्रीशंकराचार्य मठ कोल्हापूर यांचीहि अनुमति मिळविली होती. यासंबंधींचा पत्रव्यवहार 'उपदेश'-चंद्रिका' मासिकांत प्रसिद्ध झाला आहे. बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रांत फार थोर पुरुष होऊन गेले. त्यांची बुद्धि अत्यंत कुशाग्र होती. विद्वत्ता, दीर्घोद्योग, धडाडी इत्यादि गुणांमुळें त्यांचें चरित्र त्या वेळच्या महाराष्ट्रीय तरुणांना आदर्शभूत वाटे. त्यांनीं मराठी भाषेंत अनेक वाङ्मय-प्रकार रूढ केले. त्यांचें बाळव्याकरण, भूगोल-विद्या, सारसंग्रह, हिंदुस्थानाचा इतिहास इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांच्यासारखा बहुश्रुत, विद्वान् आणि कर्ता सुधारक वयाच्या अवघ्या छत्तिसाव्या वर्षीं दिवंगत व्हावा हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय. इ. स. १८४१ त 'पुनर्विवाहप्रकरण' या नांवाचें एक लहानसें वीस पानी पुस्तक प्रसिद्ध झालें. त्यांत शास्त्रग्रंथांतील आधार देऊन पुनर्विवाहाची थोडक्यांत तरफदारी केली होती. याच सुमारास बेळगांवांत दोन पुनर्विवाह झाल्याचें वृत्तहि 'प्रभाकर' पत्रांत (२३ जानेवारी १८४२) प्रसिद्ध झालें होतें.

एकवीस वर्षांतील प्रगति

गेल्या छत्तीस वर्षांच्या मानानें या एकवीस वर्षांत मराठी गद्याचा प्रसार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झाला. पूर्वींच्या गद्यवाङ्मयांतील एकांगीपणा नाहींसा

होऊन त्यामध्यें विविधता आली. नवे नवे वाङ्मयप्रकार रूढ होत चालले. निरनिराळ्या शास्त्रीय विषयांची परिभाषा तयार होऊं लागली. भाषेंतील प्रचलित शब्दप्रयोग आणि वाक्यरचना यांना नियमबद्धतेची जोड मिळाली; आणि यथातथ्य रीतीनें लेखकाचें मनोगत व्यक्त करण्याचें सामर्थ्य मराठी गद्यांत निश्चितपणें येत असल्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं.

इ. स. १८५० त दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या मराठी भाषेच्या व्याकरणाची सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति प्रसिद्ध केली. या व्याकरणाची पहिली आवृत्ति निघाली, त्या वेळीं दादोबांचें वय अवघें बावीस वर्षांचें होतें. त्यामुळें त्यांत बरेच दोष व अपूर्णता राहणें स्वाभाविक होतें. ही आवृत्ति शक्य तितकी निर्दोष व शास्त्रशुद्ध करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. प्रस्तावनेंतील त्यांच्या खालील उद्गारावरून तिचें महत्त्व लक्षांत येईल. " पूर्वीं जें व्याकरण केलें होतें, त्याचे गुणदोष तदुपपन्न भिन्नाभिन्न विषयांचा न्यूनाधिकभाव, व त्या ग्रंथाच्या पूर्णतेस आणखी नवे नवे असे जे अनेक विषय, त्यांचे प्रतिपादक जे नियम, त्यांचा शोध आणि उपपत्ति यांचे सापेक्षत्व, या सर्व गोष्टींचें मी फार दिवस मनन करून, स्वशक्त्यनुसार हा ग्रंथ जितका पूर्णतेस नेववेल तितका नेऊन, विद्वज्जनांच्या आदरास पात्रीभूत करण्याचा उपाय शोधीत होतो...... पुढें जसजसा हा ग्रंथ शोधीत गेलों, तसतसा विस्तृत होऊन पुनः या ग्रंथाची केवळ नवी रचना करावी लागली." इ. स. १८५४ त रेव्हरंड बर्जेस यांनीं मराठी भाषेचे व्याकरण इंग्रजींत लिहिलें. जे. टी. मोलस्वर्थ यांनीं हातीं घेतलेलें इंग्रजी-मराठी कोशाचें काम तसेंच अर्धवट राहिलें होतें, तें मेजर कॅन्डी यांनीं सतत सहा वर्षें परिश्रम करून इ. स. १८४७ त पुरें केलें. इ. स. १८५३ त अनंतशास्त्री तळेकर यांचा संस्कृत प्राकृत कोश प्रसिद्ध झाला. या काळांत शास्त्रीय विषयांवर बरेच ग्रंथ निर्माण झाले. अर्थशास्त्रावर ' लक्ष्मीज्ञान ', ' संपत्तिविवेचन ', ' देशव्यवहारव्यवस्था ' आणि ' अर्थशास्त्र-परिभाषा ', वैद्यकावर ' निघंटप्रकाश ', ' शार्ङ्गधर वैद्यकग्रंथ '; हिंदुधर्मशास्त्रावर ' मिताक्षराव्यवहाराध्याय व मयूखदायभाग ' इत्यादि अनेक लहानमोठे शास्त्रीय ग्रंथ प्रसिद्ध झाले. याशिवाय पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, सृष्टिजन्य ईश्वरज्ञान, यंत्रशास्त्र इत्यादि विविध विषयांवर ग्रंथरचना झाली. निबंध, इतिहास, चरित्रें, गोष्टी इत्यादि वाङ्मयविभागांतहि हळूहळू भर पडत होती. इ. स. १८४८-५० या काळांत गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांनीं ' प्रभाकर ' पत्रांत शंभरांहून अधिक पत्रें प्रसिद्ध केलीं आणि त्यांत सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय, धार्मिक वगैरे निरनिराळ्या विषयांवरील आपली पुरोगामी विचारप्रणालि निर्भीडपणें लोकांपुढें मांडली. त्यानंतर विश्वनाथ नारायण, भवानी विश्वनाथ, गोविंद नारायण, बाबा पदमनजी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री राजवाडे, गणेशशास्त्री लेले इत्यादि

नवीन लेखक उदयाला आले आणि त्यांनीं मराठी गद्यवाङ्मयाला प्रौढ आणि भारदस्त स्वरूप देण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला.

उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा

मराठी गद्यवाङ्मयाच्या विकासाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें कारणीभूत झालेल्या तत्कालीन संस्थांविषयीं या ठिकाणीं थोडीबहुत माहिती देणें अवश्य आहे. इ. स. १८४८ त 'स्टूडण्ट्स् लिटररी अँड सायण्टिफिक सोसायटी' या नांवाची एक संस्था इंग्रजी शिक्षण घेतलेल्या कांहीं एतद्देशीय गृहस्थांनीं स्थापन केली. "उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा" ही वरील संस्थेचीच एक शाखा होती. तिचे पहिले अध्यक्ष दादोबा पांडुरंग आणि उपाध्यक्ष व चिटणीस महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर हे होते. "शास्त्रीय व व्यावहारिक विषय स्वभाषेमध्यें शुद्ध रीतीनें लिहितां यावे, व स्वदेशामध्यें उपयुक्त ज्ञानप्रसार व्हावा, हा या सभेचा मुख्य उद्देश" * होता. तिची बैठक दर पंधरवड्यास भरत असे. तींत कोणतरी विद्वान् व बहुश्रुत वक्त्याचें भाषण होई; किंवा एखादा होतकरू तरुण आपण लिहून आणलेला निबंध वाचून दाखवी. या सभेनें 'मराठी ज्ञानप्रसारक' या नांवाचें एक मासिकहि काढलें होतें, त्यांत वरील निबंध व व्याख्यानें प्रसिद्ध होत असत. या संस्थेच्या विद्यमानें पहिल्या वर्षी सात व्याख्यानें झालीं; व उद्योग, एकी, सत्य, सृष्टिसौंदर्य, मराठ्यांच्या उत्कर्षापकर्ष इत्यादि विषयांवर बारा निबंध वाचले गेले.

दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी

यानंतर इ. स. १८४९ त कर्नल फ्रेंच आणि क्याप्टन हार्ट या दोघांनीं मुंबई इलाख्यांतील अनेक थोर व उदार धनिकांच्या साह्यानें "दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी" या नांवाची दुसरी एक संस्था स्थापन केली. "हिचा मुख्य उद्देश असा होता कीं, इंग्रजी भाषेंतील उत्तम ग्रंथांचीं मराठी भाषांतरें करवावीं व तीं छापून मूळ किंमतीस लोकांना विकावीं. ग्रंथ पसंत करण्याचें काम सभासदांकडे सोंपविलें होतें. त्यांच्या सल्ल्याप्रमाणें इंग्रजी ग्रंथांची योजना होत असे." + या संस्थेचे पहिले अध्यक्ष नामदार विल्बी साहेब कौन्सिलर हे होते. या मंडळीनें बराच पैसा खर्च करून 'देशव्यवहारव्यवस्था', 'नाना फडणवीस यांची बखर', 'शास्त्रीयज्ञानदर्शन' इत्यादि मनोरंजक व उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध केले. परंतु आमच्या लोकांची अनास्था व उपेक्षाबुद्धि यांमुळे ह्या मंडळीचा उद्देश व्हावा तितका सफळ झाला नाहीं.

---

* मराठी ज्ञानप्रसारक पु. १

\+ वि. ज्ञा. वि. पु. १०, अंक ३

दक्षिणा प्रैज कमिटी

इ. स. १८५१ त पुणें येथें 'दक्षिणा प्रैज कमिटी' या नांवाची आणखी एक वाङ्‌मयोत्तेजक संस्था स्थापन झाली. पेशवाईत दरवर्षीं विद्वान् ब्राह्मणांस दक्षिणा वांटण्याची चाल होती. इंग्रजी राज्य स्थापन झाल्यानंतर आमच्यांतील सुधारलेल्या विद्वान् व वजनदार गृहस्थांच्या विनंतीवरून सरकारनें ती चाल बंद केली, व या द्रव्याचा विनियोग मराठी ग्रंथ-लेखनाला उत्तेजन देण्याकडे व "कॉलेजांत फेलो म्हणून शिष्य-गुरु नेमण्याकडे करावा असें ठरविलें." ह्या कामीं गोपाळराव हरी देशमुख यांची खटपट मुख्य होती. "त्यांनीं त्या वेळीं मराठी इंग्लिश वर्तमानपत्रांतून यांविषयीं वारंवार लिहून लोकांचे व सरकारचे डोळे उघडले." वरील सरकारी ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठीं 'दक्षिणा प्रैज कमिटी'ची स्थापना झाली. या सभेचे उद्देश, "उपयुक्त विषयांवर मराठी भाषेंत नवे नवे ग्रंथ तयार करवावे, होतकरू ग्रंथकारांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें बक्षिसें द्यावीं आणि महाराष्ट्रभाषा प्रौढ आणि ऊर्जितदशेस आणावी" × असे होते. या कमिटीच्या प्रोत्साहनानें मराठी भाषेंत कांहीं उपयुक्त गद्यपद्यात्मक ग्रंथ प्रसिद्ध झाले; परंतु कमिटीच्या कार्याला अपेक्षेप्रमाणें यश आलें नाहीं, हें मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं.

याशिवाय परमहंससभा, कल्याणोन्नायक मंडळी, ज्ञानप्रकाशसभा इत्यादि संस्था त्या काळीं आपआपल्या परीनें महाराष्ट्राची सेवा करीत होत्या. इ. स. १८५४ त सरकारी विद्याखातें निर्माण झालें. इ. स. १८५७ त मुंबई विद्यापीठाचीहि स्थापना झाली. परंतु त्यापासून मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें कांहीं विशेष लाभ झाला नाहीं, हें येथें नमूद करणें भाग आहे.

इ. स १८५७ त मोलस्वर्थकृत मराठी–इंग्रजी कोशाची दुसरी आवृत्ति निघाली. तिला जोडलेल्या विल्सन साहेबाच्या निबंधांत गेल्या अर्ध शतकांतील मराठी वाङ्मयाविषयीं खालील उल्लेख आढळतो. त्यावरून अर्वाचीन मराठी वाङ्मयाचें वैशिष्ट्य ध्यानांत येईल.

> " With the establishment of the English Government in Dakhan and Konkan, on the fall of the Peshwah's Government in 1818, a new era in Marathi literature commenced. It is not as yet an era of poetry, but of prose, and that to a great extent, especially where early translations are concerned, of a rugged character. It is destined, however, in the good providence of God, to be one of great importance.

× वि. ज्ञा. वि. पु. १०, अंक ३

Religion and philanthrophy are the moving powers in generating and extending what may be denominated the reformed authorship of the Maharashtra, as well as that of other provinces in India. "

याच कोशाच्या प्रस्तावनेंत गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी भाषेच्या प्रगतीसंबंधीं खालील अभिप्राय व्यक्त केला आहे.

" Above a quarter of a century has elapsed since the publication of the Marathi and English Dictionary. During this period (1831–57) much attention has been directed, and as well of natives as of Europeans and Americans, towards the culture of the Marathi language and the formation of a Marathi literature. General grammar has been studied; the grammar of the Marathi has been evolved and set in order, and terms of science and art have been created by translators and teachers. "

[५]

(इ. स. १८५७ ते १८७४)

कथा-कादंबऱ्या

मागील एकवीस वर्षांच्या काळांत मराठी भाषेमध्यें मुख्यतः शालोपयोगी व शास्त्रीय ग्रंथच प्रसिद्ध झाले. ह्या सतरा वर्षांत मात्र ललितवाङ्मयाच्या निर्मितीला अल्प प्रमाणावर कां होईना, पण प्रारंभ झाला. इ. स. १८५७ त बाबा पदमनजी यांनीं ' यमुनापर्यटण ' या नांवाची मराठी भाषेंतील पहिली स्वतंत्र कादंबरी लिहिली. त्यानंतर मुक्तामाला, रत्नप्रभा, मंजुघोषा, सुहास्यवदना, विचित्रपुरी, चंपकमाला इत्यादि अनेक अद्‌भुतरम्य कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. या सर्व कादंबऱ्यांचा शेवट आनंदांत झाला आहे. ' राजा मदन ' हीच काय ती त्या काळांतील एक दुःखपर्यवसायी कादंबरी आहे. इ. स. १८७१ त गुंजीकरांची ' मोचनगड ' ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाली. या काळच्या सगळ्या कादंबऱ्या कथानकप्रधान आहेत. स्वभावरेखनादि कलात्मक अंगांचा त्यांत लवलेशहि नाहीं. अद्‌भुतरम्यता हेंच काय तें त्याचें सारें भांडवल; आणि त्यावरच त्यांनीं आपला लोकरंजनाचा कार्यभाग कसाबसा साधला. याशिवाय इंग्रजी भाषेंतील कांहीं कल्पित गोष्टींचीं भाषांतरेंहि या काळीं प्रसिद्ध झालीं. त्यांतील कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचीं " आरबी

भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी " आणि ' रासेलस ' हीं दोन भाषांतरें उत्कृष्ट वठलीं आहेत. त्याप्रमाणेंच 'शेरास सव्वा शेर ', ' विलक्षण न्यायचातुर्य ', ' इलिझाबेथ ', ' रिचर्डसन चरित्र ' इत्यादि भाषांतरात्मक ग्रंथहि सरस उतरले आहेत.

नाटकें

कादंबऱ्यांप्रमाणेंच मराठी नाट्य—वाङ्मयाचा उगमहि याच काळांत झाला. परशुरामपंत गोडबोले, कृष्णशास्त्री राजवाडे, गणेशशास्त्री लेले वगैरे पंडितांनीं संस्कृत भाषेंतील उत्तमोत्तम नाटकांचीं मराठींत भाषांतरें करण्याचा उपक्रम केला. शेक्सपीयरच्या नाटकांचा रसास्वाद मराठी वाचकांना घेतां यावा म्हणून महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं ' अथेल्लो ' या नाटकाचें मराठी भाषांतर केलें. त्यानंतर काशीनाथपंत नातू यांचें ' विजयसिंग ' नाटक (जुलियस सीजरचें भाषांतर) प्रसिद्ध झालें. विनायक जनार्दन कीर्तने यांनीं विद्यार्थिदशेंतच ' थोरले माधवराव पेशवे ' आणि ' जयपाळ ' हीं दोन नाटकें लिहून मराठी भाषेंतील स्वतंत्र नाट्य-वाङ्मयाचा पाया घातला. या काळांतील पुष्कळशीं नाटकें भाषांतरात्मक आहेत आणि स्वतंत्र नाट्यग्रंथांतहि पौराणिक नाटकांचाच भरणा अधिक आहे. या नाटकांत तंत्रशुद्धतेचा लेशहि नाहीं. केवळ संवादरूप असल्यामुळेंच त्यांना नाट्य-वाङ्मयांत स्थान मिळालें. ' मनोरमा ' आणि ' स्वैरसकेशा ' हीं दोनच सामाजिक नाटकें लिहिलीं गेलीं आणि त्यांत ह्या काळांतील विधवा-विवाहाच्या चळवळीचें प्रतिबिंबहि पडलें आहे. याशिवाय ' अफझलखानाच्या मृत्यूचें नाटक ', ' झांशीच्या राणीचें नाटक ', ' श्रीमिल्लिणी ', 'सायुज्यसदन', ' हंसपालिका ' इत्यादि अनेक नाटकें या काळीं प्रसिद्ध झालीं; पण त्यांत वाङ्मयाच्या खऱ्या कसोटीला उतरेल असें एकहि नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

निबंध

या काळांतील निबंध-वाङ्मय बव्हंशीं नियतकालिकांतून प्रसिद्ध झालें. गोविंद नारायण, भवानी रामकृष्ण, बाळ मंगेश वागळे, जनार्दन सखाराम गाडगीळ, विनायक जनार्दन कीर्तने, महादेव मोरेश्वर कुंटे, इत्यादि लेखकांनीं धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, औद्योगिक वगैरे निरनिराळ्या विषयांवर ' मराठी ज्ञानप्रसारकांत ' लहान लहान पण मुद्देसूद व मार्मिक निबंध लिहिले. त्यांची रचना सामान्यतः इंग्रजी भाषेंतील शालेय निबंधांच्या धर्तीवर आहे. भवानी विश्वनाथ यांचा ' मुंबईंतील सुशिक्षित तरुण हिंदु लोक ' हा निबंध, फारच उत्कृष्ट वठला आहे. याशिवाय ' हिंदु लोकांचा मध्यन्तरीय अवस्थेविषयीं विचार ', ' सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध ', ' नावल व नाटक ह्याविषयीं निबंध ', ' आमचें कर्तव्यकर्म कोणतें ' इत्यादि निबंध या काळीं लिहिले गेले.

पुनर्विवाह

इ. स. १८६४-७४ या दहा वर्षांत पुनर्विवाहाच्या प्रश्नावर महाराष्ट्रांत मोठी खडाजंगी झाली. दोन्ही पक्षांच्या अभिमान्यांनीं लेख, व्याख्यानें, वादविवाद इत्यादि साधनांच्या द्वारें आपआपला मतप्रचार जोरांत सुरू केला होता. विश्णुशास्त्री पंडित यांनीं इ. स. १८६५ त गोपाळराव देशमुख व महादेव गोविंद रानडे यांच्या सहकार्यानें 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी' ची स्थापना केली; आणि तिच्या विद्यमानें कांहीं पुनर्विवाहहि घडवून आणिले. या विषयावर अनुकूल–प्रतिकूल असे 'विधवा-विवाह', 'विधवाविवाहखंडन' 'विधवाविवाह–निषेध', 'विश्वस्तोद्वाहकलिका' इत्यादि सात-आठ ग्रंथ ह्या दशकांत प्रसिद्ध झाले.

जोतिबा फुले

जोतिबा फुले यांनीं 'ब्राह्मणाचें कसब' (इ. स. १८६९) व 'गुलामगिरी' (इ. स. १८७३) हीं दोन पुस्तकें लिहून ब्राह्मणांच्या सामाजिक वर्चस्वावर जोराचा हल्ला चढविला, आणि खालच्या जातींतील लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून दिली. 'एका हिंदूनें' लिहिलेला 'जातिभेदविवेकसार' हा ग्रंथहि त्यांनींच प्रसिद्ध केला. संघटित रीतीनें आपल्या मतांचा प्रचार करतां यावा म्हणून त्यांनीं इ. स. १८७३ त सत्यशोधक समाजाची स्थापना केली. मिशनरी लोकांच्या आहारीं गेल्यामुळें त्यांचें प्रचारात्मक लिखाण द्वेषमूलक झालें असलें, तरी त्यांत ब्राह्मणांच्या जळजळीत द्वेषाबरोबरच दलित वर्गाविषयींची तीव्र तळमळहि दिसून येते ही गोष्ट मान्य केल्या-वांचून गत्यंतर नाहीं.

इतिहास–चरित्रें

हिंदुस्थानच्या इतिहासाविषयीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत एल्फिन्स्टन-माल्कम-मरे-मॉरिस या परकीय इतिहासकारांच्या ग्रंथांची भाषांतरेंच माहितीच्या व मांडणीच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. विष्णु गोपाळ भिडे यांनीं "श्रीमंत छत्रपति शिवाजी महाराज यांच्या वंशाचा व प्रतिनिधि आणि अष्टप्रधान यांचा इतिहास" (इ. स. १८६६) हा स्वतंत्र ग्रंथ लिहिला. नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं 'ग्रांट-डफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका' करून स्वदेशाच्या इतिहासाचा आस्थापूर्वक अभ्यास करण्याची दिशा दाखवून दिली. इंग्लंड, ग्रीस, रोम या देशांचेहि संक्षिप्त इतिहास प्रसिद्ध झाले. हिंदुस्थानांत होऊन गेलेल्या असंख्य थोर पुरुषांपैकीं नाना फडणवीस, राजा राममोहनराय आणि विष्णुबावा ब्रह्मचारी या तिघांचींच चरित्रें या काळीं प्रसिद्ध झालीं. महाराष्ट्रांतील उदयोन्मुख लेखकांना शिवाजी महाराज, पहिले बाजीराव, महादजी शिंदे, सदाशिवरावभाऊ इत्यादि पराक्रमी वीरांचीं चरित्रें

लिहिण्याची इच्छा झाली नाहीं. उलट इंग्रजी भाषेंतील चरित्र-ग्रंथांची भाषांतरें करण्यांतच त्यांनीं धन्यता मानली.

व्याकरण–कोश–साहित्यशास्त्र

कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं व्याकरणशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास करून 'मराठी भाषेचें नवीन व्याकरण' लिहिलें. त्यांत त्यांनीं शब्दविचार, वाक्यविचार, पद्यविचार आणि संस्कृत व प्राकृत भाषांशीं मराठीचा निकट संबंध यांचें विवेचन करून, शेवटीं प्राकृत भाषेचें संक्षिप्त व्याकरण आणि संस्कृत–प्राकृत शब्दकोशहि दिला आहे. रघुनाथ भास्कर गोडबोले; विष्णु परशुराम पंडित, रावजी केशव सांबारे, बाबा पदमनजी, श्रीकृष्णशास्त्री तळेकर आणि माधव चंद्रोबा यांनीं निरनिराळे कोश तयार करून मराठी कोशग्रंथांत बरीच भर घातली. वृत्तदर्पण, रसमाधव आणि साहित्यशास्त्र हे साहित्यविषयक ग्रंथ या काळीं प्रसिद्ध झाले.

धर्म-नीति-तत्त्वज्ञान

धर्म, नीति व तत्त्वज्ञान या विषयांवरील बहुतेक ग्रंथ टीकात्मक अथवा भाषांतरित आहेत. विष्णुबावा ब्रह्मचारी यांचा 'वेदोक्त–धर्मप्रकाश' हा ग्रंथ स्वतंत्र असून त्यांतील विवेचनपद्धति नावीन्यपूर्ण आहे. रघुनाथशास्त्री पर्वते यांनीं 'भाषा-विवृत्ति' या नांवाची गीताशास्त्राची प्राकृत टीका प्रसिद्ध केली. याशिवाय मार्तिन हौग यांचे 'वेदावरील निबंध', 'वेदान्तसाराचें मराठी भाषांतर,' 'महाभारत ग्रंथांतील राजधर्म', 'पंचदशी या ग्रंथाची महाराष्ट्र व्याख्या' इत्यादि धार्मिक व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ या काळीं लिहिले गेले. ब्राह्मधर्मासंबंधीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. पाश्चात्य तत्त्वज्ञानासंबंधीं मात्र एकहि ग्रंथ लिहिला गेला नाहीं.

शास्त्रीय वाङ्मय

शास्त्रीय वाङ्मयांतहि या सतरा वर्षांत बरीच भर पडली. कृष्णशास्त्री भाटवडेकर यांनीं संस्कृत भाषेंतील 'वैद्यावतंस', 'वैद्यजीवन,' वैद्यामृत', 'माधवनिदान' इत्यादि वैद्यकीय ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें केलीं. पाश्चात्य वैद्यकासंबंधींहि इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें 'वैद्यतत्त्व', 'न्यायवैद्यक', 'शस्त्रवैद्यक', 'बालरोगचिकित्सा', 'गर्भविद्या आणि प्रसूतिकरण', इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध झाले. भिकाजी अमृत चोभे यांनीं 'मानुषशारीरशास्त्र' आणि 'मानुषइंद्रियविज्ञानशास्त्र' हीं दोन पुस्तकें लिहिलीं. 'ग्रहसाधनाचीं कोष्टकें', 'ज्योतिःशास्त्र', 'आकाशसौंदर्य,' 'तिथिचिंतामणि' इत्यादि ज्योतिषविषयक ग्रंथ लिहिले गेले. 'हिंदु धर्मशास्त्र', 'महमदीशास्त्र', 'अपकृत्यशास्त्र', 'प्रमाणशास्त्र' इत्यादि कायद्याचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं. याशिवाय

पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, शिल्पशास्त्र, नौकानयशास्त्र, मल्लविद्या, शिवणकला, संगीत, फोटोग्राफी, इत्यादि विषयांवर अनेक लहानमोठे ग्रंथ लिहिले आहेत. यांतील बहुतेक पुस्तकें भाषांतरवजा आहेत. तरीपण त्यांच्यामुळेंच मराठी भाषेंत निरनिराळ्या शाखांची परिभाषा तयार होऊं लागली, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

नियतकालिकें

या काळांत मराठी भाषेंत बरींच नियतकालिकें निघालीं, त्यांपैकीं पुणें पाठशालापत्रक, विविधज्ञानविस्तार, दंभहारक आणि ज्ञानसंग्रह या चार मासिकांचा प्रामुख्यानें उल्लेख करणें जरूर आहे. यांमधून प्रसिद्ध झालेल्या विविध विषयांवरील प्रौढ व भारदस्त लेखांनीं मराठी गद्यवाङ्मयांच्या या विभागाला फार चांगलें वळण लाविलें. वृत्तपत्रसृष्टींत ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश आणि इंदुप्रकाश हीं तीन पत्रें ठळकपणें लक्षांत येण्यासारखीं होतीं.

प्राचीन ग्रंथ-प्रकाशन

माधव चंद्रोबा यांनीं इ. स. १८६० सालीं प्राचीन काव्यांचें परिश्रमपूर्वक संशोधन करून, तीं ' सर्वसंग्रह ' मासिकाच्या द्वारें प्रकाशित करण्याचा उपक्रम केला; आणि पुढील सात आठ वर्षांत समग्र आर्याभारत व आनंदतनय, वामन पंडित, तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर, वगैरे प्राचीन कवींची बरीच कविता प्रसिद्ध केली. इ. स. १८६९ त विष्णुशास्त्री पंडित आणि शंकर पांडुरंग पंडित यांनीं तुकारामाचा गाथा चिकित्सापूर्व शोधून छापला. याशिवाय बापू हरशेट देवळेकर, विठ्ठल सखाराम अग्निहोत्री आणि नारो आप्पाजी गोडबोले यांनीं बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मराठी काव्यें प्रकाशित केलीं. तसेंच चौबळ, बापट आणि दिघे यांनीं ' रामदासस्वामींची बखर ' प्रसिद्ध करून अर्वाचीन महाराष्ट्राला प्राचीन गद्याची प्रथम ओळख करून दिली.

संकीर्ण वाङ्मय

' मुंबईचें वर्णन ' व ' पुणें शहरचें वर्णन ' हे दोन स्थलवर्णनात्मक ग्रंथ आणि ' प्रसिद्ध स्थळें, ' ' इंग्लंडांतील प्रवास ', ' गोकर्णमहाबळेश्वराच्या यात्रेप्रकरणीं वृत्तान्त ' आणि ' काशीयात्रा ' हीं प्रवासवर्णनपर पुस्तकें या काळीं लिहिलीं गेलीं. मोरोपंतांच्या केकावलीवर दादोबांची ' यशोदापांडुरंगी ' आणि परशुराम तात्यांचा ' केकादर्श ' हे दोन टीकाग्रंथ प्रसिद्ध झाले. याशिवाय ' निःशास्त्रवादपरीक्षा ,' ' बालोपयोगी सर्वसंग्रह ', ' शृंगारशतक ' (गद्य-भाषांतर), ' मधुक्षिका ' ' गद्य-रत्नावलि ' इत्यादि अनेक प्रकारचीं पुस्तकें या काळांत छापलीं गेलीं.

[६]

मालापूर्वकालीन मराठी गद्याचा आपण थोडक्यांत आढावा घेतला. या काळांतील गद्यलेखकांनींच अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा पाया घातला. उच्च वाङ्मयाच्या कसोटीला जरी त्यांचे ग्रंथ उतरले नाहींत, तरी त्यामुळें त्यांचें ऐतिहासिक महत्त्व मुळींच कमी होत नाहीं; आणि म्हणून मराठी साहित्याच्या अभ्यासकानें त्यांची उपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. मालापूर्वकालीन गद्यवाङ्मय प्रायः भाषांतरात्मक आहे. त्यांतील स्वतंत्र ग्रंथांची संख्या फार थोडी आहे आणि याचें कारणहि अगदीं उघड आहे.

मराठी गद्याची पुनर्घटना

पेशवाईच्या अस्तानंतर महाराष्ट्रांतील बहुसंख्य लोक केवळ शरीरानेंच नव्हे तर मनानेंहि गुलाम झाले होते. मानसिक दास्याच्या त्या दूषित वातावरणांत प्रतिभेच्या स्वैर संचाराला थोडादेखील वाव मिळणें शक्य नव्हतें. कोणत्याहि गोष्टीचा स्वतंत्र दृष्टीनें विचार करण्याची कुवतच आमच्यांत राहिली नव्हती. आमच्यांतील आत्मविश्वास समूळ नाहींसा झाला होता. यामुळें स्वाभाविकपणें प्रत्येक बाबतींत आम्हांला परकीयांच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय जडली. वाङ्मयाच्या क्षेत्रांतहि हाच प्रकार अनुभवास आला. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांतील नवशिक्षित तरुण इंग्रजी भाषेची वाङ्मयसंपत्ति पाहून दिपून गेले. या प्रभावशाली वाङ्मयाचें साह्य घेतल्याशिवाय मराठी भाषेचा तरणोपाय नाहीं अशी त्यांची खात्री पटली. आपल्या मातृभाषेचें वाङ्मयीन दारिद्र्य दूर करण्याचा त्यांनीं निश्चय केला आणि ते इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें मराठी भाषेंत नवीन ग्रंथरचना करण्याच्या प्रयत्नास लागले.

जातिवंतपणाचा अभाव

इंग्रजी वाङ्मयाच्या धर्तीवर मराठी गद्याची पुनर्घटना करतांना प्राचीन पद्यग्रंथांचा काळजीपूर्वक अभ्यास करणें आवश्यक होतें, परंतु आमचे लोक परप्रत्ययनेयबुद्धि झाल्यामुळें, त्यांना या गोष्टीची जाणीव झाली नाहीं. प्राचीन गद्य विस्कळीत स्वरूपांत असल्यामुळें त्याचीहि कोणाला फारशी माहिती नव्हती. अर्थात् विचार, मांडणी आणि भाषा या तिन्ही बाबतींत मराठी गद्याला इंग्रजी वाङ्मयावरच अवलंबून राहावें लागलें. शब्द मराठी, पण वाक्यरचनेची घाटणी मात्र पुष्कळ अंशीं इंग्रजी, अशी सुरवातीच्या गद्यग्रंथांची स्थिति होती. प्राचीन परंपरेचा आधार न मिळाल्यामुळें

अर्वाचीन मराठी गद्याची अवस्था अनाथ, बेवारशी मुलाप्रमाणें झाली होती. आईचें दूध त्याला मिळालें नाहीं. दाईच्या भाडोत्री दुधावरच त्याची वाढ झाली. यामुळें मालापूर्वकालीन गद्यांत जातिवंतपणाचा अभाव प्रामुख्यानें दिसून येतो.

सामान्य ग्रंथाचींच भाषांतरें

एकोणिसाव्या शतकांतील पहिल्या पंचवीस वर्षांत मुख्यतः शालोपयोगी पुस्तकांचेच तर्जुमे प्रसिद्ध झाले. पुढील पंचवीस वर्षांतहि भाषांतरासाठीं निवडलेले इंग्रजी ग्रंथ अगदीं सामान्य प्रतीचे होते. इंग्रजी भाषेंतील उत्तमोत्तम ग्रंथांचीं भाषांतरें करण्याचें धाडस कोणींहि केलें नाहीं. इंग्रजी वाङ्मय हें वाघिणीचें दूध असलें तरी तें पचविण्याची त्या काळीं आमच्या अंगीं शक्ति नसल्यामुळें महाराष्ट्रीय लेखकवर्ग प्राथमिक स्वरूपाच्या वाङ्मयावरच संतुष्ट राहिला. संस्कृत भाषेंतील कांहीं प्रसिद्ध नाटकांचीं व धर्मग्रंथांचीं भाषांतरें केलीं गेलीं, परंतु एकंदरींत पाहतां या काळांतील गद्यवाङ्मय निकृष्ट प्रतीचेंच आहे असें म्हणावें लागतें.

भाषांतरें यथार्थ व कलापूर्ण नाहींत

उत्कृष्ट भाषांतर करणें ही सुद्धां एक कला आहे. मुळांतील अर्थच नव्हे, तर रसहि भाषांतरांत हुबेहूब उतरविणें हें महाकठीण कर्म आहे. या दृष्टीनें पाहिलें, तर ह्या काळांतील भाषांतरात्मक ग्रंथांपैकीं सदाशिव काशिनाथ छत्रे आणि कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्याशिवाय कोणाचेहि ग्रंथ सरस वठलेले नाहींत. बहुतेक ग्रंथांतून मुळांतील आशय स्थूल मानानें कसातरी प्रकट करण्याची प्रवृत्ति दृष्टीस पडते. शास्त्रीपंडितांची भाषा क्लिष्ट व बोजड आहे, तर इंग्रजी शिकलेल्यांचें लिखाण अव्यवस्थित व घेडगुजरी झालें आहे. यामुळें मालापूर्वकालीन वाङ्मयांत सरळ, सुगम व मनोरम गद्यशैलीचे नमुने फारच क्वचित् आढळतात.

या काळांतील स्वतंत्र ग्रंथांना वाङ्मयदृष्ट्या फारसें महत्त्व नाहीं. दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, विनायक जनार्दन कीर्तने, नीळकंठ जनार्दन कीर्तने, लक्ष्मण मोरेश्वर हळबे, विष्णु गोपाळ भिडे, विष्णुबाबा ब्रह्मचारी इत्यादि लेखकांनीं थोडीफार स्वतंत्र ग्रंथरचना केली, पण भाषांतरात्मक ग्रंथविस्ताराच्या मानानें ती फार कमी आहे. बाल्यावस्थेंतील हें मराठी गद्य कितीहि सदोष असलें तरी निराशाजनक नाहीं. मंदगतीनें कां होईना, पण त्याची वाढ होत होती. त्याची प्रगमन–शीलताच भविष्यकालाच्या उज्ज्वलतेविषयीं आशा उत्पन्न करण्याला पुरेशी होती. या वाङ्मयासंबंधीं न्यायमूर्ति रानडे यांच्या खालील अभिप्रायावरून मालापूर्वकालीन मराठी गद्याच्या स्वरूपाची यथार्थ कल्पना येईल.

"It is true the entire picture thus presented to the view is far from satisfactory if one looks at it absolutely. The stage of advance which the language has at present reached is to be hailed more for the promise it holds for the future than for any accomplished success of the part." ‡

* * *

२ : कथात्मक वाङ्मय

प्राचीन कथावाङ्मय

लोकरंजनासाठीं किंवा लोकशिक्षणासाठीं गोष्टी सांगण्याची चाल जगांतील सर्व देशांमध्यें फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. गोष्टींच्या द्वारें केलेला उपदेश सामान्य लोकांच्या मनांत चांगला ठसतो, हें लक्षांत घेऊन प्राचीन धर्मोपदेशकांनींहि धर्मप्रसाराचें प्रभावी साधन म्हणून कथावाङ्मयाचाच आश्रय घेतला. त्यामुळें पौर्वात्य किंवा पाश्चात्य कोणत्याहि भाषांचा इतिहास पाहिला, तरी त्यांत कथात्मक वाङ्मयाचा विस्तार फार मोठ्या प्रमाणांत झालेला आढळून येतो. मराठी भाषाहि या नियमाला अपवाद असण्याचा संभव नाहीं. गेल्या हजार वर्षांच्या काळांत मराठी भाषेमध्यें शेंकडों लोककथा प्रचलित असतील, व त्यांच्या द्वारें महाराष्ट्रांतील लोक आपल्या मनाची करमणूक करून घेत असतील यांत कांहीं संशय नाहीं; पण परकीय संस्कृतीशीं समरस होण्याच्या भरांत खेड्यापाड्यांतील जनतेनें अशा पिढ्यान्‌पिढ्या अत्यंत जिव्हाळ्यानें जतन केलेल्या त्या अस्सल मराठी कथावाङ्मयाला आपण पूर्णपणें पारखे झालेलों आहोंत. अद्यापिहि वृद्ध स्त्रियांच्या तोंडून ऐकावयास मिळणाऱ्या मनोरंजक कहाण्या हा प्राचीन कथा-वाङ्मयाचा भाग आहे. याखेरीज आज उपलब्ध असलेलें प्राचीन मराठी कथात्मक वाङ्मय प्रायः पद्यमय व धार्मिक स्वरूपाचें आहे. इंग्रजी राज्य स्थापन होण्यापूर्वी मुद्रणकलेची माहिती नसल्यामुळें गद्यलेखनाची प्रवृत्ति बळावणें शक्य नव्हतें. उद्‌बोधक विचार आणि अभिनव कल्पना पद्यामध्यें ग्रथित करून लोकांपुढें मांडणें प्रसाराच्या दृष्टीनें सोयीचें पडे. निवृत्तिधर्माचें फाजील स्तोम माजल्यामुळें त्या वेळच्या पंडितांनाहि लौकिक विषयावर लिहिणें म्हणजे मोलाचें

‡ M. G. Ranade—*Remarks on the Marathi Catalogue.*

आयुष्य वायां दवडण्यासारखें आहे असें वाटत असे; व म्हणूनच त्यांनीं परमेश्वराचीं अवतार–कृत्यें व साधुसंतांचीं चरित्रें यांवर ग्रंथरचना केली. भगवन्नामाचा महिमा वर्णन करणें, हाच वाङ्मयाचा मुख्य विषय झाला. ह्या एकान्तिक परमार्थ–प्रवणतेमुळें आंग्लपूर्वकालीन मराठी वाङ्मय एकाच ठराविक साच्याचें झालें असलें तर त्यांत काहीं नवल नाहीं.

गद्यात्मक कथालेखनाचा उपक्रम

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं महाराष्ट्रांत हळूहळू छापील ग्रंथांचा प्रसार होऊं लागला. मराठी वाङ्मयाच्या इतिहासांतील नवीन युगाला आरंभ झाला; आणि त्याबरोबरच गद्यात्मक कथालेखनाच्या प्रवृत्तीला जोर चढला. सुरवातीचे मराठी गोष्टीरूप ग्रंथ सर्वच भाषांतरात्मक होते. इंग्रजी, संस्कृत व बंगाली भाषांतील निवडक नीतिकथांचीं भाषांतरें करून मराठी भाषेच्या द्वारें नवीन कल्पना व विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न सुरूं झाला. इ. स. १८०६ मध्यें तंजावर येथील सरफोजी राजे यांनीं इसापनीतिचें मराठी भाषांतर करवून ‘ बालबोध-मुक्तावलि ’ या नांवानें प्रसिद्ध केलें. त्यानंतर डॉ. केरी यांनीं वैजनाथ पंडित यांचेकडून ‘ सिंहासनबत्तीसी ’, (इ. स. १८१४) ‘ हितोपदेश ’ (इ. स. १८१५) व ‘ पंचतंत्र ’ (इ. स. १८१५) ह्या संस्कृत गोष्टीरूप ग्रंथांचीं मराठी भाषांतरें करवून श्रीरामपूर येथील मिशन प्रेसमध्यें छापलीं. त्यांची विस्तृत माहिती ‘ सामान्य निरूपण ’ या प्रकरणांत आलेलीच आहे.

सिंहासनबत्तीसी–मुंबई (इ. स. १८२४)

अशा रीतीनें तंजावर व श्रीरामपूर येथें मराठी गोष्टींचीं पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं होतीं. तरी त्या पुस्तकांचा महाराष्ट्रांत फारसा प्रसार झालेला नव्हता. इ. स. १८२४ त कुरियर छापखान्यांत सिंहासनबत्तीसीचें महाराष्ट्र भाषांतर प्रसिद्ध झालें. ह्या पुस्तकांतील भाषा श्रीरामपूर येथें प्रसिद्ध झालेल्या सिंहासनबत्तीसीच्या भाषेपेक्षां जास्त शुद्ध व सरस आहे. मधूनमधून सामासिक शब्दांची योजना व संस्कृत भाषेच्या धर्तीवर शब्दप्रयोग आढळतात; तरी पण निव्वळ मराठी जाणणाऱ्यांनाहि हें भाषांतर सहज समजण्यासारखें आहे. यांतील एक गोष्ट खालीं देत आहे.

> “ विक्रमराजा एके दिवशीं वसंत ऋतूमध्यें चंपक वनांत गेला. ते वन असें पाहिलें कीं रम्य पुष्करिणी अनेक प्रकारच्या कमळेंकरून युक्त-हंस मयूर कोकिल यांहींकरून शोभित-नाना प्रकारचे वृक्ष, वेली आणि जाईजुई, चमेली मालती, मोगरी इत्यादिकांनीं वेष्टित असें पाहून तेथें एक रमणीय बंगला बांधवून त्यांत बहुत कारंजीं करवून स्त्रियांबरोबर जलक्रीडा करूं लागला.

त्या वनांत एक तपस्वी तप करीत होता. त्यानें तो राजाचा विलास पाहून आपल्या मनांत विचार केला कीं, ह्या लोकींचें सुख सोडून स्वर्गलोकींच्या सुखाची इच्छा करणें यांत काय विशेष ? येथें अनेक प्रकारचे कष्ट भोगून मेल्यानंतर त्या लोकचे भोग भोगावे यापेक्षां येथेंच विषयसुख भोगावें हें फार बरें दिसतें. असें मनांत आणून तो तपस्वी विक्रमाजवळ गेला. राजानें त्याचा सत्कार करून पुसलें कीं, आपली इच्छा काय आहे. तो बोलला, " हे राजा, मी देवीजवळ तप करीत असतां देवीनें दृष्टान्त दिला कीं तूं तप पुरें कर. तुझ्या तपानें मी प्रसन्न झाल्यें तर तूं विक्रमाजवळ जाऊन संसारसुखाचा अनुभव माग असा दृष्टान्त झाला तो तुला सांगितला. संसारसुख भोगायाविषयीं देवीची आज्ञा आणि माझीहि इच्छा आहे." असें त्या तपस्व्याचें भाषण ऐकोन विक्रम आपल्या मनांत म्हणाला, याला देवी दृष्टान्त देऊं अथवा न देऊं, परंतु यास माझी क्रीडा पाहून येथें आपण क्रीडा करावी अशी इच्छा झाली आहे, ती आपण पुरवावी. मग विक्रमानें तेथें मोठें नगर वसवून त्या नगराचा राज्याभिषेक त्या तपस्व्यास केला आणि त्याच्या उपजीविकेकरितां दुसरेहि बारा गांव त्यास दिले, तेणेंकरून तो तपस्वी संसारसुखातें अनुभविता झाला. " †

शालोपयोगी गोष्टीरूप ग्रंथ

इ. स. १८२२ त मुंबई येथील शिक्षा-मंडळीची स्थापना झाली व तिच्या ग्रंथप्रकाशन-पोटमंडळाकडून शालोपयोगी गोष्टीरूप ग्रंथ प्रसिद्ध होऊं लागले. ह्या मंडळींत सदाशिव काशिनाथ छत्रे हेच एक मराठी भाषेचे प्रतिनिधि होते. त्यांनीं 'बाळमित्र' भाग १ (इ. स. १८२८), 'इसापनीति-कथा' (इ. स. १८२८) व 'वेताळपंचविशी' (इ. स. १८३०), " हे सुरस व सुबोध ग्रंथ साध्या व व्यावहारिक मराठी भाषेनें लिहून प्रसिद्ध केले. हे ग्रंथ भाषांतररूप असूनहि यांत मराठी भाषेचें साधें स्वरूप आढळतें हा चमत्कार होय- " * ह्यांपैकीं 'बाळमित्र' हा, 'Berquin's Children's Friend' ह्या फ्रेंच ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतराचा मराठी तर्जमा होय. हा फारच सरस उतरला आहे. " यांत सृष्टीचें वर्णन व मनुष्य-स्थितीचें चित्र हीं फारच मनोवेधक रीतीनें वठलीं आहेत. " ¶ 'बाळमित्र व इसाप-नीतिकथा या दोन ग्रंथांवर दादोबांनीं आपल्या आत्मचरित्रांत खालील अभिप्राय लिहिलेला आहे. " हे दोन्ही ग्रंथ फार सुरस झाले होते. तीं भाषांतरें आहेत असें

† सिंहासनबत्तीसी पृ. ३०-३१

* वि. ज्ञा. वि. पु. १०, अं. ३

¶ वि. ज्ञा. वि. पु. ३१, अं. ९-१०

त्या वेळेस कोणास वाटत नसे. मराठींत सरस रीतीनें फक्कड लिहिणारे हेच पहिले. त्यांच्या मागून आम्ही सर्व लिहिणारे झालों. "§

सदाशिव काशिनाथ छत्रे (इ. स. १७८८–१८३०)

सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे यांचा जन्म मुंबईस वाळेकश्वरीं इ. स. १७८८ त झाला. हे जातीचे कोंकणस्थ ब्राह्मण. यांच्या प्राथमिक शिक्षणाबद्दल कांहींच माहिती मिळत नाहीं. त्या काळांत इंग्रजी शिक्षणाच्या सार्वजनिक शाळा नसल्यामुळें त्यांनीं खासगी रीतीनेंच इंग्रजी भाषेचें अध्ययन केलें असावें. आरंभीं हे 'इंजनीयरच्या अफीसांत रैटर होते.' "त्यां वेळीं सदाशिव काशिनाथाप्रमाणें इंग्लिश भाषा जाणणारे या मुंबई इलाख्यांत एतद्देशीय लोकांमध्यें कोणीच नव्हते... त्यांणीं या परदेशी भाषेचें इतकें सूक्ष्म व शुद्ध ज्ञान केवळ आपल्या बुद्धिकौशल्यानें व श्रमानेंच संपादन केलें यांत अगदीं संशय नाहीं. "§ मराठी भाषेच्या मार्मिक ज्ञानाबद्दल तर त्यांची सर्वत्र ख्याति होती. मराठी ग्रंथप्रकाशनाच्या कामीं हे जर्व्हिस साहेबाचे मुख्य मदतनीस होते. सरकारी शाळांवर देखरेख करण्याच्या कामींहि यांची नेमणूक झाली होती. हे पेन्शनांत जाण्यापूर्वीं नेटिव्ह स्कूल सोसैटीचे नेटिव्ह सेक्रेटरी होते. हे इ. स. १८३८ त निवर्तले. त्यांनीं आपल्या काळांत मराठी भाषेची बहुमोल सेवा करून पुढल्या पिढीला शुद्ध रसाळ गद्य–लेखनाचा धडा घालून दिला. इसपनीतिकथेंतील खालील गोष्टीवरून त्यांच्या लेखनशैलीची कल्पना येईल.

लोभी मनुष्य

"कोणी एक लोभी मनुष्यानें पयसा सांचवून शेतांत पुरून ठेविला. तेथें नित्य एकदोन वेळ त्याणें जात असावें आणि पयसा पुरलेलें ठिकाण पाहून मनांत संतोष पावत असावें. तें त्याचें कृत्य चाकरानें लक्षांत आणून त्यावर तर्क बांधिला कीं आपला धनी या जागेकडे नित्य पाहातो तस्मात् येथें कांहीं विशेष आहे. मग त्याणें रात्रीस येऊन जागा खणून पाहिली तंव आंत ठेवा सांपडला तो घेऊन पळून गेला. दुसरे दिवसीं लोभी मनुष्य नित्याप्रमाणें तेथें येउन पाहों लागला तंव ठेवा गेला हें समजून त्याणें डोईत धूळ घातली, उर बडवुं लागला. आणि हाय हाय करून रडत बसला. तो घरीं जाईना. शेवटीं त्याचा शेजारी त्यापाशीं तेथें आला त्याणें वर्तमान पुसिलें. त्यास लोभ्यानें सर्व सांगितलें तें ऐकून शेजारी म्हणतो रे बाबा मला असें वाटतें कीं तुझें कांहीं गेलें नाहीं तूं आपल्यें चित्तांत पयसा गेला असें न आणितां, या खांचेकडे नित्य पाहात होतास तसाच पाहात जा म्हणजे तुझें काम झालें.

§ दादोबा–आत्मचरित्र पृ. २०

तापर्य

लोभी आहेत ते पयसा असून दळिद्री. ते असते द्रव्याचा उपभोग न करून आणिक मिळवावयाचे लालचेनें, मरेपर्यंत अनेक प्रकारचीं पातकें निरंतर करीत असतात. शेवटीं त्यांचा पैका चोरपोर खाऊन जातात. त्यांचे वांट्यास दुःख, शोक, आणि मेल्याअंतीं अक्षय नरक, इतकें मात्र येतें." ‡

बोधकथा

विद्याप्रसाराचें कार्य नवीनच सुरू झालेलें असल्यानें शाळांतील मुलांसाठीं बालबोध गद्यग्रंथांची उणीव भासूं लागली. ह्यापूर्वीच बंगाली भाषेमध्यें अशा तऱ्हेचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं. मुंबईच्या शिक्षामंडळीनें 'बोधकथा' (इ. स. १८३१) व 'नीतिकथा' (इ. स. १८३८), ही दोन गोष्टींचीं पुस्तकें बंगालीवरून मराठींत भाषांतर करून छापिलीं. यांमध्यें लहान मुलांची विद्याभ्यासाकडे व गुणग्रहणाकडे प्रवृत्ति व्हावी म्हणून लहान लहान गोष्टी सांगून प्रत्येक गोष्टीच्या शेवटीं तिचें तात्पर्यहि दिलें आहे. नीतिकथेंतील 'विद्येची अवज्ञा' ही गोष्ट खालीं देत आहें.

"एक मुलगा विद्याभ्यासाचा उद्योग कांहीं एक न करितां आपल्ये इच्छेस येईल त्याप्रमाणें कालक्षेप करीत असे आणि वडिलांचा चांगल्या उपदेशाचा तिरस्कार करून वाईट लोकांच्या सोबतीनें फिरत असे. मग तो मोठा झाला तेव्हां अन्नवस्त्र मिळेना म्हणून महिना दोन रुपये कबूल करून एके ठिकाणीं चाकरीस राहिला. तीपासून शरीरास बहुत श्रम होऊं लागले. पुढें तो एके दिवशीं आपले भावाजवळ जाऊन दीनवाणीनें विचारितो, "दादा, तुम्हांस थोड्या श्रमानें दरमहा दाहा किंवा अधिक रुपये मिळतात, मी तर सारा दिवस काम करीत असतों, आणि तुमच्यापेक्षां मला मेहनतही अधिक पडती; तथापि मला दोन तीन रुपयांवर कांहीं अधिक मिळत नाहीं. याचें कारण काय?" त्याणें उत्तर केलें, "बाबा, तूं विद्येची अवज्ञा केलीस, परंतु मी बहुत कष्ट करून विद्या साध्य केली म्हणून मला आतां चांगला रोजगार मिळाला आहे. तूं विद्या संपादिली नाहींस, म्हणून तूं आतां संकटांत पडला आहेस. मी विद्वानाचे तोंडून ऐकिलें आहे कीं, विद्या म्हणत्ये "जे माझी सेवा करतील त्यांस मी द्रव्य देईन."

सारांश, जीं मुलें लहानपणीं आईबापांची अवज्ञा करून मनास येईल तसें करून आपला विद्या शिकण्याचा काळ फुकट गमवितात त्यांस मोठेपणीं फार संकटें प्राप्त होऊन फजीत होतात. यास्तव विद्येचा अपमान करूं नये"*

‡ इसापनीतिकथा पृ० ४०–४१.

* नीतिकथा (आवृत्ति ३ री) पृ० २३–२५

सुबोध कथासंग्रह

इ. स. १८३३ त लेफ्टेनंट गेस्फोर्ड ह्यांनीं बाळमित्राच्या दुसऱ्या भागाचें भाषांतर करून छापिलें. पहिल्या भागाप्रमाणेंच हा भागहि चांगला उतरला आहे. यांतील शुद्ध व सोप्या भाषेवरून गेस्फोर्डला कुणातरी कसलेल्या महाराष्ट्रीय लेखकाचें सहाय्य मिळालें असावें असें स्पष्ट दिसून येतें. इ. स. १८३६ त पंचोपाख्यानाचें भाषांतर प्रसिद्ध झालें. याच सुमारास विष्णुशास्त्री यांनीं 'नीतिदर्पण' (इ. स. १८३७) व 'बालोपदेशकथा' (इ. स. १८३८) हे दोन गोष्टीरूप ग्रंथ लिहिले. नीतिदर्पणामध्यें एकंदर दहा गोष्टी असून त्यांचा उद्देश ग्रंथकर्त्यानेंच प्रस्तावनेंत स्पष्ट सांगितलेला आहे. "मराठी शाळांतून पढणाऱ्या मुलांस नीतिज्ञान व्हायाजोगे ग्रंथ फार थोडे आहेत असा अभिप्राय मनांत आणून त्यांस सांप्रतचे राज्यकारभारासंबंधीं व इतर व्यवहारासंबंधीं नीतिज्ञान होण्याकरितां हा ग्रंथ केला आहे. तेणेंकरून सर्व जातीच्या लोकांस सरकारी अधिकार मिळाला असतां कसा चालवावा, आणि सर्व लोकांबरोबर प्रामाणिकपणानें कसें वागावें हें समजेल." त्या वेळचीं सर्व पुस्तकें भाषांतरित असत. हे पुस्तक मात्र स्वतंत्र रीतीनें लिहिलेलें आहे. यामध्यें गोष्टीरूपानें राजकीय, सामाजिक व नैतिक विषयासंबंधीं उपयुक्त माहिती दिलेली आहे; आणि लोकांना व्यसनापासून अलिप्त राहाण्याचा उपदेश केला आहे. स्वतंत्र ग्रंथरचनेचा प्रथम प्रयत्न या दृष्टीनें या ग्रंथाला विशेष महत्त्व आहे. इ. स. १८४६ त हरी केशवजी पाठारे यांनीं 'Chamber's Moral Class Book' ह्या इंग्रजी पुस्तकाचें मराठी भाषांतर 'शालोपयोगी नीति-ग्रंथ' या नांवानें प्रसिद्ध केलें. यथार्थ व बालबोध भाषांतर करण्याविषयीं हरी केशवजींची फार प्रसिद्धी होती. त्यांचें हें भाषांतर तर सर्वोत्कृष्ट उतरलें आहे.

पौराणिक आख्यानांच्या संक्षिप्त बखरी

ह्याप्रमाणें परभाषेंतील बोधपर गोष्टींचीं भाषांतरें केलीं जात होतीं, त्याबरोबरच आतां पौराणिक आख्यानांच्या संक्षिप्त बखरीहि प्रसिद्ध होऊं लागल्या. त्या वेळच्या वाचकवर्गाला पुराणांतील अद्‌भुत गोष्टी पद्यरूपानें परिचित होत्याच. त्यामुळें सहजच ह्या वाङ्मयाचा जास्त प्रसार झाला व पुढील स्वतंत्र कथावाङ्मयांवरहि त्यांतील अद्‌भुत-रसाची छाप पडल्यावांचून राहिली नाहीं. 'बकासुराची बखर' (इ. स. १८४५), 'चन्द्रहास्य बखर' (इ. स. १८४६) 'भागवताची बखर' (इ. स. १८४७), 'नंदराजाची गोष्ट' (इ. स. १८५१), 'नलराजाची बखर' (इ. स. १८५७), 'लवकुशाख्यान बखर' (इ. स. १८६१), 'विराटपर्वाची बखर' (इ. स. १८६२), 'पांडवांची बखर' (इ. स. १८६९), इत्यादि पौराणिक गोष्टी सारांशरूपानें प्रसिद्ध झाल्या.

फारशी भाषेंतील गोष्टींचीं भाषान्तरें

पौराणिक आख्यानाप्रमाणेंच फारशी भाषेंतील कथात्मक वाङ्मयहि अद्‌भुत-रसप्रधान होतें. आणि अशा गोष्टींनाच लोकप्रियता लाभण्याचा जास्त संभव असल्यानें फारशी भाषेंतील अद्‌भुत कथांच्या इंग्रजी किंवा हिंदी भाषांतरावरून त्याचे मराठी तर्जुमे करण्याकडेहि त्या काळच्या लेखकांचें लक्ष लागलें. कृष्णराव माधवराव प्रभु यांनीं 'हातिमताई चरित्र' ही फारशी गोष्ट डंकन फारबस यांनीं केलेल्या इंग्रजी भाषांतरावरून महाराष्ट्र भाषेंत लिहिली. तिचे सात भाग असून प्रत्येक भागांत विक्रमाप्रमाणें परदुःखभंजन करणाऱ्या हातिमाचे पराक्रम वर्णिले आहेत. या पुस्तकांतील खालील उताऱ्यावरून फारशी भाषेंतील गोष्टींच्या स्वरूपाची कल्पना येईल.

> "एके दिवशीं हातिम अरण्यामध्यें गेला. तेथें त्याची व सिंहाची गांठ पडली, तेव्हां हातिम मनांत विचार करतो कीं, जर मी या सिंहाला शस्त्रानें मारला तर मजसारिखे दयाळू मनुष्यास हें कर्म अयोग्य आहे, आणि जर मी त्यास मारणार नाहीं तर तो मला खाचित मारील. कदाचित् मी त्या सिंहाचें मनास द्रव आणीन, असा विचार करून तो सिंहाला गरिबीनें बोलतो, "रे ईश्वराचे प्राण्या, जर तूं माझे मांसाकरितां भुकेला असशील, तर मी तुझ्यापुढें सिद्ध आहें, आणि जर तुला मांसानेंच पोट भरावयाची इच्छा असली तर माझा घोडा आहे, हा, घे, खा, आणि आपली क्षुधा शांत कर; परंतु जर तुला माझेंच मांस पाहिजे तर तें मी तुला देतों, घे, मला खा पण तुझें मन दुखवूं नको." हे शब्द ऐकून सिंहानें मोठी गर्जना केली, तेव्हां हातिमानें आपलें कवच व घोड्याचें जीन काढून हात जोडून तो सिंहापुढें उभा राहिला, आणि म्हणाला, "अहो महाराज, आम्हां दोघांतून कोणता पाहिजे तो खावा, परंतु मनांत दुःखी होऊन जाऊं नका." हें ऐकून सिंह हातिमाचे पायांवर मस्तक ठेवून रडूं लागला. मग हातिम म्हणाला कीं, "ईश्वराचे प्राण्या, तुला उपवासी जाऊं द्यावें असें माझे हातून घडणार नाहीं. कांकीं ईश्वरानें आपले प्राण्यास सुख व्हावें म्हणून घोडे निर्माण केले आहेत यास्तव याला खा, आणि जर तुला माझे मांसाची इच्छा असेल, तर तें मी तुला धर्मार्थ देतों, परंतु उपवासी आणि मनांत दुःखी होऊन जाऊं नको. मी आपलें स्वतः शरीर तुला देत असतां, जर तूं खाणार नाहींस, तर मला चांगलें वाटणार नाहीं." मग सिंहानें आपलें तोंड खालीं घालून तो आपले भक्षणाचे शोधास निघून गेला. याप्रमाणें हातिम प्राण्यावर उपकार आणि

दया करीत असे, तो कधीं अतृप्त अथवा दुःखी नसे. आणि जेणेंकरून ईश्वरास चांगलें वाटेल तें करण्यास आपलें शरीर लावीत असे. "*

फारशी भाषेंतील गोष्टींच्या धर्तीवर भाषांतरात्मक व स्वतंत्र कथाग्रंथ

इ. स. १८५५ त नारायण केशव प्रभु यांनीं सर विल्यम औस्लेच्या इंग्रजी अनुवादावरून 'बख्त्यारनामा अथवा बख्त्यारनामक राजपुत्र आणि दहा वजीर यांची कथा' हें मूळच्या फारशी गोष्टींचें मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें. याखेरीज 'आरबी गोष्टी' (इ. स. १८६३), 'बाहारदानीष' (इ. स. १८६५), 'गुल आणि सनोबर' भाग १–२ (१८६७–६९), 'बागोबहार' भाग १-२-३ (इ. स. १८६९-७०-७१), 'पार्शियन नैटस् अथवा किश्वरसिता' (इ. स. १८७३) इत्यादि फारशी गोष्टींचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध झालीं. ह्यांतील बहुतेक सर्व गोष्टी एकाच धर्तीच्या असून त्यांतील शृंगारिक वर्णनेंहि तामसी व उत्तान स्वरूपाचीं आहेत. अशा अश्लील कथांच्या वाचनानें वाचकांची अभिरुचि बिघडली; व साहजिकच मराठी कथात्मक वाङ्मयाला अनिष्ट वळण लागलें.

आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी

मुसलमानी गोष्टींच्या भाषांतरांपैकीं रसिकमणि कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं लिहिलेल्या 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' या लोकप्रिय ग्रंथानें मराठी भाषेच्या वाङ्मयसंपत्तींत भर घातली. इ. स. १८६१ ते १८६५ या चार वर्षांत या ग्रंथाचे पहिले पांच भाग प्रसिद्ध झाले. मनोहर व मार्मिक भाषांतराचा उत्कृष्ट नमुना या दृष्टीनें आज पाऊणशें वर्षांनंतरहि या ग्रंथाची बरोबरी करणारा दुसरा ग्रंथ मिळणें मुष्कील आहे. या ग्रंथानेंच महाराष्ट्रीय जनतेला कथात्मक वाङ्मयाची गोडी लाविली व पुढील लेखकांना सुबोध, शुद्ध, सरस व चटकदार भाषापद्धतीचा अप्रतिम आदर्श निर्माण करून ठेविला. 'ज्यांस थोडक्यांत गोड व अर्थाचा समावेश पुष्कळ असें कसें लिहावें हें शिकणें असेल, तर तें शास्त्रीबुवापासून समजावून घ्यावें.' असा शास्त्रीबुवासंबंधीं फार मार्मिक अभिप्राय केरोपंत छत्रे यांनीं व्यक्त केला आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर (इ. स. १८२४–७८)

कृष्णशास्त्री यांचा जन्म पुणें येथें इ. स. १८२४ त झाला. त्यांच्या वडिलांची फार गरिबी होती. त्यांना फक्त दरमहा चार रुपये पगार मिळे. त्या

* हातिमताई चरित्र (भाग १) पृ. ५–६.

काळीं विद्याभ्यासाचीं साधनें आजच्याप्रमाणें सुलभ नसल्यामुळें त्यांचें प्राथमिक शिक्षण एका गांवठी शाळेंत झालें. पुढें पुणें येथील संस्कृत पाठशाळेंत त्यांनीं अल्पावधींतच अलंकार, न्याय व धर्म या तीन शास्त्रांचें सांगोपांग अध्ययन केलें. लोकविलक्षण बुद्धिमत्तेमुळें त्यांचे गुरुजी मोरशास्त्री साठे हे त्यांना बृहस्पति म्हणून संबोधीत असत. कालमानाकडे पाहून शास्त्रीबुवांनीं इंग्रजीचाहि अभ्यास सुरू केला, आणि असाधारण ग्रहणशक्ति व अव्याहत परिश्रम यांमुळें त्या भाषेंत ते लवकरच पारंगत झाले. विद्याभ्यासानंतर त्यांनीं शिक्षणखात्यांत सरकारी नोकरी पत्करली आणि ते अनुक्रमें भाषांतरकार, ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल व वर्तमानपत्रें आणि मासिकें यांचे रिपोर्टर होते. त्यांनीं आपलें काम फार कुशलतेनें बजावून सर्वत्र वाहवा मिळविली. ' साक्रेतिसाचें चरित्र ' (इ. स. १८५२), ' अर्थशास्त्रपरिभाषा ' (इ. स. १८५५), ' संस्कृत भाषेचे लहान व्याकरण ' (इ. स. १८५९), ' अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह ' (इ.स.१८६१), 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी (इ. स. १८६१-६५) आणि ' रासेलस ' (इ. स. १८७३) हे त्यांचे मुख्य गद्यग्रंथ होत. त्याप्रमाणेंच ' गद्य-रत्नावलि ' व ' मेघदूताचें भाषांतर ' हीं त्यांचीं काव्येंहि फार लोकप्रिय झालीं होतीं. खिस्ती धर्मप्रचारकांना धैर्यानें तोंड देण्यासाठीं त्यांनीं इ. स. १८५२ च्या सुमारास ' विचारलहरी ' पत्र सुरू केलें. पण प्रतिकूल परिस्थितीच्या तडाक्यांत तें फार दिवस टिकलें नाहीं. ' ज्ञानप्रकाश ' व ' शालापत्रक ' यांच्या द्वारें मात्र शास्त्रीबुवांनीं मराठी भाषेंत अनेक विषयांचें उद्‌घाटन करून, आपल्या मातृभाषेची बहुमोल सेवा केली. शालापत्रकांतील मार्मिक ग्रंथ-परीक्षणें व व्याकरणशास्त्रावरील निबंध हे त्यांच्या गाढ विद्वत्तेची साक्ष देतात. अशा तऱ्हेनें महाराष्ट्र–भाषेची बहुविध कामगिरी करीत असतां, हे इ. स. १८७८ त आपल्या वयाच्या चौपन्नाव्या वर्षीं दिवंगत झाले.

स्वतंत्र ग्रंथलेखनाच्या प्रवृत्तीचा अभाव

" शास्त्रीबोवांची सरळ, सुगम, मार्मिक व शुद्ध लिहिण्याची सरणी खरोखर अनुकरणार्ह आहे. विषयानुरूप भाषा बोलतां येऊन पुन्हां ती समजण्यास कठीण वाटूं नये, असें लिहिणें किती कठीण हें सांगणें नलगे. परंतु शास्त्रीबोवांनीं जे जे विषय हातीं घेतले त्यांना साजेल व वाचकांस तर नडणार नाहीं अशीच भाषेची सरणी ठेविली आहे, यामुळें शास्त्रीबोवांचे ग्रंथ सर्वत्र प्रिय झाले आहेत. शास्त्रीबोवांचे ग्रंथ आज सात आठ प्रसिद्ध आहेत. परंतु हे सर्व भाषांतररूप आहेत. त्यांनीं स्वतंत्र म्हणून एकहि ग्रंथ लिहिला नाहीं. आतां शास्त्रीबोवासारख्या विशाल बुद्धीच्या गाढ्या विद्वानानें स्वतःचें बुद्धीचें व विचाराचें फल म्हणून स्वतंत्र ग्रंथ लिहिणें आवश्यक होतें. परंतु त्यांनीं तसल्या प्रकारचा यत्न केल्याचें ऐकिवांत नाहीं."§ शास्त्रीबोवांची योग्यता

§ वि. ज्ञा. वि. पु. १०, अं. ८.

असतांहि त्यांच्या हातून स्वतंत्र ग्रंथनिष्पत्ति झाली नाहीं याचें कारण म्हणजे सर्व बाजूंनीं परावलंबी बनलेल्या आमच्या देशांतील विद्वानांच्याहि ठिकाणीं असलेला आत्मविश्वासाचा अभाव हेंच होय.

स्त्रीचरित्रात्मक कथाग्रंथ

फारशी गोष्टींच्या अनुकरणानें स्त्रियांना दुर्वर्तनापासून परावृत्त करण्यासाठीं स्त्रीचरित्रपर गोष्टी प्रसिद्ध होऊं लागल्या. यांपैकीं रामजी गणोजी चौगुले यांनीं लिहिलेला 'स्त्रीचरित्र' हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. याचे एकंदर चार भाग निघाले. डॉक्टर रामजी गणोजी हे जातीचे गवळी. विद्याव्यासंग बेताबाताचाच असतांहि अनुभव व बहुश्रुतपणा यांच्या जोरावर त्यांनीं 'नारायणबोध' भाग १, 'बोधकथामृत' भाग २, 'रसायनशास्त्र अथवा हुन्नेरनिधि' भाग ३, आणि 'स्त्रीचरित्र' भाग ४ हे गद्यग्रंथ लिहिले. भाषेची शुद्धता यथातथाच, पण उपयुक्त माहितीच्या दृष्टीनें मात्र ग्रंथ बऱ्यापैकीं आहेत. यानंतर 'विदग्धस्त्रीचरित्र' (इ. स. १८७१) व 'मनोरंजक सुशिक्षित स्त्रीचरित्र' भाग २ (इ. स. १८७२-७३) इत्यादि स्त्रीचरित्रात्मक कथाग्रंथ प्रसिद्ध झाले.

चातुर्यबोधक व मनोरंजक गोष्टी

फारशी व आरबी भाषेंतील गोष्टींच्या धर्तीवर भाषांतरात्मक व स्वतंत्र अशा चातुर्यबोधक गोष्टीहि लिहिल्या गेल्या. 'तर्कदीपिका' (इ. स. १८५८) 'चमत्कारिक गोष्टी' – भोज, कालिदास वगैरे यांच्या (इ. स. १८६५), 'चमत्कारिक न्यायाच्या व अकलेच्या गोष्टी' (इ. स. १८६७), 'बादशहा आणि बिरबल यांच्या गोष्टी' (इ. स. १८६९) इत्यादि सर्व कथा याच प्रकारच्या होत. याचप्रमाणें आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टींच्या धर्तीवर केशव रघुनाथशेट चोंचे यांनीं 'महाराष्ट्र भाषेंत मनोरंजक गोष्टी' या स्वतंत्र कथासंग्रहाचे पांच भाग प्रसिद्ध केले. यांतील खालील उताऱ्यावरून एकंदर ग्रंथाच्या लेखनशैलीची कल्पना येईल.

> "पूर्वीं अवंती नगरीस राजा मनमथ राज्य करीत होता. तो स्वभावानें गर्विष्ठ होता. त्याचें राज्य विस्तीर्ण होतें. त्याच्या त्या स्वभावामुळें त्यापुढें प्रधानांचा नाइलाज होता. त्याची स्त्री मनकर्णिका नामक होती, ती रूपवान असून चतुर होती. राजाच्या स्वभावापुढें तिचेंहि कांहीं चालत नव्हतें. एके दिवशीं राजानें प्रधानास सांगितलें कीं, एक उत्तम प्रकारचें जलमंदिर तयार करवावें. अशी राजाज्ञा होतांच प्रधानानें बहुत द्रव्य खर्च करून सुंदर जलमंदिर तयार केलें, आणि तें पाहण्यास्तव राजासह तो तेथें आला. राजानें तें पाहतांच नाक मुरडिलें, व हें कांहींच उपयोगी नाहीं, असें म्हणून तें मोडून टाकविलें,

अशा प्रकारचा त्याचा स्वभाव पाहून त्याच्या दरबारांतील प्रधानास तो कोणत्या वेळीं काय करील ह्याचें भय होतें. त्यास बहुत काळ संतान होत नव्हतें, म्हणून त्यानें पुत्रेष्टि नामक यज्ञ करण्याचा विचार केला; आणि गांवोगांवींच्या ब्राह्मणांस बोलावण्यास व यज्ञमंडपाची सिद्धता करण्यास प्रधानास आज्ञा केली. त्याप्रमाणें प्रधानानें गांवोगांवीं पत्रें पाठविलीं, व शहराबाहेर मोठा विस्तीर्ण यज्ञमंडप घातला. सर्व सिद्धता झाल्यावर यज्ञास आरंभ झाला, त्या समयीं लक्षावधि ब्राह्मण तेथें जमा झाले होते. कांहीं दिवसांनीं यज्ञ समात होऊन ब्राह्मण यज्ञप्रसाद राजास देतेसमयीं म्हणाले, "राजा, तूं पुत्रेष्टि यज्ञ केला आहेस, परंतु तुला महारूपवती एक कन्या होईल." हें त्या ब्राह्मणांचें वचन ऐकतांच तो संतप्त झाला, परंतु प्रसादाप्रीत्यर्थ त्यानें हात पुढें केला होता, म्हणून तो मागें घ्यावा तर त्यांत महत् पाप आहे असें, कांहींसें त्या समयीं त्याच्या मनांत आलें, याकरितां कांहीं न बोलतां त्यानें तो प्रसाद घेतला. त्यापासून कन्या होईल असें त्यास समजलें. तेव्हां कन्या आपणास नसावी असें त्यास वाटून त्या यज्ञमंडपाबाहेर येऊन कोणास समजूं नये अशा रीतीनें शिकारीचें निमित्त करून तो कांहींसा दूर गेला, आणि तेथें त्यानें तो फेकून दिला; तो अकस्मात् एका घारीनें भक्षण केला. असें पाहून मनमथ तेथून परतला, आणि तसलाच पदार्थ घेऊन तो यज्ञप्रसाद आहे, अशा मिषानें मनकर्णिकेसह त्यानें भक्षण केला." *

या काळांत एवढा मोठा स्वतंत्र कथाग्रंथ दुसरा नव्हता. या कथासंग्रहाच्या धर्तीवर नारायण गोपाळ दामले व विनायक हरी सिनकर यांनीं 'मराठी भाषेंतील सुरस गोष्टी' (इ. स. १८७०) लिहून प्रसिद्ध केल्या. याच सुमारास 'युरोपाकाकूच्या शाळेंतील मारामारी' ही रूपकात्मक गोष्ट (Allegory), 'युरोपांतील वनदेवतांच्या गोष्टी' (इ. स. १८६८), आणि 'सुंदरी आणि आस्वल' (इ. स. १८७१) ह्या वनदेवतांच्या कथा (Fairy Tales) प्रसिद्ध झाल्या.

इंग्रजी भाषेंतील सामान्य कथाग्रंथांचींच भाषांतरें

नवीन शाळांमधून शिकणाऱ्या मुलांसाठीं इंग्रजी भाषेंतील बालबोध नीतिकथांचीं भाषांतरें करण्यांत आलीं. त्यांची माहिती आरंभीं सांगितलेली आहेच, त्याबरोबरच हळू हळू त्या भाषेंतील मनोरंजक कल्पित गोष्टींचींहि भाषांतरें प्रसिद्ध होऊं लागलीं. भाषांतरासाठीं निवडलेल्या मूळ इंग्रजी गोष्टी सामान्य प्रतीच्याच होत्या. एकोणिसाव्या शतकांतील डिकन्स, थॅकरे, आस्टेन्, जॉर्ज इलियट् इत्यादि कुशल कथालेखकांच्या नामांकित कलाकृतींना कोणींहि हात लाविला नाहीं. मध्यम

* महाराष्ट्र भाषेंत मनोरंजक गोष्टी (भाग ५ वा) पृ० ५७–५८

प्रतीच्या गोष्टींचे तर्जुमे करण्यांतच तत्कालीन लेखकांनीं संतोष मानला. याचें कारण म्हणजे उच्च वाङ्मयांतील रसग्रहण करण्यास लागणारी कलात्मक दृष्टि त्या काळीं फारच थोड्या लोकांत होती. बुद्धिमान् व सुशिक्षित लोक सरकारी नोकरीच्या मोहांत गुंतलेले होते. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांचें पूर्ण ज्ञान असलेले लोक मराठी वाङ्मयाच्या वांट्याला येणें शक्य नसल्यामुळें तुटपुंज्या भांडवलावर लेखन-व्यवसाय चालविणाऱ्या सामान्य लोकांच्या हातींच कथावाङ्मयाची भूकहि कलाहीन पण चटकदार गोष्टींनीं भागण्यासारखी होती. यामुळें इंग्रजी वाङ्मयांतील बहुमोल रत्नें बाजूला सारून साधारण गोष्टींचींच भाषांतरें करण्याचा सर्वांनीं प्रयत्न केला.

भवानी विश्वनाथ कानविंदे

भवानी विश्वनाथ कानविंदे आणि इतर कांहीं मंडळी यांनीं इ. स. १८५४ त 'बर्थोल्ड' या इंग्रजी कथाग्रंथाचें भाषांतर केलें. कानविंदे हे गौड सारस्वत ब्राह्मण. मुंबईस जनरल असेंब्लीच्या विद्यालयांत शिक्षक होते. यांनीं मोठ्या परिश्रमानें 'नेटिव्ह बुक क्लब' नांवाचें पुस्तकालय स्थापिलें. याशिवाय त्यांनीं 'वर्तमानदीपिका' नामक पत्र काढिलें होतें, तेंहि बरेंच दिवस चाललें. यांनीं १ 'दारूपासून अनर्थ', २ 'मानवी कर्तव्यकर्में', ३ 'मुंबईतील सुशिक्षित हिंदु लोक', ४ 'सारस्वत ब्राह्मण किंवा शेणवी ऊर्फ कोंकणे ब्राह्मण याविषयीं आक्षेपकांचें यथार्थ खंडन' इत्यादि गद्यग्रंथ लिहिले.

सखाराम परशुराम पंडित

सखाराम परशुराम पंडित यांनीं 'Lamb's Tales from Shakesepeare' ह्या इंग्रजी कथासंग्रहामधील 'Taming of the shrew' आणि 'Merchant of Venice' या दोन गोष्टींचीं भाषांतरें 'शेरास सव्वाशेर' (इ. स. १८६७) व 'विलक्षण न्यायचातुर्य अथवा उज्जनी शहराचा व्यापारी' (इ. स. १८६८) ह्या नांवांनीं प्रसिद्ध केलीं. पहिल्या पुस्तकावरील अभिप्रायांतील सूचना लक्षांत घेऊन दुसऱ्या पुस्तकांत योग्य ती सुधारणा केल्यामुळें तें जास्त सरस वठलें आहे. सदर गोष्ट वाचकांना मनोरंजक वाटावी म्हणून एतद्देशीय लोकांच्या रीतीभातीस अनुसरून रचली आहे. भाषा सुबोध, गोड व कल्पित गोष्टीस असावी तशी आहे. इंग्रजी नांवांची योजना खुबीदार रीतीनें केली आहे. इंग्रजी नांवांतील पहिलें अक्षर मराठी नांवांत कायम ठेविलें आहे. उदा.—शायलॉक–शालगचंद, पोर्शिआ–पार्वती इ. इत्यादि. या पुस्तकावर वि. ज्ञा. विस्तार व शालापत्रक या मासिकांत अभिप्राय आले आहेत.

शेक्स्पीयरच्या नाटकांचीं कथात्मक रूपांतरें

इ. स. १८७० त कथासंग्रहांतील 'The Two Gentlemen of Verona', ह्या गोष्टींचें भाषांतर 'अवर्णनीय स्नेहभाव अथवा आनंदपुर नगरींतील दोन तरुण गृहस्थ' या नांवानें प्रसिद्ध झालें. याखेरीज इ. स. १८७१ त 'स्त्रीन्यायचातुर्य' (Merchant of Venice) व इ. स. १८७२ त 'भुरळ' (Comedy of Errors) ही शेक्स्पीयरच्या नाटकांचीं रूपांतरें प्रसिद्ध झालीं.

जिल्ब्लासचरित्र, भाग १ ला

विष्णु जीवाजी पागनीस यांनीं 'जिल्ब्लास चरित्र' भाग १ (इ. स. १८७१) ही मूळची फ्रेंच गोष्ट इंग्रजी भाषांतरावरून 'मूळ भाषेंतील भावार्थ राखून सुरस्या प्रकारानें' मराठी भाषेंत लिहिली. ग्रंथकर्त्यानें प्रस्तावनेंत अद्भुतरसाची चंगळ असणाऱ्या गोष्टी वाचण्याकडे वाचकांचा जास्त कल आहे. तरीसुद्धां वस्तुस्थितीला धरून असणाऱ्या गोष्टी लिहिण्यांतच समाजाचें खरें कल्याण आहे; म्हणून परभाषेंतील 'ग्राह्य' पुस्तकाचें भाषांतर झालें तर तें हितावह आहे असें सांगितलें आहे.

रॉबिन्सन क्रूसो ह्याचें चरित्र, भाग १ ला

याच वर्षीं रावजीशास्त्री गोडबोले यांनीं डीफोच्या 'रॉबिन्सन क्रूसो ह्याचें चरित्र', भाग १ ला या पुस्तकाचें मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें. "हें भाषांतर करतेसमयीं मुळांतील अर्थ जितका आणवेल तितका आणण्याविषयीं व सुलभ असून व्यवहारांत नित्यशः येणाऱ्या शब्दांचा प्रयोग करण्याविषयीं यत्न केला आहे."*

रासेलस

'क्लासिक टेल्स'या इंग्रजी कथासंग्रहांतील दोन गोष्टींचीं मराठींत भाषांतरें झालीं. त्यांपैकीं 'रासेलस' या गोष्टीचें भाषांतर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं केलें. "'अरेबियन नैटस्' वगैरे ग्रंथांत जसा मुख्यतः कल्पनाशक्तीचाच खेळ आहे तसें येथें नसून ती येथें केवळ गौण आहे; व संसारांतील नानाविध स्थितींच्या गुणदोषांचें व प्रसंगोपात्त दुसऱ्या अनेक विषयांचें प्रतिपादन करतांना मूळ ग्रंथकर्त्यानें आपली सूक्ष्म विवेचनशक्तीच विशेषेंकरून प्रगट केली आहे. यास्तव प्रतिपादनरूप ग्रंथाचा आपल्या भाषेंत हा पहिलाच मासला होय."† शास्त्रीबुवासारख्या रसिकवरानें केलेलें हें भाषांतर किती उत्तम वठलें असेल हें सांगण्याची कांहीं आवश्यकता नाहीं.

---

* प्रस्तावना—राबिन्सन क्रूसो ह्याचें चरित्र

† वि. कृ. चि.—प्रस्तावना—'रासेलस'

मुळांतील अर्थ व रस जसाचा तसा उतरवून हुबेहूब भाषांतर करणें, ही एक कला आहे, व ती कृष्णशास्त्री चिपळूणकरांना पूर्णपणें अवगत होती यांत कांहीं शंका नाहीं. "मराठी भाषेच्या सरणीस इंग्रजी ग्रंथांतील विचार कसे उतरवावे, म्हणजे मुळांतील अर्थांत उणें अधिक कोठें घालावें, कोणत्या ठिकाणीं कसा फेरफार करावा, वगैरे ज्या नाना प्रकारच्या युक्त्या भाषांतरकर्त्यांस प्रसंगवशात् लढवाव्या लागतात, त्यांची समजूत पुढील ग्रंथावरून बरीच पडेल असा भरंवसा आहे. तसेंच शब्दांचें व अर्थांचें सौष्ठव व स्वारस्य हींहि मराठी अभ्यास करणारांस लक्षपूर्वक वाचनांतीं कळण्यासारखीं आहेत."‡ भाषांतरात्मक ग्रंथांत रासेलसाचा दर्जा फार वरचा आहे. या ग्रंथांतील खालील उताऱ्यावरून कृष्णशास्त्र्यांचें मराठी भाषेवरील प्रभुत्व लक्षांत येईल.

"प्रथमच मी अफाट दर्यांत गेलों होतों. मग जेव्हां जमीन कोणीकडेहि अगदीं दिसेनाशी झाली, त्या वेळेस चोहींकडे पाहून मला मोठी मौज वाटली, परंतु त्या मौजेंत भयाचाहि कांहीं अंश होता. भोंवतालचा तो अमर्याद विस्तार पाहून माझें मन विस्तृत झालेंसें भासलें, व असें वाटलें कीं, समुद्राकडे टक लावून कितीहि दिवस बसलें तरी कधींहि कंटाळा यावयाचा नाहीं. परंतु कांहीं वेळ लोटल्यावर मला त्या नुसत्या एकसारख्या पाण्याकडे पाहावयास त्रास येऊन मी तक्तपोशीवरून उठून खालीं खोलींत जाऊन बसलों. माझ्या मनांत असा संशय आला कीं, समुद्राच्या मौजेविषयीं जसें झालें तसेंच ज्या पुष्कळ आशा बाळगून मी मुशाफरीस निघालों आहें, त्यांचाहि असाच शेवट होणार नाहीं ना! परंतु पुनः आपल्या मनाशीं असा विचार केला कीं, समुद्र आणि जमीन यांच्यामध्यें फार तफावत आहे. पाण्याच्या स्थितींत वैचित्र्य म्हटलें म्हणजे फारच थोडें. तें हालत असेल किंवा संथ असेल. परंतु जमिनीची गोष्ट तशी नाहीं. तीवर डोंगर, खोरीं, मैदानें, रानें व नगरें असें पुष्कळ वैचित्र्य असतें. तीवर निरनिराळे लोक राहतात, व त्या त्या लोकांच्या रीतिभाती, समजुती फारच निरनिराळ्या असतात. तसेंच जमिनीवरील सृष्टीच्या रचनेंत व स्वरूपांत जरी तितकें वैचित्र्य दृष्टीस न पडेल तरी तीवरील मनुष्यांचा व्यवहारांतरीं पुष्कळ वैचित्र्य आढळण्याचा संभव आहे. याप्रमाणें विचार करून मी आपलें मन स्वस्थ केलें."†

गोविंद शंकरशास्त्री बापट (इ. स. १८४४–१९०४)

गोविंद शंकरशास्त्री बापट यांनीं 'इलिझाबेद अथवा सिबिरिया देशांतील हद्दपार झालेलें कुटुंब' (इ. स. १८७४) या क्लासिक टेल्समधील दुसऱ्या गोष्टीचें

‡ वि. कृ. चि. —प्रस्तावना—'रासेलस'

† रासलेस पृ. ३१-३२

भाषांतर केलें. ही गोष्ट ऐतिहासिक आहे. म्हणून स्थळें व व्यक्ती यांचीं नांवें कायम ठेवलीं आहेत. या ग्रंथाची प्रस्तावना लहानच पण उद्बोधक अशी आहे. गोविंदशास्त्री यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत इ. स. १८४४ त झाला. मराठी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनीं वडिलांजवळ वेदाध्ययन केलें. पुढें पुण्यास येऊन न्याय व व्याकरण पढले. नंतर ट्रेनिंग कॉलेजची परीक्षा दिली. यांनीं खासगी रीतीनें अभ्यास करून इंग्रजी भाषेचें ज्ञान संपादिलें. हे सरकारी शिक्षणखात्यांत शेवटपर्यंत नोकरीस होते. यांनीं 'इलिझाबेथ', 'पाल आणि व्हर्जिनिया', 'हरी आणि त्रिंबक', 'गद्य-रत्नमाला' इत्यादि पुस्तकें लिहिलीं. यांची भाषा सरळ व गोड आहे. हे इ. स. १९०४ मध्यें निवर्तले.

रिचर्डाचें चरित्र (Ivanoe)

हरी विनायक बर्वे पनवेलकर यांनीं इ. स. १८७४ त सुप्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार सर वाल्टर स्कॉट ह्यांच्या 'Ivanoe' या कादंबरीचें मराठी भाषांतर 'रिचर्डाचें चरित्र' या नांवानें प्रसिद्ध केलें. इंग्रजी भाषेंतील नाणावलेल्या ग्रंथकाराच्या कादंबरीचें भाषांतर करण्याचा हा एकच प्रयत्न त्या काळीं झाला. बर्वे यांचें तरी अशा ग्रंथाकडे लक्ष गेलें हें नवलच म्हणावयाचें !

मराठी भाषेंतील पहिली स्वतंत्र कादंबरी – 'यमुनापर्यटण'

मराठी भाषेंतील स्वतंत्र कादंबऱ्यांची सुरुवात 'यमुना पर्यटन' (इ. स. १८५७) या खिस्ती गोष्टीनें झाली. 'यमुना पर्यटण' ही स्वतंत्र गोष्ट बाबा पदमनजी यांनीं लिहिली. तिच्यामध्यें हिंदु विधवांच्या दुःस्थितीचें वर्णन केलें असून पुनर्विवाहाची आवश्यकता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबरोबरच हिंदु-धर्माची नालस्ती करून खिस्ती धर्माचे गोडवेहि गाइले आहेत, यामुळें ह्या कादंबरीला फारशी लोकप्रियता मिळाली नाहीं. बाबा पदमनजी यांनीं मराठी भाषेंत पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. बाबांची भाषा शुद्ध व सुबोध असून तिच्यांत एक तऱ्हेचा प्रेमळपणा आहे. त्यामुळें त्यांचे सर्वच ग्रंथ वाचनीय झाले आहेत.

फुलमुनी आणि करुणा ह्यांचा वृत्तान्त

याच सुमारास प्रसिद्ध झालेली दुसरी खिस्ती गोष्ट "फुलमुनी आणि करुणा ह्यांचा वृत्तान्त" (इ. स. १८५९) ही होय. ही गोष्ट मुळांत कलकत्ता येथील एका मिशनरी बाईनें इंग्रजी भाषेंत लिहिली होती. तिचें हें मराठी भाषांतर फार चांगलें उतरलें आहे. यांत ईश्वराला भिणाऱ्या एका सुशील कुटुंबाचा वृत्तान्त सांगितला आहे. मधून मधून खिस्ती धर्मांतील शास्त्रवचनें व प्रार्थना देऊन खिस्ती धर्माचें महत्त्व सूचित केलें आहे. या दोन्ही गोष्टींमध्यें तत्कालीन कथावाङ्मयांतील अद्भुत–रसाचा

गंधहि नाहीं. यांतील सर्व वृत्तान्त वस्तुस्थितीला धरून आहे. भाषा सोपी असून परिणामकारक आहे. मराठी भाषेंत त्या काळीं ह्या दोनच वस्तुस्थितिनिदर्शक (Realistic) कादंबऱ्या लिहिल्या गेल्या असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. ' फुलमुनी आणि करुणा ' या कादंबरींतील खालील उताऱ्यावरून तिची सुबोध भाषासरणी समजून येईल.

" बहुत वर्षांपासून मी जेव्हां बाहेर फिरावयास जातें तेव्हां ईश्वरानें सृष्टीमध्यें नाना प्रकारचे सुंदर पदार्थ केले आहेत त्यांचें मनन करून त्यांपासून त्यांच्या प्रीतीविषयीं व ज्ञानाविषयीं जो बोध होतो तो ग्रहण करावा अशी माझी रीत पडली आहे. कधींकधीं एखादें रानझाडाचें फूल नजरेस पडलें, तर त्याचें सौंदर्य, त्याचे गुण इत्यादिकांविषयीं विचार करीत असावें. कधींकधीं सृष्टींतील एखादा भलता पदार्थ नजरेस पडला असतां, त्यावरून आत्मसंबंधीं कांहीं बोध घेत जावा अशी माझी रीत आहे. माळ्याला बागेंतील रोपास खसी करितां पाहून मला बहुत वेळां या पुढील गोष्टीची आठवण झाली आहे. " ज्यावर प्रभु प्रीति करितो, त्याला शिक्षा करितो." मी कधींकधीं ह्या तेजःपुंज सूर्यास अस्ताप्रत जातां पाहतें तेव्हां विश्वासी मनुष्याच्या मरणाची मला आठवण होती. जसा सूर्य एखाद्या उघाडीच्या दिवशीं देखील कोणास न कळतां अस्तास जातो, त्याप्रमाणें कित्येक खिस्ती मनुष्यें आपल्या तारकाची बहुत सेवा करूनहि कोणास न कळतां मावळतात. कित्येकांची अशी गोष्ट असते कीं, बहुत काळपर्यंत आपल्या तारणाविषयींचे संशय त्यांच्या मनांत उत्पन्न होतात, तरी परमेश्वर त्यांच्या मरणसमयीं त्यांजवर आपल्या यथार्थाच्या सूर्याचीं तेजस्वी किरणें पडूं देतो. दुसऱ्या कित्येकांची गोष्ट अशी असते, जसा पावसाळ्यांत सूर्य केव्हांशी उगवतो व केव्हांशी मावळतो, हें बहुधा ठाऊक होत नाहीं, त्याप्रमाणें त्यांच्या अल्पविश्वासामुळें, तेहि केव्हां उगवतात व मावळतात हें जगांतील लोकांस ठाऊक होत नाहीं. तरी हीं सर्व निरनिराळ्या प्रकारचीं खिस्ती मनुष्यें पुनरुत्थितीच्या वेळीं आपल्या सूर्याप्रमाणें तेजःपुंज होतील यांत कांहीं संशय नाहीं. †

सुरुवातीच्या स्वतंत्र कादंबऱ्यांचें सामान्य स्वरूप

मराठी भाषेंतील आरंभींच्या कथालेखकांचें इंग्रजी भाषेचें ज्ञान फारच मर्यादित होतें. त्यामुळें कथारचनेचें आधुनिक तंत्र त्यांना अवगत होणें शक्य नव्हतें. उत्तम गोष्ट लिहिणें ही एक कला आहे; व ती साध्य करून घेण्यासाठीं दीर्घकाल तपस्या करावी लागते याची कोणालाहि कल्पना नव्हती. " आतांशी नावलांची

† फुलमुनी आणि करुणा पृ. १८–१९

कीड फार झाली आहे. मुलेंबाळें देखील नावलें लिहून पैसा मिळवूं लागलीं आहेत. "‡ हे का. ब. मराठ्यांचे उद्गारहि हेंच दर्शवितात. इंग्रजीपेक्षां संस्कृत भाषेशीं त्या काळच्या लेखकांचा जास्त परिचय होता. 'दशकुमारचरित', 'बृहत्कथासागर' आणि मुख्यतः कादंबरी हे संस्कृत ग्रंथ कथा–लेखनाचे आदर्श म्हणून पुढें ठेवण्यांत आले; इतकेंच नव्हे तर कल्पित कथेला कादंबरी हाच शब्द मराठी भाषेंत रूढ झाला. त्यामुळें साहजिकच स्वतंत्र मराठी कथावाङ्मयांत अद्भुतरसाला प्राधान्य मिळालें.

कथानक

लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही मराठी भाषेंतील पहिली स्वतंत्र कादंबरी समजली जाते. त्यानंतरच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या हिच्याच धाटणीवर लिहिलेल्या आहेत. बाणाच्या कादंबरीप्रमाणें कादंबऱ्यांचीं नांवें बहुधा स्त्री-वाचक असत– 'रत्नप्रभा', 'मंजुघोषा', 'चंपकमाला', 'सुवर्ण-मालिनी', 'वसंत-माला' इ. इत्यादि. साधारण माणसाच्या आयुष्यांत अद्भुत गोष्टींना बिलकूल वाव नसल्यामुळें राजपुत्र, प्रधानपुत्र, राजकन्या, यांचा विलासी जीवनक्रमच कादंबरीचा विषय झाला. कथानकाची धाटणी एका ठराविक साच्याचीच असे. कामिनी, कांचन व राज्यपद यांवरच बहुधा त्यांची उभारणी झालेली असावयाची. कथावस्तूच्या विकासांत स्वाभाविकपणाचा लेशहि नसे. नायक–नायिकेची भेट हेंच सामान्यतः कथेचें उद्दिष्ट असे. 'राजा मदन' सोडून बाकीच्या सर्व कादंबऱ्यांचा शेवट आनंदांत झाला आहे. कथानकांतून पतिव्रतेवरील संकट-परंपरेचीं वर्णनें जागोजाग आढळतात. त्याबरोबरच त्यांची मुक्तताहि अकल्पित व असंभाव्य रीतीनें घडवून आणली जाते. औचित्यभाव बाजूला सारून मंत्रतंत्र, जादूटोणा, धरणीकंप इत्यादि पाहिजे त्या साधनांचा हवा त्या प्रसंगीं बिनदिक्कत उपयोग करण्यांत येतो. कथानकाचा रोख साधारणपणें सद्गुणांचा उत्कर्ष व दुर्गुणांचा अपकर्ष दाखविण्याकडे असतो. 'विलासिनी' ह्या कादंबरीच्या कर्त्यानें प्रस्तावनेंत नमूद केलेला खालील उद्देश साधारणपणें या काळच्या सर्व कादंबऱ्यांना लागू पडण्यासारखा आहे. "माझ्या अल्पमतीप्रमाणें मी, वाईट कृत्याचा वाईट, व चांगल्या कृत्याचा चांगला परिणाम, सुशिक्षित स्त्रियांची नीति, गंभीर पुरुषाचें धैर्य, संकटकालीं बुद्धीचें स्थैर्य, स्त्रीसक्त पुरुषाचें साहस व दुष्टत्व आणि ईश्वर सत्याचा अभिमानी इतक्या गोष्टी सिद्ध करण्याचा यत्न केला आहे."

स्वभाव-रेखनाची उणीव

ग्रंथकाराच्या अघटित–घटना–पटुत्वावरच कथानकाची सारी भिस्त असल्या-मुळें ह्या कादंबऱ्यांमधून स्वभावरेखनाला अजिबात फाटा मिळाला असला तर

‡ नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध–पृ. १८

त्यांत कांहीं नवल नाहीं. " जेवढे पुरुष तेवढे मदनाचे पुतळे, जेवढ्या स्त्रिया तेवढ्या तिलोत्तमा; " § तसेंच नायक म्हणजे सर्व सद्‌गुणांचें आगर, आणि खलनायक म्हणजे यच्चयावत् दुर्गुणांची खाण असें ठरून गेल्यानंतर मानवी स्वभावांतील भिन्न भिन्न सूक्ष्म व्यक्ति–विशेषांच्या आविष्करणाचें कारणच राहिलें नाहीं. अशा तऱ्हेच्या गोष्टी लिहिण्यांतच सारे लेखक गुंतल्यामुळें कथारचनेंतील कलात्मक अंगांची ओझरती ओळखहि तत्कालीन महाराष्ट्राला झाली नाहीं.

वर्णनें–वास्तवतेपेक्षां भरगच्चपणाकडे अधिक लक्ष

कथेंतील प्रत्येक भागाच्या आरंभीं एखाद्या ऋतूचें, वेळेचें, बागेचें किंवा अरण्याचें वर्णन असे. त्यांत वास्तवतेपेक्षां भरगच्चपणाकडे अधिक लक्ष देण्यांत येई. अत्यंत महत्त्वाच्या अशा निवडक गोष्टींचेंच वर्णन करून शब्दचित्र उठावदार व परिणामकारक करण्याची कला कोणालाहि माहीत नव्हती. बागेच्या वर्णनांत शक्य तितक्या फळांची व फुलांची अरण्याच्या वर्णनांत शक्य तितक्या वृक्षांची व पशु-पक्ष्यांची, भोजनाच्या प्रसंगीं शक्य तितक्या पक्वान्नांची व पोषाखाच्या वेळीं शक्य तितक्या वस्त्रांची व अलंकारांची यादी दिल्यावांचून वर्णन पुरेंच होत नसे. इतर वर्णनेंहि अशाच ठरीव पद्धतीचीं असत. " प्रत्येक शोकस्थलीं मरणासारिखा शोक, व आनंदस्थळीं स्वर्गासारिखा आनंद दुसरी उपमाच नाहीं, नवराबायकोचें भांडण प्रेमाचा लोट ! त्यांत अभिप्राय गूढ राखणें, किंवा गांभीर्य हीं बिलकूल नाहींत. " ‡ स्थल, काल व वर्णनें यांमध्येंहि पुष्कळ ठिकाणीं विसंगतपणाचा दोष आढळतो. पंधराव्या शतकांतल्या विचित्रपुरी नगरींतील राजपुत्र व प्रधानपुत्र कलकत्ता युनिव्हर्सिटीचे पदवीधर दाखविले आहेत. ' विश्वासराव ' कादंबरींत एकाच प्रसंगीं जुन्या काळच्या दरबाराचा थाट व एकोणिसाव्या शतकांतील यांत्रिक साधनें यांचें वर्णन केलें आहे. ' मुक्तामाले ' तील वसंतऋतूच्या खालील वर्णनावरून तत्कालीन कादंबऱ्यांच्या वर्णनशैलीची यथार्थ कल्पना येईल.

> " वसंतकालास आरंभ होऊन बरेच दिवस झाल्यामुळें, बागा, रानें व डोंगर ह्यांतील वृक्षांस नवीन पालवी फुटली. तेणेंकरून त्यांची फारच रमणीय शोभा दिसूं लागली. आंबे, फणस, अंजीर, द्राक्षें इत्यादि वृक्ष चोहींकडे फळांनीं थबथबल्यामुळें त्यांचीहि एक मोठी मनोरंजक रचना दिसूं लागली. बागांतून व कितीएकांच्या गृहांतून गुलाब, मोतिया, शेवंती, चमेली, जाई वगैरे फुलझाडांस बार आल्यामुळें चोहींकडे मधुर सुगंध सुटूं लागला.

§ नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध पृ. ८

‡ नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध पृ. ९

कोकिळा, मयूर, कीर इत्यादि पक्ष्यांच्या मंजुळ स्वरांनीं आकाश भरून गेलें. मृगजल हें पाणीच आहे असें मानून आपली तृषा शांत करण्याकरितां हरिणांचे कळप रानांतून हिकडून तिकडे फिरूं लागले. कितीएक पांथस्थ लोक उष्णतेमुळें त्रास पावून वृक्षच्छायेखालीं मंद शीतळ वारा घेत बसले. ह्याचप्रमाणें गुरांचे कितीएक कळप छायेखालीं बसले आहेत व कितीएक येत आहेत. ह्या ऋतूंत थंड वारा व थंड पाणी फारच प्रियकर वाटते व अवशीं पहांटे प्रवास करणें फारच सुखकर होतें. सारांश, शीतोपचाराची ह्या ऋतूंत जशी उत्कट इच्छा होते, तशी इतर ऋतूंत होत नाहीं. *

बोजड भाषाशैली

ह्या कादंबऱ्यांच्या भाषेमध्येंहि स्वाभाविकपणा बिलकुल नसे. लांबलांब, बोजड व अर्थशून्य वाक्यें लिहिण्यांतच लेखकांना भूषण वाटे. ‘ मंजुघोषा ’ ह्या कादंबरींतील नायिका साध्या पत्रांतहि आपल्या पांडित्याचें प्रदर्शन करिते. अनुप्रास साधण्याच्या हौसेपायीं अर्थहानि होत असतांहि त्याकडे पूर्णपणें दुर्लक्ष करण्यांत येई. “ वसंतासहि संतत उसंत देणारी व–सं–त–मा–ध–व हीं सहा अक्षरें तिच्या कर्णरंध्रद्वारें शिरून आंतील शुद्धिकंदास जागृत अवस्था देती झाली, ” ‘ आवडीनें कावडी घेऊन, ’ ‘ सर्व वंदीत असतांनाहि बंदींत ’ इ. इत्यादि.

सामाजिक परिस्थितीचा परिणाम

भोंवतालच्या सामाजिक परिस्थितीचाहि तत्कालीन कथा–वाङ्मयावर थोडाबहुत परिणाम होणें अपरिहार्य होतें. स्त्री-शिक्षण, पुनर्विवाह, परदेशगमन इत्यादि सामाजिक प्रश्नांवर त्या काळीं कडाक्याचे वाद चालू होते. दोन्ही पक्षांकडील मंडळी आपापल्या मतांचा प्रचार करीत होती. याच सुमारास लक्ष्मणशास्त्री हळबे यांनीं ‘ रत्नप्रभा ’ (इ. स. १८६६) ही आपली दुसरी कादंबरी प्रासिद्ध केली. तिच्यांत त्यांनीं नायकाचा पुनर्विवाह घडवून आणला आहे.

लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे

लक्ष्मणशास्त्री हळबे हे महाराष्ट्रांतील पहिले स्वतंत्र कादंबरीकार होत. यांनीं आपल्या ‘ मुक्तामाला ’ व ‘ रत्नप्रभा ’ या दोन कादंबऱ्या लोकप्रिय करून दाखविल्या आणि मराठी वाङ्मयांत अद्‌भुतरम्य कादंबऱ्यांची नवीन प्रथा पाडिली. त्यांच्याविषयीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. मुंबई येथें सामाजिक सुधारणांचा प्रसार करण्यासाठीं स्थापन झालेल्या परमहंस मंडळींविषयीं त्यांना विशेष आस्था वाटत असे. ‘ मराठी

* मुक्तामाला (आवृत्ति ७ वी) पृ. ८–९

ज्ञानप्रसारक मासिकां 'तहि त्यांच्या कांहीं कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. ' इंदुप्रकाश ' वर्तमानपत्राच्या आरंभींच्या व्यवस्थापक वर्गांत यांचें नांव आढळतें. त्यांची भाषासरणी शुद्ध, साधी पण गोड असून वर्णनें मनोरम आहेत.

राजा मदन

इ. स. १८६५ त बाबा गोखले यांनीं ' राजा मदन ' ही दुःखपर्यवसायी कथा प्रसिद्ध केली. त्या काळच्या कथावाङ्मयांत दुःखामध्यें शेवट झालेली अशी ही एकच अपवादात्मक कादंबरी होती. न्यायमूर्ति रानडे यांनीं ह्या कादंबरीसंबंधीं आपल्या निबंधांत " Of the original works Muktamala and Raja Madan are the best " ‡ असा अभिप्राय आहे.

इतर कादंबऱ्या

नारो सदाशिव रिसबूड यांनीं हळबेशास्त्र्यांच्या पावलावर पाऊल टाकून ' मंजुघोषा ' (इ. स. १८६८) व ' विश्वासराव ' (इ. स. १८७०) ह्या दोन कादंबऱ्या लिहिल्या. यांपैकीं ' विश्वासराव ' या कादंबरीवर वि. ज्ञा. विस्तारांत सडेतोड टीका आली होती. इ. स. १८६९ त विनायक बाळकृष्ण दामले यांनीं ' अवलिया अथवा मानी स्वभावाचा दारुण परिणाम ' ही कादंबरी लिहिली. ' शालापत्रक ' मासिकांत हिचें फार मार्मिक परीक्षण प्रसिद्ध झालें होतें. याच सुमारास केशव लक्ष्मण जोरवेकर यांनीं ' विचित्रपुरी ' (इ. स. १८७०) ही कादंबरी प्रसिद्ध केली. हिच्यामध्यें भूताखेतासारख्या लोकभ्रमावर कोरडे ओढले आहेत. " विचित्रपुरी कर्त्याकडून जरी बरेच हास्यास्पद प्रकार घडले आहेत, तरी तिच्यांतील अनेक भाग चटकदार असून ती कादंबरी एके काळीं बरीच लोकप्रिय झाली होती. शिवाय समाजांतील अज्ञानमूलक चालीवर कडक टीका करून व कौटुंबिक कर्तव्यापेक्षां परोपकाराची श्रेष्ठता वर्णून कादंबरीच्या एका नवीन प्रकारास तिनें सुरुवात केली. या दृष्टीनें तिचें बरेंच महत्त्व आहे. "* इ. स. १८७२ त डेविड हाईम या खिस्ती लेखकानें ' प्रियकांता व सुशीला ' ही कल्पित गोष्ट लिहिली. ह्याखेरीज त्यानें ' गुल व सनोवर ' भाग २, ' छेलबताऊ व मोहनाराणी ', ' रासक्रीडा ' इत्यादि गद्य ग्रंथ लिहिले. ह्या काळांतील एका स्त्रीलेखिकेचा कौतुकास्पद प्रयत्न म्हणून साळूबाई भ्रतार भाऊसाहेब तांबवेकर यांच्या चंद्रप्रभा विरहवर्णन ' (इ. स. १८७३) ह्या कथाग्रंथाचा उल्लेख करणें जरूर आहे. ह्याशिवाय वसंतमाला ', (इ. स. १८६८), ' सुहास्यवदना ', (इ. स. १८७०), ' चंपकमाला ', (इ. स. १८७१)

‡ M. G. Ranade—*Remarks on the Marathi Catalogue*

* वि. ज्ञा. वि. पु. ४३, अं. १–२

'मनोवेधक मधुसूदन आणि रूपसुंदरी' (इ. स. १८७२), 'हिरालाल' (इ. स. १८७३), 'प्रेमबंधन' (इ. स. १८७४) इत्यादि अद्‌भुतरम्य कादंबऱ्या या काळांत प्रसिद्ध झाल्या.

घाशीराम कोतवाल

ऐतिहासिक गोष्टींच्या रचनेंत अद्‌भुतता आणि वास्तवता यांच्या मनोहर मिश्रणाला भरपूर वाव मिळतो. या दृष्टीनें अद्‌भुत गोष्टीनंतर ऐतिहासिक गोष्टी लिहिण्याकडे लेखकांच्या प्रवृत्ति होणें स्वाभाविक आहे. 'मुक्तामाला' प्रसिद्ध झाल्यानंतर बरोबर दोन वर्षांनीं मोरोबा कान्होबा विजयकर यांनीं 'घाशीराम कोतवाल' (इ. स. १८६३) हा ऐतिहासिक कथाग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. "सवाई माधवराव पेशव्यांचे कारकीर्दीत घाशीराम या नांवाच्या कनोजा ब्राह्मणाकडे पुणें शहरची कोतवाली होती. ह्या कोतवालाचें कारकीर्दीचें संबंधानें ह्या ग्रंथांत लोकांचे मनोरंजनार्थ व उपदेशार्थ गोष्टी लिहिल्या आहेत. त्या प्रत्येक गोष्टीचें तात्पर्य काय याचा विचार करून ग्रंथ वाचिला असतां ह्या कोतवालाचे वेळेस किती अंदाधुंदी होती व विद्वान् म्हणविणारे लोकांस देहाभिमान व जात्यभिमान मोठा असून त्यांचा नीतिमार्ग किती अशुद्ध व साधारण विषयांविषयीं केवढें अज्ञान होतें हें सहज कळून येईल" * या ग्रंथांत एकंदर अठ्ठावीस गोष्टी आहेत. त्यांत आळंदीची यात्रा, सेंटपालचें देऊळ, पापीचा स्तंभ, दुर्भिणीचा इतिहास इत्यादि अनेक विषयांची माहिती आलेली आहे. ह्या काव्यसंग्रहांतील संवाद व वर्णनें चटकदार आहेत. या ग्रंथांत ऐतिहासिकदृष्ट्या पुष्कळ चुका असल्या तरी मनोरंजकतेच्या दृष्टीनें त्यांतील गोष्टी निःसंशय सरस वठल्या आहेत.

मोरोबा कान्होबा विजयकर (इ. स. १८१३–७१)

मोरोबा कान्होबा विजयकर हे पाठारे प्रभु ज्ञातींतील सन्मान्य सुधारक. त्या काळच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि त्यांनीं सामाजिक सुधारणेच्या बाबतींत विलक्षण धडाडी दाखविली. स्वतः पुनर्विवाह करून आपल्या मताचा आजन्म प्रचार केला. विधवाविवाहावरील त्यांचें एक व्याख्यान इ. स. १८७० त प्रसिद्ध झालें होतें. यांनीं सरकारी मोठमोठ्या हुद्द्याच्या जागांवर कामें करून चांगला नांवलौकिक संपादन केला, आणि शेवटीं हे मुंबईतील स्मालकॉज कोर्टाचे जज्ज झाले होते. त्यांच्या वरील कथा-संग्रहांतील एक गोष्ट नमुन्यादाखल खालीं देत आहें.

"रात्रीस भोजन झाल्यावर घाशीराम आपले वाड्यांत कांहीं वेळपर्यंत पानाच्या पट्ट्या व जर्दा खात बसत असे, व त्या वेळीं आर्जवी मंडळी

* ग्रंथप्रवेश—घाशीराम कोतवाल.

त्याचें भोंतालीं जमून त्याचें इनसाफाची व कर्तृत्वाची मोठी तारीफ करीत असे. तशा एका वेळीं तेथें एक विजापूरचा गृहस्थ आला. त्यानें आपलें शहरचे न्यायाधीशाच्या प्रशंसेची गोष्ट सांगितली, कीं गेले आषाढीचे यात्रेंत विकण्याकरितां पंढरपुरास पाठविण्यासाठीं आमचे शहरचा रामदीन नामें एक गंधी पांचपंचवीस मण चांगला सुगंधी बुक्का तयार करून, पन्नास पोतीं भरून, दुसरें दिवशीं तीं बैलावर लादून रवाना करणार होता. तीं पोतीं त्यानें आपले दुकानामागील चौकांत ठेविलीं होतीं. तीं रात्रीस कोणी चोरट्यांनीं नेलीं. रामदीन पहाटेस उठून चौकांत जाऊन पाहतो तों पोतीं नाहींत. परंतु इकडेतिकडे कांहीं बुक्का उधळलेला होता व भिंतीवरून पोतीं चढवून नेल्याच्या खुणा दिसत होत्या. त्यावरून ' चोरी झाली रे, चोरी झाली " म्हणून त्यानें आरोळी ठोकली. त्यावरून जवळपासचे लोक धावून आले. त्यांस त्यानें मजकूर सांगितला आणि शहरचे कोतवाल समशेर-खान यांस खबर दिली. त्यावरून त्यांनीं जलदी करून स्वार पाठवून नाके-बंदी केली, आणि सर्व शहरांत शोध केला. परंतु ठिकाण लागेना. तेव्हां बुक्क्याचे सर्व दुकानदार व त्यांचे गुमास्ते यांजला जमवून चौकशी चालविली, ती दोन प्रहर होत तोंपर्यंत चालली. तथापि पत्ता लागला नाहीं. नंतर सर्वांस उभे करून समशेरखान हे त्यांसभोंवते तीनदां फिरून येऊन समोर उभे राहिले, आणि मोठ्यानें हासून बोलले कीं, हे काय निर्लज्ज लोक आहेत! बुक्का चोरला तर चोरला; परंतु त्यापैकीं बुक्का कपाळासहि लावून येथें लाले आहेत ! इतके शब्द ऐकतांच जमलेल्या मंडळींपैकीं चौघा जणांनीं आपआपले कपाळावरून हात जलदीनें फिरवून नाकाकडे वास घेण्यास नेले. इतक्यावरून त्या चौघांस एकीकडे काढून तपास करितां, त्यांत दोघेजण सख्खे बंधु होते, व बाकीचे दोन असामी त्यांचे गुमास्ते होते, असें कळलें. त्यावरून त्या उभयता बंधूंचे दुकानचीं व घरचीं तळघरें मशाली लावून शोधली, तेव्हां चोरीस गेलेली पन्नासहि पोतीं अडचणीचें ठिकाणीं लपवून ठेविलेलीं सांपडलीं. त्यावरून त्या चौघांचें पारिपत्य केलें, तेव्हांपासून समशेरखान कोतवाल यांचे बुद्धीची व चातुर्याची मोठी प्रशंसा झाली आहे.

सदरहूप्रमाणें गोष्ट विजापूरचे वाण्यानें सांगितलेली ऐकून घाशीराम बोलला कीं, समशेरखान व तरवारखान असे अक्कलवान असते तर विजापूरची बादशाई कां बुडाली असती ? आमचे शहरांत अशी चोरी झाली असती तर दोन प्रहर व चार प्रहर ते चोर धरण्यास कशास लागते ? आम्ही सर्वांस एका कोठडींत दडपून घालून त्यांपैकीं पांचचार जणांस तापवून लाल केलेल्या लोखंडी तव्यावर उभे केले असते, म्हणजे चोर कोणते ते एका क्षणांत

सांपडले असते. हें भाषण ऐकून घाशीरामाचे घरचे आर्जवी मंडळीनें वहावा करून विजापूरचे वाण्याची मोठी फजीती करण्यास आरंभ केला. तेव्हां तो बापडा उठून गेला. " ‡

मोचनगड

रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनीं इ. स. १८७१ त 'मोचनगड' ही मराठी भाषेंतील पहिली ऐतिहासिक कादंबरी पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. ह्या कादंबरींतील काळ छत्रपति शिवाजीमहाराजांचा घेतला असून, तिची रचना प्रख्यात इंग्रजी कादंबरीकार सर वॉल्टर स्कॉट ह्याच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या धर्तीवर केलेली आहे. त्या काळीं उपलब्ध असलेलीं ऐतिहासिक साधनें लक्षांत घेतां ही कादंबरी पुष्कळच चांगली उतरली आहे. गुंजीकरांची भाषा शुद्ध, सरळ, सोपी व प्रसादयुक्त आहे. " यांची सर्वत्र ख्याति आहे ती ते उत्तम शिक्षक अथवा विद्वान् गृहस्थ होते म्हणून नव्हे, तर ते मराठी भाषेंतील एक मार्मिक ग्रंथकार होते म्हणून होय. " *

रामचंद्र भिकाजी गुंजीकर (इ. स. १८४३–१९०१)

रामभाऊ गुंजीकर हे गौड सारस्वत ब्राह्मण. यांचें प्राथमिक शिक्षण बेळगांवास व इंग्रजी शिक्षण मुंबईस झालें. यांनीं शाळाखात्यांत बरींच वर्षें काम केलें. इ. स. १८६७ त कांहीं मित्रांच्या साह्यानें यांनीं 'विविधज्ञानविस्तार' या नांवाचे मासिक काढिलें, तें आतां बंद पडलें आहे. " विस्ताराची टीकाकार म्हणून जी प्रसिद्धि आहे ती त्यास मूळ रामभाऊंमुळेंच प्राप्त झाली. " * त्यांचे व्याकरणावरील निबंध फार मार्मिक आहेत. यांनीं 'मोचनगड', 'महाराष्ट्रभाषेची लेखनशुद्धि', 'अभिज्ञान–शाकुंतल', 'लाघवी लिपि' इत्यादि गद्यग्रंथ लिहिले. मराठी भाषेंतील एक चतुरस्त्र लेखक या दृष्टीनें रामभाऊंची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्या 'मोचनगड' कादंबरींतील खालील उताऱ्यावरून त्यांची लिहिण्याची शैली लक्षांत येईल.

" मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, शिपाई याणें गंगूबाईला ठाणेदार यांचे घरीं नेऊन पोंचविलें; आणि घरांत जाऊन वरदी दिली. त्याबरोबर त्यांची बायको आंतून बाहेर आली. ती मोठी सभ्य वर्तणुकीची असून तिचें वय सुमारें ३० वर्षांचें दिसत असे. इच्या स्वरूपास व वयास पाहून ती

‡ घाशीराम कोतवाल पृ. १५–१६

* वि. ज्ञा. वि. पु. ३२.

* वि. ज्ञा. वि. पु. ३२

किंचित् दुःखी जाहली, आणि हातपाय धुण्याकरितां पाणी देववून, फारसें कांहीं न बोलतां तिला आंत घेऊन गेली. तिला बसावयास एक पाट दिला, आणि आपणहि खालीं बसली. गंगूबाईस खालीं बसल्याबरोबर जो एकदम हुंदका आला, त्यामुळें कांहीं केल्या रडें सावरेना. जात्याआधीं स्त्री, तशांत तरुण, तशांत सुंदर, सुस्वभावाची, सरळ मनाची; तेव्हां अशा स्त्रीचें रुदन पाहून कोणत्या बरें पाषाणहृदयी मनुष्याचें अंतःकरण द्रवल्यावांचून राहील ? तिनें खालीं मान करून डाव्या हाताच्या तळाथावर टेकलेले ते गुलाबी रंगाचे गाल, तें विस्तीर्ण कपाळ, तें सरळ उंच नाक, हें सर्व फिक्कट पडून, त्यांजवरील तजेला अगदीं नाहींसा जाहला आहे. मुक्ताफळांचा हार तुटून खालीं ती सांडूं लागल्याप्रमाणें, नेत्रांतून घळघळा चाललेल्या अश्रूंच्या धारा गालांवरून खालीं पडत आहेत अशांतच भीतीस्तव पुनः पुनः डोळे पुसत आहे, परंतु डोळे लाल झाले व पदर ओला होऊन गेला, तरी तिचें रडें थांबेना. उकळीवर उकळी येऊं लागली, हें पाहून ठाणेदाराचे स्त्रीस फार वाईट वाटलें. शेजारीं मुलेंबाळें जमून आश्चर्यानें व भीतीनें चकित होऊन तिकडच्या तिकडे स्तब्ध राहिलीं आणि एकमेकांच्या तोंडाकडे उदास मुद्रेनें टकमक पाहूं लागलीं. " ×

ह्याप्रमाणें मराठी भाषेंतील कथात्मक वाङ्मयाचा पूर्व-वृत्तान्त थोडक्यांत सांगितला. हळबे-रिसबुड-जोरवेकर-गुंजीकरप्रभृति लेखकांचे कथाग्रंथ कलात्मक दृष्टीनें कितीहि सदोष असले, तरी त्यांनीं महाराष्ट्र—वाङ्मयांत स्वतंत्र कादंबऱ्यांची परंपरा निर्माण केली, वाङ्मयाच्या बाल्यावस्थेंत त्याचें परिश्रमपूर्वक संगोपन आणि संवर्धन केलें, म्हणून ऐतिहासिक दृष्ट्या त्यांची कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे, यांत बिलकुल संदेह नाहीं.

* * *

× मोचनगड (प्रकरण १०)

परिशिष्ट

बोधपर गोष्टी व लोककथा

१. बालबोध-मुक्तावलि–इसापनीतीचें मराठी भाषांतर; (प्रारंभ–प्रपंच्यामाजि जें शास्त्र लोपल्या मनुष्यसृष्टीचें श्रेष्ठपण.) सख्खनपंडित. तंजावर, इ. स. १८०६ (ब्रि. म्यु.)

२. सिंहासनबत्तीसी–भाषांतर, वैजनाथ शर्मा श्रीरामपूर, इ. स. १८१४ (मुं. ग्रं.)

३. पंचतंत्र–भाषांतर, वैजनाथ शर्मा, श्रीरामपूर, इ. स. १८१५ (इं. ऑ.)

४. हितोपदेश–भाषांतर, श्रीरामपूर, इ. स. १८१५ (ब्रि. म्यु.)

५. सिंहासनबत्तीसी–भाषांतर, मुंबई, इ. स. १८२४

६. बाळमित्र भाग १–Berquin's Children's Friend ह्या फ्रेंच कथासंग्रहाचें इंग्रजीवरून भाषांतर–सदाशिव काशिनाथ छत्रे, मुंबई, इ. स. १८२८

७. इसापनीतिकथा–भाषांतर, सदाशिव काशिनाथ छत्रे, मुंबई, इ. स. १८२८

८. वेताळपंचविशी–भाषांतर; सदाशिव काशिनाथ छत्रे, मुंबई, इ. स. १८३१

९. बोधकथा-भाषांतर, (दुसरी आवृत्ति.) पुणें, इ. स. १८३०

१०. बाळमित्र भाग २–भाषांतर, लेफ्टेनंट टी. गेस्फोर्ड, मुंबई, इ. स. १८३३

११. पंचोपाख्यान–भाषांतर, पुणें, इ. स. १८३६

१२. नीतिदर्पण–स्वतंत्र, विष्णुशास्त्री (आवृत्ति दुसरी) मुंबई, इ. स. १८३८

१३. नीतिकथा–भाषांतर, (आवृत्ति तिसरी) मुंबई, इ. स. १८३७

१४. बालोपदेशकथा. विष्णुशास्त्री. मुंबई, इ. स. १८३८

१५. नीतिकथा– पुणें, इ. स. १८४५ (ग्रां. कॅ.)

१६. शालोपयोगी नीतिग्रंथ (Chamber's Moral Class-book) भाषांतर, हरी केशवजी पाठारे, मुंबई, इ. स. १८४६
१७. बालोपदेशकथा. इंदूर, इ. स. १८४९
१८. इसापनीतिकथा—मेजर कँडी यांनीं शोधिली. मुंबई, इ. स. १८५१
१९. शुकबहात्तरी— मुंबई, इ. स. १८५२ (ग्रां. कॅ.)
२०. संक्षिप्त इसापनीतिकथा—मेजर कँडी, मुंबई, इ. स. १८५९
२१. नारायणबोध भाग १—स्वतंत्र, रामजी बिन गणोजी चौगुले. (आपल्या नारायण नामक पुत्रासाठीं बोधपर गोष्टी) मुंबई, इ. स. १८६०
२२. सुबोधतरणी—नीतिपर गोष्टी, अप्पाजी गणेश वसईकर, मुंबई, इ. स. १८६७ (इं. ऑ.)
२३. बोधकथा—गणेश महादेव गोडबोले, पुणें, इ. स. १८६७ (इं. ऑ.)
२४. सुबोधकथासंग्रह, भाग १—रावजी श्रीधर गोंधळेकर, पुणें, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

पौराणिक आख्यानांच्या व इतर राज्यांच्या बखरी

२५. बकासुराची बखर., रामचंद्रशास्त्री, पुणें, इ. स. १८४५ (ग्रां. कॅ.)
२६. चंद्रहास्य बखर. इ. स. १८४६ (ई. इं.)
२७. भागवताची बखर. पुणें, इ. स. १८४७ (ग्रां. कॅ.)
२८. शालिवाहनाची बखर. इंदूर, इ. स. १८४७ (ई. इं.)
२९. नंदराजाची गोष्ट. इंदूर, इ. स. १८५१ (इं. ऑ.)
३०. नलराजाची बखर—रामचंद्रशास्त्री, पुणें, इ. स. १८५७
३१. लवकुशाख्यानबखर—प्र. नारो आप्पाजी गोडबोले, पुणें, इ. स. १८६१ (ग्रां. कॅ.)
३२. विराटपर्वाची बखर—चिंतामणशास्त्री थत्ते व गजाननशास्त्री डोंगरे, मुंबई, इ. स. १८६२
३३. नीलकंठराजाची बखर— पुणें, इ. स. १८६३ (ग्रां. कॅ.)
३४. द्रौपदीवस्त्रहरणाची बखर—विनायक आपाजी काणे, पुणें, इ. स. १८६४
३५. पांडवांची बखर—रामचंद्रशास्त्री, पुणें, इ. स. १८६९ (ब्रि. म्यु.)

फारशी भाषेंतील गोष्टींचीं भाषांतरें व त्या धर्तीवर स्वतंत्र कथाग्रंथ

३६. हातिमताईचरित्र–डंकन फारबस साहेबाच्या इंग्रजी भाषांतरावरून (भाग ७), कृष्णराव माधवराव प्रभु. मुंबई,
इ. स. १८५४–१८५५ (ब्रि. म्यु.)

३७. बखत्यारनामा अथवा बखत्यारनामक राजपुत्र आणि दहा वझीर यांच्या कथा–सर विलियम औस्लेच्या इंग्रजी भाषांतरावरून. नारायण केशव प्रभु. इ. स. १८५५ (ब्रि. म्यु.)

३८. आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी–अरेबियन नाइट्सचें भाषांतर (भाग ५), कृष्णशास्त्री चिपळूणकर, पुणें,
इ. स. १८६१ ते ६५.

३९. दुर्दैवी मुराद व दैववान सलाउद्दीन–इंग्रजीवरून भाषांतर. विनायक नारायण भागवत, पुणें, इ. स. १८६२

४०. आरबी गोष्टी– (The thousand and one days). भास्कर सखाराम. मुंबई, इ. स. १८६३ (ब्रि. म्यु.)

४१. बाहारदानीश अथवा फारसी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी (भाग १–२), नारो आप्पाजी गोडबोले;
पुणें, इ. स. १८६५–६७.

४२. गुल आणि सनोबर (भाग १–२); डेविड हाइम,
मुंबई इ. स. १८६७–६९

४३. बागोबहार अथवा चार दर्वेशांच्या गोष्टी (भाग ३), डंकन फारबसच्या इंग्रजी भाषांतरावरून. मोशे दानिएल तळकर,
मुंबई, इ. स. १८६९–७०–७१.

४४. पर्शियन नाइटस् अथवा किशबरसिता (भाग १) रावजी मनोहर ताकभाते, पुणें, इ. स. १८७३.

४५. गुलबकावली–गुजराथीवरून भाषांतर, विनायक सदानंद नवलकर, मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

स्त्रीचरित्रात्मक गोष्टी

४६. स्त्रीचरित्र (भाग ४), रामजी बिन गणोजी चौगुले, मुंबई,
इ. स. १८५४. (ग्रां. कॅ.)

४७. विदग्ध-स्त्रीचरित्र–चिंतामण दीक्षित जोशी, सातारा, इ. स. १८७१.

४८. सुशिक्षित स्त्रीचरित्र (भाग १–२)—गोविंद विनायक कानिटकर, मुंबई, इ. स. १८७२–७३

चातुर्यबोधक गोष्टी

४९. तर्कदीपिका—जनार्दन हरी आठल्ये, रत्नागिरी, इ. स. १८५८

५०. चमत्कारिक गोष्टी (भाग ३)—भोज कालिदास यांच्या, नारो आप्पाजी गोडबोले, पुणें, इ. स. १८६५–६६

५१. चमत्कारिक न्यायाच्या व अकलेच्या गोष्टी (भाग १)—उडदु व मराठी. त्र्यंबकराव नारायण राजमाचीकर, पुणें, इ. स. १८६७

५२. एका प्रधानाचें चातुर्य—परशुराम भिकाजी भाटे, रत्नागिरी, इ. स. १८६८.

५३. बादशहा आणि बिरबल यांच्या गोष्टी— मुंबई, इ. स. १८६९

आरबी भाषेंतील गोष्टींच्या धर्तीवर स्वतंत्र कथासंग्रह

५४. मराठी भाषेंतील सुरस गोष्टी (भाग १)—नारायण गोपाळ दामले, विनायक हरी सिनकर, मुंबई, इ. स. १८७०

५५. महाराष्ट्र भाषेंत मनोरंजक गोष्टी (भाग ५)—केशव रघुनाथशेठ चोंचे सईतवडेकर, मुंबई, इ. स. १८७०–७३.

रूपकात्मक गोष्ट (Allegory)

५६. युरोपाकाकूच्या शाळेंतील मारामारी, मुंबई, इ. स. १८७१

वनदेवतांच्या गोष्टी (Fairy Tales)

५७. युरोपांतील वनदेवतांच्या गोष्टी—एच् बेलियर्स, मुंबई, इ. स. १८६८

५८. सुंदरी आणि अस्वल, मुंबई, इ. स. १८७१

इंग्रजी भाषेतील कल्पित गोष्टींचीं भाषांतरें

५९. बर्थोल्ड—भवानी विश्वनाथ कानविंदे आणि इतर, मुंबई, इ. स. १८५४ (ग्रां. कॅ.)

६०. शेरास सव्वाशेर. (चार्लस् व मिस् लॅब् यांच्या शेक्सपीयरच्या ग्रंथांतील गोष्टींपैकीं 'Taming of the shrew' या गोष्टीचें भाषांतर) सखाराम परशुराम पंडित मुंबई, इ. स. १८६७

६१. विलक्षण न्यायचातुर्य अथवा उज्जनी शहरचा व्यापारी. ('ल्यांब्स टेल्स्' या कथासंग्रहांतील 'Merchant of Venice' या गोष्टीचें भाषांतर) सखाराम परशुराम पंडित, मुंबई, इ. स. १८६८

६२. अवर्णनीय स्नेहभाव अथवा आनंदपुरनगरींतील दोन तरुण गृहस्थ ('ल्यांब्स् टेल्स्' या कथासंग्रहांतील The two gentlemen of Verona या गोष्टीचें भाषांतर) मुंबई, इ. स. १८७०

६३. बर्थोल्डचरित्र—एक हिंदु. रत्नागिरी, इ. स. १८७०

६४. रॉबिन्सन क्रूसो ह्याचें चरित्र (भाग १)–दानियल दीफोच्या इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर. रावजीशास्त्री गोडबोले, मुंबई, इ. स. १८७१

६५. स्त्रीन्यायचातुर्य. शेक्सपीयरच्या 'Merchant of Venice' ह्या नाटकाचें कथात्मक रूपांतर–आत्माराम विनायक पाटकर, मुंबई, इ. स. १८७१

६६. लावण्यकलिका अथवा कळसूत्री घोडा व बंगाल देशच्या एका सुंदर राजकन्येची मनोरंजक गोष्ट–भगवंतराव वासुदेवजी घुमरे, मुंबई, इ. स. १८७१

६७. जिल्ब्लास–चरित्र, पुस्तक १ लें– Adventures of Gil Blas Book I (मूळ फ्रेंच गोष्टीच्या तोबियन् स्मालेत यांनीं केलेल्या इंग्रजी भाषांतराचा अनुवाद') विष्णु जिवाजी पागनीस, मुंबई, इ. स. १८७१

६८. भुरळ– (शेक्सपीयरच्या 'Comedy of errors' या नाटकाचें कथात्मक रूपांतर) वासुदेव रामचंद्र मोहनी पैठणकर, पुणें, इ. स. १८७२

६९. रासेलस– डॉक्टर जॉनसन्च्या कथाग्रंथाचें भाषांतर. कृष्णशास्त्री चिपळूणकर, पुणें, इ. स. १८७३

७० इलिझाबेथ अथवा सिबिरिया देशांतील हद्दपार झालेलें कुटुंब– 'क्लासिक टेल्स' या इंग्रजी कथासंग्रहांतील एका गोष्टीचे भाषांतर. गोविंद शंकरशास्त्री बापट, मुंबई, इ. स. १८७४.

७१. रिचर्डाचें चरित्र–ऐवेनो किंवा एका स्वदेशाभिमानी पुरुषाची गोष्ट. (सर वाल्टर स्कॉटच्या 'Ivanoe' या कथाग्रंथाचें भाषांतर) हरी विनायक पनवेलकर, ठाणें, इ. स. १८७४

संस्कृत भाषेंतील गोष्टींच्या आधारें लिहिलेले कथाग्रंथ

७२. भाषामंजरी—शब्दशः भाषांतर, काशिनाथ वासुदेव खांडेकर, मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

७३. कादंबरीसार—बाणभट्टाच्या कादंबरीच्या प्राकृत भाषांतराचा सारांश—परशुरामपंत गोडबोले, मुंबई, इ. स. १८७२.

ख्रिस्ती कादंबऱ्या

७४. यमुनापर्यटण अथवा हिंदुस्थानांतील विधवांच्या स्थितीचें निरूपण. बाबा पदमनजी, मुंबई, इ. स. १८५७.

७५. फुलमुनी आणि करुणा ह्यांचा वृत्तान्त—मिसेस म्युलेन्सच्या कथा-ग्रंथाचें भाषांतर, मुंबई, स. स. १८५९.

स्वतंत्र कादंबऱ्या

७६. मुक्तामाला—लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे, मुंबई, इ. स. १८६१.

७७. राजा मदन—दुःखपर्यवसायी कथा—बाबाजी कृष्ण गोखले, मुंबई, इ. स. १८६५

७८. सुलोचना आणि माधव—रामचंद्र भिकाजी गोखले, मुंबई, इ. स. १८६५. (ब्रि. म्यु.)

७९. चंद्रकांत—बाळकृष्ण रामचंद्र दोंदे, रत्नागिरी, इ. स. १८६६.

८०. रत्नप्रभा—लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे, मुंबई, इ. स. १८६६.

८१. प्रभवमालिनी आणि कलावती—एक स्वदेशकल्याणेच्छु, मुंबई, इ. स. १८६८.

८२. मंजुघोषा—नारो सदाशिव रिसबुड, पुणें, इ. स. १८६८ (इं. ऑ.)

८३. वसंतमाला—केशव रघुनाथ, पुणें, इ. स, १८६८ (इं. ऑ.)

८४. अवलिया अथवा मानी स्वभावाचा दारुण परिणाम—विनायक बाळकृष्ण दामले, पुणें, इ. स. १८६९.

८५. विश्वासराव—नारो सदाशिव रिसबुड, संगमनेरकर, पुणें, इ. स. १८७०

८६. सुहास्यवदना–वामन कृष्ण देशमुख,
मुंबई, इ. स. १८७०.

८७. विचित्रपुरी–केशव लक्ष्मण जोरवेकर,
मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)

८८. बोधसुधा अथवा एका तरुणाचा इतिहास–केशव बळवंत केळकर,
मुंबई, इ. स. १८७१

८९. चंपकमाला–अण्णा मार्तंड जोशी, विनायक परशुराम बाब्रे,
मुंबई, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

९०. मनोरंजक कल्पित गोष्ट—पुरुषोत्तम गोपाळ केळकर,
रत्नागिरी, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

९१. विलासिनी–रामचंद्र आबाजी राजे, मुंबई, इ. स. १८७१

९२. मनोवेधक मधुसूदन–व रूपसुंदरी–गणेश विनायक कानिटकर,
मुंबई, इ. स. १८७२

९३. प्रियकांता व सुशीला—डेविड हाइम, मुंबई, इ. स. १८७२

९४. चंद्रप्रभाविरहवर्णन–साळूबाई भ्रतार भाऊसाहेब तांबवेकर,
पुणें, इ. स. १८७३

९५. हिरालाल–गणेश विनायक कानिटकर, मुंबई इ, स. १८७३. (इं. ऑ.)

९६. मनमोहिनी–आब्राहाम दानियल कुल्लकर,
मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

९७. बैरागी–कृष्णनाथ रघुनाथजी, मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

९८. प्रेमबंधन (भाग १)–नारायण दामोदर योगी, पुणें, इ. स. १८७४

९९. सुवर्णमालिनी–जगन्नाथ सखारामशास्त्री व दामोदर बापूजी नाईक,
मुंबई, इ. स. १८७४.

ऐतिहासिक कथाग्रंथ

१००. घाशीराम कोतवाल–मोरोबा कान्होबा, पुणें, इ. स. १८६३

१०१. मोचनगड–रामचंद्र भिकाजी गुंजीकर,
मुंबई, इ. स. १८७१

संकीर्ण कथाग्रंथ

१०२. वाटसराची गोष्ट–राघो नारायण देवळे, पुणें, इ. स. १८५३

१०३. हत्तीच्या गोष्टी–कोंडो अमृत, पुणें, इ. स. १८५३. (ग्रा. कॅ.)

१०४. मिनोराबाई–मुलीसाठीं मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)

१०५. नकली–वासुदेव बापुजी मंत्री, मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)

१०६. पुष्पमाला–कथासंग्रह. नारायण रावजी खैरे, केशवचंद्र, शिवचंद, अहमदनगर, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

१०७. स्नेह्याची भेट—जनार्दन मोरोबा पाटील, गोरेगांवकर, मुंबई, इ. स. १८७२. (इं. ऑ.)

१०८. शृंगार–मंजरी–विठ्ठल बाळकृष्ण सरनाईक, पुणें, इ. स. १८७४. (इं. ऑ.)

* * *

३ : नाटकें

मराठी रंगभूमीचे जनक, विष्णु अमृत ऊर्फ विष्णुदास भावे

(इ. स. १८१९—१९०२)

महाराष्ट्रांत नाट्यकलेचा उदय होण्यापूर्वीं ललीतवाले, तमासगीर, शाहीर, गोंधळी आणि बहुरूपी हे आपल्या समयसूचकतेनें व अभिनयकौशल्यानें सामान्यजनांची करमणूक करीत असत. बदलत्या परिस्थितीप्रमाणें मनोरंजनाच्या या साधनांतहि फरक होणें स्वाभाविक होतें. “ सुमारें सव्वाशें वर्षांपूर्वीं मंगळूरकडील एका विद्वान् गृहस्थानें पुष्कळ दशावतारांचीं नाटकें लिहून कर्नाटकी नाट्य–संस्थेला व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. हीं नाटकें करणाऱ्या मंडळया कर्नाटकांत, महाराष्ट्रांत व गुजराथेंतहि फिरत असत. ” ✻ यांपैकीं ‘ भागवत ’ नांवाची एक नाटक–मंडळी इ. स. १८४२ सालीं सांगलीस आली. तिचे दोन–तीन खेळ पाहून तेथील आधिपति चिंतामणराव आप्पासाहेब यांना मराठींतहि अशीं नाटकें बसवावीं असें वाटलें. श्रीमंतांच्या प्रोत्साहनानें त्यांच्या आश्रयाखालील विष्णु अमृत ऊर्फ विष्णुदास भावे या कल्पक तरुणानें वरील मंडळींच्या पौराणिक खेळांच्या धर्तीवर इ. स. १८४३ त ‘ सीता–स्वयंवर ’ या नाटकाचा प्रयोग करून दाखविला व मराठी रंगभूमीचा पाया

✻ बा. ग. मुडेंश्वर–‘ जानपद नाट्याचें पुनरुज्जीवन, ’ रत्नाकर, एप्रिल १९३२.

घालण्याचें श्रेय संपादन केलें. श्रीमंतांच्या इच्छेस्तव त्यांनीं मराठी भाषेंत आणखी कांहीं नाटकें बसविण्याचा निश्चय केला, व अनेक आपत्तींना धैर्यानें तोंड देऊन तो तडीसहि नेला. प्राचीन मराठी कविता प्रायः श्लोकबद्ध असल्यामुळें नाटकाच्या उपयोगांस येईना; तेव्हां त्यांनीं पौराणिक कथा–भागावर रसानुकूल पद्यरचना करून सुमारें पन्नास नाट्यप्रयोग बसविले. या नाटकांचें महत्त्व प्रयोगापुरतेंच मर्यादित होतें. वाङ्मयाच्या दृष्टीनें त्यांची रचना केलेली नव्हती. तरी पण विष्णुदास भावे यांनीं मोठ्या कल्पकतेनें व योजना–चातुर्यानें ह्या नाटकांच्या द्वारें महाराष्ट्रांत रंगभूमीची स्थापना करून मराठी नाट्यवाङ्मयाच्या रचनेला अनुकूल परिस्थिति निर्माण केली असें म्हणावयास हरकत नाहीं.

नाट्यवाङ्मयाचा प्रारंभ–भाषांतरात्मक नाटकें

मराठी भाषेंत छापलेलें पहिलें नाटक–‘ प्रबोधचंद्रोदय ’

सतराव्या शतकाच्या अखेरीस तंजावरच्या राजानें ‘ लक्ष्मीनारायणकल्याण ’ नाटक करविलें होतें. इतरहि आणखी बरींच नाटकें येथील ग्रंथालयाच्या यादींत आढळतात. परंतु एकोणिसाव्या शतकांत या नाटकांची कोणालाहि माहिती असण्याचा संभव नव्हता. नाट्यवाङ्मयाचा तो प्रवाह अल्पावधींतच लुप्त झाला असावा असें दिसतें. अर्वाचीन मराठी नाट्यवाङ्मयाचा प्रारंभ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत झाला. मराठी भाषेंतील इतर ग्रंथांप्रमाणें आरंभींचीं मराठी नाटकेंहि भाषांतरात्मकच होतीं. त्या काळीं महाराष्ट्र-भाषेविषयीं आस्था बाळगणारे लोक मुख्यतः संस्कृत भाषेचे पंडित होते. संस्कृत भाषाहि नाट्यवाङ्मयाच्या बाबतींत संपन्न होती. यामुळें साहजिकच संस्कृत नाटकांच्या भाषांतरानें मराठी नाट्यवाङ्मयाचा प्रारंभ झाला. सदाशिव बजाबाशास्त्री अमरापुरकर व रावजी बापूजीशास्त्री बापट यांनीं इ. स. १८५१ त श्रीकृष्णमिश्र पंडिताच्या ‘ प्रबोधचन्द्रोदय ’ नाटकाचें मराठींत भाषांतर केलें. हें मराठी भाषेंत छापिलेलें पहिलें नाटक होय. नाटककाराचा उद्देश वेदान्तशास्त्राचें गहन सिद्धान्त लौकिक व्यापारांमध्येंच निमग्न असणाऱ्या प्राकृत जनांना कळावें म्हणून त्यांचें संवादरूपानें प्रतिपादन करण्याचा आहे. या नाटकांत काम, रती, विवेक आणि त्याची स्त्री मति, दंभ, अहंकार, महामोह, क्रोध, लोभ इत्यादि पात्रांकरवीं मानवी मनांतील दुर्दमनीय विकारांचें हिडिस स्वरूप उघड करून दाखविलें आहे; आणि सामान्यजनांचीं परमार्थाकडे प्रवृत्ति व्हावी व त्यांनीं ईश्वराच्या वास्तविक स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घ्यावें म्हणून उपदेश केला आहे. “ हें भाषांतर बहुधा संस्कृतावरून पदशः केलें आहे, व कोठें कोठें मराठींत बरोबर संबंध येण्याकरितां सारांश घेऊन लिहिलें आहे, ”† हें मराठी भाषेंतील या पहिल्या नाटकाची रचना

† प्रस्तावना:—प्रबोधचंद्रोदय नाटक.

कशा स्वरूपाची होती, तें लक्षांत यावें म्हणून त्यांतील एक लहानसा उतारा खालीं देत आहें.

" (महामोह, क्रोध, लोभ, हिंसा आणि तृष्णा. क्रोध व लोभ हे सर्व आपल्या स्त्रियांसहवर्तमान वाटेनें येत असतां परस्पर संभाषण करितात.)

क्रोध—मीं ऐकिलें कीं, शांति, श्रद्धा व विष्णुभाक्ति ह्या महाराजांसी प्रतिकूल वागतात; अहो ! मी जिवंत असतां आपल्या जिवाची आशा सोडून त्यांच्यानें यथेच्छ वागवेल काय ? पहा ! माझें सामर्थ्य, मी ज्यांच्या हृदयांत प्रवेश करितों तो मनुष्य डोळस असूनहि अगदीं अंधळा होतो, जेणें-करून त्यास कर्तव्याकर्तव्य कांहींएक दिसत नाहीं; कोणी हिताचीहि गोष्ट सांगितली तथापि तो ती ऐकत नाहीं; फार काय सांगूं, मोठा बुद्धिमान् व धर्मशास्त्रज्ञहि असला तरी माझ्या योगानें दोषादोषविचार न पाहतां दुसऱ्याचा घात वगैरे करण्यास प्रवृत्त होतो.

लोभः—अरे, जे लोक मजवर विशेष प्रीति करितात, व ज्यांवर माझी कृपा झाली, त्यांच्या मनोरथ-परंपराच पूर्ण होत नाहींत; कितीहि द्रव्य मिळालें तरी ते नेहमीं आधिकाधिक द्रव्याचीच इच्छा करीत असतात तें असें कीं, " हे इतके माझे मदोन्मत्त हत्ती आहेत, इतके वायूच्या वेगासारखे त्वरित चालणारे घोडे आहेत; व याहूनहि अधिक मिळवीन." याप्रमाणें सर्व काळ ज्यांचीं अंतःकरणें द्रव्य-चिंतनेनें जर्जर झालीं आहेत, अशा पुरुषांस शांति व ईश्वरभक्ति इत्यादिकांचा संबंध कोठून असणार ?

क्रोधः—सख्या, माझा प्रभाव तुला ठाऊक आहे ? अरे, मजकरितां इंद्रानें पूर्वी त्वष्ट्याचा पुत्र वृत्रासुर यास ठार मारलें, व चंद्रशेखर भगवान् शिवहि माझ्याच स्वाधीन होऊन ब्रह्मदेवाचें मस्तक तोडिता झाला. तसेंच विश्वामित्र ऋषींनेंहि माझ्याच योगानें वसिष्ठाचे शंभर पुत्र मारले; व मोठे विद्वान्, सदाचारसंपन्न, दानशील, कीर्तिमान् आणि शूर अशाहि लोकांस आपल्या स्वाधीन करून त्यांचा समूळ नाश करण्यास एक क्षणहि नको.

लोभ:—(आपल्या स्त्रीस हांक मारतो.) तृष्णे, इकडे ये.

तृष्णा:—(जवळ येऊन नम्रतेनें) महाराज, काय आज्ञा ?

लोभ:—प्रिये ! तुझ्या योगानें हे लोक एक शेत मिळालें असतां खेड्याची इच्छा करितात, खेडें मिळालें म्हणजे मोठ्या शहराची इच्छा करितात, तेंहि मिळालें असतां मोठ्या शहराची इच्छा करितात, तेंहि मिळालें असतां द्वीपाची इच्छा करितात, तेंहि मिळाल्यावर त्यांस सर्व पृथ्वीची आशा

उत्पन्न होती; याप्रमाणें कितीहि संपत्ति मिळाली तरी त्यांची तृप्ति होतच नाहीं; यास्तव तूंच कृपा करून आपलीं आंगें पुष्ट करसील (म्ह. वृद्धिंगत होसील) तर त्यांस लक्षावधि ब्रह्मांडेंहि मिळालीं तरी शांति होणार नाहीं.

तृष्णा :—महाराज, याविषयीं मी स्वतः नेहमीं उद्योग करीतच आहें; त्यांत आज स्वामींची आज्ञा झाली तर आतां कोट्यावधि ब्रह्मांडांनाहि माझी तृप्ति होणार नाहीं असें मी करीन.

क्रोध :—(आपल्या स्त्रीस बोलावतो.) हिंसे, इकडे ये.

हिंसा :—(हात जोडून बोलते.) महाराज, ही मी जवळ आहे. काय आज्ञा असेल ती करावी.

क्रोध :—प्रिये, धर्मपत्नी जी तूं, त्या तुझ्या साहाय्यानें मला मातृ-पितृवधहि सुलभ वाटतो, अगे पहा! मी क्रोधाविष्ट झालों असतां पिशाचरूप या आईबापांसहि मोजीत नाहीं, मग हे क्षुल्लक भ्राते व दुसरे जे मामा, काका इत्यादि बांधव यांची काय कथा? हे तर मला शुद्ध किड्याप्रमाणें वाटतात, मग जारिणीप्रमाणें अक्षय स्वहितच पाहणारे कपटी जे सोयरेधायरे वगैरे ज्ञाती यांजविषयीं मला दया कोठून येईल? (हात चोळून व दांत–ओंठ खाऊन) पहा या विवेकादिक बांधवांचा समूळ नाश केल्यावांचून प्रज्वलित झालेला असा हा माझा क्रोधाग्नि कधींहि शांत होणार नाहीं. (पुढें पाहून) अहो, ही महाराज महामोहाची स्वारी बसली आहे तर चला आपण सर्व तेथें जाऊं.''§

भास्कर दामोदर पाळंदे (इ. स. १८३२–७४)

मराठी ज्ञानप्रसारक मासिकाच्या चौथ्या व पांचव्या पुस्तकांमधून 'विक्रमोर्वशीय' नाटकाचें गद्यपद्यात्मक भाषांतर प्रसिद्ध झालें होतें. हें भाषांतर बहुतेक शब्दशः केलें असून त्यांतील पद्यभाग दोन–चार अपवाद सोडून मूळ वृत्तान्तच रचलेला आहे. भाषांतराच्या शेवटीं खालील माहिती दिलेली आहे. "हें नाटक कालिदास नामक विख्यात कवींनीं संस्कृत भाषेंत केलेलें आहे. त्याचें मूळ स्वरूप तर प्राकृत भाषेंत यथार्थ दाखविणें अशक्य. परंतु यथाशक्ति भाषांतराच्या द्वारानें त्यांच्या स्वादाचा एक लेश ज्या गृहस्थांस संस्कृत भाषेचें ज्ञान नाहीं त्यास प्राप्त करून देण्याविषयीं हा यत्न भास्कर दामोदर पाळंदे यांनीं केला आहे. भाषांतरांत विद्वज्जनांस दोष आढळतील यांत नवल नाहीं, परंतु ज्या उद्देशानें तें केलें आहे तो जर सिद्धीस गेला, अथवा तसेंहि न होतां त्याच्या योगानें जर दुसऱ्या कोणास निर्दोष भाषांतर करून प्रसिद्ध करण्याची इच्छा उत्पन्न झाली, तर कर्त्याचे मनोरथ पूर्ण झाल्यासारखे

§ प्रबोधचंद्रोदय नाटक (अं. २, प्र. ३) पृ. ४८–५१.

होतील. " † संस्कृत भाषेंतील प्रख्यात नाटककाराच्या कलाकृतीचें मराठींत भाषांतर करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होय. भास्कर दामोदर पाळंदे यांचा जन्म वाई क्षेत्राजवळील मेणवली गांवीं इ. स. १८३२ त झाला. यांचें शिक्षण प्रथमतः ठाण्यास व नंतर मुंबईस झालें. अत्यंत गरिबीच्या स्थितींतूनहि केवळ आपल्या आंगच्या गुणानें ते पुढें आले, व शेवटीं स्मॉलकॉज कोर्टांतील न्यायाधीशाच्या पदापर्यंत पोहोंचले. आपलें सरकारी काम सांभाळून त्यांनीं मराठी वाङ्मयाच्या वाढीला यथाशक्ति हातभार लाविला. मराठी ज्ञानप्रसारक मासिकांत ह्यांचे अनेक शास्त्रीय व व्यावहारिक विषयांवर लेख आले होते. 'विद्युत् अथवा विद्युल्लता', 'सृष्टीच्या सौंदर्याविषयीं निबंध' हे त्यांचे लेख सुबोध व माहितीपूर्ण आहेत. प्राकृत पद्यरचनेवरील त्यांचा निबंध स्वतंत्र पुस्तकरूपानेंहि प्रसिद्ध झाला आहे. याशिवाय 'गीतासुधा' आणि 'रत्नमाला' हे त्यांचे पद्यग्रंथ त्यांच्या रसिकतेची आणि भक्तियुक्त अंतःकरणाची उत्कृष्ट साक्ष पटवितात. इ. स. १८७४ त त्यांचा अकालीं अंत झाला. ईश्वरकृपेनें त्यांना अधिक आयुष्य लाभतें तर त्यांच्या हातून मराठी भाषेची फार चांगली सेवा झाली असती यांत कांहीं संशय नाहीं.

रशुराम बल्लाळ गोडबोले (इ. स. १७९९–१८७४)

ह्यानंतर परशुरामपंत गोडबोले यांनीं 'वेणीसंहार' इ. स. (१८५७) उत्तररामचरित्र' (१८५९), 'शाकुंतल' इ. स. (१८६१), 'मृच्छकटिक . स. (१८६२), आणि 'पार्वती–परिणय' (इ. स. १८७२) ह्या संस्कृत ाटकांचीं मराठींत भाषांतरें केलीं, व महाराष्ट्रांतील रसिकजनांना जगन्मान्य संस्कृत वींच्या नाट्य–वाङ्मयाची ओळख करून दिली. एकाच कवीच्या नाटकांचीं भाषांतरें करतां कालिदास–भवभूति–बाणभट्टादि सर्व कवींच्या एक एक नाटकाचें भाषांतर रून त्यांनीं नाट्यसृष्टीमध्यें विविधता आणली; व आपल्या समकालीन शास्त्रीपंडितांना ाषांतराचा कित्ता घालून दिला.

सौवर्णपात्रीं सुरसासि गोडी । जी तीहुनी पर्णपुटीं न थोडी ।
परंतु ते दुर्लभ पात्र ज्याला । ती यांत सारीच मिळेल त्याला ॥

मूळ नाटकांतील गोडी जशीच्या तशीच भाषांतरामधूनहि चाखावयास ळेल असा आत्मविश्वास ह्या श्लोकांत परशुरामतात्यांनीं प्रगट केला आहे. तात्या ापल्या वेणीसंहाराच्या उपोद्घातांत म्हणतात. 'आतां भाषांतर म्हटलें म्हणजे शब्दास ब्द बरोबर असावे; परंतु तसें केवळ येथें नाहीं. प्रायः बरोबरी आहे, पण क्वचित् ळीं फेरफार केला आहे. कारण कीं, संस्कृत भाषेची रीति निराळी आणि महाराष्ट्र

† मराठी ज्ञानप्रसारक (पु. ५, अं. ७) पृ. २२३.

भाषेची रीति निराळी पडते, आणि संस्कृताप्रमाणें शब्दास शब्द लावून भाषांतर केलें असतां तें महाराष्ट्र भाषेच्या रीतीनें सर्वांशीं चांगलें दिसत नाहीं. कोठें कोठें रसभंग होतो. म्हणून क्वचित् स्थळीं संस्कृतांतील अर्थ घेऊन महाराष्ट्र भाषेच्या रीतीनें लिहावें लागतें. '' तात्या मोठे रसिक व मर्मज्ञ होते. प्राचीन मराठी कवितेचा त्यांचा दीर्घ व्यासंग होता. मोरोपंतांच्या आर्या लावण्यांत तर त्यांचा हातखंडा असे. त्यामुळें त्यांचीं सर्वच भाषांतरें सरस वठलीं आहेत. " मुळावरून जो रसाविर्भाव होतो तो भाषांतरावरून झाला पाहिजे हें भाषांतराचें मुख्य तत्त्व तात्यांच्या ग्रंथांत चांगलें व्यक्त होतें. " + हा बालबोधकारांचा अभिप्राय यथायोग्य आहे. तात्यांचा जन्म वाई येथें इ. स. १७९९ त झाला. नारायणशास्त्री देव यांच्यापाशीं ते संस्कृत पढले. तात्यांचे वडील बंधु दाजीबा यांच्या सहवासानें त्यांना मराठी कवितेची गोडी लागली. ' पुढें प्रपंचाच्या निर्वाहार्थ तात्या पुण्यास येऊन आपले मातुल जोग यांच्या पेढीवर कारकून राहिले. ' ह्या वेळींच मराठीच्या मार्मिक ज्ञानाविषयीं त्यांचा चांगला लौकिक होता, म्हणून मराठी कोश तयार करण्यासाठीं सरकारनें जें शास्त्रीमंडळ नेमलें त्यांत तात्यांचीहि योजना झाली. त्याच सुमारास पुणें कॉलेजचे प्रिन्सिपॉल मेजर क्यांडी यांच्याशीं त्यांचा परिचय झाला. पुढें मराठी क्रमिक पुस्तकें रचण्याकरितां जेव्हां क्यांडी साहेबांची भाषांतरकार म्हणून नेमणूक झाली, तेव्हां त्यांनीं तात्यांना मराठी पंडित या नात्यानें आपल्या हाताखालीं ठेविलें. इ. स. १८५४ त तात्यांनीं मराठी काव्यांतील निवडक वेच्यांचा संग्रह करून ' नवनीत ' या नांवानें प्रसिद्ध केला. प्राचीन मराठी काव्याचा महाराष्ट्रांत प्रसार होण्यास त्या वेळीं हा ग्रंथच प्रामुख्यानें कारणभूत झाला. दादोबांची ' यशोदापांडुरंगी ' सामान्य लोकांना समजण्यास कठीण म्हणून तात्यांनीं ' केकादर्श ' लिहिला. ह्याशिवाय ' वृत्तदर्पण ', ' संक्षिप्त भूगोल-वर्णन ', ' कादंबरीसार ', ' पांडुरंगस्तोत्रावरील टीका ' इत्यादि गद्य-ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केले. अशा रीतीनें महाराष्ट्रभाषेची आजन्म सेवा करून परशुराम तात्या इ. स. १८७४ त दिवंगत झाले. त्यांच्या ' वेणीसंहार ' नाटकांतील खालील उताऱ्यावरून त्यांच्या सुगम भाषासरणीची कल्पना येईल.

" (इतक्यांत पडद्यापलीकडे शब्द होतो.)

अरे दुष्टा, अरे द्रौपदीकेशांबराकर्षणरूप महापातक करणाऱ्या, अरे धार्तराष्ट्र–पुत्राधमा, फार दिवसांनीं माझ्यापुढें आला आहेस. हे क्षुद्र–पशो, आतां कोठें जातोस ! आणखी, अरे राधेयदुर्योधनशकुनि–प्रभृति–पांडव-द्वेष्टयांनो, अरे धनुर्धरहो, अरे मानधनहो, ऐका, सर्व तुम्ही माझें भाषण.

+ बालबोध—फेब्रुवारी १९०५

श्लोक ४८

जेणें राजसभेंत तैं द्रुपदजा केशांसि आकर्षिलें ।
जेणें त्या गुरुच्या समक्ष सतिच्या वस्त्रासही ओढिलें ॥
ज्याचें फोडुनि वक्षरक्त पिउं म्यां केली प्रतिज्ञा अहो ।
तो हा मद्भुजपंजरीं गवसला राखा तुम्ही यास हो ॥ ४८ ॥

(सर्व लोक कान देऊन ऐकतात.)

अश्व :—अहो अंगराज, कौरवसेनापते, अहो, जामदग्न्यशिष्य, अहो द्रोणाचार्य-निंदक, आपल्या भुजबलानें सकल लोकांचें संरक्षण करणारे आणि "माझ्या करीं जोंवरी धन्व बाण, अन्यायुधें निष्फळ सर्व जाण" असें म्हणणारे ते तुम्हीच ना ? प्रसंग जवळच आला आहे. आतां पुढें व्हा आणि कांहीं सामर्थ्य असेल तर भीमसेनापासून त्या गरीब दुःशासनाला सोडवा.

कर्ण :—आँः जारे काय शक्ति आहे त्या भीमाची, कीं मी जिवंत असतां आमच्या युवराजाच्या छायेलाहि स्पर्श करूं शकेल ? युवराजा, दुःशासना, भिऊं नको, भिऊं नको, हा मी आलों पहा.

(असें बोलून निघून जातो.)

अश्वः—राजा कौरवेश्वरा, हें कौरव सैन्य भीष्मद्रोणाविरहित झालें असें पाहून भीमार्जुनांनीं फार अनर्थ मांडला आहे. तर तुमच्या राधेयाच्या हातून त्या दोघां वीरांचें निवारण व्हावयाचें नाहीं. यास्तव आपणच स्वतः भावाला सोडविण्याकरितां जावें हें बरें.

दुर्यो :—आँः काय शक्ति आहे त्या दुष्टा भीमाची किंवा दुसऱ्याची ? अरे, मी शस्त्रपाणि जिवंत असतां माझ्या बत्सा, दुःशासनाच्या छायेस तरी कोणी हात लावूं शकेल काय ? वत्सा, भिऊं नको, भिऊं नको. कोण आहे रे ? माझा रथ लौकर आण.

(असें म्हणून निघून जातो.)

अश्व :—(पुढें पाहून) मातुला, अरे हें पहा काय अरिष्ट आलें तें, अरे हा अर्जुन, आपल्या भावाची प्रतिज्ञा सिद्धीस जावी या बुद्धीनें राधेय आणि दुर्योधन यांस अडविण्याकरितां त्या दोघांवर एकसारखी मोठी शरवृष्टि करीत त्यांच्या मागें लागला आहे. पहा, हाय हाय आतां कसें होईल ? मला वाटतें खचित भीमानें दुःशासनाच्या उरःस्थळाचें रक्त प्राशिलें. आतां दुर्योधनाच्या भावाची विपत्ति माझ्यानें पहावत नाहीं. मातुला, असत्य वचनाचा दोष मला पतकरला. आण आण माझें शस्त्र कोठें आहे तें.

आर्या ४९

सत्याहुनि अनृत भलें स्वर्ग जळो दुर्गतीस जाईन.।
भीमापासून दुःशासन्र राखायास खड्ग घेईन ॥ ४९ ॥

(असें म्हणून खड्ग उचलावयास पहातो.)

(इतक्यांत बाहेर मोठ्यानें शब्द होतो.)

हे महात्म्या भारद्वाजपुत्रा, अश्वत्थाम्या, त्वां आजपर्यंत कधींहि सत्यवचनाचें उलंघन केलें नाहीं. यास्तव तूं आज सत्यवचन उलंघायास योग्य नव्हेस.

कृपाचार्य :—वत्सा, आकाशवाणी तुला अनृतापासून राखीत आहे.

अश्व :—काय ही देववाणी ? मला संग्रामास जाण्याविषयीं अनुमोदन देत नाहीं काय ? काय करावें आतां. ही मोठीच अडचण झाली. काय सांगावें, देवहि पांडवांचे पक्षपाती झाले ? आतां खचित भीमानें दुःशासन-रुधिराचें पान केलें असावें यांत कांहीं संशय नाहीं. कायहो संकट हें ? अहो.

आर्या ५१

दुःशासनरुधिराचें अरि करितां पान मी उदासीन ।
समरीं सुयोधनाचें दुसरें मग कोणतें हित करीन ॥ ५१ ॥

मातुला, त्या मूर्खा राधेयावर क्रोध करून म्यां शस्त्र टाकिलें हें फार वाईट केलें. असो, आतां उपाय नाहीं. आतां तूं तरी राजाच्या पाठीवर साह्य करावयास जा.

कृपा०—हा मी निघालों. राजाचें साह्य करावयास. तूंहि शिबिरास जाऊन तेथेंच ऐस.

(असें बोलून दोघे निघून जातात.)—" §

कृष्णशास्त्री राजवाडे (इ. स. १८२०–१९००)

कृष्णशास्त्री राजवाडे यांनींहि 'मालतीमाधव' (इ. स. १८६१), 'मुद्राराक्षस' (इ. स. १८६७), 'शाकुंतल' (इ. स. १८६९), व 'विक्रमोर्वशीय' (इ. स. १८७४) या चार नाटकांचीं संस्कृतावरून मराठींत भाषांतरें केलीं. 'भाषांतरांत मूळ ग्रंथाचा शब्दशः तरजुमा केला आहे असें नाहीं. तथापि मराठी भाषेची रीत राखून व पद्यरचनेचे नियम न सुटतां जितका मूळचा अर्थ आला

§ वेणीसंहार (अं. ३) पृ. ११५–१९.

तितका आणला आहे व मुळांतला मार्मिक व मुख्य अर्थ प्रायः सोडला नाहीं. " ‡ विक्रमोर्वशीय नाटकाच्या प्रस्तावनेंत राजवाडे ह्यांनीं ' वीरचरित ' नाटकाचें भाषांतर केल्याचा उल्लेख आढळतो, पण त्याबद्दल जास्त कांहीं माहिती मिळत नाहीं. कृष्णशास्त्री राजवाडे यांचा जन्म इ. स. १८२० त झाला. यांनीं पुणें येथील पाठशाळेंत न्याय, अलंकार, वेदान्त व धर्म या शास्त्रांचा अभ्यास केला. पुढें याच पाठशाळेत त्यांना अलंकारशास्त्राच्या उपगुरूची जागा मिळाली. इ. स. १८५३ त त्यांनीं ' अलंकारविवेक ' हा ग्रंथ लिहिला. ह्याशिवाय ' उत्सवप्रकाश ' व ' ऋतुवर्णन ' हीं त्यांचीं काव्येंहि स्वतंत्र असून सरस उतरलीं आहेत. हे इ. स. १९०० त निवर्तले.

गणेशशास्त्री लेले (इ. स. १८२५–१८९८)

गणेश सदाशिवशास्त्री लेले यांनीं ' जानकी–परिणय ' (इ. स. १८६५), ' मालविकाग्निमित्र ' (इ. स. १८६७) व ' विद्धशालभंजिका ' (इ. स. १८६९) या तीन संस्कृत नाटकांचीं मराठींत भाषांतरें केलीं. याशिवाय इ. स. १८७७ त ' कर्पूरमंजरी ' ही नाटिकाहि बालभाषेंतून मराठींत करून छापिली. हीं भाषांतरें " मूळार्थास धरून असून पुनः अत्यंत सरस व शुद्ध असल्याबद्दल त्या त्या वेळच्या चिटणिसांनीं त्यांची रिपोर्टांत विशेष तारीफ केलेली आढळतें. ¶ गणेशशास्त्री हे मोठे व्युत्पन्न व रसिक असल्यामुळेंच त्यांचीं भाषांतरें दोषरहित व सरस झालीं आहेत. गणेशशास्त्र्यांचा जन्म श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथें इ. स. १८२५ त झाला. त्यांचें इंग्रजी शिक्षण मुंबईस एलफिन्स्टन विद्यालयांत झालें. यांनीं ' कप्तान कुकचा वृत्तान्त ', ' तेलेमेकसचा वृत्तान्त ', ' साहित्यशास्त्र ', ' तीर्थयात्राप्रबंध ' इत्यादि गद्यग्रंथ व ' शिवाजीचरित्र ', ' रघुवंशाचें मराठी भाषांतर ', ' सीमंतिनीचें आख्यान ', 'गंगाचरित्र', 'शिवस्तुति' इत्यादि पद्यग्रंथ लिहिले. गद्यरचनेपेक्षां पद्यरचनेवरच ह्यांचा विशेष कटाक्ष होता. ' यांची कविता प्रौढ, जागोजाग अलंकृत व रमणीय आहे. ' *

ह्याखेरीज या काळांत ' प्रसन्नराघव ' (इ. स. १८५९), ' रत्नावली ' (इ. स. १८६४), ' अभिज्ञानशाकुंतल ' ' (इ. स. १८७०) व 'विक्रमोर्वशीय ' (इ. स. १८७२) ह्या नाटकांचीं भाषांतरें झालीं. मासिक पुस्तकांतूनहि संस्कृत भाषेंतील प्रसिद्ध नाटकांचीं भाषांतरें छापिलीं जात होतीं. 'शाकुंतल' व 'विक्रमोर्वशीय' या नाटकांचीं तर अनेकदां भाषांतरें केलीं गेलीं.

---

‡ प्रस्तावना—मालतीमाधव

¶ विष्णुशास्त्री चिपळूणकर–निबंधमाला, ' भाषान्तर '

* गणेश रंगनाथ दंडवते—' संक्षिप्त अर्वाचीन मराठी वाङ्मय ' (चरित्रखंड)—पृ. १०

महादेवशास्त्री कोल्हटकर (इ. स. १८२२-१८६५)

वर वर्णिल्याप्रमाणें संस्कृत भाषेंतील उत्तमोत्तम नाटकांचीं मराठींत भाषांतरें होत होतीं. इंग्रजी नाटकांना बेमालूम मराठी पेहराव चढविणें हें त्यापेक्षां जास्त श्रमाचें व कौशल्याचें काम होतें. महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं शेक्स्पीयरच्या 'अथेल्लो' नाटकाचें मराठींत भाषांतर करून ह्या कठीण कामाला प्रथम हात घातला. परंतु "त्यांची रसभरित लेखणी शेवटीं एक वेळ सर्व ग्रंथावरून" फिरण्यापूर्वींच त्यांना इहलोकींची यात्रा संपवावी लागली. ह्यामुळें त्यांचे भाचे जनार्दन सखाराम गाडगीळ यांनीं हें भाषांतर शुद्ध करून त्यांत कमी असलेल्या दोन प्रवेशांचें भाषांतर घालून इ. स. १८६७ त प्रसिद्ध केलें. मुळांतील नांवें जशींच्या तशीं ठेवूनच हें भाषांतर केलें आहे. त्या काळाच्या मानानें हा ग्रंथ फारच चांगला झाला आहे. कित्येक ठिकाणीं इंग्रजी भाषेच्या धर्तीवर शब्दप्रयोग व वाक्यरचना आढळते. पण त्या वेळची मराठी भाषेची स्थिति लक्षांत घेतां ह्या दोषाकडे दुर्लक्ष करणेंच उचित आहे. निबंधमालाकारांनीं ह्या ग्रंथाबद्दल फार चांगले उद्‌गार काढले आहेत. "शेक्सपीयरकृत 'अथेल्लो' या अत्यंत प्रसिद्ध नाटकाचें भाषांतर कैलासवासी महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं सुमारें दहा—बारा वर्षांपूर्वीं केलें, तें एकंदरींत फार उत्कृष्ट साधलें आहे, व तें इतकें मराठींत उतरेलसें आम्हांला वाटलेंहि नव्हतें! पण याचें कारण अर्थात्‌च भाषांतरकर्त्याचा रंगेल स्वभाव हें एक; आणि दुसरें त्या नाटकाची निवड."* महादेवशास्त्र्यांचें शिक्षण पुणें येथील पाठशाळेंत झालें. त्यानंतर त्यांनीं कँडीसाहेबांच्या हाताखालीं कांहीं वर्षें काम केलें. पुढें त्यांना पुणें कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक नेमण्यांत आलें होतें. मुंबई येथें इ. स. १८४८ त स्थापन झालेल्या 'उपयुक्त ज्ञानप्रसारक' सभेचे ते उपाध्यक्ष व चिटणीस होते. ह्या सभेच्या विद्यमानें त्यांनीं पदार्थविज्ञानशास्त्रावर दिलेलीं सहा व्याख्यानें 'ज्ञानप्रसारक' मासिकामध्यें क्रमशः प्रसिद्ध झालीं होतीं. ह्यांनीं 'कोलंबसाचा वृत्तान्त' (इ. स. १८४९), 'पदार्थविज्ञानशास्त्र' (इ. स. १८६१) इत्यादि गद्यग्रंथ लिहिले. त्या काळच्या विद्वान् लोकांत त्यांची प्रामुख्यानें गणना होत होती. "त्यांचें वक्तृत्व फारच सुरस असे. जसा नाग गारोड्याच्या पुंगीस भुलून त्याकडे सर्व तनमन लावून तल्लीन होतो, त्याप्रमाणें यांचे श्रोते भुलत असत."‡ त्यांच्या अथेल्लो नाटकांतील खालील उताऱ्यावरून त्यांची सफाईदार भाषा लिहिण्याची शैली लक्षांत येईल.

"**यागो:**—नशीब! बोडक्याचें नशीब. अहो, असें असणें अथवा तसें असणें हें आपल्या हातचें आहे. आपण करूं तसें होईल. आपलीं शरीरें

---

* विष्णुशास्त्री चिपळूणकर—निबंधमाला 'भाषांतर'.

‡ नारायण विष्णु जोशी—पुणें शहरचें वर्णन पृ. ८०.

या बागा आणि त्यांचे बागवान आपण म्हणून या बागांत आपण जें पेरूं तें निपजेल. जर आपण कुइले लाविले किंवा कडू वृंदावनें लाविलीं अथवा निवडुंग लावून मोगरे उपटून टाकिले अथवा एका जातीची फळफळावळ सर्वभर लावून बाग सजविला अथवा हें लाव तें लाव करून बागेची नासाडी करून टाकिली किंवा आळसानें बाग नापीक केला किंवा उद्योगानें बागेंत चांगलें खतपाणी घालून ती सुपीक होईल असें केलें तर तसतसें फळ प्राप्त होईल. हें सर्व करण्याची शक्ति आपल्या इच्छेच्या स्वाधीन आहे. या जीविताच्या तराजूला एक विचाराचें आणि दुसरें विषयवासनेचें अशीं दोन पारडीं आहेत. जर विचाराचें पारडें नसतें तर आपल्या विषयवासना आणि हलकट स्वभाव यांच्या योगें आपण भलभलतींच कर्में केलीं असतीं, परंतु आपणांस विचारशक्ति आहे. तिच्या योगानें अंतःकरण क्षुब्ध होऊन जें उसळ्या मारूं लागतें तें आपणांस स्थिर करतां येतें. तशीच अनिवार जी विषयवासना उत्पन्न होत्ये ती कमी करितां येत्ये. आणि कामरूप सर्पाच्या दंशानें ज्या व्यथा होतात त्यांचें निवारण करितां येतें. तूं ज्या गोष्टीला प्रेमपाश म्हणून म्हणतोस ती गोष्ट देखील या वरील गोष्टींतीलच एक कलम आहे."†

काशिनाथ गोविंद नातू (इ. स. १८४०-१८९७)

काशिनाथ गोविंद नातू यांनीं इ. स. १८७२ त 'विजयशिंग' या नांवानें शेक्स्पीयरच्या 'ज्युलियस सीजर' नाटकाचें भाषांतर प्रसिद्ध केलें. "आतां हें पुस्तक इंग्रजी पुस्तकाचें शब्दशः भाषांतर आहे असें कोणी समजूं नये. आपल्या देशास लागूं नाहींत अशा गोष्टींचीं स्वरूपें व नांवें बदललीं आहेत. भाषा उघड करण्यासाठीं कोठें कोठें आम्ही आपल्या पदरचे शब्द घातले आहेत." ‡ असें भाषांतराचें स्वरूप प्रस्तावनेंत प्रथम सांगून पुढें महाराष्ट्र व संस्कृत भाषेचे जे मर्मज्ञ आहेत त्यांना आपली भाषापद्धति मान्य होईल असा विश्वास प्रगट केला आहे. ह्याखेरीज प्रस्तावनेंत त्या काळांतील नाटकांच्या घेडगुजरी भाषेवरहि कडक टीका केली आहे.

याच सुमारास वि. ज्ञा. विस्तारांत 'रोमकेतुविजया' या नांवानें शेक्स्पीयरच्या 'रोमिओ आणि ज्युलिएट' ह्या नाटकाचें भाषांतर प्रसिद्ध होत होतें.

मोरो विठ्ठल वाळवेकर

मोरो विठ्ठल वाळवेकर यांनीं 'नीलदर्पण' या नांवानें एका बंगाली नाटकाच्या इंग्रजी तर्जुम्याचें मराठी भाषांतर केलें. बंगालमधील असहाय व गरीब शेतकऱ्यांना

§ अथेल्लो नाटक (अं. १, प्र. ३) पृ. ४३-४४.

† प्रस्तावना-'विजयशिंग.'

नीळ पिकविणाऱ्या युरोपियन लोकांच्या जुलमापासून मुक्त करण्यासाठीं हें नाटक लिहिलें गेलें. " या नाटकांत लोकस्थिति, जुलमाचा प्रकार, कांहीं कांहीं युरोपियन अधिकाऱ्यांचें एतद्देशीय प्रजेच्या हिताविषयीं दुर्लक्ष आणि नीळ पिकविण्याच्या जुलमाच्या प्रकारानें एका सुखी शेतकरी गृहस्थाच्या कुटुंबाचा नाश व दुःखकारक परिणाम इत्यादि गोष्टी उत्तम रीतीनें व मनावर ठसा उमटण्यासारख्या प्रकारानें दाखविल्या आहेत. " ¶ अशा तऱ्हेचे उपयुक्त ग्रंथ लिहिण्याची महाराष्ट्रांतील लेखकांनाहि इच्छा व्हावी म्हणून वाळवेकर ह्यांनीं हें भाषांतर केलें. ते आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात, " ग्रंथाचें भाषांतर सादर करण्यांत माझा मुख्य उद्देश लोकांमध्यें हल्लीं जीं नाटकें, कादंबऱ्या वगैरे ग्रंथ करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे, तिचा कल उपयुक्त व आपल्या लोकांस दुःखमुक्त करण्याकडे वळावा आणि हल्लीं जीं अनेक प्रकारचीं दुःखें, लोकाचार, व्यापार व राज्यरीति यासंबंधानें होतात तीं निवारण करण्यास साह्यभूत होतील अशा प्रकारचे नाटक वगैरे ग्रंथ आपल्या महाराष्ट्र भाषेंत व्हावें असा आहे. " या नाटकांवर ' ज्ञानसंग्रह ' मासिकांत प्रतिकूल टीका आलेली होती. * या नाटकाचें संविधानक मुळांत चित्ताकर्षक नसूनहि त्याची रचना चांगली झाली आहे.

ह्याप्रमाणें संस्कृत, इंग्रजी व बंगाली भाषेंतील नाटकांचीं मराठींत भाषांतरें झालीं. संस्कृत नाटकाचें मराठींत भाषांतर करणें सोपें, संस्कृतज्ञ पंडितांचीहि संख्या जास्त, यामुळें भाषांतरात्मक नाट्य-ग्रंथांत संस्कृत भाषेंतील नाटकांचाच भरणा अधिक होता. ह्या भाषांतरकारांनीं पद्यसृष्टींत अमृताशीहि पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेंत मनुष्याच्या अंतःकरणांतील अनेकविध भाव व्यक्त करण्यास समर्थ अशी अभिनव गद्यशैली निर्माण केली.

¶ प्रस्तावना – ' नीलदर्पण. '

* ज्ञानसंग्रह, पु. १, अं. ८.

स्वतंत्र नाटकें

ऐतिहासिक व चरित्रात्मक

विनायक जनार्दन कीर्तने (इ. स. १८४०-१८९१)

भाषांतरात्मक नाटकें लिहिण्याला प्रारंभ झाल्यानंतर लवकरच मराठी भाषेंतील पहिलें स्वतंत्र नाटक लिहिण्याचा मान विनायक जनार्दन कीर्तने यांनीं केवळ आपल्या वयाच्या विसाव्या वर्षींच मिळविला. एल्फिन्स्टन कॉलेजांत शिकत असतांनाच त्यांनीं 'थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीचें वर्णन' नाटकरूपानें लिहून मराठी ज्ञानप्रसारक सभेपुढें वाचिलें; व आपल्या लेखनचातुर्यानें तत्कालीन विद्वानांचीं मनें आकर्षण करून घेतलीं. "या लहानशा नाटककारानें हास्य व करुणारस चांगले उतरून पुस्तक मनोरंजक केलें आहे." मराठी भाषेंतील हें पहिलें स्वतंत्र व ऐतिहासिक नाटक इ. स. १८६१ त प्रसिद्ध झालें. ह्यांत मराठी नाट्यवाङ्मयाच्या भावी प्रगतीचीं पूर्वचिन्हें स्पष्टपणें दृष्टीस पडतात. अवघ्या साठ पृष्ठांच्या मर्यादित जागेंत माधवरावांच्या कारकीर्दींतील अनेक प्रसंगांची माहिती कोंबल्यामुळें रसोत्पादन व स्वभाव-दिग्दर्शन यांना योग्य अवसर मिळणें शक्य नव्हतें. तरीपण अगदीं अल्प प्रमाणांत कां होईना, या कलात्मक अंगांचा या नाटकांत समावेश झालेला आहे. मराठी दरबाराचें वास्तविक स्वरूप दाखविण्याच्या उद्देशानें मराठे सरदारांच्या तोंडीं कीर्तने यांनीं अडाणी व कुणबाऊ भाषा घातली आहे. संवादांत स्वाभाविकपणा असावा म्हणून प्रसंग व पात्रें यांना अनुसरून भाषेची योजना करण्याचा प्रयत्न केला आहे. माधवराव व रमाबाई यांच्या प्रवेशांत दिसून येणारें प्रेमळ जोडप्याचें चित्र मनोरम आहे. रामशास्त्री व माधवराव यांच्या भेटीचे प्रसंग स्वतंत्रपणें कितीहि चांगले वठले तरी ते मूळ कथानकाला धरून नसल्यामुळें अनावश्यक आहेत असा कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं 'शालापत्रक' मासिकांत आपला अभिप्राय दिलेला आहे.* लौकिक विषयांवर व तेंहि दुःखपरिणामी नाटक लिहिण्याचा उपक्रम त्या काळीं अपूर्वच होता. विनायकराव यांचा जन्म इ. स. १८४० त झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथें झालें. हे सन १८५६ त मुंबईस शिकावयास आले व इ. स. १८५९ त प्रवेश परीक्षेंत यशस्वी झाले. त्यांनीं ज्ञानप्रसारक सभेपुढें वाचलेले 'वाचन' व 'हिंदुस्थानांतील प्राचीन विद्या' हे निबंध 'ज्ञानप्रसारक' मासिकांत प्रसिद्ध झाले होते. त्यांनीं इ. स. १८६१ त थोरले माधवराव व इ. स. १८६५ त 'जयपाळ' हीं दोन नाटकें लिहिलीं, आणि इ. स. १८७१ त मालकमच्या 'Central India' चें भाषांतर (मध्य

---

* शालापत्रक पु. ५, अं. १.

हिंदुस्थानचा इतिहास) प्रसिद्ध केलें. हे सामान्य जागेपासून बडोदा व इंदूर यासारख्या मोठ्या संस्थांतील दिवाणांच्या हुद्द्यापर्यंत पोहोंचले. इ. स. १८९१ त यांचा अंत झाला. विनायकरावासारख्या रसिक व विद्वान् माणसाच्या हातून महाराष्ट्र भाषेची अधिक सेवा व्हावयास पाहिजे होती. त्यांच्या 'थोरले माधवराव पेशवे' या नाटकांतील खालील उताऱ्यावरून मराठी भाषेंतील पहिल्या स्वतंत्र नाटकाचें स्वरूप लक्षांत येईल.

शनवारवाडा; माधवराव व रामशास्त्री

माधवराव—या शास्त्रीबाबा ! ठीक आगमन झालें; आपली स्वारी प्रातःकाळीं आली होती. परंतु जप करीत बसलों होतों. त्यामुळें गांठ पडली नाहीं. ब्राह्मण कुलांत जन्म घेतला आहे त्याअर्थीं त्याप्रमाणें कांहीं केलें पाहिजे. जन्मास आल्याचें कांहीं तरी सार्थक नको ?

शास्त्रीबाबा :—तसेंच आम्हांसहि सार्थक केलें पाहिजे. योगसाधनाचे मार्ग फार उत्तम आहेत, सर्व त्रिभुवनव्यापक आनंदरूपी असाहि असता अहंकारमोहादि शत्रूकडून बद्ध झाला जो परमात्मा त्याच्या मुक्तीची इच्छा आपल्या ठायीं झाली आहे. येणेंकरून जीवात्म्याचें कल्याण होईल. मीहि त्याच क्रमाचें अवलंबन करणार; परंतु तसें करण्यास हीं ऐहिक सुखें उपयोगी नाहींत. सर्वसंगाचा परित्याग करून सुक्षेत्रीं सावधान चित्तानें अधिष्ठित झालें पाहिजे. अतएव काशी क्षेत्रीं जावयाची योजना करून आपली आज्ञा घ्यावयास आलों आहें. आपलीहि तशीच इच्छा आहे म्हणून दुसरी विनंती करितों कीं आपणहि प्रस्थान ठेवून मजबरोबर येण्याचें करावें. काशी म्हणजे केवळ प्रतिकैलास आहे. तेथें जान्हवीच्या पवित्र उदकाचें त्रिकाल स्नान करून जपजाप्य, योगमार्ग व भगवंताच्या मंगल नामाचें स्तवन हेंच करण्यांत कालक्षेप करूं.

.....

माधव :—आपला भाव पुरा माझ्या लक्षांत आला नाहीं, परंतु साधारण असें वाटतें कीं जपजाप्य करीत बसलों होतों त्यावर आपला रोख आहे.

शास्त्री :—माझ्या बोलण्यांतील भाव इतकाच कीं, आत्मस्वरूप ओळखण्याची आपणांस इच्छा झाली आहे. ही फार चांगली. याजकरितां आपण मजबरोबर काशीस चलावें. मी आपणाकडून योगमार्गाचें अध्ययन करवीन.

माधवराव :—आतां तर उमजलोंच. मी पूर्वी बोललों तेंच. शास्त्रीबाबा, आपण योग्य पुरुष आहां. आपली निःस्पृहता पाहून माझें पूर्ण समाधान झालें. आतां आपलें वास्तविक म्हणणें कळवा.

रामशास्त्री :—श्रीमंतांचा—

माधवराव :—मग्रांची थट्टा नको. खरें तें सांगा, मी उपदेशास पात्र आहे.

रामशास्त्री :—(हंसून) श्रीमंतांची थट्टा करण्याची योग्यता माझी नाहीं. आपण जप करीत मध्यान्हकाल होईतोंपर्यंत जर बसलां तर प्रजेचें संरक्षण कसें होईल ? मुख्यांनीं कारभार पाहणें सोडिलें म्हणजे हाताखालील कामगार अर्थातच आळशी होतात. असें झालें म्हणजे गरीबगुरिबांची दाद कशानें लागते ? आपण जप करीत दोन प्रहरपावेतों बसणार असें जेव्हां ऐकिलें तेव्हा तो जप सर्व अनिष्टांचें मूळसा मला भासला. आतां आपला मुख्य धर्म प्रजा–प्रतिपालन हाच होय. तें जर सशास्त्र झालें तर त्यांतच आपणांस मुक्ति आहे. आपण त्यांचें संकटापासून रक्षण करावें आणि त्यांनीं आपणांसाठीं परमेश्वरापाशीं वर मागावे असा परस्पर–संबंध ज्या राज्यांत राहतो, त्या राज्यास वैकुंठाची उपमा योग्य. यास अनेक शास्त्राधार आहेत. केवळ माझेंच म्हणणें असा अर्थ नाहीं.

माधव० :—मला शास्त्राधार आपणापुढें नकोत. आपणच जागृत शास्त्रावतार आहां. शास्त्रीबाबा, आज मला आपण मोठया संकटांतून बाहेर काढिलें. नाहींतर लोकांना थोड्याच दिवसांत माझा कंटाळा आला असता. कारभारी निःस्पृही पाहिजेत ते येवढ्याकरितां.

रामशास्त्री:—माझ्या बोलण्याचा श्रीमंतास क्रोध आला नाहीं यावरूनच लोक आपल्या स्वभावाची तारीफ करितील. आतां मला आज्ञा असावी.

माधव०:—उत्तम. मला आणखी कांहीं गोष्टी विचारावयाच्या आहेत. परंतु आतां अवकाश दिसत नाहीं. दुसरी एखादी संधि लवकरच येवो.

रामशास्त्री:—मी आपला सेवक आहे. दर्शनास दररोज येतच असतों......"¶

झांशीच्या राणीचें नाटक

इ. स. १८७० त 'नूतनेतिहासांतर्गत मनोल्हादक झांश्यख्य पुराधीश्वरी लक्ष्मीबाई इचें नाटक' विश्वनाथ मोरेश्वरशास्त्री नाशिककर, नारायण गोपाळ दामले व विनायक हरी शिनकर या तिघांनीं मिळून रचिलें. हें नाटक चेंबर्सकृत 'इंडियन रिव्होल्टस्' नामें इतिहासाच्या आधारानें लिहिलें आहे. ह्यांत संस्कृत, हिंदुस्थानी, गुजराथी इत्यादि सर्व भाषांचा उपयोग केला आहे. नाटकाची भाषा शुद्ध व सुबोध आहे. त्यांतील एक उतारा खालीं उद्धृत करीत आहे.

¶ थोरले माधवराव पेशवे यांजवर नाटक (अं. ३, प्र. ५) पृ. २६–२८

"(स्थळ—ग्वालेरचा आसमंतात भाग)

पात्रें

झांशीची राणी		बंडवाले.
तात्या टोपी		
रावसाहेब		
रामराव–गोविंद शिंद्याकडील माजी नौकर		
भंडाचा नबाब		
लक्षुमण नाना		
वकील—........शिंद्याकडील		

राव०:—कां तात्या, आपला मनुष्य आला परंतु सर्व व्यर्थ आहे. अनुकूलता दिसत नाहीं. काय काल विपरीत पाहा.

तात्या०:—कांहीं चिंता नाहीं. ईश्वराला सर्वांची काळजी आहे. आपल्या जवळ आठ-दहा हजार फौज आहे, दहा–बारा तोफा आहेत, तशा त्यांचेजवळ असतील; आणखी काय ? बनल्यास लढाई करायची. पुन्हा मदत द्या असें आतां वचन निघून कीर्ति होईल ती न होतां मेलों तरी बेहेत्तर.

राणी०:—होय तर काय, आपल्याला शरण-मुद्रेनें जाणेंच नाहीं. परजाती अन्यधार्मिक लोकांच्या हातून मरण्यापेक्षां स्वजाती हिंदुधर्मपालक लोकांच्या हातून मरणें काय वाईट आहे ?

रामराव:—सरकार, कोणी शिंद्यांकडील वर्तमान घेऊन आल्याचें चोपदार घडोघडीं सुचवीत आहे.

राव०:—येऊं द्या इकडे, आंत पाठवून द्या.

तात्या०:—(उभा राहून) या बसा; कशी काय तजवीज झाली ?

वकील:—तजवीज काय ? पाहिजे तेव्हां होईल असें देखील म्हणावयास नको. आपल्या आश्रयानें कमती काय आहे ? म्हणाल त्या वेळेस तयारी आहे. परंतु सरकारचें मनांत आपला हेतु काय आहे तो समजून घेण्याविषयीं फार उत्कंठा आहे. म्हणजे तशीच तजवीज ठेवितां येईल.

तात्या०:—त्यांना सर्व गोष्टीची माहिती आहे. आतां नवीन समजून घेण्याची व नंतर तजवीज करण्याची वेळ नाहीं. प्रसंग जाणून व पूर्व स्मरून लिहिल्याप्रमाणें होत असल्यास ठीक आहे. नाहीं तर ईश्वर समर्थ आहे.

राणी०:—नाहीं तर काय ? न कर्त्यांचा वार शनवार. आम्हांला देखील मतलब समजतो.

वकील:—(चोहींकडे नजर फिरविल्यावर) पाहिजे तसें म्हणा. ते आहेत, तुम्ही आहांत; आम्हांला नोकरी करणें जरूर आहे. आपला हुकूम होईल त्याप्रमाणें कळवितों.

तात्या०:—सांगितलें हेंच, जा आतां लवकर.

वकील:—नमस्कार (बाहेर निघून जातो.)

राव०:—कांहीं अर्थ नाहीं. आपली तजवीज बराबर ठेवा.

तात्या०:—अहो, त्यांनीं आपलेकडून आमचा दम पहावयाचा यत्न केला; परंतु मी ही वस्तादगिरी केली आहे. आपला मतलब आहे तो खरा. प्रसंगावर काय मौज होईल ती पहा.

राणी०:—रावसाहेब, तात्यांनीं बहुतेक जमीन पोंखरून ठेविली आहे. पत्र पाठविलें हें काय निमित्य टाळिलें; नाहींतर स्वजातीचा दोष येतो. मी तर तयारी केली आहे.

तात्या०:—अहो तयारी कराच, उठा;, मला कांहीं चिन्ह बरें दिसत नाहीं. आपण विश्वासावर राहिलों आणि त्यांची अकस्मात् तयारी झाली म्हणजे घात होईल. ''$

अफ्झलखानाच्या मृत्यूचें नाटक

इ. स. १८७१ त कोंडो सखाराम घाटे यांनीं 'अफ्झलखानाच्या मृत्यूचें नाटक' लिहिलें. "देश भरभराटीस येण्यास व देशबांधवांस सुखानुभव मिळण्यास कारण जो स्वदेशाभिमान त्याचा फैलाव होणें एकीकडे राहून त्याच्या उलट तो सर्वत्रांच्या अंतःकरणांतून नष्ट झाला असें म्हटलें तरी चालेल. याविषयीं पुष्कळ उदाहरणें प्रसंगवशात् पाहण्यांत येतात. आपले पूर्वज देशाच्या कल्याणाकरितां कसे झटत होते व तो त्यांचा हेतु सिद्धीस जाण्यास अश्रान्त श्रम करून त्यांनीं काय काय त्रास सोसले, आणि आपल्या आयुष्याचा कसा सद्व्यय केला या गोष्टीचा विचार प्रत्येकाच्या अंतःकरणांत सार्वकाल असणें जरूर आहे;'' असें ग्रंथकर्त्यांनीं प्रस्तावनेंत म्हटलें आहे. नाटकांत यवनांच्या तोंडीं उर्दू भाषा घातली आहे. हें नाटक मुख्यतः ग्रांटडफच्या इतिहासावरून रचलें आहे. वि. ज्ञा. विस्तारांत ह्या नाटकावर अभिप्राय आलेला होता. * त्यांत लेखकांनीं परकीय इतिहासावरून विश्वासून न राहतां शिवाजी महाराजांचें खरें स्वरूप प्रगट करण्याकडे लक्ष्य द्यावें अशी सूचना केली होती.

$ झांशीच्या राणीचें नाटक (प्र. १२) पृ. ६५–६७.

* वि. ज्ञा. वि. पु. ४

याखेरीज त्या काळांत ' नारायराव पेशवे यांचें नाटक ' (इ. स. १८७०) व सवाई माधवरावांचें नाटक ' (इ. स. १८७१) हे ऐतिहासिक नाट्यग्रंथहि प्रसिद्ध झाले.

बळवंत पांडुरंग किर्लोस्कर (१८४३–१८८५)

ह्याच काळांत एक चरित्रात्मक नाटकहि प्रसिद्ध झालें. बौद्धधर्माची प्रचंड लाट परतवून हिंदुधर्माचें संरक्षण करणाऱ्या दिग्विजयी वीराच्या वास्तविक चरित्राची सामान्य जनांना ओळख व्हावी म्हणून बळवंत पांडुरंग किर्लोस्कर यांनीं श्रीसदानंद-स्वामीकृत ' शंकरविजय ' नामक संस्कृत ग्रंथावरून इ. स. १८७४ त ' शांकर-दिग्विजय ' नाटक लिहिलें. वि. ज्ञा. विस्तारांत ¶ या नाटकावर विस्तृत अभिप्राय आलेला असून त्यांत शंकराचार्यांचें चरित्र हें शांतरसानें युक्त असल्यामुळें नाटकाचा विषय होण्यास योग्य नाहीं असें मत प्रदर्शित केलें आहे, किर्लोस्करांची शाकुंतल–सौभद्रादि संगीत नाटकें सर्वांच्या परिचयाचीं आहेतच त्याबाबत जास्त विवेचन करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.

पौराणिक व तत्त्वज्ञानविषयक नाटकें

ह्या काळांतील नाट्यवाङ्मयांत पौराणिक नाटकांची संख्या अधिक आहे. पुराण-ग्रंथांतून विविधरसपूर्ण अद्भुतरम्य कथानकें आयतींच तयार मिळत असल्यामुळें पौराणिक आख्यानांवर नाट्यरचना करण्याकडे सामान्य लेखकांची प्रवृत्ति होणें स्वाभाविक आहे. शिवाय धर्मप्रधान हिंदुसमाजांत अशा नाटकांनाच भरपूर लोकाश्रय मिळण्याचा हमखास संभव असल्यामुळें रंगभूमीवरहि पौराणिक नाटकाचेंच स्तोम माजलें असलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं. ह्यांतील बहुतेक नाटकें अगदीं सामान्य प्रतीचीं आहेत. कल्पकता, रचनाकौशल्य व भाषासौन्दर्य या गुणांचा त्यांत लवलेशहि नाहीं. कथानकाची रचना दशावताराच्या खेळांच्या ठराविक पद्धतीवर केलेली असे. संस्कृत शब्दाची प्रमाणाबाहेर योजना केल्यामुळें भाषेंत कमालीचा कृत्रिमपणा येई. विदूषकाच्या भाषणांत तर अनुप्रास, श्लेष व शाब्दिक कोट्या यांची रेलचेल असे. " विरस करून चुरस लावण्याचें काम माझें नाहीं. मजकडून सुरस साधण्यास यथा-शक्ति साह्य मिळेल अशी मात्र नाटकाचार्यांनीं आशा करावी " × अशा तऱ्हेचीं वाक्यें ह्या नाटकांतून मुबलक आढळतात.

विनायक महादेव नातु

आरंभीं ' महाराष्ट्रजन-प्रबोध-कविताप्रसारक मंडळी'नें गणेशप्रतापाचे कर्ते विनायक महादेवशास्त्री नातु यांजकडून 'नलराजाचें नाटक' लिहवून इ. स. १८६२

¶ वि. ज्ञा. वि. पु. ६–७.

× गोपीचंद नाटक पृ. ४

त प्रसिद्ध केलें. हें नाटक एल्फिन्स्तन विद्यालयांतील संस्कृत भाषेचे शिक्षक वेदशास्त्रसंपन्न यज्ञेश्वर चिमणाजी शास्त्री यांनीं शुद्ध केलें आहे. नाटकाचा उद्देश प्रकाशकांनीं प्रस्तावनेंतच नमूद केला आहे. प्राचीन काळीं आपल्या समाजांत रूढ असलेली प्रौढविवाहाची व स्वयंवराचीं चाल किती इष्ट व हितकारक होती; द्यूताच्या नादानें कसकसे अनर्थ ओढवतात व संसारांत सुखदुःखाच्या दोन्हीहि प्रसंगीं पतीची केवळ छाया होऊन राहणाऱ्या पतिव्रतेची थोरवी किती अवर्णनीय आहे ह्या गोष्टी लोकांना समजाव्या म्हणून नाटकासाठीं नलराजाचें चरित्र निवडलें आहे. यानंतर विनायकशास्त्री यांनीं शिवलीलामृताच्या चवदाव्या अध्यायांतील कथेच्या आधारानें 'श्रीभिल्लिणी' नाटक लिहिलें. या नाटकांत शिवतपोवनप्रवेश, शिवतपोवनत्याग व शिवगृहप्रवेश, असे तीन अंक असून त्यांत पतिव्रतेचा प्रभाव दाखविला आहे. हें नाटक 'महाराष्ट्रकाव्य प्रसारणेच्छु मंडळी'नें इ. स. १८६५ त प्रसिद्ध केलें.

जयपाळ

इ. स. १८६५ त विनायक जनार्दन कीर्तने यांचें 'जयपाळ' नाटक प्रसिद्ध झालें. जुन्या करारांमधील 'Genesis' या पर्वाच्या ३७, ३९, ४०, ४३ या अध्यायांतील 'जोसेफ'च्या गोष्टीवरून या नाटकाचें कथानक घेतलें आहे. कीर्तन्यांच्या पहिल्या नाटकाप्रमाणेंच हें नाटकहि चांगलें आहे. 'शालापत्रक' मासिकांत या नाटकाचें संक्षिप्त परीक्षण प्रसिद्ध झालें होतें. त्यांत आपल्या पुराणांतून सुरस व चमत्कारिक गोष्टींची बिलकूल कमतरता नसतांना लेखकांनीं परधर्मीयांच्या पुराण-ग्रंथाकडे धाव घेतली याबद्दल आश्चर्य प्रगट केलें आहे. तरी पण नाटककाराच्या लेखनचातुर्याबद्दल तारीफच केली आहे. "याप्रकारें विचार करून जयपाळ नाटक प्राचीन कवींच्या नाटकाशीं लावून पाहतां, संविधानकाच्या संबंधानें किंवा रसपरिपाकाच्यासंबंधानें त्या नाटकांशीं बरोबरी यास कोणत्याही प्रकारे नाहीं खरीं; तथापि स्वतंत्रपणें त्याचा विचार केला असतां विनायकराव यांचा हा ग्रंथ उत्तम ग्रंथांत गणला पाहिजे. हल्लीं जीं नाटकें व कादंबऱ्या उत्पन्न होतात व छापल्या जातात त्यांशीं 'जयपाळ' लावून पाहिला असतां या नाटकांत व त्या ग्रंथांत सूर्य व काजवा यांच्या मधल्याप्रमाणें तफावत आहे. एकंदरींत पाहतां कीर्तने यांची खुबीदार व रसिक भाषा लिहिण्याची शैली व त्या त्या पात्राच्या भिन्न स्वभावाचें हुबेहूब वर्णन करण्याचें सामर्थ्य, व त्या त्या प्रसंगास योग्य मनोविकार दर्शविण्याची खुबी वगैरे नाटककर्त्याच्या अंगीं जे गुण अवश्य असावे लागतात ते कीर्तने यांच्या अंगीं नांवाजण्यासारखे आहेत असें सर्वांस कबूल केलें पाहिजे." * तत्कालीन नाट्यवाङ्मयांतील कीर्तन्यांची कामगिरी फार महत्त्वाची आहे. त्यांचीं दोन्ही नाटकें स्वतंत्र व सरस असून नावीन्यपूर्ण आहेत.

* शालापत्रक पु. ४ अं. १२

रघुनाथशास्त्री अभ्यंकर यांनीं 'विराटपर्व' (इ. स. १८६७) व 'हरिश्चंद्रदर्शन' (इ. स. १८६९) हीं दोन नाटकें लिहिलीं.

रावजी बाळकृष्ण लेले

रावजी बाळकृष्ण लेले यांनीं 'श्रियाळचांगुणा–सत्त्वदर्शन' (इ. स. १८६९) 'गोपीचंद' नाटक (इ. स. १८७०), 'सुलोचना सती' नाटक (इ. स. १८७०), 'रावणवध' (इ. स. १८७१) इत्यादि नाटकें प्रसिद्ध केलीं. हे विद्याखात्यांत नोकरीस होते. त्यांची शिकविण्याची शैली अप्रतिम होती.

बजाबा बाळाजी नेने

इ. स. १८७२ त बजाबा बाळाजी नेने यांनीं 'सैरंध्री' या नांवाचें एक 'स्वकपोलकल्पित द्वादशांकी नाटक' रचिलें. या नाटकांतील बारा अंकांत गर्भित असलेलीं बारा सारतत्त्वें सांगितलीं आहेत. गद्य–रचनेंत अनुप्रासांची योजना करण्याचा हव्यासहि या नाटकांत दिसून येतो. खालील उताऱ्यावरून या नाटकाची भाषाशैली किती बोजड आहे तें समजून येईल.

"सूत्र : (सभेस) सज्जन विद्वज्जनहो, द्वापर युगाच्या ठायीं मत्स्यपुरांत वर्तलेला वृत्तान्त श्रीव्यासानें हव्यासानें काव्यरसानेक गुणांहीं भारतांत आपल्या अस्खलित, रसभरित संस्कृत वाणीनें वर्णिला आहे; तो कोणता म्हणाल तर भरतकुलालंकारिष्णु विष्णुभक्तयांसक्त पंडुनंदन नंदनवनसदृश द्वैतवन त्याहून क्षिति–युवतींत पतिव्रताशिरोमणी अशी जी आपली पट्टराणी याज्ञसेनी तिशीं सहवर्तमान अज्ञातवास अनायासें करून जावा म्हणून विराट नगरांत वर्तला तो. ते नयनिपुण पंडुतनय दुस्तर परसेवाधर्माचें नीच कर्म करून महाविवेकेंकरून स्वविपत्समयाचा व्यय करीत असतां संतांस तापद, असंतांस तोषजनक अशी जी कथा वर्तली ती तुम्हांस यथाशक्ति नाटककृतीनें प्रत्यक्ष दाखवावी हा उद्देश धरून स्वदेश पालटून आज मी आकस्मात् नाटकांतर्भागीं कसा प्रवेश करितों तें लक्षांत आणा आणि तुम्हीही आपलीं संकल्पें करून अंतःकरणें फिरवून आपण विराट नगरांत बसलों आहों असें कल्पा आणि आखिल-खल–मंडल–मंडनभूत अति कुमति मात्स्यसेनापति द्रौपदी-सतीचा आभिलाष धरून, भीमकर-मकराच्या वक्त्रांत पडून आपल्या जीवितास मुकणार तें चित्र–चरित्र प्रत्यक्ष नेत्रांनीं पहा." *

---

* सैरंधी पृ. ८–९

ह्याखेरीज ‘ गौरीहरविनोद नाटक ’ (इ. स. १८७१), ‘ मदनप्रताप नाटक ’ इ. स. १८७४), ‘ रासक्रीडा नाटक ’ (इ. स. १८७४) इत्यादि पौराणिक नाटकें त्या काळांत प्रसिद्ध झालीं.

रामकृष्ण हरि भागवत

रामकृष्ण हरि भागवत यांनीं इ. स. १८६८ त ‘ सायुज्यसदन ’ या नांवाचें तत्त्वज्ञानविषयक नाटक लिहिलें. या नाटकाचा उद्देश वेदान्त मत वाचकांच्या मनांवर सुलभ रीतीनें ठसावें असा आहे. “ या ग्रंथाची रचना गद्य-पद्यात्मक असून स्थावर-जंगम जगदाभास ह्याच जो सर्वेश्वराचा खेळ, तो या ग्रंथांत समजण्याजोगता, कानास मधुर, आणि मनास वेधक असा वर्णन केला आहे. यांत करुणरस आणि शृंगाररस प्रधान असून वीररस हा अंगभूत आहे. ”§ भाषा बेडौल व क्लिष्ट आहे. कामाजी नाईक व त्याची बहीण मायाऊ यांच्या खालील वर्णनावरून नाटकांतील भाषासरणीची कल्पना येईल.

> “ जो सकलभुवनैकसुंदर, जो बोधादि अमित्रांला अजिंक्य, जो केली-वनांत नृपाळांस, जसा कंजपुष्पांत भ्रमर गुंततो, तसा गुंतवून ठेवणारा; जो दमादिकांच्या चिथावणीवरून प्रभूनें निजनयनोद्भव अनलानें दहन केला असून अदह्य, असा हा कामाजी नाईक संपूर्ण जगताला कारणभूता आणि राजाची अत्यंत प्रियपरिचारा अशी जी आपली भगिनी मायाऊ तिजसह-वर्तमान येत आहे; तर सर्व भवारण्यवासी जन हो, त्यांच्या सन्मानार्थ मंगलोत्सव करा. ” †

सामाजिक नाटकें

व्यवहारोपयोगी नाटक

मराठी भाषेंतील पहिलें सामाजिक नाटक म्हणून गोविंद नारायण माडगांव-कर यांनीं लिहिलेल्या ‘ व्यवहारोपयोगी नाटक ’ या छोटेखानी पुस्तकाचा उल्लेख करणें जरूर आहे. हें प्रथमतः मराठी ‘ ज्ञानप्रसारक ’ मासिकांत छापलें गेलें व पुढें इ. स. १८५९ त प्रसिद्ध झालें. ह्या एकांकी नाटकांत सहा प्रवेश असून त्यांत ग्रंथकारांनीं लग्न करण्यास व लग्नांत बडेजावीनें वावगे खर्च करण्यास आपले लोक किती उत्सुक असतात व तें साधून घेतांना कसें तापत्रयांत पडतात हें दाखविलें आहे.

---

§ शालापत्रक पु. ८, अं. ३

† सायुज्यसदन (अं. ४) पृ. १६२

तत्कालीन सामाजिक चळवळी

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, परदेशगमन इत्यादि सामाजिक प्रश्नांच्या बाबतींत रणें माजलीं होतीं. विष्णुशास्त्री पंडितासारख्या कट्टर समाजसुधारकानें लेख, व्याख्यानें व वादविवाद यांच्या द्वारें पुनर्विवाहाच्या प्रश्नाला चालना देऊन समाजांतील अनिष्ट रूढींचें उच्चाटन करण्याचा चंग बांधला होता. सनातनी व सुधारक या दोन्ही पक्षांकडून खंडनमंडनादि प्रकार जोरांत चालू होते. शास्त्रार्थांचा कीस काढून प्रत्येक पक्ष आपआपल्या मतांचें समर्थन करीत होता. ह्या सामाजिक चळवळीचे प्रतिध्वनि तत्कालीन वाङ्मयांतून उठणें अपरिहार्यच होतें. मनोरमा व स्वैरसकेशा या दोन्हीहि नाटकांत त्या काळच्या परिस्थितीचें चित्र हुबेहूब रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

मनोरमा

'मनोरमा' हें डेक्कन कॉलेजांतील एक विद्यार्थी महादेव बाळकृष्ण चितळे यांनीं इ. स. १८७१ त प्रसिद्ध केलें. "सुनांना सासवांचा जाच, लग्नकार्यांतले विहिणींचे रुसवाफुगवीचे प्रकार; वृद्धाशीं तरुण मुलींचीं लग्नें, गतभर्तृकेचें वाईट मार्गांत पाऊल पडलें असतां घडलेले दुष्परिणाम, विद्यार्जनाकरितां परदेशगमन, इत्यादि सामाजिक चर्चेतले विषय या नाटकांत कर्त्यानें गोवले आहेत." ‡

या नाटकांतील भाषा पुष्कळ ठिकाणीं अश्लील आहे, म्हणून त्यावर वि. ज्ञा. विस्तारांत खरमरीत टीका * आली होती. सदर नाटकांतील बीभत्सरसाच्या निंद्य प्रकाराबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करूनहि निबंधमालाकारांनीं 'कांहीं संविधानकांचें चातुर्य व विशेषतः भाषणाचा चटकदारपणा' ह्या गुणांमुळें या नाटकास मराठी भाषेंतील उत्कृष्ट नाटकाच्या पंक्तींत बसविलें आहे. 'नावल व नाटक' या निबंधांत का. बा. मराठे यांनीं ह्या नाटकावर खालील अभिप्राय दिला आहे. "आलीकडे झालेल्या मनोरमा नाटकांत कुशी, गंगू, ठकू, गोदी अशा चार मुली व आणखीहि कांहीं मुली आहेत. त्यांत कुशीचें मनोरमा नांव ठेवून तिला मुख्य नायिका केली आहे. परंतु दुसऱ्या तीन मुलींचेंहि वृत्त अव्वलपासून अखेरपावेतों ओढीत नेलें आहे व जागोजाग त्यांचें इतकें वर्णन केलें आहे कीं, नाटकांत मुख्य नायिका कोण, व उद्देश काय, हे शेवटचे दोन प्रवेश वाचीपर्यंत लक्षांत येत नाहीं. पुनर्विवाह अवश्य आहे असें दाखविणें होतें, तर मुख्य पात्रावरचा तो प्रसंग फार चमत्कारिक रीतीनें टाळला आहे. मुख्य पात्रावर तो प्रसंग आणून पुनर्विवाह करविला असता

---

‡ शंकर बापूजी मुजुमदार—महाराष्ट्रीय नाटककार पृ. १४१

* वि. ज्ञा. वि. पु. ३, अं. १०

तर, उद्देश विशेष सफळ झाला असता. व्यभिचारी स्त्रियांना पुनर्विवाह पाहिजे असें दाखविण्यांत फारसें पुनर्विवाहशास्त्राचें महत्त्व राहत नाहीं. " × या नाटकांतील अश्लीलतेवर अनेक वर्तमानपत्रांतून टीका आली होती. त्याबाबत नाटककारांनीं पुढीलप्रमाणें आपलें मत प्रगट केलें आहे. " सभ्य लोकांच्या स्त्रिया लग्नकार्यांत पांचशें बायकांत जी भाषा बोलतात ती जर प्रौढ नव्हे तर प्रौढ भाषाच नाहीं असें म्हटलें पाहिजे. " असो. अश्लीलपणाचा दोष वगळला तर स्वतंत्र सामाजिक नाटक या पुस्तकांतील त्या काळांतील उत्तम ग्रंथांत गणना करणें भाग आहे. या नाटकांतील एक उतारा खालीं देत आहे.

स्थळ :—**मनोरमेचा रंगमहाल**

(खिन्नवदन झालेली अशी मनोरमा येते.)

मनो :—(आपल्याशीं) हा ! हा ! काय तरी महालाची शोभा दिसती आहे ! जिकडं पहावं तिकडे उदास दिसतं ! एकावांचून सर्व शोभा व्यर्थ आहे ! उत्तम शृंगारलेला वारु असून जसा त्यावर स्वार नसला म्हणजे त्या घोड्याची सर्व कांति फिक्की पडते, त्याप्रमाणें ह्या महालाची दशा झाली आहे ! हाच महाल, हीच मी, हाच राघू व हीच मैना; पण त्यांच्या बोलण्यापासून बरोबर बसलं असतां, जो विलक्षण आनंद होईल तो आतां होत नाहीं, तर उलटा त्यांचा शब्द ऐकून हृदयांत बाण मारल्याप्रमाणं वेदना होतात ! ह्याच खिडकींतून खालीं बागेंत पाहिलं म्हणजे इंद्रपुरींत असल्यासारखं वाटे; परंतु आतां तीच खिडकी यमपुरीच्या दरवाजाची दिंडी आहे अशी वाटते ! ह्याच महालांत शुभ्र चांदणं पडलं म्हणजे एकमेकांच्या मुखाची शोभा पहात बसलों असतां स्वर्गलोकीचं सुख होई. आतां कांहीं जरी येथें पाहिलं तरी उलट दुःखद होतं ! काय चमत्कार आहे पहा ! मनाला तर कशानंच आल्हाद होत नाहीं. आकाशांत अभ्र येऊन विजा कडकडतात आणि त्या वेळेस जसं सर्व उदास दिसतं तसं या महालांत आल्यें म्हणजे दिसूं लागतं. अन्न खाल्लेलं अंगीं लागत नाहीं. गोड तर कांहींच वाटत नाहीं. काळजीनें जीव एकसारखा हुरहुर करतो. सर्व चित्त तिकडे लागलं आहे. ध्यानीं तेंच, मनीं तेंच. शरीर मात्र येथें राहिलं आहे. मन तर एकसारखं तिकडे आहे. डोळ्यांपुढं सदोदित मूर्ति दिसते. कधीं तरी गांठ पडणार कोण जाणे ! देवा, ह्या दुःखासारखं दुःख कोणचंच नाहीं, सर्व दुःख पतकरतं, पण हें एक विरहदुःख नको ! †

× नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध पृ. ३३

† मनोरमा नाटक (अं. ४ प्र. ४) पृ. १५५–५६

प्रबोधविद्युत् अथवा स्वैरसकेशा नाटक

ह्याच वर्षी रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकर यांनीं ' प्रबोध-विद्युत् अथवा स्वैरसकेशा ' (इ. स. १८७१) ही नाटिका लिहून प्रसिद्ध केली. बालावृद्ध-विवाहाचे परिणाम किती घोर होतात व लहानपणींच वैधव्य प्राप्त झाल्यामुळें आपलें शील शाबूत ठेवतांना गतभर्तृकांची किती करुणास्पद स्थिति होते तें निर्भीडपणें दाखविण्याचा नाटकांत प्रयत्न केला आहे. परंतु त्याबरोबरच या नाटकांत " हलकटपणाचा व दुष्टवर्तनाचा कडेलोट केला आहे. नीच, कपटी, व्याभिचारी लोकांची एक माळिकाच लाविली आहे. "‡ त्यामुळेंच कीं काय एक वर्षाच्या अवधींत या नाटकाच्या दोन आवृत्त्या निघाल्या.

कल्पनारम्य नाटकें

इ. स. १८६८ त वासुदेव रामचंद्र मोहनी पैठणकर (अकोला) यांनीं ' वन्हिरथ राजाचें नाटक ' लिहिलें. हें लहानसें नाटक रेल्वेवर रचिलें आहे. ह्यांतील पात्रांचीं नांवेंहि मोठीं मनोरंजक आहेत. वन्हिरथ राजा (एंजिन), सिग्नालिका (सिग्नल), कोलांतिक (कोलमन), पातल (पोर्टर) इत्यादि. यानंतर धोंडो भिकाजी मराठे यांनीं इ. स. १८७१ त ' विलासतरंगिनी ' या नांवाचें नाटक प्रसिद्ध केलें. यामध्यें सूर्यकुलोत्पन्न चंद्रशेखर राजा व त्याचा प्रधान सुविचार परस्परांच्या विचारानें राज्य चालवीत असतां दायादांनीं तें कसें हरण केलें हा कथाभाग वर्णिला आहे. ' मराठी शालापत्रकां 'त ह्या नाटकाचें परीक्षण प्रसिद्ध झालें होतें.* या नाटकांत संविधानकाचा मागमूस देखील नाहीं. याशिवाय फाजील चऱ्हाट, पूर्वापरसंबंधाचा अभाव, अशुद्ध शब्दप्रयोग, अनावश्यक शब्दांची योजना, इत्यादि दोष आहेत ते निराळेच. इ. स. १८७२ त रावजी मनोहर ताकभाते यांनीं ' हंसपालिका ' या नांवाचें नाटक लिहिलें. यांतील मुख्य नायिकेचें हंसपक्ष्यांनीं पालन केल्यामुळें सदर नाटकाला हें नांव दिलें आहे. यांत अनेक विषयांचें विवेचन आलें आहे. याच वर्षी जनार्दन मोरोबा पाटील गोरेगांवकर यांनीं ' आई नर्मदा अथवा भ्रांति-निरसिनी ' हें काल्पनिक नाटक लिहून प्रसिद्ध केलें. ग्रंथकारानें आपल्या मातोश्रीच्या स्मरणार्थ नाटकास असें चमत्कारिक नांव दिलें आहे. इ. स. १८७४ त कृष्णाजी परशुराम गाडगीळ यांनीं ' फटफजितीचा कळस ' हें एकांकी नाटक लिहिलें. यामध्यें अत्यंत निर्दय, निर्लज्ज व जबर महत्त्वाकांक्षी अशा खल-पुरुषांचें स्वभावचित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. ह्याशिवाय ' सूर्यकान्त व नागकन्या ', ' चंपावती ', ' छेलबताऊ व मोहना राणी ' इत्यादि कल्पनारम्य नाटकें त्या काळीं प्रसिद्ध झालीं.

* * *

---

‡ नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध पृ. ३५

* शालापत्रक, पु. १३, अं. ७-९

परिशिष्ट

१

भाषांतरात्मक

संस्कृत

१ प्रबोधचंद्रोदय–सदाशिव बजाबाशास्त्री अमरापूरकर व रावजी बापुजीशास्त्री बापट, मुंबई, इ. स. १८५१

२ वेणीसंहार–परशुरामपंत गोडबोले, पुणें, इ. स. १८५७.

३ उत्तमरामचरित–परशुरामपंत गोडबोले, मुंबई, इ. स. १८५९.

४ प्रसन्नराघव–शिवरामशास्त्री पाळंदे, मुंबई, इ. स. १८५९.

५ मालतीमाधव–कृष्णशास्त्री राजवाडे, मुंबई, इ. स. १८६१.

६ शाकुंतल–परशुरामपंत गोडबोले, पुणें, इ. स. १८६१.

७ मृच्छकटिक–परशुरामपंत गोडबोले, इ. स. १८६२.

८ रत्नावली–शिवरामशास्त्री खरे, मुंबई, इ. स. १८६४.

९ जानकीपरिणय–गणेशशास्त्री लेले, मुंबई, इ. स. १८६५.

१० नागानंद–परशुरामपंत गोडबोले, मुंबई, इ. स. १८६५.

११ मालविकाग्निमित्र–गणेशशास्त्री लेले, मुंबई, इ. स. १८६७ (इं. ऑ.)

१२ मुद्राराक्षस–कृष्णशास्त्री राजवाडे, मुंबई, इ. स. १८६७.

१३ अभिज्ञानशाकुंतल–कृष्णशास्त्री राजवाडे, मुंबई, इ. स. १८६९.

१४ विद्धशालभंजिका–गणेशशास्त्री लेले, मुंबई, इ. स. १८६९ (इं. ऑ.)

१५ अभिज्ञानशाकुंतल–रामचंद्र भिकाजी गुंजीकर, मुंबई, इ. स. १८७०.

१६ पार्वतीपरिणय–परशुरामपंत गोडबोले, मुंबई, इ. स. १८७२.

१७ विक्रमोर्वशीय–भास्कर अनंतशास्त्री ताम्हनकर व गणेश अनंतशास्त्री अभ्यंकर, मुंबई, इ. स. १८७२.

१८ विक्रमोर्वशीय–कृष्णशास्त्री राजवाडे, पुणें, इ. स. १८७४.

इंग्रजी

१९ अथेल्लो–महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर, मुंबई, इ. स. १८६७.

२० विजयासिंग–काशिनाथ गोविंद नातू (ज्युलियस सीजर नाटकाचें भाषांतर) पुणें, इ. स. १८७२.

बंगाली

२१ नीलदर्पण– (इंग्रजीवरून भाषांतर) मोरो विठ्ठल वाळवेकर, मुंबई,
इ. स. १८७२.

२

स्वतंत्र

ऐतिहासिक

२२ थोरले माधवराव पेशवे–विनायक जनार्दन कीर्तने,
मुंबई, इ. स. १८६१.

२३ झांशीचे राणीचें नाटक–विश्वनाथ मोरेश्वरशास्त्री नाशिककर,
नारायण गोपाल दामले, विनायक हरी शिनकर, मुंबई, इ. स. १८७०.

२४ नारायणराव पेशवे–वीरेश्वर सदाशिव छत्रे, मुंबई,
इ. स. १८७० (इं. ऑ.)

२५ अफझलखानाच्या मृत्यूचें नाटक–कोंडो सखाराम घाटे,
ठाणें, इ. स. १८७१.

२६ सवाई माधवरावांचें नाटक–व्यंकट रंगो कट्टी,
मुधोळकर, बेळगांव इ. स. १८७१.

चरित्रात्मक

३७ शांकरदिग्जय–बळवंत पांडुरंग किर्लोस्कर, बेळगांव,
इ. स. १८७४ (इं. ऑ.)

पौराणिक

२८ श्रीकृष्णलीला–दामोदर कविकृत (वीरेश्वर सदाशिव छत्रे यांनीं शुद्ध केलें) मुंबई, इ. स. १८६०.

२९ नलनाटक–विनायकशास्त्री नातु, मुंबई, इ. स. १८६२.

३० वालिवध–कृष्णाजी रामचंद्र, पुणें, इ. स. १८६३ (ग्रां. कॅ.)

३१ मेघावतीपरिणय–लक्ष्मण गोपाळ दीक्षित, पुणें,
इ. स. १८६३ (ग्रां. कॅ.)

३२ जयपाळ—विनायक जनार्दन कीर्तने, मुंबई, इ. स. १८६५.
३३ श्रीभिल्लिणी नाटक—विनायकशास्त्री नातु, मुंबई, इ. स. १८६५.
३४ रुक्मिणीहरण—लक्ष्मण गोपाळ दीक्षित, पुणें, इ. स. १८६५.
३५ चित्रसेन गंधर्व—दत्तात्रय वासुदेव जोगळेकर,
मुंबई, इ. स. १८६७ (ब्रि. म्यु.)
३६ विराटपर्व—(पूर्वभाग) रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकर,
पुणें, इ. स. १८६७.
३७ गोपीचंद राजाचें नाटक—नारायण दिनकर गोडबोले,
मुंबई, इ. स. १८६८ (इं. ऑ.)
३८ हरिश्चंद्रसत्त्वदर्शन—रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकर, (आवृत्ति २ री)
पुणें, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
३९ श्रियाळचांगुणासत्त्वदर्शन—रावजी बाळकृष्ण लेले,
पुणें, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
४० वत्सलाहरण—दामोदर हरी चितळे (आवृत्ति २ री)
पुणें, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
४१ पुनर्दर्शननाटक—रामकृष्ण काशिनाथ ओक, महाडकर,
पुणें, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
४२ पार्थप्रतिज्ञा—विश्वनाथ नारायण ताटके, पुणें,
इ. स. १८७० (इं. ऑ.)
४३ सीतास्वयंवर—लक्ष्मण शंकर अभ्यंकर, मुंबई, इ. स. १८७०.
४४ सुलोचना नाटक—रावजी बाळकृष्ण लेले, पुणें,
इ. स. १८७० (इं. ऑ.)
४५ गोपीचंद नाटक—रावजी बाळकृष्ण लेले, पुणें,
इ. स. १८७० (इं. ऑ.)
४६ गौरीहरविनोद—अनंत दीक्षित जोशी, सातारा, इ. स. १८७१.
४७ रावणवध—रावजी बाळकृष्ण लेले, पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)
४८ सैरंध्री—बजाबा बाळाजी नेने, पुणें, इ. स. १८७२.
४९ मदनप्रताप—रणछोड रामभाई गुजर, आलिबाग,
इ. स. १८७४ (इं. ऑ.)
५० रासक्रीडा—डेविड हाइम्, मुंबई, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

तत्त्वज्ञानात्मक

५१ सायुज्यसदन–रामकृष्ण हरी भागवत, मुंबई, इ. स. १८६८.

सामाजिक

५२ व्यवहारोपयोगी नाटक–गोविंद नारायण,
मुंबई, इ. स. १८५९ (ब्रि. म्यु.)

५३ मनोरमा–महादेव बाळकृष्ण चितळे, मुंबई, इ. स. १८७१.

५४ प्रबोधविद्युत् अथवा स्वैरसकेशा नाटक
रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकर, मुंबई, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

काल्पनिक

५५ वन्हिरथ राजाचें नाटक–वासुदेव रामचंद्र मोहोनी,
पैठणकर, अकोला, इ. स. १८६८.

५६ सूर्यकांत व नागकन्या–गणपत पांडुरंग कमळाकर व
भास्कर विनायक कानिटकर, मुंबई, इ. स. १८६९.

५७ विलासतरंगिनी–धोंडो भिकाजी मराठे, पुणें, इ. स. १८७१.

५८ चंपावती–गणेश विनायक कानिटकर, मुंबई, इ. स. १८७१.

५९ हंसपालिका–रावजी मनोहर ताकभाते, पुणें, इ. स. १८७२.

६० आई नर्मदा–अथवा भ्रांतिनिरसिनी––
जनार्दन मोरोबा पाटील, मुंबई, इ. स. १८७२.

६१ छेलबताऊ व मोहनाराणी–डेविड हाइम्, मुंबई,
इ. स. १८७२ (इं. ऑ.)

६२ फटफजितीचा कळस–कृष्णाजी परशुराम गाडगीळ
पुणें, इ. स. १८७४.

* * *

४ : निबंध–भाषणें–संवाद

निबंध-वाङ्मयाचा प्रारंभ

अव्वल इंग्रजींत शिकून तयार झालेल्या सुशिक्षित लोकांची पहिली पिढी इंग्रजांचें अगाध ज्ञानभांडार पाहून दिपून गेली, त्याबरोबरच आपल्या लोकांचें अज्ञान व दुरवस्था पाहून, त्यांच्या मनाला इळहळ लागली. आपण मिळविलेल्या ज्ञानाचा आपल्या देशबांधवांना फायदा करून द्यावा व त्यांची स्थिति सुधारण्याविषयीं त्यांच्या अंतःकरणांत तळमळ उत्पन्न करावी, म्हणून तत्कालीन विद्वानांनीं इंग्रजी विद्येचा ग्राह्यांश सुबोध मराठी भाषेंत उतरविण्याचा प्रयत्न केला. मराठी गद्य–वाङ्मय बाल्यावस्थेंत असल्यामुळें, प्रत्येक विषयावर विस्तृत ग्रंथरचना करण्याचा काळ अद्याप आलेला नव्हता. सामान्य वाचकांना विविध विषयांची 'धूळभेट' करून देण्यासाठीं स्फुट स्वरूपाची गद्यरचना करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. यामुळें निबंध–लेखनाच्या प्रवृत्तीला साहजिकच उत्तेजन मिळालें. विद्येची महती, सद्‌गुणांचें श्रेष्ठत्व, नीति–नियमांची आवश्यकता, व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम इत्यादि विषयांवर लहानमोठे निबंध प्रसिद्ध होऊं लागले. समाजांतील विचारी लोक आपली अवनति व सर्वत्र पसरलेलें दारिद्र्य यांचा शोध करण्यांत गढून गेले. आपल्या अधःपतनाचें मूळ परकीय राजसत्तेंत आहे, याची त्या वेळीं कोणालाहि कल्पना आली नाहीं. परमेश्वरानें आपल्या कल्याणासाठींच इंग्रजांना या देशांत धाडून दिलें आहे व त्यांच्या अनुकरणानेंच आपण आपली सुधारणा करून घेतली पाहिजे, अशी त्या वेळच्या विद्वानांची दृढ समजूत होती. ज्या गुणांनीं इंग्रजांचा उत्कर्ष झाला ते गुण आपण आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हें लक्षांत घेऊन त्यांनीं इंग्रजी भाषेंतील बोधपर (Didactic) निबंधांच्या धर्तीवर निबंध लिहिण्याला सुरुवात केली. विद्यादेवीची आराधना करा, आळस सोडून देऊन उद्योगाची कांस धरा, आपआपसांतील दुही नाहींशी करा, देशपर्यटनाचें महत्त्व लक्षांत आणा, दुर्व्यसनांच्या आहारीं न जातां सत्य व सदाचार यांच्या मार्गानें चाला अशा तऱ्हेचा उपदेश त्या काळच्या निबंधांतून प्रामुख्यानें केलेला आढळतो.

कुटुम्बविषयक निबंध

मराठी भाषेंतील सुरुवातीचे निबंध नवशिक्षित महाराष्ट्रीयांनीं व मिशनरी लोकांनीं लिहिले. या प्रांतांतील लोकांना विद्येची गोडी लागावी म्हणून खिस्ती धर्मोपदेशकांनीं निरनिराळ्या उपयुक्त विषयांची सामान्य माहिती देणारीं लहान लहान

पुस्तकें तयार केलीं. मिसेस फारार या ख्रिस्ती लेखिकेनें इ. स. १८३५ त नाशिक येथें 'कुटुंबप्रवर्तननीति' या नांवाचा निबंध प्रसिद्ध केला. हा निबंध भाषांतररूप असून त्यांत कुटुंबांतील व्यक्तींनीं एकमेकांशीं कशा रीतीनें वागावें व आईबापांनीं मुलांविषयींचीं आपलीं कर्तव्यें पार पाडतांना कोणत्या प्रकारची सावधगिरी घेणें जरूर आहे, याचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. या पुस्तकामधील 'स्वभाव' प्रकरणांतील खालील उताऱ्यावरून हा विषय किती सोप्या भाषेंत मांडला आहे, तें लक्षांत येईल.

> " कुटुंबांत समागमसुख पावायासाठीं सर्वांनीं नम्रतेनें, शांततेनें, सोशीकपणानें वागावें म्हणून लहानपणापासून हे सद्गुण मुलांचा ठायीं दृढ करण्यासाठीं आईबापांनीं उपाय करीत असावा. मुलांची वासना बहुतकरून त्यांच्या वडिलांच्या रीतीभातीप्रमाणें ठसती; ह्याकरितां आईबापें जर खाष्ट, रागीट अभिमानी असलीं, परस्परांत देखील निंद्य भाषण बोलत असलीं तर त्यांचें वारें मुलाला कसें बाधणार नाहीं ? बाधेलच.
>
> कित्येक लोक जरी आपल्या लेंकरावर अति प्रीति करितात तरी क्रोध आला असतां त्याला नाना प्रकारें दटावितात, म्हणतात कीं, मी तुला उभा चिरीन, तुला उळकंबीन, तुला उलटा टांगीन असें म्हणतात, तर अशा उग्र भाषणानें मुलाला कांहीं तरी शिक्षा लागेल काय ? त्यानें मूल कधीं तरी ठिकाणीं येईल काय ? आईबापाला ओफरें आलें म्हणून लेकराचें ओफरें जाईल काय ? तर मुलाला जो धारेवर आणणार त्यानें आपल्याला अगोदर धारेवर आणलें पाहिजे म्हणजे मूल धारेवर येईल.
>
> आपल्या स्वभावाला जो जिंकील तो दुर्ग जिंकण्यापेक्षां श्रेष्ठ होय. " ‡

याखेरीज त्या काळीं या विषयावर 'मातृबोध' (इ. स. १८५२) 'कुटुंबसुधारणा' (इ. स. १८५५) व 'मुलांस वागविण्याची रीति' (इ. स. १८७२) इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध झालीं.

प्रज्ञाप्रधान वाङ्मयाचा पुरस्कार

मिशनरी लोकांच्या या विद्यादानाच्या मुळाशीं धर्मप्रसाराची भावना होती. पण महाराष्ट्रांतलि कांहीं विद्वान् लोक, आपल्या समाजांत भौतिक ज्ञानाचा प्रसार होऊन त्याची सर्वांगीण सुधारणा व्हावी, वा आपुलकीच्या भावनेनें या कार्याला प्रवृत्त झाले होते. त्यांपैकीं बाळशास्त्री जांभेकर व भाऊ महाजन हे दोघे प्रमुख होत. बाळशास्त्री यांनीं आपल्या 'दर्पण' व 'दिग्दर्शन' ह्या नियतकालिकांच्या द्वारें अनेक

‡ कुटुंबप्रवर्तननीति पृ. १६-१७

उद्बोधक व मनोरंजक विषयांची माहिती देण्याचा उपक्रम केला. त्याबरोबरच त्यांचे वृत्तपत्र-व्यवसायांतील सहकारी गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन यांनीं आपल्या 'प्रभाकर' पत्रांतून समाजाच्या प्रगतीला पोषक अशा गोष्टींचीं निबंधरूपानें अत्यंत निःस्पृहपणें चर्चा करण्यास प्रारंभ केला. बाळशास्त्री व भाऊ महाजन यांच्यासारखे विद्वान् व दूरदर्शी लोक त्या काळीं महाराष्ट्रांतच काय, पण मुंबई इलाख्यांतहि फार थोडे होते. या दोघां पंडितांनीं प्रज्ञाप्रधान वाङ्मयाचा पुरस्कार करून मराठी गद्य-रचनेला नवीन वळण लाविलें. त्यांच्या अनुकरणानें त्या वेळेच्या इतर सुशिक्षित तरुणांनींहि मराठी भाषेंत निरनिराळ्या विषयांवर निबंध लिहून प्रसिद्ध केले.

दारू व इतर मादक पदार्थांविषयीं निबंध

दारिद्र्याला दुर्व्यसनांची जोड मिळाली तर त्याचे परिणाम फार भयंकर होतात, हें लक्षांत घेऊन त्या वेळच्या विचारवंतांनीं आपल्या गरीब देशबांधवांना मादक पदार्थांच्या सेवनापासून परावृत्त करण्यासाठीं लहान लहान निबंध लिहिले. इ. स. १८३४ त स्थापन झालेल्या 'मुंबई टेंपरन्स् सोसैटी'च्या विद्यमानें 'दारू पिणाऱ्यांस सुबोध' (इ. स. १८४६) या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध झालें. त्यानंतर इ. स. १८५५ चे सुमारास या विषयांवर आणखी चारपांच निबंध लिहिले गेले. 'अम्मल करणें वाईट', दारूपासून अनर्थ', 'दुर्व्यसन-निषेधक-बोध', 'दारू व इतर कैफी पदार्थ-निषेधक-बोध' इत्यादि पुस्तकांतून व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम वर्णन करून त्यापासून अलिप्त राहण्याचा उपदेश केला आहे. काशिनाथ थत्ते यांच्या 'अम्मल करण्यापासून नाश' या निबंधांतील खालील उताऱ्यावरून ह्या विषयावरील निबंधांचें स्वरूप समजून येईल.

"अहो, दारूबाजहो! ह्या दारूपासून तुम्हास कांहींच फायदा नाहीं. तुमचें सर्व द्रव्य ह्या दारूमुळें गेलें, आणि तिच्याच योगानें हल्लीं तुम्हांस पोटभर अन्न मिळत नाहींसें झालें आहे. तर, हे माझे स्वदेशीय बांधव हो! अशा नाशाचें मूळ जे दारू वगैरे कैफी पदार्थ ते सोडून द्या. तुमचे वाडवडील दारू पीत नव्हते, तरी ते तुम्हांपेक्षां मातबर होते, व शरीरानें धष्टपुष्टहि होते, ह्याचा विचार करा. हल्लीं जे लोक अम्मल करीत नाहींत, ते तुम्हांपेक्षां अधिक सुखी आहेत, व त्यांच्यानें तुमच्यापेक्षां अधिक व चांगलें काम करवतें. दारू प्यावी असें कोणत्याहि शास्त्रांत सांगितलें नाहीं. दारू पिण्यानें तुम्ही मोठ्या वेदनेंत असतां, ह्यामुळें तुमच्यानें ईश्वराची भक्ति करवत नाहीं म्हणून तो तुम्हांवर रागावतो. ह्या कारणांनीं तुम्ही ह्या लोकच्या सुखांस मुकतां इतकेंच केवळ नाहीं, तर परलोकच्या सुखांसहि मुकतां. ही दारू तुम्हांस नरकवासास पाठविती, ह्याचा पूर्णपणीं विचार करा. आपल्या

देशाकडे पाहा, आपल्या वाडवडिलांकडे पाहा; त्यांनीं कोणत्या रीतीने अब्रू मिळविली, व कोणत्या रीतीनें पैसा मिळविला, ह्याचा विचार करा; अज्ञानसागरांत लोळूं नका, शुद्धीवर या, असा नाशकारक वेडेपणा करूं नका. अहो बांधवहो ! ह्या वरच्या सर्व गोष्टींचा सावधपणीं विचार करा, आणि याप्रमाणें वागण्यास झटा म्हणजे ईश्वराच्या आशीर्वादेंकरून तुम्हांस सुखाची प्राप्ति होईल.

" दारूबाजी मतकर यारो अक्कल गुंग होती ॥
अपने पदरका दाम खरचकर हातमें मट्टी आती ॥
वंदे हुशार रहना बे, साहेब० ॥ २ ॥ " ‡

बोधपर निबंध

आमच्या लोकांच्मा दारिद्र्यांत भर टाकणारे दुसरे महत्त्वाचे दोष म्हणजे आळस आणि कर्तबाजारीपणा हे होत. त्यांचें निवारण होऊन लोकांची स्थिति सुधारावी, या उद्देशानें एकदोन निबंध लिहिले गेले. इ. स. १८४७ त 'आळशी आणि दिवाळखोर यांस उपदेश' या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध झालें. तसेंच इ. स. १८५० त 'डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें' गोविंद नारायण यांनीं लिहिलेला 'ऋणनिषेधक बोध' हा निबंध प्रसिद्ध केला. त्यांत कर्ज होण्याचीं कारणें व तीं नाहींशीं करण्याचे उपाय या विषयाचें विस्तृत विवेचन केलें आहे. याशिवाय लोकांनीं सत्यपालन करण्याचा प्रयत्न करावा; अभिचारादि, अनैतिक कृत्यांपासून दूर रहावें व परोपकारांस आपल्या आयुष्याचा व्यय करावा अशा तऱ्हेचा उपदेश करणारीं अनेक लहानमोठीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं. 'सत्यनिरूपण' (इ. स. १८५२), 'व्याभिचारनिषेधक बोध' (इ. स. १८५४), 'सत्यासत्यविवेचन' (इ.स.१८६२), 'परोपकार' (इ. स. १८७२) इत्यादि निबंधांचा हेतु त्यांच्या नांवावरून स्पष्ट कळण्यासारखा आहे.

तत्कालीन स्थितीविषयीं चर्चात्मक निबंध

हिंदुस्थानांतील तत्कालीन स्थितीचा ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत बारकाईनें अभ्यास करून लिहिलेले कांहीं निबंध या काळांत प्रसिद्ध झाले. त्यांपैकीं रामकृष्ण विश्वनाथ यांनीं लिहिलेला 'हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिति व पुढें काय त्याचा परिणाम होणार याविषयीं विचार' (इ. स. १८४३) हा निबंध फार महत्त्वाचा आहे. यांतील भाषा पुष्कळ ठिकाणीं अशुद्ध आहे, पण

‡ अम्मल करण्यापासून नाश—पृ. २८–३०

विचारसरणी मात्र स्पष्ट व सडेतोडपणाची आहे. स्वदेशाभिमानाचे भावनेनें ओतप्रोत भरलेला व पूर्णपणें स्वतंत्र दृष्टीनें लिहिलेला हा पहिलाच निबंध होय. यांत आरंभीं इतिहास–संशोधनाच्या मार्गांतील अडचणी दाखवून देऊन पुढें परकीय इतिहासकारानें लिहिलेले वृत्तान्त कसे अपूर्ण, एकपक्षी व विपर्यस्त आहेत तें स्पष्ट केलें आहे. तत्कालीन स्थितीविषयीं लिहितांना, देश दिवसानुदिवस बुडत चालला आहे, दारिद्र्य आणि दुःख हीं सारखीं वाढत आहेत, आमच्या श्रमाचे जिन्नस आम्ही उपभोगूं शकत नाहीं, एतद्देशीय लोक सर्व कामें करण्यास समर्थ असतांहि त्यांना तशी संधि मिळत नाहीं अशा तऱ्हेचे विचार अत्यंत निर्भयपणें प्रगट केले आहेत, आणि शेवटीं आपल्या लोकांत देशाभिमान व संघटना यांची वाण आहे. तेव्हां ते गुण अंगीं आणण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे व आपले बुडत चाललेले उद्योगधंदे भरभराटीस आणण्यासाठीं समाईक भांडवल जमा करून यांत्रिक साह्यानें मोठ्या प्रमाणावर व्यापार करण्यास तयार झालें पाहिजे अशा सूचना केल्या आहेत. या निबंधांतील खालील उताऱ्यांवरून लेखकाच्या स्वतंत्र विचार-सरणीची कल्पना येईल.

" हिंदुस्थान देश ज्या रीतीनें सध्यां आहे, त्याकडे आपण अवलोकन करून पाहूं लागलों असतां, व त्यांचा सांप्रतचे स्थितीचा नीटपणें विचार करूं गेलों असतां असें आपणांस खास दिसोन येईल, कीं ज्या सर्व लोकांची या विस्तीर्ण देशांत वस्ती आहे, त्यांचें कल्याण होण्यास व ब्रिटिशांचे राज्यांची व्यवस्था व स्थिरता असण्यास एक राज्यकारभार करण्याचे स्थितींत मोठा फेरफार झाला पाहिजे, नाहींतर या लोकांच्या उद्योगांत व वर्तणुकेंत कांहीं नवीन रचना झाली पाहिजे. इंडियाचे कोणतेही भागांत गेलों असतां सांप्रतचे जमाबंदी, शिबंदी, अथवा न्यायखातें यांच्या कारभारांत जे लोकांवर मोठमोठाले कर, अंदाधुंदी आणि जुलूम आहे याविषयीं आणि हिंदुस्थानांतील उत्पन्न केलेलें सामान यांवर अनिवार मोठी जकात बसवलेली आहे, कीं जेणें-करून त्या जिनसांस विलायतचे बाजारांत जाण्यास मार्ग न मिळावा याविषयीं व या काम करणारे लोकांनीं यामुळें आपआपले धंदे सोडून दिले व भिकेस लागले याविषयीं चहूंकडून लोक गाऱ्हाणीं करितात, असें आपलें आढळण्यांत येईल. हीं असलीं गाऱ्हाणीं ऐकून आम्हांस फार दुःख वाटतें. लोकांचे उद्योगास प्रतिबंध करणारे असे जे मोठमोठाले कर आहेत, तेहि पाहून आम्हांस खेद वाटतो. चांगलीं प्रमाणें समोर असतांना आमचानें कधींहि नाहीं म्हणवत नाहीं, कीं जेव्हां दिवाणींत अथवा फौजदारींत युरोपियन लोकांवर कज्जा आणलेला असतो, अथवा कंपनीचे कोडतांत त्यावर फिर्याद असती, तेव्हां जो बिचारा नेटिव कज्जा घालणारा असतो, तो गरादींत

गुन्हेगाराप्रमाणें उभा असतो, आणि हा शुभ्र ताडाचा गुन्हेगार न्यायाधीशाचे शेजारीं खुर्ची घेऊन बसतो, अथवा कधींकधीं जो अधिक पैका देऊं सकेल, त्याचे तर्फेचा न्याय होतो. आणखी आमचानें नाहीं म्हणवत नाहीं कीं गरिबास बहुतकरून शासन होतें, कारण कीं तो दरिद्री पडला व मातब्बर पेंचांतून सुटतो, कारण कीं तो श्रीमंत पडला, व दैवयोगेंकरून असेंहि घडते कीं, तो न्याय करणारा या गृहस्थाचा बऱ्याच पैक्याचा ऋणकारी असतो. या सर्व गोष्टी एथील लोकांचा इतक्या माहितींतल्या आहेत, कीं जेथजेथें त्या नाहींत तेथतेथें त्या लोकांस आश्चर्य वाटतें, व त्याविषयीं गवगवा उत्पन्न होतो, व जेथें त्या आहेत, तेथें आश्चर्य वाटण्याचें काय प्रयोजन! वाः काय ही न्याय करण्याची उत्कृष्ट चाल! मग बर्क साहेबानें जो दोष ठेविला आहे, त्याचें आपण कां बरें आश्चर्य मानावें! कीं "हिंदुस्थानांत राज्य नव्हे, लष्करी अंमल, व दिवाणी जुलूम आहे." ×

याच विषयावर कृष्णनाथ रघुनाथजी यांनींहि एक लहानसा निबंध लिहिला होता. त्याशिवाय 'कामगारलोकांशीं संभाषण', (इ. स. १८५३), 'मुंबईतील सुशिक्षित तरुण हिंदु लोक' (इ. स. १८५८), 'लोकसुधारणोपदेश', (इ. स. १८६६), 'आमचें कर्तव्यकर्म कोणतें' (इ. स. १८७४), इत्यादि उद्बोधक निबंध त्या काळीं प्रसिद्ध झाले, यांपैकीं भवानी विश्वनाथ कानविंदे यांनीं लिहिलेला 'मुंबईतील सुशिक्षित तरुण हिंदु लोक' हा निबंध फार उत्तम वठला आहे. त्यांत प्रथम विद्येची महती वर्णन केल्यानंतर मातृभाषेकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल खेद व्यक्त केला आहे. अखेरीस ऐक्यसाधन करा, वाईट चाली मोडून टाकण्यासाठीं झटा, पण उतावळे होऊं नका; विरोधकांचे विनयपूर्वक मतपरिवर्तन करा. अशा तऱ्हेचा उपदेश केला आहे. 'लोकसुधारणोपदेश' या पुस्तकांत लोकांनीं प्राप्त परिस्थितीला तोंड देऊन कशा रीतीनें आपली सुधारणा करून घ्यावी याविषयीं चर्चा केली आहे. 'आमचें कर्तव्यकर्म कोणतें' या निबंधांत स्वदेशीच्या तत्त्वाचा अत्यंत कळकळीनें पुरस्कार केला आहे. त्यांतील खालीं दिलेल्या उताऱ्यावरून त्या वेळच्या लोकांचा विचारप्रवाह कोणत्या दिशेनें वहात होता तें समजून येईल.

"या देशांत जरी व्यापार जास्त वाढला आहे, तरी येथील लोकांस लागणाऱ्या पदार्थांपैकीं पुष्कळ पदार्थ बाह्य देशाहून येथें येतात, व येथें जे तयार होतात, त्यांची संख्या फारच अल्प आहे. पूर्वीं या हिंदुस्थानांत लागणारे पदार्थ बहुधा येथेंच तयार होत होते, परंतु आतां बाहेरून येणारे पदार्थ येथील

× हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिति व पुढें काय त्याचा परिणाम होणार याविषयीं विचार–पृ. ७९–८०

पदार्थांपेक्षां जास्त चांगले व स्वस्त दरानें मिळतात असें झाल्याकारणानें अर्थात् ते लोक घेऊं लागले, व यांना कोणी विचारीनासें झालें. त्या योगानें दिवसेंदिवस ते देशी पदार्थ खप नसल्याकारणानें नष्ट होत चालले. तसेंच ते बनविणारे किंवा त्यांच्या कृतीची माहिती असणारे लोकांची संख्याहि कमी होत चालली, आतां याचा हा दोष दुसऱ्याकडे नाहीं, परंतु खचित त्यांच्याकडेसच आहे. कारण दुसऱ्याचे चांगले पदार्थांना न भुलतां जर तसे किंबहुना त्याहून जास्त चांगले व सुलभ पडणारे पदार्थ (तयार होणाऱ्या युक्तीनें) येथेंच बनविण्याचा यत्न त्यांनीं केला असता तर गोष्ट या थरास आलीच नसती. तेव्हां आयते तयार व चांगले पदार्थ थोडया किंमतींत मिळूं लागले म्हणून श्रम कोण करितो ! असें म्हणून आळसानें स्वस्थ बसले, आणि आतां जेव्हां या थरास गोष्ट आली, तेव्हां " कसें करूं, काय करूं " या अष्टाक्षरी मंत्राचा जप करीत बसले; अशानें दुःख निवारण होईल काय ? जर असे उत्तम पदार्थ बनविण्याचे आधींच श्रम केले असते तर त्यांचे (म्ह. आमचे) किती हित झालें असतें, व देशाला तरी किती भूषणास्पद झालें असतें बरें ! आतां तरी एकमतानें झटून श्रम करणें योग्य होय, कीं ज्या योगें कालेंकरून खचित पूर्व दिवस प्राप्त होईल. वाईट जरी लवकर होतें आणि चांगल्यास जरी अवधि लागतो, तरी " प्रयत्नीं परमेश्वर " या म्हणीप्रमाणें खचित होईल. " *

राजकीय विषयांवरील निबंध

राजकीय विषयावरील निबंधांत 'सरकारचे चाकर आणि सुखवस्तु हिंदुस्थानांतील साहेब लोकांशीं संभाषण' (इ. स. १८५०), 'हिंदुस्थानांतील ब्रिटिश लोकांचें राज्य व पूर्वींचीं राज्यें यांची तुलना आणि हल्लीं उद्भवलेल्या बंडापासून होणारे तोटे' (इ. स. १८५७), इंग्रेजी राज्यसत्ता इजविषयीं संभाषण (इ. स. १८६८), 'राजकीय विचार' (इ. स. १८६८), 'हिंदुस्थानांत युरोपियन लोक एतद्देशीय लोकांबरोबर कसें वागतात' (इ. स. १८७४) ह्या पुस्तकांचा उल्लेख करणें अवश्य आहे. या पुस्तकांपैकीं 'हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यसत्ता इजविषयीं संभाषण' या पुस्तकांत प्रो. दादाभाई नौरोजी यांनीं लंडनमधील ईस्ट इंडिया असोसिएशनपुढें केलेल्या इंग्रजी भाषणाचें भाषांतर केलें आहे, देशाच्या राज्यकारभारांत हात घालण्याची हिंदुस्थानांतील लोकांस मोकळीक नाहीं; तसेंच पार्लमेंटमध्ये हिंदुस्थानचे प्रतिनिधी नाहींत यामुळें एतद्देशीय लोकांच्या बाबतींत पुष्कळ वेळां अन्याय होतो; व त्याची योग्य दाद लावून घेणें प्रायः अशक्य होतें. अशा आशयाचें

---

*आमचें कर्तव्यकर्म कोणतें पृ. १६–१९

विधान करून शेवटीं " अंतरीं दुखावलेली वीस कोटी प्रजा व एक लक्ष परकी लोकांची फौज या परस्परांच्या तंट्याचा परिणाम कसा होईल हें सांगण्यास कांहीं ज्योतिषी नकोत, " असा इषारा दिला आहे. 'राजकीय विचार,' या पुस्तकांत आरंभीं सरकार व विलायतेंतील लोक यांना हिंदुस्थानाविषयीं माहिती देऊन, होईल तेवढें या देशाचें हित करण्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या 'ईस्ट इंडिया असोसिएशन' या सभेची माहिती दिली आहे. त्यानंतर कलकत्ता येथील बाबू उमेशचंद्र बानर्जी यांनीं हिंदुस्थानांत प्रतिनिधींचे मार्फत राज्यकारभार चालविण्याविषयीं या सभेपुढें जो निबंध वाचला त्याचा मराठींत सारांश लिहिला आहे. शेवटीं हिंदुस्थानच्या सनदी सिव्हिल नौकरीमध्यें हिंदुस्थानांतील लोकांचा प्रवेश होण्यास्तव अवश्य अशा सोयी व्हाव्या म्हणून हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांकडे अर्ज करण्याचा विचार करण्याकरितां 'ईस्ट इंडिया असोसिएशन' या मंडळींची सभा भरली होती तिची हकीकत दिली आहे.

वाङ्मयविषयक निबंध

काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांनीं इ. स. १८७२ त 'नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध' लिहिला. त्यांत त्यांनीं कादंबरी व नाटक यांची रचना करतांना लेखकानें सामान्यतः कोणत्या गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत याबद्दल थोडक्यांत विवरण केलें आहे. त्याबरोबरच तत्कालीन कादंबऱ्या व नाटकें यांमधील ठळक ठळक दोषहि दाखविले आहेत. वाङ्मयविषयक चर्चेनें युक्त असा हा एकच निबंध त्या काळीं प्रसिद्ध झाला.

निरनिराळ्या मासिकांतील निबंध

निरनिराळ्या मासिकांतील लेखांनींहि तत्कालीन निबंध—वाङ्मयांत बरीच भर टाकली. 'दिग्दर्शन' व 'प्रभाकर' या नियतकालिकांचा आरंभीं निर्देश केलेला आहेच. त्यानंतर ज्ञानप्रसारक मासिकानें या बाबतींत फार महत्त्वाची कामगिरी बजाविली. 'शिक्षालाभ,' सृष्टीच्या सौंदर्याविषयीं निबंध,' 'क्रियेवांचून ज्ञान पंगु,' 'उद्योग,' 'पुरुषार्थ,' 'आत्मशिक्षण,' 'लिहिण्याची शैली,' इत्यादि विविध विषयांवरील लहानमोठे निबंध या पुस्तकांत प्रसिद्ध झाले. भास्कर दामोदर पाळंदे, बाळ भास्कर शिंत्रे, लक्ष्मण नृसिंह जोशी, जनार्दन सखाराम गाडगीळ, विष्णु घनःशाम, नारायणभाई, जनार्दन रामचंद्र अशा त्या काळच्या उदयोन्मुख लेखकांनीं याच मासिकाच्या आश्रयानें निबंध लेखनाचे पाठ गिरविले. पुणें पाठशाला—पत्रकांतून अनेक विषयांवर चांगले चांगले निबंध प्रसिद्ध झाले. 'व्यसनाविषयीं निबंध,' 'कवितेविषयीं निबंध,' 'मराठी भाषेविषयीं निबंध', 'नेटिवांची मंद गतीनें सुधारणारी स्थिति' अशा तऱ्हेचे या मासिकांतील पुष्कळ निबंध वाचनीय आहेत.

विविधज्ञानविस्तार मासिकांतहि ' मराठी भाषा ', ' मोरोपंत ', ' कानडी भाषा ', ' आमच्या भाषांचा सांप्रतकाळ ', ' स्मृतिशास्त्र, ' ' संस्कृत कवि ', इत्यादि विषयांवर भारदस्त व माहितीपूर्ण निबंध प्रसिद्ध झाले. याशिवाय ' चंद्रिका, ' ' दंभहारक ', ' ज्ञानसंग्रह ' इत्यादि मासिकांनींहि आपापल्यापरी मराठी भाषेंतील निबंधवाङ्मयाच्या विकासाला हातभार लाविला.

लोकहितवादी (इ. स. १८२३–९२)

इ. स. १८७४ पूर्वीच्या मराठी भाषेंतील निबंध–वाङ्मयाचा आपण थोडक्यांत आढावा घेतला. त्याबरोबरच या काळांत उदयास आलेल्या निबंध–लेखकांची ओझरती कां होईना पण ओळख करून घेणें अवश्य आहे. अर्वाचीन महाराष्ट्रांतील पहिले निबंधकार म्हणून बाळशास्त्री जांभेकर व भाऊ महाजन यांचा उल्लेख आरंभीं आलेला आहेच. त्यानंतर ज्यांनीं आपल्या प्रभावी लेखणीनें महाराष्ट्रांत ज्ञानप्रसाराचें पवित्र कार्य आमरण चालविलें ते थोर पुरुष म्हणजे समाजसेवेची तळमळ, सूक्ष्म अवलोकन, सत्यप्रीति व सहनशीलता हे गुण उत्कटत्वानें बसत होते. संधि सांपडतांच प्रत्येक विषयाची माहिती करून घेण्याबद्दल ते अत्यंत दक्षता बाळगीत. विविध विषयांवरील त्यांचा व्यासंग फार दांडगा होता. " आमच्या देशाच्या माहितीच्या संबंधानें हे रावबहादुर केवळ समुद्र आहेत. " † हा ' बालबोध'-कारांचा अभिप्राय अगदीं यथार्थ आहे, त्याचप्रमाणें कठोर वाक्प्रहार करण्याच्या भरांतहि मालाकारांना त्यांचे वरील गुण मान्य करावे लागले, यावरून त्यांची थोरवी लक्षांत येईल. लोकहितवादी यांनीं इ. स. १८४८–'५० या काळांत ' प्रभाकर ' पत्रांत निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर शंभरांहून अधिक पत्रें लिहिली. यांतील प्रत्येक पत्र म्हणजे एकेका विषयावरील उत्कृष्ट निबंधच आहे. त्यांच्या लेखनकार्याचा व्याप इतका मोठा आहे कीं, त्यांच्या लेखणीच्या कचाट्यांतून एकहि विषय सुटला आहे असें नाहीं. ' शिमग्याचा दुराचार ', ' शाक्तमार्ग ', ' हिंदुस्थानां-तील इंग्रजी राज्याचा विचार ', ' आर्जवीपणा व डौलीपणा ', ' हिंदुस्थानच्या पराधीनतेचीं कारणें ', ' डोले करण्याची चाल ', ' मानास व दानास पात्र ', ' मन हेंच ईश्वरी शास्त्र ', ' नाशिबावर हवाला ', ' वेळेचा व्यर्थ खर्च ', ' नादविद्या ', ' हिंदु लोकांचा व्यापार ' इत्यादि मथळे पाहूनच त्यांच्या बहुविध लेखनाचें महत्त्व समजून येईल.

गोपाळराव यांचा जन्म पुण्यामध्यें इ. स. १८२३ त झाला. त्यांचे वडील इ. स. १८३७ त निवर्तले. तेव्हां त्यांस पेशवाईपासून जी दहा हजारांची जहागीर होती, ती जप्त झाली. कालमानाप्रमाणें इंग्रजी शिकल्यावांचून चालणार नाहीं हें

† बालबोध, नोव्हेंबर १८८६

लक्षांत घेऊन ते इ. स. १८४० त पुण्याच्या इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. इ. स. १८४४ त त्यांस पुण्यास न्यायखात्यांत दरमहा ७७ रु. पगारावर कारकुनाची जागा मिळाली. पुढें त्यांनीं मोठमोठ्या सरकारी हुद्द्यांच्या जागांवर कामें केलीं व इ. स. १८७९ त आपल्या वयाच्या ५५ व्या वर्षी पेन्शन घेतलें. यानंतर त्यांना मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो, जस्टिस ऑफ दि पीस, पहिल्या प्रतीचे सरदार, कायदेकौन्सिलचे सभासद व रतलामच्या महाराजांचे दिवाण असे मानसन्मान प्राप्त झाले. अशा रीतीनें सरकार व जनता ह्यांची बहुमोल सेवा करून हे इ. स. १८९२ त दिवंगत झाले. सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याची त्यांना पहिल्यापासूनच आवड होती. त्यांनीं मोठ्या प्रयत्नानें ज्ञानप्रकाश छापखाना व पुस्तकालय यांची पुण्यांत स्थापना केली; तसेंच आगमप्रकाश, निगमप्रकाश, भिक्षुक, कलियुग, जातिभेद, पानिपतची लढाई, इत्यादि अनेक ग्रंथ लिहिले. याशिवाय ऐतिहासिक विषयांवरहि त्यांचें पुष्कळ लिखाण प्रसिद्ध झालें आहे. यांच्या निबंधांतील विषयांची मांडणी व भाषाशैली ह्या फार सरळ व मार्मिक आहेत. "लोकहितवादी यांच्या लेखांत एक विशेष गुण असा आहे कीं त्यांत विषयासंबंधीं दिलेली माहिती इतकी बारीक व पूर्ण असते कीं, अशी माहिती दुसऱ्या लोकांच्या निबंधांतून फारच विरळा आढळते." ¶ त्या काळांतहि त्यांचे विचार पुरोगामी होते व लोकांना ते पटवून देण्यासाठीं कोणाच्याहि रागलोभाची पर्वा न करतां त्यांनीं अत्यंत निःस्पृहपणें अविश्रान्त खटपट केली. कित्येक ठिकाणीं त्यांच्या विचारांत दुराग्रह, परकीयांचें अंधानुकरण व उथळपणा हे दोष आढळतात. पण एकंदरींत त्यांच्या लेखसंग्रहांत ग्राह्यांशाचें प्रमाण फार मोठें आहे हें मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं. आपले विचार स्पष्टपणें मांडण्याची त्यांची तडफहि असामान्य आहे. त्यांच्या अंतरींचा जिव्हाळा त्यांच्या प्रत्येक वाक्यांत, नव्हे प्रत्येक शब्दांत प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्यांच्या लेखांतील दोनचार ओळी वाचतांच कोणाहि सहृदय माणसास त्याची जाणीव झाल्यावांचून राहणार नाहीं. त्यांचें सामाजिक व वाङ्मयविषयक कार्य फार मोठें आहे. त्याचें यथोचित वर्णन करावयाचें म्हटलें तर तो एक स्वतंत्र ग्रंथ होईल. त्यांच्या विचारसरणीची व लेखनशैलीची कल्पना यावी म्हणून त्यांच्या एका पत्रांतील उतारा खालीं देत आहें.

> "सांप्रत हिंदु लोक भिकारी होत चालले आहेत, व त्यांस रोजगार धंदा नाहीं. याचें कारण मला असें दिसतें कीं या लोकांचा व्यापार अगदीं बुडाला; इंग्रज व दुसरे देशचे लोक फार शहाणे होऊन या लोकांस सर्व जिनसा पुरवितात. आणि हे मुकाट्यानें स्वस्ताईमुळें खरीदी करितात. यास्तव या लोकांनीं एकत्र होऊन जर असा कट केला कीं आपले देशांत दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरी घ्यावयाचा नाहीं, आपले देशांत पिकेल

¶ वि. ज्ञा. वि. पु. १०, अं. १

तेवढाच माल ध्यावा. आपले लोक कापडें जाडी वाईट करतात. परंतु तींच नेसावीं. इकडे छत्र्या करितात त्याच घ्याव्या म्हणजे या लोकांत व्यापार राहुन इकडे सुख होईल, परंतु हे लोक असें करीत नाहींत. आणि थोडी किंमत म्हणून लोकांचा जिन्नस विकत घेतात. वास्तविक पाहिलें तर हल्लीं दाणे मात्र इकडे पिकवून हे लोक खातात. अजून दाणे परदेशांतील येऊं लागले नाहींत. बाकी सर्व पाहावें तें परदेशचें आहे. आमचे कपडे, आमची छत्री, आमची चाकू-कात्री, आमचें घड्याळ, आमची गाडी, आमचीं बुकें सर्व परदेशांतील आहेत. आम्ही दाणे मात्र आपले खातों. यामुळें सर्व व्यापार बुडाला. उदमी, मजूरदार, कसबी कारागीर घरीं बसले. आणखी तर काय सांगावें, परंतु आमचे रुपये, आमचे घरांत सनकाड्यादेखील युरोपच्या. इकडे लोक पैशाच्या शंभर सनकाड्या देतात. त्या पेटवावयास विस्तव पाहिजे, ठेवावयास मोठी जागा पाहिजे; परंतु विलायतेचा सनकाड्या सुंदर पेटीमध्यें तयार करून भरलेल्या पैशाचा शंभर मिळतात. विस्तव पेटवावयास नको अशी सोय पाहून आम्ही आपले देशचा लोकांचा सनकाड्या घेत नाहीं, परंतु यांजमुळें आमचे लोक किती भिकारी झाले आहेत. याचकरितां सर्वांहीं असा कट करावा कीं जें आपले देशांत पिकेल तेंच नेसूं, तेंच वापरूं, कसेंही असो आणि तितक्यांत चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयाच्या विद्या शिकूं. आम्हांस मिळेल तसेंच घेऊन आम्ही काळ काढूं. मग हजारों खंडी कापूस इकडून विलायतेस कशाला जाईल ? कापूस विकणाऱ्यांनीं असा बेत करावा कीं इंग्रेजास इकडे तयार केलेलीं कापडें द्यावीं, परंतु कापूस देऊं नये. येणेंकरून हे लोक सुखी होतील. सांप्रत आपलेच लोक आपल्या लोकांस मारीत आहेत. जशी बाहेरची चांगली स्त्री पाहून घरची लग्नाची स्त्री टाकून तिचे पाठिस लागतात आणि भुलतात. तसें या लोकांचे झालें. येणेंकरून हाहाःकार झाला आहे. आणि जो तो शेत करूं लागला; दुसरा व्यापार कांहीं नाहीं; परंतु शेत करण्यांत तरी काय नफा ? वर्षभर मजुरी मरेमरेतों करावी तरी लंगोटी आणि शिळी कोंड्याची भाकरदेखील मिळावयाची भ्रांती. बहुत दाणे पिकवितात. परंतु घेतो कोण ? पैसा दुसऱ्या देशांत चालला. श्रीमंत लोक जांजवळ लाखो रुपये आहेत ते विलायती जिनसा घेतात आणि पैसा उडवितात. त्यांचे पोटास पावशेर दाणे पाहिजेत, त्याची मात्र किंमत रयतेकडे जाते. बाकी हजारों रुपये विलायतेस थेट जातात. याप्रमाणें हमेश चाललें आहे. असा कट करणें वगैरे उपयोगी गोष्टी आहेत त्या पुराणीक, हरदास यांणीं लोकांस सांगाव्या त्या टाकून दुसऱ्या गोष्टी सांगतात. आणि याकडे लक्ष देत नाहींत. लोक भिकारी झाल्याचें कारण कोणी मनास आणीत

नाहीं. जर हरदास व कथेकरी यांनीं अशीं मतें घेतलीं आणि लोकांस जर भरविलीं तर बहुत लोक एकत्र होतील; कारण कीं ही गोष्ट उघडी आहे. परंतु देव आधीं बुद्धी नेतो मग भांडवल नेतो. तशी या लोकांची बुद्धी पापाचरणाकडे गेली. नंतर या संकटांत ते आले. परंतु सर्व मागील पुराणांतील कथा एकीकडे ठेवून हल्लींचे लोकांची स्थिती सुधारण्याबद्दल लोकांस उपदेश केला तर महान पुण्य आहे. तसें हे हरदास करीत नाहींत. चांगल्या गोष्टी छापखान्यांतून निघाव्या असेंच नाहीं. हरदासांनींही काढाव्या व त्यास लोक एकत्र करण्याची फार शक्ती आहे. कारण कीं ते चौघांत उभे राहून उपदेश करण्याचा आरंभ करितात. त्यांनीं असे उपयोगी विषय लोकांस शिकविले तर सर्व आख्यानांहून हीं आख्यानें चांगलीं होतील. आणखी लोकांस समजवावें कीं, तुम्ही मूर्ख आहां. विचार करीत नाहीं. वास्तव विचार करा व विद्या करा. विलायतेंतील लोकांप्रमाणें अक्कलवान व्हा. म्हणजे तुम्हांस लक्ष्मी अनुकूल होईल. ‡

गोविंद नारायण माडगांवकर (इ. स. १८१५–६५)

आपल्या देशांत विद्येचा प्रसार व्हावा या सदिच्छेनें प्रेरित होऊन अव्वल इंग्रजींत ज्या कांहीं व्यक्तींनीं लेखनव्यवसाय हातीं घेतला त्यामध्यें गोविंद नारायण माडगांवकर ह्यांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. त्यांनीं व्यवहारोपयोगी व शास्त्रीय विषयांवर सुबोध मराठी भाषेंत पंधरावीस पुस्तकें लिहिलीं. त्यांचें बरेचसें लिखाण निबंधरूप आहे. ‘ शुचिर्भूतपणा ’ (इ. स. १८४९), ‘ ऋणनिषेधक बोध ’ (इ. स. १८५०), ‘ सत्यनिरूपण ’ (इ. स. १८५२) आणि ‘ दारूपासून अनर्थ ’ (इ. स. १८५५) हे त्यांचे निबंध स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले. याशिवाय त्यांनीं ‘ ज्ञानप्रसारक ’ मासिकांत ‘ अचाट खाणें मसणांत जाणें ’, ‘ अति सर्वत्र वर्जयेत् ’, ‘ द्रव्येण सर्वे वशाः ’, ‘ बळी तो कान पिळी ’, ‘ भरत खंडांतील कारागीर ’ इत्यादि निबंध लिहिले. “ उदाहरणद्वारा एखादा विषय मनांत भरविण्याची शैली ह्यांस फार चांगली साधली होती....त्यांची भाषा चांगली शुद्ध, सरळ आणि गोड, म्हणजे बहुतकरून सध्यां चांगली मराठी भाषा म्हणतात तीसारखी आहे—ते गोव्याकडचे रहाणारे असून मुंबई म्हणजे भ्रष्ट मराठीचें अगदीं आगर, तेथें अशी चांगली भाषा त्यांनीं इतक्या दिवसांमागें लिहिली हें त्यांच्या कीर्तीस मोठें भूषण आहे. ” * त्यांचा जन्म गोवें प्रांतांत माडगांवनजीकच्या पेरी गांवीं इ. स. १८१५ त झाला. ते आपल्या नवव्या वर्षी मुंबईस आले. त्यांचें इंग्रजी व मराठी

‡ लोकहितवादी—निबंधसंग्रह (नं. ५७) पृ. २६४–६७

* बालबोध–नोव्हेंबर १८८७

शिक्षण मुंबईसच झालें. इ. स. १८३३ त त्यांचे वडील दिवंगत झाल्यामुळें कुटुंब-पोषणाचा सर्व भार त्यांच्या अंगावर पडला. त्यामुळें त्यांनीं मुंबईतील सुप्रसिद्ध मिशनरी डॉ. विल्सन यांच्या शाळेंत शिक्षकाची नोकरी पत्करली. सुमारें तीस वर्षेंपर्यंत त्यांनीं हें काम कळकळीनें व कुशलतेनें करून आपल्या छात्रगणाचें प्रेम संपादन केलें. इ. स. १८६३ अखेर त्यांनीं हें काम सोडलें, तेव्हां सर्वांस फार वाईट वाटलें. "त्यांचे विद्यार्थी व इतर मित्रमंडळी यांनीं या समयीं मोठ्या आदर-पूर्वक, भक्तिभावानें ता. २८ जानेवारी सन १८६४ रोजीं त्यास एक मानपत्र दिलें, आणि सुमारें रु. २००० वर्गणीनें जमा करून त्यांस नजर केलें." × अध्ययन आणि अध्यापन हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय झाला होता. त्यामुळें उत्तम शिक्षक म्हणून त्यांचा चांगला नांवलौकिक झाला. "त्यांचा स्वतःचा जीवनक्रम नमुन्यालायक सद्-भावप्रेरक, सद्बोधप्रद होता. त्यांचा स्वभाव मोठा मनमिळाऊ, प्रेमळ व गोड होता. त्यामुळें ते सर्वांस तेव्हांच प्रिय होत व हवेसे वाटत." × इ. स. १८६५ त त्यांचा अंत झाला. "इंग्रजी शिक्षणप्रसार या इलाख्यांत सुरू झाल्यावर पहिल्या पिढींत जे आपल्या कलमबहाद्दरीमुळें विद्वान् म्हणून गाजले, त्यांतच गोविंदजी हे एक होते." × त्यांच्या प्रेमळ व मनमिळाऊ स्वभावाचें प्रतिबिंब त्यांच्या लेखनांत उमटलेलें दिसतें. 'शुचिर्भूतपणा' या त्यांच्या निबंधांतील खालील उताऱ्यावरून त्यांच्या सरळ, सुबोध, शुद्ध व मनोरम भाषाशैलीची स्पष्टपणें कल्पना येईल.

"परम दयाळू परमेश्वरानें मनुष्यमात्रास निर्मळपणा ठेवण्यास दुर्भिक्षता न पडावी म्हणून सर्व ठिकाणीं पाण्याची सामग्री पुष्कळ करून ठेविली आहे. गरीबगुरीब लोकांनीं हवा तसा निर्मळपणा ठेवावा म्हणूनच त्यानें पाण्याचा सुकाळ करून ठेविला आहे. यथाकाळीं पाऊस पाडून प्रतिवर्षीं पाण्याची वृद्धि करून, ईश्वर लोकांस सूचना करितो कीं, तुम्ही आपल्या शुचिर्भूतपणांत कांहीं व्यंग पडूं देऊं नका, जी सामग्री ईश्वरानें आमच्या सुखासाठीं करून ठेविली आहे, तिचा जर आम्ही अनादर केला, तर तिजपासून आम्हांस सुख कसें प्राप्त होईल ! आम्हांस या पृथ्वीवर पुष्कळ सुखें मिळत नाहींत म्हणून आम्ही वारंवार चडफडत असतों, याचें कारण काय तें पाहा ! सुख प्राप्त होण्याचीं जीं साधनें ईश्वरानें आम्हांस लावून दिल्हीं आहेत, त्याप्रमाणें आम्ही करीत नाहीं तर तें प्राप्त होत नाहीं, म्हणून ईश्वरास दोष कां लावावा ? आमचें निमें आयुष्य तर आळसांतच जातें, आणि हा आळस एका मळीणपणापासून उत्पन्न होतो. मग त्याच्या मागून सर्व विपत्ती हळूहळू घरांत शिरतात. जे जे नेम भगवंतानें आमच्या कल्याणासाठीं दिल्हे आहेत, ते यथास्थित

× महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका (व. ६, अं. ३) पृ. १११–१४

चालवावे, म्हणजे आपणांस इहलोकीं व परलोकीं सुख प्राप्त होईल. ” *

बाबा पदमनजी

बाबा पदमनजी या खिस्ती झालेल्या लेखकानें ‘ हिंदुलोकांच्या सणांविषयीं निबंध ’ (इ. स. १८५३), ‘ व्यभिचार-निषेधक बोध ’ (इ. स. १८५४), ‘ कुटुंब–सुधारणा ’ (इ. स. १८५५), ‘ निबंधमाला ’ (इ. स. १८६०) इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध केलीं. यांपैकीं दोन निबंधांची माहिती आरंभीं दिली आहेच. ‘ निबंधमाला ’ या पुस्तकांत त्यांनीं “ अर्धी सोडून सगळीला धांवूं नको, ” ‘ बौद्ध धर्म ’, ‘ कुस्तीशास्त्र ’, ‘ खरें सुख ’, ‘ मित्रत्व ’, स्वदेश-प्रीति ’, वगैरे लहान लहान निबंध लिहिले आहेत. याखेरीज त्यांनीं मराठी भाषेंत खिस्ती धर्मासंबंधीं पुष्कळ पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्यांची माहिती पुढें येईलच. बाबांची भाषा सरळ व सुबोध असून तिच्यांत एक तऱ्हेची स्वाभाविक गोडी आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर

कृष्णशास्त्रीं चिपळूणकर यांनीं मराठी शालापत्रकांत निरनिराळ्या विषयांवर निबंध लिहिले. त्यांची लिहिण्याची शैली सुबोध, शुद्ध व नमुनेदार होती. दुर्बोधता येऊं न देतां प्रौढ व भारदस्त भाषा कशी लिहावी, ही कला त्यांना चांगली साधली होती. वरील मासिकांत प्रसिद्ध झालेले मराठी व्याकरणावरील निबंध व ग्रंथ-परीक्षणें हीं फार मार्मिक व मुद्देसूद आहेत. “ मराठी वाङ्मयांत जसें निबंधमालेचें तसेंच कृष्णशास्त्री चिपळूणकरांचेंहि युग आहे. अर्धस्फुट कलिकेचें मुग्ध सौंदर्य हें पुष्पाच्या प्रस्फुट सौंदर्याचें पूर्वस्वरूप असतें. शास्त्रीबुवांची सौम्य व प्रसन्न भाषाशैली पुढें निबंधमालेंत ओजस्वी व अलंकृत होऊन अवतरली. निबंधमालेला अनुकूल व अनुरूप काळ शास्त्रीबुवांनीं उत्पन्न केला ही त्यांची कामगिरी कांहीं साधारण नव्हे. ” ¶

विश्वनाथ नारायण मंडलीक

विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं केवळ आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीं मराठी ज्ञानप्रसारक सभेपुढें ‘ व्यवहारशास्त्राचे उद्देश आणि लाभ ’ हा निबंध वाचला. त्यानंतर इ. स. १८२७ त ‘ संवयी आणि अभ्यास ’ हे दोन निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले. हे मुख्यतः डॉ. जॉन टॉड् यांच्या स्टूडंटस् गाइडच्या आधारानें लिहिले आहेत. त्यानंतर इ. स. १८६२ त यांचा ‘ हिंदुलोकांचा मध्यंतरीय अवस्थेविषयीं विचार ’ हा निबंध प्रसिद्ध झाला. “ सिकन्दर पादशाहाचा पूर्वींचे, त्याचा वेळचे

---

* शुचिर्भूतपणा पृ. २०–२१.

¶ ग. त्र्यं. माडखोलकर—विष्णु कृष्ण चिपळूणकर (टीकात्मक निबंध) पृ. ९.)

आणि विक्रमापर्यंतचे लोक चाळीसपन्नास वर्षांअलीकडील लोक यांचा स्थितींतील कांहीं गोष्टींमधील अन्तर दाखविणें, हा या निबंधाचा उद्देश आहे." या निबंधांतील एक लहानसा उतारा खालीं देत आहे.

"**शिल्पः**—पूर्वीं या विषयाची अगदीं माहिती नव्हती म्हणावें तर रामराज नामें एका मद्रासेकडील गृहस्थानें या विषयाबाबद हिंदूंचे जे प्राचीन ग्रंथ विद्यमान आहेत त्यांविषयीं एक निबंध लिहिला आहे. त्यावरून या शास्त्राचीं मूलतत्त्वें पूर्वींचा लोकांस चांगलीं समजलीं होतीं, व त्यांवरून त्यांणीं पुष्कळ नियम बसविले होते, असें दिसतें. उपानादि बारा प्रकारचे कंगोरे, उथळी, स्तम्भमध्यभाग, शिरोभाग व लग या सर्वांचे आकार व परिमाणें हीं त्याणीं दिलीं आहेत. सांप्रत जे शुद्ध एतद्देशीय शिल्पी आहेत, त्यांस त्यांचा शास्त्राचा मूलतत्त्वांची कांहीं माहिती नाहीं, आणि कोणाजवळ ग्रंथ असल्यास या विषयाचा फार दिवस अव्हेर झाल्यामुळें त्यांची परिभाषाहि लावणें जड पडते. असो. साम्प्रत या देशांत इंग्रजी शिल्पाचा पाया पडला आहे; ही सन्धि साधून आमचे लोक या शास्त्रांत व तत्संबंधीं व्यापारांत मन घालून परिश्रम करितील तर या देशाचें बरेंच दैन्य नाहींसें होईल." $

विष्णुबावा ब्रह्मचारी

विष्णुबावा ब्रह्मचारी यांनीं 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध' (इ. स. १८६७), व 'सहजस्थितीचा निबंध' (इ. स. १८६८), हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्यांपैकीं पहिल्या पुस्तकांत त्यांनीं आपल्या मताप्रमाणें आदर्श राज्य-व्यवस्था कशी असावी त्याचें कल्पनाचित्र लोकांसमोर मांडलें आहे. सर्व राज्य हें एक प्रकारचें कुटुंबच आहे या मूलभूत तत्त्वावर निबंधाची उभारणी केली आहे. विष्णुबावांची विचारसरणी उदार, व्यापक, स्वतंत्र, जोरदार आणि कौतुकास्पद जसली तरी तिच्यांत शास्त्रशुद्धतेचा पूर्णपणें अभाव आहे, हें अमान्य करून चालणार नाहीं. 'विविधज्ञानविस्तार' मासिकानें या निबंधावर अत्यंत सडेतोडवणें टीका केली होती. प्रस्तुत निबंधांतील खालील उताऱ्यावरून विष्णुबावांच्या विचाराची दिशा समजून येईल.

"याप्रमाणें सर्व प्रजा एक कुटुंब व सर्व जमीन हाच एक बाग व त्यांतून जें जें निघेल तें तें सर्वांचें एक. याप्रमाणें राज्यव्यवस्था असली म्हणजे सर्वांना सर्व उपभोग मिळतात, सर्वांना उत्तम खावयास मिळतें व सर्वांना उत्तम विपुल वस्त्रें व अलंकारभूषणें मिळतात व सर्वांना नाच, तमाशे, बैठकी

$ हिंदू लोकांचा मध्यंतरीय अवस्थेविषयीं विचार पृ. २०–२१

पहावयास सांपडतात. व पालख्या व रथ, घोडे व हत्ती यांजवर सर्वांना बसावयास मिळतें, यामुळें कोणाला कांहीं प्राप्त नाहीं असें होतच नाहीं. म्हणून सर्व लोक पूर्णकाम होतात. यामुळें कामाच्या अपूर्णतेनें क्रोध येणें हें शिल्लक रहात नाहीं आणि क्रोध नसल्यामुळें गुन्हा करणें किंवा गुन्हा करण्यास्तव मत्सर धरून बसणें यांचा लवलेशही राहत नाहीं. यामुळें हाच प्रजेचा व राजाचा खरोखर असावा तसा संबंध आहे. " *

विष्णुशास्त्री चिपळूणकर

इ. स. १८७२ पासून विष्णुशास्त्री चिपळूणकर शालापत्रकाचें बहुतेक काम पाहूं लागले. या पुढील तीन वर्षांत त्यांनीं या मासिकाच्या द्वारें ' प्रवास ' शिक्षणाचें काम ', कविता ' (इंग्रजी), ' कवितेचा निबंध ' (मराठी), ' शिक्षा आणि शिक्षण ' इत्यादि निबंध प्रसिद्ध केले. याच सुमारास ' संस्कृत कविपंचक ' हा त्यांचा काव्यविषयक टीका–ग्रंथ शालापत्रकांतून क्रमशः प्रसिद्ध झाला. मराठी भाषेंतशोधपूर्वक आणि चिकित्सक दृष्टीनें लिहिलेला हा पहिलाच विस्तृत टीकाग्रंथ होय. शालापत्रकांत प्रसिद्ध झालेल्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या या लिखाणांत निबंधमालेच्या द्वारें, तरुण महाराष्ट्रांत नवचैतन्य निर्माण करणाऱ्या ओजस्वी लेखणीची चुणूक दिसल्यावांचून राहत नाहीं. इ. स. १८७४ त निबंधमाला निघाली आणि मराठी वाङ्मयाच्या इतिहासांतील एका नवीन युगाला प्रारंभ झाला. यापूर्वीच निबंधवाङ्मय हें अगदीं प्राथमिक स्वरूपाचें होतें. त्यांत इंग्रजी भाषेंतील बोधपर निबंधांच्या धर्तीवर एखाद्या विषयाचें थोडक्यांत कलमवार विवरण केलेलें असे. कोणत्याहि प्रश्नाची स्वतंत्र रीतीनें सांगोपांग चर्चा करण्याची धमक त्या काळच्या लेखकांत फार क्वचित् आढळते. निबंधमालेंतील विस्तृत, विद्वत्तापूर्ण, चित्ताकर्षक आणि प्रभावी लेखांच्या योगानें हा मनु पालटला. महाराष्ट्रांत स्वदेशाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली. प्रत्येक विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. उदयोन्मुख लेखकांना नवी दृष्टी मिळाली; त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न झाला आणि मराठी गद्य–वाङ्मयाचें वैभव वाढीला लागलें.

★ ★ ★

* सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध (कलम ५) पृ. १४–१५

परिशिष्ट

कुटुंबविषयक

१ कुटुंबप्रवर्तननीति—मिसेस फारार, नाशिक इ. स. १८३५
२ मातृबोध—बॉम्बे ट्राक्ट आणि बुक सोसायटी, मुंबई, इ. स. १८५२
३ कुटुंबसुधारणा—बाबा पदमनजी, पुणें, इ. स. १८५५ (ग्रां. कॅ.)
४ मुलांस वागविण्याची रीती—एस्. बेंजामिन, मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
५ कुटुंबसुधारणा—गोविंद नारायण माडगांवकर.

तत्कालीन स्थितीविषयीं चर्चात्मक निबंध

६ हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिति व पुढें काय त्याचा परिणाम होणार याविषयीं निबंध—रामकृष्ण विश्वनाथ, मुंबई, इ. स. १८४३
७ मुंबईंतील सुशिक्षित तरुण हिंदु लोक—भवानी विश्वनाथ कानविंदे, मुंबई, इ. स. १८५८
८ हिंदुस्थानच्या पूर्वींच्या आणि सांप्रतच्या स्थितीकडेस अवलोकन—कृष्णनाथ रघुनाथजी.
९ Essay on India—काशिनाथ त्र्यंबक, अहमदनगर, इ. स. १८६३ (ग्रां. कॅ.)
१० लोकसुधारणोपदेश—चिंतो सदाशिव भिडे, पुणें इ. स. १८६६
११ आमचें कर्तव्यकर्म कोणतें—सिताराम रघुनाथजी अधिकारी, मुंबई, इ. स. १८७४

दारू व इतर मादक पदार्थांविषयीं निबंध

१२ दारू पिणाऱ्यांस सुबोध. मुंबई, इ. स. १८४६
१३ अम्मल करण्यापासून नाश—काशिनाथ थत्ते, मुंबई, इ. स. १८५५
१४ अम्मल करणें वाईट—शिवराम सखाराम खरे, मुंबई, इ. स. १८५५
१५ दारूपासून अनर्थ—गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८५५
१६ दारूपासून अनर्थ—भवानी विश्वनाथ कानविंदे.

१७ दारू व इतर कैफी पदार्थनिषेधक बोध–विष्णु घनःशाम, मुंबई, इ. स. १८५५ (ग्रां. कॅ.)
१८ दुर्व्यसननिषेधक बोध–गंगाधरशास्त्री सहस्रबुद्धे, मुंबई, (ग्रां. कॅ.)
१९ Evils of intemperance–जनार्दन रामचंद्रजी, मुंबई, इ. स. १८५६

सत्य–नीति–परोपकार

२० सत्यनिरूपण–गोविंद नारायण मुंबई, इ. स. १८५२
२१ व्यभिचार–निषेधक बोध–बाबा पदमनजी, मुंबई, इ. स. १८५४
२२ नीतिसंवाद–गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८५७
२३ द्यूतवर्जक संवाद, मुंबई, इ. स. १८६०
२४ सत्यासत्यविवेचन–कृष्णनाथ रघुनाथजी, मुंबई, इ. स. १८६२
२५ शिक्षापद्धति (भाग २) धर्म आणि नीति यासंबंधीं शिक्षण मुंबई, इ. स. १८६३
२६ परोपकार–एक हिंदु मुंबई, इ. स. १८७२
२७ स्वदेशाभिमान–एक हिंदु मुंबई, इ. स. १८७२

राजकीय

२८ हिंदुस्थानांतील ब्रिटिश लोकांचें राज्य व पूर्वींचीं राज्यें यांची तुलना आणि हल्लीं उद्भवलेल्या बंडापासून होणारे तोटे–डोसाभाई फ्रामजीकृत गुजराथीवरून भाषांतर–केशव सखारामशास्त्री, मुंबई, इ. स. १८५७.
२९ धान्याचा निरख–सरकारनें धान्य ठरविण्याच्या बाबतींत हात घालावा किंवा नाहीं याबद्दल चर्चा–गरिबांचा मित्र, पुणें, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)
३० सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध–विष्णुबावा ब्रह्मचारी, मुंबई, इ. स. १८६७
३१ राजकीय विचार— मुंबई, इ. स. १८६८
३२ हिंदुस्थानांतील इंग्रेजी राज्यसत्ता इजविषयीं संभाषण (भाषांतर) प्रो. दादाभाई नौरोजी. मुंबई, इ. स. १८६८
३३ हिंदुस्थानांत युरोपियन लोक एतद्देशीय लोकांबरोबर कसें वागतात? (नौरोजी फर्दुंजी यांच्या व्याख्यानाचें भाषांतर) विनायक बाळकृष्ण दामले. पुणें, इ. स. १८७४

वाङ्मयविषयक

३४ नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध–काशिनाथ बाळकृष्ण मराठे, मुंबई, इ. स. १८७२

संकीर्ण विषयांवरील निबंध

३५ होळीविषयीं उपदेश— मुंबई, इ. स. १८४७
३६ आळशी आणि दिवाळखोर यांस उपदेश (आवृत्ति ३ री) पुणें, इ. स. १८४७
३७ नामदार सर आर्स्किन पेरी साहेब यांचें शिक्षामंडळीच्या शाळेंत भाषण (मराठी भाषांतर) जेम्स फिलन, मुंबई, इ. स. १८४८
३८ शुचिर्भूतपणा–गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८४९
३९ सर आर्स्किन पेरी आणि डॉक्टर जेम्स बर्नस् यांची ग्रांट मेडिकल कॉलेजांतील व्याख्यानें. (मराठी तर्जुमा) नारायण दिनानाथजी, मुंबई, इ. स. १८४९
४० ऋणनिषेधकबोध–गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८५०
४१ सरकारचे चाकर आणि सुखवस्तु हिंदुस्थानांतील साहेब लोकांशीं संभाषण पुणें, इ. स. १८५०
४२ कामगार लोकांशीं संभाषण पुणें, इ. स. १८५३
४३ हिंदु लोकांच्या सणाविषयीं निबंध मुंबई, इ. स. १८५३
४४ विद्याभ्यास केलेल्या तरुणांस व्याख्यान–कुकडे मुंबई, इ. स. १८५५
४५ संवयी आणि अभ्यास–विश्वनाथ नारायण मंडलीक मुंबई, इ. स. १८५७
४६ निबंधमाला–बाबा पदमजी, पुणें, इ. स. १८६०
४७ हिंदुलोकांचा मध्यंतरीय अवस्थेविषयीं विचार–विश्वनाथ नारायण मंडलीक मुंबई, इ. स. १८६२
४८ संवादमंडळ (भाग १) हरी नारायण मोडक, मुंबई, इ. स. १८६७
४९ सहजस्थितीचा निबंध–विष्णुबावा ब्रह्मचारी मुंबई, इ. स. १८६८
५० चंदन–एक हिंदु मुंबई, इ. स. १८७२
५१ व्यापारसंबंधीं व्याख्यानें–माधवराव गोविंद रानडे, पुणें, इ. स. १८७३
५२ बडोद्याच्या स्थितीविषयीं विचार पुणें, इ. स. १८७४

* * *

५ : सामाजिक वाङ्मय

पाश्चात्यांचें सांस्कृतिक आक्रमण

इ. स. १८१८ त पेशवाईचा अस्त होऊन शनवारवाड्यावर इंग्रजांचें निशाण फडकलें. एखाद्या देशांत आपलें राजकीय वर्चस्व स्थापित झाल्यावर त्याला बळकटी आणण्यासाठीं जेते लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें जित राष्ट्रावर आपली संस्कृति लादीत असतात ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. इंग्रजांच्या बाबतींतहि असाच प्रकार झाला असल्यास नवल नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतच ब्रिटिश मुत्सद्यांनीं पाश्चात्य शिक्षणाच्या द्वारें आपली संस्कृति हिंदी लोकांच्या गळीं उतरविण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू केला. त्या वेळच्या मिशनरी लोकांचें कार्यहि या प्रयत्नाला पूरकच होतें. " Our vocation is to plant the seeds of European civilization and the principles of Christianity " ¶ पाश्चात्य संस्कृतीचें बीजारोपण आणि खिस्ती धर्माचा प्रसार यांसाठींच त्यांच्या नानाविध चळवळींचें जाळें मोठ्या कुशलतेनें पसरविलें जात होतें. त्यांच्या संस्कृतीचें श्रेष्ठत्व सिद्ध करतांना आमच्या समाजांतील दोष दाखविणेंहि अवश्य होतें, आणि म्हणून मिशनरी लेखकांनीं मुद्रण कलेच्या साह्यानें हिंदु समाजव्यवस्थेवर जोराचा हल्ला चढविला. आमच्यांतील अनिष्ट चालींचें आणि वेडगळ समजुतींचें हिडीस स्वरूप त्यांनीं उघड करून दाखविलें. जातिभेद, बालविवाह, स्त्रीशिक्षणाचा अभाव, विधवांची दुःस्थिति इत्यादि विषयांवर त्यांनीं लहान लहान पुस्तकें प्रसिद्ध करून खेड्यापाड्यांतून वांटलीं. बाजारांतून व यात्रांमधून व्याख्यानें देऊन समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंत त्यांनीं आपल्या धर्माचा व संस्कृतीचा प्रचार केला आणि तो परिणामकारक व्हावा, म्हणून आमच्या समाजरचनेची आणि रीतिरिवाजांची भरपूर नालस्ती करण्यासहि कमी केलें नाहीं. त्यांचा हेतु कसाहि असला तरी त्यांच्या विचारसरणींत कांहींच तथ्य नव्हतें असें म्हणतां येणार नाहीं. उलट त्यांचा प्रचार ही एका दृष्टीनें इष्टापत्तीच होती, हें मान्य करणें भाग आहे. यामुळें तरी त्या वेळच्या विचारी आणि समंजस लोकांचे डोळे उघडले, व आपल्यांतील दोष शोधून काढण्याकडे त्यांचें लक्ष लागलें. त्यांनीं व्यापक दृष्टीनें आपल्या समाजस्थितीचा विचार केला, आणि त्यांना ज्या ज्या सुधारणा इष्ट वाटल्या त्या त्या प्रांजल बुद्धीनें आणि निर्भीडपणें लोकांसमोर मांडल्या.

¶ John Clark Marshman-*History of Serampore Mission Vol. 11, P. 49.*

पतित–परावर्तन

अर्वाचीन काळांतील डामाजिक सुधारणेचे आद्य प्रवर्तक बाळशास्त्री जांभेकर हे होत. या थोर पुरुषानें महाराष्ट्रांत अनेक चळवळींचें बीजारोपण केलें. गंगाधरशास्त्री फडके यांजकडून त्यांनीं विधवाविवाहाविषयीं एक अनुकूल ग्रंथ लिहविला. त्याचप्रमाणें रे. नारायण शेषाद्रि यांचे खिस्ती झालेले बंधु श्रीपाद शेषाद्रि यांस प्रायश्चित्त देऊन परत हिंदुधर्मांत घेण्याच्या कामीं त्यांनीं पुढाकार घेतला होता. महादेवभट शेंड्ये आणि गंगाधरशास्त्री फडके यांचें त्यांना सहकार्य लाभलें. त्र्यंबकशास्त्री शालिग्राम आणि नारायणशास्त्री थत्ते यांनीं शास्त्रार्थ काढून दिला. जगद्गुरु शंकराचार्य, मठ कोल्हापूर, यांचें आज्ञापत्रहि आणविलें होतें. इतक्या शास्त्रशुद्ध रीतीनें शुद्धीकरण झालें, तरी देखील शास्त्रीमंडळींना याबद्दल सतत पांच वर्षें ग्रामण्याचा जाच सोसावा लागला. आज शुद्धीच्या चळवळीचें महत्त्व लोकांना कळूं लागलें आहे. पण जवळजवळ एका शतकापूर्वीं ज्यांनीं या कार्याला हात घातला त्यांचा दूरदर्शीपणा आणि धडाडी हे गुण गौरवास्पद नाहींत काय? श्रींचें आज्ञापत्र, शुद्धीविषयींचा शास्त्रार्थ इत्यादि सर्व पत्रव्यवहार ‘उपदेश-चंद्रिका’ मासिकांत (इ. स. १८४४) प्रसिद्ध झाला आहे. जिज्ञासूंनीं तो अवश्य पहावा.

स्त्रीशिक्षण

मुंबई इलाख्यांत स्त्रीशिक्षणाचा उपक्रम अमेरिकन मिशननें केला. “It was in March 1824 that female education commenced in the island of Bombay under the American Mission” $ मिशनरी लोकांच्या शाळेंत मुली धाडण्यास लोक आरंभीं मुळींच तथार नसत आणि मोठ्या मिनतवारीनें ज्या थोड्या मुली येत त्याहि लोकापवादाच्या भीतीनें लवकरच शाळा सोडून जात, असें ‘Oriental Christion Spectator’ Vol. V (1834), मधील त्यांच्या अहवालावरून दिसून येतें. अशा प्रतिकूल परिस्थितींतहि त्यांनीं आपले प्रयत्न चिकाटीनें चालूं ठेवले. हळूहळू मुलींची संख्या वाढत चालली. परंतु लोकांचा विरोध मात्र कायमच होता. इ. स. १८४१ त ‘स्त्रीविद्याभ्यास–प्रकरण’ या नांवाचा दोनतीन पृष्ठांचा लहानसा निबंध प्रसिद्ध झाला. त्यांत स्त्रीशिक्षणावरील आक्षेपांचें थोडक्यांत खंडन केलें आहे. शिक्षणानें स्त्रिया बिघडतील, दुराचारी बनतील ही कल्पना चुकीची आहे; त्याप्रमाणेंच शिक्षणामुळें शीघ्र वैधव्य येतें ही समजूतहि वेडगळपणाची आहे असें सांगून शेवटीं “रुक्मिणीनें कृष्णास श्लोकबद्ध पत्र लिहून ब्राह्मणाहातीं पाठविलें होतें, ही कथा श्रीमद्भागवतीं दशम स्कंधांत प्रसिद्ध आहे. तेव्हां

$ *Memoir–Rev. Robert Nesbit*

पूर्वीं चाल असतांही क्षुद्र दृष्टीनें मना केली, असें स्पष्ट दिसतें, ” असें म्हटलें आहे.

इ. स. १८४८ त जोतिराव फुले यांनीं आपल्या वयाच्या एकविसाव्या वर्षीं पुण्यांत एक मुलींची शाळा काढिली. या कामीं त्यांच्या पत्नीनें त्यांना निष्ठा-पूर्वक साह्य केलें. त्यांचे पुष्कळ हाल झाले. त्यांनीं ते निमूटपणें सहन केले; पण आपलें कार्य मात्र सोडिलें नाहीं. त्यांतच त्यांच्या कर्तव्यनिष्ठेची कसोटी होती. इ. स. १८५१ मध्यें सर आर्स्किन यांच्या प्रयत्नानें जोतिबांना एक शालजोडी व २०० रु. बक्षीस मिळाले. अशा रीतीनें स्त्रीशिक्षणाचा दिवसानुदिवस अधिकाधिक प्रसार होत होता. ‘ मराठी ज्ञानप्रसारक ’ मासिकांत स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करण्यासाठीं ‘ स्त्रीशिक्षणाविषयीं निबंध ’, ‘ स्त्रीशिक्षणाविषयीं विचार ’, ‘ एतद्देशीय स्त्रियांची स्थिति ’ इत्यादि अनेक लेख प्रसिद्ध झाले होते. बाबा पदमनजी यांनीं इ. स. १८५२ त ‘ स्त्रीविद्याभ्यास ’ या नांवाचा निबंध लिहिला. × याच वर्षीं डॉ. रामजी गुणोजी यांनींहि या विषयावर एक पुस्तक प्रसिद्ध केलें. ‘ ज्ञानप्रसारक ’ मासिकांतील खालील उताऱ्यावरून त्या वेळच्या स्त्रीशिक्षणविषयक लेखाची कल्पना येईल.

> “ सुवाच्य व दिव्य अक्षर लिहिणें, सुमाराचे हिशेबठिशेब जाणणें, याचें नांव विद्या नव्हे. हीं केवळ विद्येचीं साधनें मात्र होत. जिच्या योगें आपल्या इहलोकीं परलोकसाधनार्थ काय कर्तव्य आहे हें समजतें, जिच्या योगें भूतदया अंतःकरणांत उत्पन्न होत्ये, जिच्या योगें सृष्टिजन्य ईश्वरी ज्ञान कळतें, जिच्या योगें आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांसीं व आपला आत्मा आणि जगन्नियंता भगवान् याशीं काय संबंध आहे हें समजतें; जिच्यायोगें हिताहिताची, बऱ्यावाईटाची, पापपुण्याची निवड करण्याची शोधक बुद्धि आपणास प्राप्त होत्ये; जिच्या योगें आपणास नीतिशास्त्र व ईश्वरप्रेरित धर्मप्रकरण वाचून समजण्यांत आनंद प्राप्त होतो, तिचें नांव विद्या. तर अशा विद्येच्या योगें स्त्रियांचें मन सन्मार्गाकडेस वळल्यावांचून कसें राहील ? मातापितरांची सेवा, पतिशुश्रूषा व पातिव्रत्य रक्षण, हे जे स्त्रियांचे उत्कृष्ट धर्म, तेच आचरीत जावे, असें त्यांस बलात्कारानें सांगितलें तर त्या भिडेभाडेनें ऐकतील एवढेंच मात्र, परंतु त्यांच्या मनावर असा दृढ संस्कार करून देण्यास ज्ञान हेंच मुख्य साधन होय. या प्रकारची विद्या शिकून ज्यांचा मनांत नीतीचा प्रकाश व दुराचरणाचा वीट बसला आहे, अशा कुलपालिका स्त्रिया कधींही दुराचारास प्रवृत्त होणार नाहींत. ” §

× “ प्रभाकर पत्रांत ह्या लहानशा पुस्तकाविषयीं चांगला अभिप्राय आला होता. ” बाबा पदमनजी–‘ अरुणोदय ’, पृ. १२०

§ मराठी ज्ञानप्रग्रारक मासिक (पु. ४, अं. ३) पृ. ७०

पुनर्विवाह

इ. स. १८३७ त एक तैलंग ब्राह्मण व दुसरा परशुराम क्षेत्रस्थ ब्राह्मण अशा दोघां लेखकांनीं एक किताब छापून महाराष्ट्रांत पुनर्विवाहाच्या प्रश्नाला प्रथम चालना दिली. त्यानंतर इ. स. १८४१ त 'पुनर्विवाहप्रकरण' या नांवाचें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध झालें. गंगाधरशास्त्री फडके यांनींहि या विषयावर एक ग्रंथ लिहिल्याचा उल्लेख आढळतो. § कदाचित् हाच तो ग्रंथ असण्याचा संभव आहे. गतभर्तृकांना पुनर्विवाहाची मोकळीक नसल्यामुळें वैधव्यदशेंत त्यांचें वाकडें पाऊल पडलें तर त्याबद्दल त्यांना दूषण देणें योग्य नाहीं, असें या पुस्तकांत स्पष्ट म्हटलें आहे. त्यांतील खालील उताऱ्यावरून पुनर्विवाहाच्या चळवळीची पूर्वपीठिका लक्षांत येईल.

"असें हें बालविधवाकृत दुष्कृत उघड पाहून जे लोक विचारवंत, पापभीरू, लोकहितेच्छु आहेत त्यांनीं पुनर्विवाहविधि चालविल्यावांचून हा दुराचार मिटणार नाहीं. असें विचारून त्या विधीकरितां प्राचीन संमति घेऊन बहुत लिहिलें. असें पूर्वी सवाई जयसिंगाचे वेळेस व त्याचे अलीकडे पुण्यास परशुरामभाऊ पटवर्धन, कलकत्यास राममोहनराय, हे आदिकरून बहुतांहीं वादविवाद चालविला, परंतु विचारवंत थोडे, गतानुगतिक बहूत, याजकरितां तो विचार तसाच राहिला. त्याचे आलीकडे शके १७५९ इसवी सन १८३७ या सालीं मुंबईंत एक किताब छापिली. त्याचे लिहिणार दोघे; एक तेलंग ब्राह्मण, दुसरा परशुरामक्षेत्रस्थ ब्राह्मण; त्या किताबा सर्वत्र गेल्या. त्याजवर एक धर्मशास्त्री यांणीं दूषण लिहिलें, तें मुंबई दर्पणांत छापिलें; त्याजवर परशुराम क्षेत्रस्थ यांणीं कट्ट लिहिलें. तीं दोन्हीं पाहून तैलंग ब्राह्मण याणें कट्ट लिहायाचें कारण नाहीं, म्हणून दोघांचें समाधान करून युक्तिप्रयुक्तिनें आपलें मत स्थापिलें. हें सर्व दर्पणांत छापिलें आहे. तें सर्व पाहून एका मध्यस्थानें साधकेंबाधकें विस्तारपूर्वक लिहून अक्षतयोनि स्त्रियांचा पुनर्विवाह करावा असें तैलंग ब्राह्मणाचेंच मत स्थापिलें; त्यांत फळेंहि दाखविलीं. म्हणून ती किताब विस्तृत आहे, यास्तव दर्पणांत समावेश न होय म्हणून छापिली नाहीं. वेगळीहि छापिली गेली नाहीं; परंतु कांहीं प्रति लिहवून धर्मशास्त्री वगैरे यांजकडे पाठविल्या. त्याजवर पुन्हां कोणीं दूषण दिल्हें नाहीं. तेव्हां सर्व संमतीच दिसली; परंतु संमति देऊन लिहिलें न होतें. त्यानंतर या सालांत मुंबई अखबारामध्यें पुनर्विवाह करण्याविषयीं सरकार चित्त पुरवीत आहे यास्तव हिंदुस्थानांतील नेटिव लोकांहीं बालविधवांस कामोत्पत्तीच न व्हावी अशा मात्रा करून ठेवाव्या, असें थट्टेप्रमाणें लिहिलें

§ मराठी ज्ञानप्रसारक मासिक (पु. ४, अं. ३) पृ. ७०.

होतें, परंतु त्यांत पंडित लोकांनीं पाहायाजोगी हांसल गोष्ट एकही न होती. असी ही चर्चा स्तब्ध झाल्याप्रमाणें होती. सांप्रत नागपूरीं एक भरंवशीक गृहस्थाचे पदरचा पंडित यानेंही हा दुराचार पाहून अनुतापानें एक किताब लिहिली त्यांत प्राचीन ग्रंथस्थवचनें व युक्तिप्रयुक्ति चांगल्या लिहिल्या आहेत. ती किताब पुण्यास छापणार आहेत. ही किताब आणि मध्यस्थांनीं लिहिलेली एक अशा दोन्ही छापवून त्या किताबा सर्वत्र पंडितांकडे पाठविल्यास श्रीभगवान् त्यांना बुद्धि देऊन संमत करवील म्हणजे हें कार्य सिद्धीस जाईल अशी आम्हांला आशा आहे. सर्व पंडित मंडळींस आमची प्रार्थना हीच कीं, पाहा सर्वत्र दुराचार सर्वांस दिसत असतांही कोणी मिटविण्याचा उद्योग करीत नाहीं. जो करितो त्याला सहायही करीत नाहींत हें आश्चर्य आहे. भगवंतानें विवेक दिल्यासारखा लोकोपकाराचा विचार करावा यांतच कीर्ति आणि सुकृत आहे. गतानुगतिकत्व करूं नये. सर्वांसही त्या किताबा मागवून आद्यंत चांगला पाहून एकमत होवून संमती द्यावी. म्हणजे लोकोपकार मोठा होऊन त्याचें श्रेयही मिळेल." +

'प्रभाकर' पत्राच्या २३ जानेवारी १८४२ च्या अंकांत बेळगांव येथें दान ब्राह्मण बालविधवांचें पुनर्विवाह झाल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून महाराष्ट्रांत पुनर्विवाहाची प्रथा निदान पंचाणव वर्षांपूर्वीं तरी सुरू झाली होती हें उघड होतें.

लोकहितवादी

लोकहितवादी यांचीं 'प्रभाकर' पत्रांतून पुनर्विवाहविषयक आठदहा पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांत त्यांनीं अत्यंत कळवळ्यानें हा विषय लोकांसमोर मांडला आहे. "ईश्वरानें स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत असें असतां पुरुषांस पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई हा केवढा जुलूम आहे. लोकांनीं मनांत आणलें तर हा अन्याय ताबडतोब दूर करता येईल. शास्त्र यद्यपि असेल कीं, स्त्रीचा पुनर्विवाह करूं नये. तर शास्त्र हे कायदे आहेत, व जे अनहितकारक कायदे असतील ते सोडून दुसरे करण्यास कांहीं चिंता नाहीं." * निर्भयपणानें पुढें होऊन आतां ह्या कामाला आरंभ केला पाहिजे. कोणाचीहि भीडमुर्वत धरून स्वस्थ बसण्यांत आपलाच नाश आहे. अशा तऱ्हेचे स्पष्ट आणि सडेतोड विचार त्यांनीं या पत्रांत प्रगट केले आहेत.

+ पुनर्विवाह प्रकरण (इ. स. १८४१)

* लोकहितवादी—निबंधसंग्रह (नं. १६) पृ. ६०

विधवाश्रुमार्जन

दादोबा पांडुरंग यांनीं इ. स. १८५७ त संस्कृत भाषेमध्यें 'विधवाश्रुमार्जन' या नांवाचा एक निबंध लिहिला, आणि त्याबरोबरच त्याचें सारांशरूपानें मराठी भाषांतरहि प्रसिद्ध केलें. यांत त्यांनीं निरनिराळ्या शास्त्रग्रंथांच्या आधारें पुनर्विवाह पक्षाचें समर्थन केलें आहे.

मोरोबा कान्होबा

इ. स. १८६३ च्या सुमारास 'पाठारे रिफॉर्म असोसिएशन' या नांवाची एक सभा स्थापन झाली. तिचे चिटणीस मोरोबा कान्होबा विजयकर हे होते. ह्या सभेच्या विद्यमानें विधवाविवाहासंबंधीं एक इंग्रजी व एक मराठी अशीं दोन पत्रकें प्रसिद्ध झालीं. ह्या पत्रकावर अभिप्राय देण्याच्या निमित्तानें 'वर्तमानदीपिका', 'वृत्तवैभव', 'ज्ञानप्रकाश' इत्यादि पत्रांनींहि या विषयाची चर्चा केली. मोरोबा कान्होबा हे विधवाविवाहाचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांनीं इ. स. १८७० त स्वतः पुनर्विवाह केला. याच वर्षांतील त्यांचें विधवाविवाहावरील व्याख्यान पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालें आहे. इ. स. १८६४ त जोतिराव फुले यांनीं शेणवी जातींत एक पुनर्विवाह घडवून आणिला आणि या चळवळीला आपला पूर्ण पाठिंबा आहे हें दाखवून दिलें.

विष्णुशास्त्री पंडित (इ. स. १८२७–७६)

यानंतर विष्णुशास्त्री पंडित यांनीं हा प्रश्न हातीं घेतला, आणि तो सोडविण्यासाठीं जन्मभर कसोशीनें प्रयत्न केला. इ. स. १८६५ त बंगाल प्रांतांतील पुनर्विवाह पक्षाचे अध्वर्यु पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या 'विधवाविवाह' ह्या ग्रंथाचें त्यांनीं मराठींत भाषांतर केलें. त्यांत धर्मग्रंथांतील आधार देऊन पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेची चर्चा केली आहे. हा ग्रंथ प्रसिद्ध होतांच महाराष्ट्रांत मोठी खळबळ उडाली. सनातनी आणि सुधारक असे दोन तट पडून पुनर्विवाहाच्या लढ्याला तोंड लागलें. सामाजिक सुधारणेची चळवळ म्हणजे 'सुळावरील पोळी' आहे याची विष्णुशास्त्री पंडितांना पूर्ण जाणीव होती, लोकविरोधाला न जुमानतां त्यांनीं लेख, व्याख्यानें, वादविवाद इत्यादि साधनांच्या द्वारें आपला प्रचार जोरांत सुरू केला; आपल्या प्रयत्नांना संघटित स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून त्यांनीं गोपाळराव हरी देशमुख (लोकहितवादी), न्यायमूर्ति रानडे, रा. ब. मोरोबा कान्होबा वगैरे मंडळींच्या साह्यानें इ. स. १८६५ त पुनार्विवाहोत्तेजक मंडळीची स्थापना केली, आणि तिच्या विद्यमानें दोनतीन पुनर्विवाहहि घडवून आणिले. इ. स. १८७४ त त्यांनीं स्वतः पुनर्विवाह केला आणि आपली अढळ तत्त्वनिष्ठा जगाच्या प्रत्ययास आणून दिली.

विष्णुशास्त्री यांचें मूळ गांव सातारा. तेथें इ. स. १८२७ त त्यांचा जन्म झाला. त्यांनीं लहानपणीं वे. शा. सं. राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर यांच्यापाशीं व्याकरणशास्त्राचा अभ्यास केला. त्यांचें इंग्रजी शिक्षण पुणें येथें झालें. इ. स. १८५५ त त्यांनीं शिक्षणखात्यांत नोकरी पतकरली. सातआठ वर्षें काम केल्यानंतर नोकरीचा राजीनामा देऊन ते इ. स. १८६४ त इंदुप्रकाश वर्तमानपत्र चालवूं लागले. ह्या वेळेपासून त्यांनीं विधवाविवाहाचें कार्य हातीं घेतलें आणि सतत बारा वर्षेंपर्यंत तें नेटानें चालविलें. इ. स. १८७६ त त्यांस देवाज्ञा झाली. त्यांनीं ' नाना फडनवीस ह्यांची संक्षिप्त बखर ', ' हिंदुस्थानचा इतिहास–भाग ३ रा (मरेचें भाषांतर), ' ब्राह्मणकन्याविवाहविचार ', ' इंग्रजी–मराठी कोश ', ' विधवाविवाह ', ' संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश ', ' पुणें व नासिक येथील स्त्रीपुनर्विवाहावरील व्याख्यानें ', ' आर्य लोकांच्या प्राचीन आणि अर्वाचीन रीति व त्यांची परस्परांशीं तुलना आणि ' द्विजांनीं नावेंतून विलायतेस जाणें निर्दोष आहे या विषयावर व्याख्यानें, ' ' शूद्रधर्म ', ' स्मृतिशास्त्र ', ' वेदांतील सूर्य–सावित्रीचा विवाह ' इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्यांच्या विधवाविवाह या ग्रंथांतील खालील उताऱ्यावरून पुनर्विवाहपक्षीयांची भूमिका स्पष्ट होईल.

" विधवाविवाह मन्वादि स्मृतिकर्त्यांच्या मतास वास्तविकच विरुद्ध नाहीं. इतकीच एक गोष्ट समजली पाहिजे की, दुसऱ्या वेळेस विवाह झालेल्या स्त्रियांस ते पुनर्भू म्हणत असत, आणि त्यांजपासून झालेल्या पुत्रांस पौनर्भव म्हणत असत, आणि पराशराच्या मताप्रमाणें अशा स्त्रियांस व अशा पुत्रांस कलियुगांत तीं नांवें नाहींत. हा एवढाच काय तो फरक पराशर व अन्य स्मृतिकर्ते यांच्या मतांत आहे. पराशराच्या मनांत कलियुगांत त्या संज्ञा चालवायाच्या असत्या तर त्यानें अशा स्त्रियांस पुनर्भू हा शब्द लावला असता आणि सांगितलेल्या पुत्रांच्या प्रकारांत पौनर्भव पुत्रांचें परिगणन केलें असतें. कलियुगामध्यें अशा स्त्रियांस पुनर्भू शब्द लावावयाचा नाहीं, आणि त्याजपासून झालेल्या पुत्रांस पौनर्भव या प्रकारचें न मानितां औरसच मानावयाचें, हें चालू संप्रदायावरूनही सिद्ध आहे. पाहा कीं वाणीनें एखाद्या पुरुषास कन्या दिल्यानंतर विवाह होण्यापूर्वींच तो पुरुष मेला अथवा दुसऱ्या कारणानें त्याजबरोबर व्हावयाचा विवाह रहित झाला तर त्या कन्येचा विवाह दुसऱ्या पुरुषाबरोबर होतो. मागील युगांत अशा स्त्रियांस पुनर्भू व त्यांच्या संततीस पौनर्भव असें म्हणत असत. तें असें:—

सप्त पौनर्भवाः कन्या वर्जनीयाः कुलाधमाः ।

वाचा दत्ता मनोदत्ता कृतकौतुकमंगला ।

उदकस्पर्शिता या च या च पाणिगृहीतिका ।
अग्निं परिगता या च पुनर्भूप्रभवा च या ॥
इत्येताः काश्यपेनोक्ता दहन्ति कुलमग्निवत् ॥

हल्लींच्या काळांत वर सांगितलेल्या सात प्रकारच्या पुनर्भूपैकीं वाग्दत्ता, मनोदत्ता, कृतकौतुकमंगला आणि पुनर्भूप्रभवा या चार प्रकारच्या पुनर्भूंचा विवाह धडका चालूच आहे. अशा स्त्रियांस जरी पूर्वीच्या युगांत पुनर्भू म्हणत असत, तरी आतां त्यास निराळें विशेषण लागत नाहीं, आणि सर्व गोष्टींमध्यें त्या, ज्यांचा प्रथमच विवाहसंबंध झाला आहे, त्यांजप्रमाणें मानल्या आहेत. आणि त्यांजपासून झालेले पुत्र पौनर्भव असें न मानतां सर्व गोष्टीं-विषयीं औरसच मानले आहेत. मातापितरांस पिंडदान करणें, त्यांच्या मालमत्तेचे वारस होणें वगैरे पुत्रानें करावयाच्या गोष्टी ते औरस पुत्राप्रमाणेंच करितात. त्यांस चुकूनही कधीं पौनर्भव असें म्हणत नाहींत. "†

विधवाविवाहखंडन

'विधवाविवाह' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचें खंडन करण्यासाठीं तीनचार पुस्तकें लिहिलीं गेलीं. इ. स. १८६५ त बाळकृष्ण लक्ष्मणशास्त्री बापट यांनीं 'विधवाविवाहखंडन' हा ग्रंथ छापला. त्याच्या प्रस्तावनेंत "या ग्रंथाच्या नांवावरून ग्रंथकाराचा आशय पुनर्विवाहाविरुद्ध आहे अशी शंका येईल, परंतु त्याचा अभिप्राय तसा नाहीं, तर तो तूर्त उभयपक्षींच्या अडचणी पाहून उदासीन आहे हें उपोद्घातावरून समजेल. तथापि जे शास्त्रार्थ पुनर्विवाहास लागू केलेले आहेत ते तसे नसतां त्यांचा विपरीत अर्थ करून स्वार्थपर लाविल्यामुळें ग्रंथकारानें स्वबुद्ध्यनुसार त्यांचें सशास्त्र खंडन करून दाखविलेलें आहे." * असा स्पष्ट खुलासा केला आहे. यानंतर कृष्ण प्रभाकरशास्त्री साठे यांनीं श्रीकाशीक्षेत्रस्थ पंडितांनीं गीर्वाण भाषेंत लोकोपकारार्थ केलेल्या 'पुनर्विवाहनिषेध' या ग्रंथाचें मराठी भाषांतर केलें. इ. स. १८७० त रत्नागिरीस यथार्थवर्णनसूचक यानें बाळशास्त्री आगाशे यांच्या साह्यानें 'विश्वस्तोद्वाहकालिका' या नांवाचा ग्रंथ लिहिला. याच वर्षीं पुण्यास पंचासमक्ष दोन्ही पक्षांत जो वादविवाद झाला, त्याचा निर्णयहि पुनर्विवाह पक्षाला अनुकूल असा नव्हता. या वादाचें विस्तृत माहितीपत्रक प्रसिद्ध झालें आहे. बाळकृष्ण लक्ष्मण बापट यांच्या ग्रंथांतील दोन उतारे खालीं देत आहे.

"साधारणतः जें विलायती (म्हणजे इंग्रजी) तें सर्वोत्कृष्ट आणि तद्भिन्न तें निंद्य" असें बहुत नवीन विद्वान् लोकांच्या मनांत दिवसेंदिवस

† विधवाविवाह पृ. ७४–७६

* प्रस्तावना—विधवाविवाहखंडन

बिंबत चाललें आहे आणि यद्यपि यांत अंशतः सत्यता आहे. तथापि मिथ्याभावही तितकाच आहे. परंतु सारासार विचाराकडे विशेष लक्ष न देतां "इंग्रजी" हें ज्यास सामान्यतः विशेषण प्राप्त झालें आहे अशाचा हल्लीं विशेष खप होत चालला आहे; आणि त्या माळेपैकींच पुनर्विवाह हे एक रत्न होय असें दिसतें. ही व स्त्रीशिक्षणादि दुसऱ्या गोष्टी विचारार्ह व आपल्या लोकांत चालू करण्यास अयोग्य असें सर्वथैव म्हणणें नाहीं. परंतु सांप्रत या कोणत्या दिशेकडून येऊन एतद्देशीय प्राकृत विद्वज्जनांच्या सदैव अंतःकरणांत प्रविष्ट झाल्या आहेत व त्याकडे इतकें प्रेम कोणत्या हेतूस्तव लागत चाललें आहे याच्या मूळाकडे मात्र पहाणें आहे." ×

"येणेंप्रमाणें 'शास्त्रोक्त विधवाविवाहाचें' सशास्त्र खंडन झालें. सबब हें 'सशास्त्र आहे म्हणून तुम्ही करा' असें तूर्त विद्यासागरांच्यानें लोकांस म्हणतां येत नाहीं आणि यद्यपि विद्यासागरांनीं अगर अन्यानें त्या ग्रंथाचें पुनः मंडन आरंभिलें, तथापि कोणी तरी पुनः खंडनार्थ कंबर बांधील यांत शंका नाहीं. कारण कोणास हे आवडत असेल व कोणास नसेल, सबब शास्त्राच्या महाघोळ्याळ्यांत पडून तडीस पोंचण्याची कोणीही आशा बाळगूं नये. तर सर्व श्रुतिस्मृति पक्क्या वेष्टनांत बांधून ठेवून ज्यांच्या अंगीं सामर्थ्य असेल त्यांनीं या कृत्यास आज आरंभ करावा. हाच एक मार्ग राहिलेला आहे. म्हणजे जशा आपल्या लोकांत शेंकडों प्रत्यक्ष शास्त्राविरुद्ध चाली यथाशास्त्र होऊन गेल्या आहेत त्याच रीतीनें विधवाविवाहही कालांतरानें त्यांच्या मालिकेंत बसेल हें खचित आहे. आणि जो कोणी समर्थ पुरुष पुढें येऊन या महत् कृत्यास अनुकूल होईल त्यास वैधव्यदुःखाग्नीनें होरपळून गेलेल्या बालविधवांस द्वितीयसंबंधसुखरसानें संजीवित शांत व जन्मभर सुखी केल्याचें श्रेय येईल यांत तिलप्रायही संशय नाहीं."*

बालविवाह

इ. स. १८४८ त लोकहितवादी यांनीं 'लहानपणच्या लग्नापासून अडचणी' हें पत्र प्रसिद्ध केलें. त्यांत त्यांनीं बालविवाहामुळें होणारे दुष्परिणाम दाखवून दिले आहेत. "लहानपणीं बापांनीं आपलीं मुलें शाहाणीं केलीं तर कितीएक चांगलीं निघतील आणि लग्न हें केव्हां तरी त्यांचे स्वसामर्थ्यानें घडेल; परंतु मुलास रोजगार धंदा नाहीं, शहाणपण नाहीं, व पुढें कसा निघतो त्याचा अंकुर दिसत नाहीं तों

× विधवाविवाखण्डन—उपोद्घात पृ. ३–४

* विधवाविवाहखण्डन पृ. ९९

त्याच्या गळ्यांत मुलगी बांधून जोखिमांत घालावा व त्याची विद्या, आयुष्य सर्व बुडवावें यांत काय लाभ होतो ? " + अशा तऱ्हेची त्यांची विचारसरणी होती. याखेरीज अन्य पत्रांतहि त्यांनीं ह्या विषयाचा ऊहापोह केला आहे, आणि त्याबरोबरच जरठकुमारीविवाहाच्या अमानुष चालीवर कोरडे ओढले आहेत. मराठी ज्ञानप्रसारक मासिकांतहि ह्या विषयावर एकदोन लेख प्रसिद्ध झाले होते.

ब्राह्मणकन्याविवाहविचार

नंतर विष्णुशास्त्री पंडित यांनीं 'एक स्वदेशहितेच्छु' या नांवानें इ. स. १८६४ त 'ब्राह्मणकन्याविवाहविचार' हें पुस्तक लिहिलें. त्यांत प्रौढविवाहाचें सशास्त्र समर्थन केलें आहे. त्यांतील लहानसे दोन उतारे खालीं उद्धृत करितों.

"महान महान विचारी व दूरदर्शी अशा आपल्या शास्त्रकर्त्यांनीं ज्या लोकांनीं अज्ञानतमांत न चांचपडावें म्हणून ढळढळीत शास्त्रदीपक लावून जिकडे तिकडे अक्षय प्रकाश पाडला आहे, ते लोक आपले डोळे घट्ट झांकून अंधारांत ठेंचा खात चालले आहेत. "खोट्या खड्यास चमक अधिक" या म्हणीप्रमाणें वडिलांच्या चाली खऱ्या शास्त्रार्थापेक्षां अधिक तेजस्वी होऊन बसल्या आहेत. त्यामुळें एखाद्यानें सर्व शास्त्रांस संमत पण या चालीस यत्किंचित् विरुद्ध असें कांहीं लिहिलें म्हणजे त्याच्या कपाळीं पहिला डाग हाच कीं, हा लिहिणारा सुधारलेला आहे, नास्तिक आहे, याचा लेख वाचुं नये. तर अशा प्रकारचे दोष देणारांस आम्ही इतकेंच सांगतों कीं हा समज आपल्या पूर्वजांचा असता तर नास्तिक ग्रंथांचीं त्यांनीं केलेलीं हजारों हजार खंडणें आपल्या दृष्टीस पडतीं काय हें मनांत आणा आणि जें काय कोणी लिहिलें तें फुरसतीप्रमाणें वाचून पाहा." *

"विवाहसंस्कार हा स्त्रीपुरुषांमध्यें शास्त्रविहित एक संकेत अथवा करार आहे असें विवाहप्रयोग साकल्येंकरून पाहतां खचीत मनांत येतें, कारण करारास ज्या प्रकारच्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याच प्रकारच्या गोष्टी त्या प्रयोगांत बहुत आढळतात. यांत स्त्रीपुरुष या उभयतांचा संबंध, उभयतांच्या संबंधाचे हेतु, उभयतांनीं परस्परांशीं कसें वागावें इत्यादि गोष्टींचा उल्लेख फार व्यक्त रीतीनें केला आहे. आणि तो उभयतांपैकीं कोणा एकानेंहि मोडूं नये; यास्तव प्राचीन सांप्रदायाप्रमाणें शपथा घेतल्या आहेत व साक्षीहि ठेवले आहेत, आणि किती एक मुख्य मुख्य गोष्टींचा उच्चार त्या कायम असें

+ लोकहितवादी–निबंधसंग्रह (नं २) पृ. ८

* प्रस्तावना––ब्राह्मणकन्याविवाहविचार

दाखविण्यासाठीं त्रिवार केला आहे. व्यवहारांतील दुसरे कोणतेहि करार अथवा त्यांतील कांहीं अंश मोडिल्यास स्मृतींत ज्याप्रमाणें शिक्षा सांगितल्या आहेत, त्याप्रमाणें विवाहरूप संकेत किंवा त्याचा एखादा अंश मोडल्यास मोडणारांस यथायोग्य प्रायश्चित्त सांगितलें आहे. सामान्य करारनाम्यापेक्षां यांत आणखी विशेष हा आहे कीं, हा त्याचप्रमाणें अगदीं सहज अथवा क्षुल्लक कारणानें मोडण्यासारखा नाहीं.

अशा प्रकारचा परस्परांशीं परस्परांचें बंधन करणारा करारनामा करण्याविषयीं स्त्रीपुरुष या उभयपक्षांची पूर्ण इच्छा असली पाहिजे आणि ती इच्छा तीं उभयतां जाणत्या वयांत आल्यानंतर झालेली पाहिजे. कारण अज्ञान स्थितींत असणाऱ्या लोकांनीं केलेला करारनामा त्यांस बंधनभूत होईल असें कोणत्या लोकांत मान्य होणार आहे ? " ×

अस्पृश्योद्धार

लोकहितवादी यांचे हरिजनाविषयींचे विचार त्यांच्या अंतःकरणाची साक्ष पटवितात. ते एका पत्रांत म्हणतात, "ब्राह्मण महाराची निंदा करितात. त्यांस शिवत नाहींत व इंग्रजांजवळ प्रीतीनें बसतात हें पाहून मला आश्चर्य वाटतें. शास्त्राप्रमाणें पाहिलें असतां महार बरे, परंतु इंग्रजांचे मंडळींत ब्राह्मण असूं नयेत." † लोकहितवादीप्रमाणेंच जोतिबा फुले यांनींहि आपल्या दलितबांधवांच्या उद्धारासाठीं कळकळीनें प्रयत्न केले. त्यांनीं महारमांगादि अतिशूद्रांसाठीं एक स्वतंत्र शाळा चालविली होती.

परदेशगमन

परदेशगमन निषिद्ध मानल्यामुळें आपल्या लोकांच्या साहसप्रियतेला आणि पराक्रमाला ओहोटी लागली होती. सहा हजार मैलांवरून येऊन इंग्रज लोकांनीं येथें राज्य स्थापिलें पण तेवढ्यानेंहि आमच्या लोकांचे डोळे उघडले नाहींत. विलायतेस जाण्यांत पाप आहे ही समजूत कायमच होती. यासंबंधीं मधूनमधून चर्चा होत असे. इ. स. १८७२ त विष्णुशास्त्री पंडित यांनीं 'द्विजांनीं नावेंतून विलायतेस जाणें निर्दोष आहे' या विषयावर एक व्याख्यान दिलें आणि ते पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें.

जातिभेद आणि वर्णव्यवस्था

जातिभेद आणि वर्णव्यवस्था याविषयीं लोकहितवादी यांनीं तीनचार पत्रें प्रसिद्ध केलीं. श्रमविभागाच्या दृष्टीनें करण्यांत आलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था त्यांना

× ब्राह्मणकन्याविवाहविचार पृ. २६–२७

† लोकहितवादी–निबंधसंग्रह (नं. ६४) पृ. ३०१

संमत होती. ते म्हणतात, " प्रत्येक मुलकांत चारी वर्ण आहेतच. याशिवाय तर कोठेंहि चालावयाचें नाहीं...परंतु अंतर इतकेंच आहे कीं, अन्य देशांत हे धर्मपरंपरा चालत नाहींत. वाणी आहे आणि त्याचा मुलगा बुद्धिमान निघाला तर तो पंडितामध्यें जातो आणि पंडिताचा मुलगा मूर्ख निघाला तर तो चाकरांत जातो. अशा रीतीनें हे चारी वर्ण सर्व देशांत आहेत. परंतु हिंदुस्थानांत त्यांचीं वेगळालीं कुळेंच झालीं आहेत. आम्हांस वाटतें कीं पूर्वीं जातींत फेरफार होण्याची चाल असे. रावण ब्राह्मणाचा मुलगा परंतु दैत्य झाला; कारण तो महादुष्ट होता. " × " खरें पाहिलें तर चालू काळांत चारही वर्णांच्या लोकांनीं उच्चनीच भाव मनांतून काढून टाकला पाहिजे. कारण, सांप्रत जितके लोक हिंदुस्थानांत आहेत, तितक्यांचा एक वर्ण मला दिसतो कीं ते सर्व शूद्र आहेत. इतर वर्णांचीं नांवें मात्र घेतात, परंतु त्यांचे गुण व कर्म नाहीं. " * जातीजातींतील वैमनस्य नाहींसें करून पोटजातींत तरी सर्रास विवाह चालू करावे असें आपलें मत त्यांनीं दोनतीन पत्रांत प्रगट केलें आहे.

तुकाराम तात्या पडवळ (इ. स. १८३६–१८९८)

इ. स. १८६१ त तुकाराम तात्या पडवळ यांनीं आपल्या दोनतीन मित्रांच्या साह्यानें ' जातिभेदविवेकसार ' हा ग्रंथ लिहिला आणि ' एक हिंदू ' या नांवानें प्रसिद्ध केला. चार वर्षांतच या ग्रंथाची दुसरी आवृत्ति निघाली. या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत त्यांनीं आपला ग्रंथरचनेचा उद्देश स्पष्ट शब्दांत सांगितला आहे. " ज्या शोधांचा लाभ या ग्रंथकर्त्यास झाला आहे ते शोध आपल्या स्वदेशीयांस सांगून त्यांस या जातिभेदामुळें प्राप्त झालेल्या नीचत्वापासून मुक्त करण्यापेक्षां दुसरें कोणतेहि धर्मसंबंधीं कार्य साधावयाचें नाहीं. त्यास वाटतें कीं हिंदुजन जीं संसारांत दुःखें भोगितात त्या, किंबहुना सर्व दुःखाचें मूळ हा जातिभेद आहे. म्हणून तो या अशा नाशकारी भेदाचा उच्छेद करण्यास प्रयत्न करीत आहे. "

जोतिबा फुले (इ. स. १८२७–१८९०)

लक्षावधि ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांच्या बौद्धिक गुलामगिरींतून मुक्त करण्यासाठीं जोतिबा फुले यांनीं आटोकाट प्रयत्न केले. हलक्या मानल्या गेलेल्या जातींतील लोकांना आपल्या सामाजिक हक्कांची जाणीव झाली म्हणजे ब्राह्मणांचें प्रस्थ आपोआपच कमी होईल याबद्दल त्यांना पूर्ण खात्री होती. ' भटांची ' कारवाई उघडकीस आणण्यासाठीं त्यांनीं ' ब्राम्हणांचे कसब ' (इ. स. १८६९), व ' गुलाम-

× लोकहितवादी–निबंधसंग्रह (नं. २२) पृ. ८५–८६

* लोकहितवादी–निबंधसंग्रह (नं. २३) पृ. ९२

गिरी' (इ. स. १८७३) हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं. आपल्या चळवळीला संघटित स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून त्यांनीं इ. स. १८७३ त सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शेंकडों वर्षेपर्यंत दडपल्या गेलेल्या अज्ञानी जनतेच्या वतीनें ब्राह्मणशाहीशीं झगडण्याच्या कार्याला त्यांनीं आपलें आयुष्य वाहिलें होतें. त्यांच्या विचारसरणींत जळजळीत ब्राह्मण–द्वेष आणि शास्त्रशुद्धतेचा अभाव हे दोन दोष प्रामुख्यानें आढळतात. तरी पण त्यांच्या मनाची तळमळ, त्यांचा स्वार्थत्याग, आपल्या मतांचा प्रचार करण्यांत त्यांनीं दाखविलेलें धैर्य, मागासलेल्या जातींच्या उन्नतीसाठीं त्यांनीं सोसलेले कष्ट इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे त्यांच्या मोठेपणाबद्दल कोणालाहि शंका राहणार नाहीं. स्वकीयांकडून काडीचेंहि उत्तेजन मिळालें नाहीं; त्यांचा जाच मात्र सहन करावा लागला. उलट मिशनऱ्यांनीं जोतिबांच्या कार्याचें कौतुक केलें; त्यांना थोडीफार मदतहि केली. यामुळें त्यांच्या आचारविचारांवर मिशनरी लोकांची छाप पडलेली दिसली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. जोतिबांचा जन्म इ. स. १८२७ त पुणें येथें फुलमाळी जातींत झाला. अनेक अडचणी सोसून त्यांनीं आपलें शिक्षण पुरें केलें. सरकारी नोकरीच्या मोहांत न पडतां त्यांनीं समाजसेवेचा खडतर मार्ग स्वीकारला. इ. स. १८४८ त त्यांनीं पुणें येथें मुलींची शाळा काढिली. त्यानंतर महारमांगांसाठींहि त्यांनीं एक स्वतंत्र शाळा चालविली होती. इ. स. १८६३ त त्यांनीं जननिंदेची पर्वा न करतां 'बालहत्याप्रतिबंधगृहा 'सारखी उपयुक्त संस्था स्थापन केली. त्यानंतर इ. स. १८७३ त सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनीं ब्राह्मण–ब्राह्मणेतर चळवळीला तोंड फोडलें. 'शिवाजीचा पोवाडा', गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा असूड', 'सार्वजनिक सत्यधर्म', इत्यादि पुस्तकें त्यांनीं प्रसिद्ध केलीं. व 'दीनबंधु' नामक वर्तमानपत्रहि काढिलें. अशा रीतीनें दीनदुबळ्यांचा कैवार घेऊन झगडणारा हा थोर पुरुष इ. स. १८९० त दिवंगत झाला. त्याच्या 'गुलामगिरी' पुस्तकांतील एक उतारा खालीं देत आहे.

"अरे कित्येक घरंदाज अज्ञानी शूद्रांचीं घराणीं ईर्षेस पेटून एकमेकांशीं लढत असतां, आंतून या कलमकसायांसहित दुसऱ्या भटकामगारांचीं घरें शेकारतां शेकारतां धुळीस मिळालीं नसतील काय? अरे या कसायांच्या नारदशाईमुळें मुलकी, फौजदारी, आणि दिवाणी खात्यांत अतोनात खर्च फुगून त्यांतील बहुतेक कारकून मामलेदारांसहित चिटणीसांनीं आपल्या "तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्" या अस्सल बीजमंत्रास हरताळ लावून त्याबद्दल "चिरिमिरी देव, चिरिमिरी देव" या यवनी गायत्रीचा उपदेश त्या पवित्र भटमुल्लापासून त्यांनीं घेतल्यामुळें भटवकिलांची दलाली वाढून ते मोठमोठ्या रथांत बसून पोळासारख्या डुरक्या फोडीत फिरतात कीं नाहीं? याखेरीज मुनसफनबाबांचे सरंजाम किती वाढले

आहेत याची बेरीज घे. इतकाही बंदोबस्त असून गरीब लोकांस न्याय स्वस्ता पडून वेळेस तरी मिळतो काय ? यामुळें खेड्यापाड्यांनींसुद्धां एक जगप्रसिद्ध म्हण पाडली आहे, ती अशी कीं, सर्व खात्यांत ब्राह्मण कामगारांच्या हातांवर अमुकतमुक केल्याशिवाय ते आमच्या गरिबांच्या कामास हातच लावीत नाहींत. त्यांच्या डोमल्यावर घालावयास कांहीं तरी बरोबर घ्या तेव्हां बाहेर निघा.''‡

जांभेकर–लोकहितवादी–फुले–पंडितप्रभृति लेखकांचे वरील प्रयत्न सामाजिक-दृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहेत. लोकांच्या तात्कालिक विरोधाला न जुमानता त्यांनीं स्त्रीशिक्षण, पतितपरावर्तन, परदेशगमन, पुनर्विवाह, जातिभेद इत्यादि विषयांवरील आपलीं मतें निर्भीडपणें समाजापुढें मांडली, आणि म्हणूनच यांपैकीं कांहीं प्रश्न तरी आज आपल्याला अंशतः सुटल्यासारखे वाटतात.

* * *

परिशिष्ट

स्त्रीशिक्षण

१. स्त्रीविद्याभ्यासप्रकरण — मुंबई, इ. स. १८४१
२. स्त्रीविद्याभ्यास–बाबा पदमनजी — इ. स. १८५२
३. स्त्रीविद्याभ्यासापासून लाभ–रामजी गणोजी — मुंबई, इ. स. १८५२

विधवाविवाह

४. पुनर्विवाहप्रकरण– — मुंबई, इ. स. १८४१
५. विधवाश्रुमार्जन–दादोबा पांडुरंग, — मुंबई, इ. स. १८५७
६. पाठारे परभू ज्ञातींत पुनर्विवाहाविषयीं घाटाघाट — मुंबई, इ. स. १८६३
७. विधवाविवाह–विष्णु परशुरामशास्त्री पंडित — मुंबई, इ. स. १८६५
८. विधवाविवाहखण्डन–बाळकृष्ण लक्ष्मण बापट — मुंबई, इ. स. १८६५
९. पुनर्विवाहनिषेध–कृष्ण प्रभाकरशास्त्री साठे, — मुंबई, इ. स. १८६५
१०. विधवाविवाहसंहारसार–सीतारामपंत– रत्नागिरी, इ. स. १८६६ (ब्रि. म्यु.)

‡ गुलामगिरी पृ. ८९–९०

११. स्त्रीपुनर्विवाह सशास्त्र असल्याविषयीं पुणें व नासिक येथें चार चार व्याख्यानें दिलीं तीं. विष्णु परशुरामशास्त्री पंडित
मुंबई, इ. स. १८७०

१२. विधवाविवाहाच्या अशास्त्रतेविषयीं निर्णयपत्र. पुणें, इ. स. १८७०

१३. विधवादुःखवर्णन–विनायक यशवंत बेरडे, मुंबई, इ. स. १८७०

१४. विधवाविवाहाविषयीं व्याख्यान–रा. ब. मोरोबा कान्होबा
मुंबई, इ. स. १८७०

१५. स्त्रीपुनर्विवाहाचा अशास्त्रतेचा बोधक वाद– इ. स. १८७०

१६. विधवाविवाहाविषयीं पुण्यांत झालेला वाद–
मोरोबा कान्होबा, मुंबई, इ. स. १८७०

१७. विश्वस्तोद्वाहकलिका यथार्थवर्णनसूचक (बाळशास्त्री आगाशे यांच्या साह्यानें) रत्नागिरी, इ. स. १८७०

१८. विधवाविवाहखण्डनाचा साद्यंत इतिहास–दसरदार आणि बेडेकर, सातारा, इ. स. १८७१

(आवृत्ति २ री Revised by बा. ना. काशीकर)

बालविवाह

१९. ब्राह्मणकन्याविवाहविचार–एक स्वदेशहितेच्छु मुंबई, इ. स. १८६४

परदेशगमन

२०. आर्य लोकांच्या प्राचीन व अर्वाचीन रीति व त्यांची परस्परांशीं तुलना आणि द्विजांनीं नावेंतून विलायतेस जाणें निर्दोष आहे या विषयांवर व्याख्यानें–विष्णुशास्त्री पंडित, मुंबई, इ. स. १८७२

जातिभेद

२१. जातिभेदविवेकसार–एक हिंदु (तुकाराम तात्या पडवळ)
मुंबई, इ. स. १८६१

२२. ब्राह्मणाचें कसब–जोतिराव फुले, मुंबई, इ. स. १८६९

२३. ज्ञातिभेदावर संभाषण–(कुणबी लोकांसाठीं) सिदोबा बापुजी मिसाळ, इ. स. १८७०

२४. गुलामगिरी–जोतिराव फुले, पुणें, इ. स. १८७३

संकीर्ण

२५. हिंदुलोकांच्या रीतिसुधारणा–गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८५१

* * *

६ : इतिहास–चरित्रें

इतिहास

इंग्रजी राज्य स्थापन होण्यापूर्वी शास्त्रीय दृष्टीनें यथार्थ इतिहास लिहिण्याची प्रथा महाराष्ट्रांत रूढ होती असें दिसत नाहीं. मुसलमानांच्या तवारिखा पाहून स्वकीयांचा वृत्तान्त लिहिण्याची मराठ्यांना प्रेरणा झाली आणि मराठी भाषेंत त्यांनीं आपल्या बखरी सजविल्या. या बखरींतून ऐतिहासिक घडामोडी आणि काल्पनिक वर्णनें यांच्या चमत्कारिक मिश्रणामुळें खरा इतिहास समजणें कठीण झालें आहे. " कोणतीहि बखर घ्या, तींत कालाचा विपर्यास झाला नाहीं असें क्वचितच आढळेल. " × याशिवाय अतिशयोक्तीचें प्राबल्य, क्षुल्लक गोष्टींचा निरर्थक पाल्हाळ इत्यादि दोष आहेत ते निराळेच. महाराष्ट्राचा सुसंगत इतिहास लिहिण्यास प्रथमतः युरोपियन लेखकांनीं आरंभ केला. अव्वल इंग्रजींतील महाराष्ट्रीय विद्वानांनीं या इतिहासाचीं भाषांतरें मात्र केलीं. स्वतंत्र रीतीनें इतिहासाचें संशोधन करण्याचा कोणीहि फारसा प्रयत्न केला नाहीं.

मराठ्यांचा इतिहास

रघूजी भोंसल्याची वंशावळी

इ. स. १८१६ च्या सुमारास श्रीरामपूर येथें ' रघूजी भोसल्याची वंशावळी ' या नांवाचें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध झालें. त्यांत बाबाजी भोसले यांच्यापासून भोसले कुळाचा वृत्तान्त वर्णिला आहे. मराठी भाषेंत छापलेला हा पहिलाच इतिहास–ग्रंथ होय. यांतील एक उतारा खालीं देत आहे.

> " त्या उपरी भेटीस शीवाजी राजे व संभाजी राजे व मुत्सद्दी ऐसे घेऊन रामसिंग पातशहाचे भेटीस गेलेत्. अगोधर रामससींहानी व नीराजीपंत मजुरीयाचा राहारवेश उभे राहून करावा हें पढवीले होते. भेटीस् तख्तापुढें संनीध जाताच सलाम न करीता राहीले खान दीवान त्याचे वर्ते जाऊन पिता व पुत्र उभयता उभे राहीलेत. ते खुणेने रामसींहानें सांगितले परंतु सलाम न करीता मनामधे की तुर्कास सलाम करण उचीत् नाहीं. पादशाह शीवाजीस पाहून रुमाल मुखास् लावून् हसूं लागलेत्. रामसींहाकडे पाहूं लागले. रामसींहानी सांगीतल की महराटे यास राहारवेश ठाऊक नाहीं. तेच

× वि. का. राजवाडे–ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३

क्षणीं रामसींहास आज्ञा केली जे उभयतास घेऊन् जाणे. जात्या समयींही मजुरा केला नाहीं. पाठी पादशहाकडे करून चाललेत् लश्करांत आपले डेऱ्यास् आलेत. " *

मराठ्यांची बखर

यानंतर क्यापटन डेविड केपन यांनीं इ. स. १८२९ त बाबा साने यांच्या साह्यानें 'मराठ्यांची बखर' लिहिली. हें पुस्तक ग्रांट डफच्या इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर आहे. ऐतिहासिक ग्रंथाची परिभाषा मराठेशाहींतच निश्चित झाली असल्यामुळें त्या वेळच्या इतर पुस्तकांच्या मानानें हें भाषांतर फार चांगलें उतरलें आहे. यांतील भाषा प्रौढ पण सुबोध आहे.

पुणें येथील सरकारी इंग्रजी शाळेंतील विद्यार्थी कुशाबा लिमये यानें इ. स. १८४० त दे. अ. इजदेलसाहेब यांच्या ग्रंथावरून 'महाराष्ट्र देशाचें वर्णन' लिहून प्रसिद्ध केलें. इ. स. १८६६ त बाबा पदमनजी यांचा शाळांकरिता लिहिलेला 'महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास' छापला गेला.

नीलकंठ जनार्दन कीर्तने (इ. स. १८४४ – १८९६)

वर उल्लेखिलेले सर्व ग्रंथ भाषांतरात्मक आहेत, याचें कारण म्हणजे प्रत्येक गोष्टींत इंग्रजांच्या ओंजळीनें पाणी पिण्याची तत्कालीन विद्वानांची प्रवृत्ति हेंच होय. इ. स. १८६७ त नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं पुणें कॉलेजांत शिकत असतांनाच 'ग्रांट डफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका' हा निबंध लिहिला. त्यांत ग्रांट डफच्या इतिहासांतील माहिती अपुरी असून कित्येक ठिकाणीं चुकीचीहि आहे असें दाखविलें आहे. हा निबंध लिहून नीळकंठराव कीर्तने यांनीं भावी पिढीला आपल्या इतिहासाचा स्वतंत्र दृष्टीनें अभ्यास करण्याचा कित्ता घालून दिला. यांतील एक उतारा खालीं सादर करीत आहे.

"महाराष्ट्राचें नांव पुराणामध्यें अगदींच निघत नाहीं असें नाहीं. या देशांत सीतेच्या स्नानानें परिपूत झालेले निर्झर वाहात आहेत व रामायणांत ज्या ऋषींचीं नांवें सांपडतात त्यांतील कित्येक परमविख्यात ऋषींचे आश्रमही याच देशांत होते. पुराणांत अशी दंतकथा आहे कीं, हा देश (ज्यास पूर्वीं दंडकारण्य असें म्हणत असत) रावणाचे राज्याखालीं होता; व त्यानें आपल्या घडशास म्हणजे वाजंत्र्यास बक्षीस दिला असेंही आहे. हें वर लिहिलें याचे प्रसंगानें हें म्हणण्यास मूळभूत जो रामायण ग्रंथ याविषयीं

---

* रघूजी भोंसल्याची वंशावळी, पृ. ५९

सांप्रत विद्वानांचें जें मत आहे व त्या मतास दृढ करणारीं जीं कारणें आहेत, तीं सर्व येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं; परंतु इतकेंच सांगतों कीं, रामायणांतील मूळ कथा खचित घडली असावी, व राक्षस म्हणून ज्यांस म्हटलें आहे, ते कोणी तरी अफगाण, ज्यांस मराठे लोक गिलचे असें म्हणतात, त्याप्रमाणें शरीरानें धिप्पाड व क्रूर असावे, व रामानें वानरांची सेना केली यांतील तात्पर्य रामानें रानटी लोकांची एक सेना केली असें असावें असें बहुतांचें मत आहे. याविषयीं जास्त माहितीची ज्यांस अपेक्षा असेल त्यानें एका बंगाली विद्वानानें रामायणावर सर्वमान्य कलकत्ता रिव्ह्यू या नांवाच्या मासिकपत्रांत जी टीका केली आहे ती पाहावी. या गोष्टींचा शक कोणता होता हें माहीत नाहीं. याविषयीं शुष्क तर्क फार आहेत." ‡

मराठेशाहींतील सरदार घराण्यांचा इतिहास

लोकहितवादी

इ. स. १८६२ च्या सुमारास लोकहितवादी यांनीं 'इंदुप्रकाश' पत्रांत मराठेशाहींतील भोंसले, शिंदे, होळकर, गायकवाड इत्यादि घराण्यांची संक्षिप्त माहिती लेखरूपानें प्रसिद्ध केली. त्यांचा इतिहासाचा व्यासंग फार दांडगा होता. त्यांच्या चौकस व मेहनती स्वभावामुळें त्यांनीं मराठयांच्या इतिहासाची बरीच बारीक सारीक माहिती मिळविली होती.

विष्णु गोपाळ भिडे

भोर संस्थानचे चिटणीस विष्णु गोपाळ भिडे यांनीं इ. स. १८६६ त 'सातारचे श्रीमंत छत्रपति शिवाजी महाराज यांचे वंशाचा व प्रतिनिधी आणि अष्टप्रधान यांचा इतिहास' लिहिला. हा ग्रंथ सातारचे दप्तरांतील खात्रीलायक माहितीवरून व दुसऱ्या अनेक दाखल्यांवरून तयार केला आहे. अस्सल कागदपत्रांच्या आधारें ऐतिहासिक ग्रंथ रचण्याचा मराठी भाषेंतील हा पहिलाच प्रयत्न होय. खालील उताऱ्यावरून या ग्रंथाची ढब लक्षांत येईल.

"शिवाजी महाराज मोठे विलक्षण चतुर पुरुष होते; त्यांचें शौर्य त्यांचे सदरचे पराक्रमावरून किती होतें हें समजतेंच व प्रसंगानुसार अनुसरून स्वकार्य साधण्याची मोठी दक्षता होती. मिजास अगदीं नसून कजाखी सोसण्याचा मोठा अभ्यास होता. द्रव्याचा व्यय उदारपणें धर्मादि सत्कर्मास करण्याची मोठी आवड होती. अंतःकरण त्यांचें निरंतर सदय असून

‡ ग्रांड डफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका, पृ. १४–१५

सर्वांभूतीं दया होती. त्यांणीं ब्राह्मणाचे व प्रजेचे पालन उत्तम प्रकारें केलें. भगवद्भक्तीविषयीं मोठी निष्ठा व गुरुसेवेच्या ठायीं अति आदर. त्यांस पूर्वी साक्षात्कार झाला होता, हें मागें लिहिलेंच आहे व त्या पुरुषावर श्रीरामदासस्वामीचीं व भवानी देवीची पूर्ण कृपा होती. सारांश, असा पुरुष दोनशें वर्षांत झाला नाहीं व पुढें होणें कठीण." *

जगन्नाथ प्रभाकर सरंजामे

इ. स. १८७२ त जगन्नाथ प्रभाकर सरंजामे यांनीं 'शिंदे अलिजाबहादूर ह्यांचें घराण्याचा इतिहास' प्रसिद्ध केला. "मालकम, ग्रांट डफ, मरी" वगैरे साहेब लोकांनीं जे लिहिले आहेत, त्यांच्या आधारानें मुख्यत्वेंकरून हा इतिहास लिहिला आहे. अस्सल मराठी कागदपत्रांवरून इतिहास तयार करण्याचा विचार होता, पण भरपूर साहित्य मिळालें नाहीं यामुळें वरील लेखकांचें सहाय्य घ्यावें लागलें असें ग्रंथकारानें प्रस्तावनेंत म्हटलें आहे.

हिंदुस्थानचा इतिहास

बाळशास्त्री जांभेकर (इ. स. १८१२-४६)

बाळशास्त्री जांभेकर यांनीं इ. स. १८४६ त एलफिन्स्टन साहेबाच्या इतिहासाचा सारांश मराठींत लिहून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला. हें पुस्तक मुख्यतः शाळेंतील विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां तयार केलें आहे. त्याच्या प्रस्तावनेंत स्वदेशाच्या इतिहासाचें ज्ञान किती उपयुक्त आहे तें सांगितलें आहे. ह्यानंतर त्यांनीं लिहिलेला 'हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास' हा ग्रंथ शुद्ध करून मेजर कँडी यांनीं इ. स. १८४९ त छापला. बाळशास्त्री जांभेकर हे तत्कालीन विद्वानांचे मुकुटमणी म्हणून गणले जात. त्यांनीं महाराष्ट्रांतील शिक्षणप्रसाराच्या कार्याला आणि मराठी गद्यवाङ्मयाच्या वाढीला सहाय्य केलें. "बाळशास्त्री हे मूळचे राजापूर प्रांतीं पोंबुर्लें गांव आहे तेथील राहणार." त्यांचा जन्म इ. स. १८१२ त झाला. त्यांचे वडील चांगले व्युत्पन्न भिक्षुक होते. त्यांनीं आपल्या मुलास चांगली काव्यव्युत्पत्ति करून दिली होती. 'बापू छत्र्यांच्या सांगण्यावरून गंगाधरशास्त्री यांणीं आपला मुलगा बापूकडेस इंग्रजी शिकण्याकरितां ठेविला. त्यांहीं त्या मुलाची अल्पवयांत थोर बुद्धि पाहून त्यास सोसायटीच्या इंग्रजी शाळेंत अभ्यासाकरितां ठेविलें. दिवसास इंग्लिश शिकावें व संध्याकाळीं आमचे गुरु बापूशास्त्री शुक्ल यांच्या बिऱ्हाडीं

---

* सातारचे श्रीमंत छत्रपति शिवाजी महाराज यांचे वंशाचा व प्रतिनिधि आणि अष्टप्रधान यांचा इतिहास, पृ. ४५.

कौमुदीची पोथी घेऊन तेथें पढावयास जावें......ते मुंबईस आल्यावर प्रोफेसर आर्लिबार यांजपाशीं गणितशास्त्र शिकले. " * बाळशास्त्री यांची कुशाग्रबुद्धि पाहून प्रोफेसरसाहेब त्यांची तारीफ करीत असत. ह्यानंतर एल्फिन्स्टन विद्यालयांतील उपगुरूच्या जागीं त्यांची नेमणूक झाली होती. भाऊ महाजन यांच्या साह्यानें बाळशास्त्री यांनीं ' दर्पण ' या नांवाचें वर्तमानपत्र व ' दिग्दर्शन ' या नांवाचें एक मासिक चालविलें होतें. मराठी भाषेंत त्यांनीं हा नवीनच उपक्रम केला. त्यांच्या लिहिण्यावर संतुष्ट होऊन त्या वेळचे गव्हर्नर सर जेम्स कॉरनॅक यांनीं त्यांना ' जस्टिस ऑफ दि पीस ' ही पदवी दिली. शास्त्रीबुवांस मराठी, संस्कृत, इंग्रजी, लॅटिन ह्या चार भाषा चांगल्या येत होत्या. त्यांचे ' भूगोलविद्या ', ' नीतिकथा ', ' सारसंग्रह ', ' भास्कराचार्यांवरील निबंध ', ' हिंदुस्थानचा इतिहास ' इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांनीं नियतकालिकें, शुद्धीकरण आणि विधवाविवाह या तीन प्रमुख चळवळी महाराष्ट्रांत सुरू केल्या. इ. स. १८४६ त त्यांचा अकालीं अंत झाला. त्यांच्या ' हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास ' या ग्रंथांतील एक उतारा खालीं देत आहेः—

" इंग्लिश लोक प्रथम हिंदुस्थानांत व्यापाराकरितां आले, त्यांचा राज्यें घेण्याचा बेत आरंभीं नव्हता; आणि मूळापासून कंपनी व पार्लमेंट ह्यांजकडून कामगारांस हुकुमही वारंवार निक्षूण तसेच येत होते. परंतु व्यापाराचे सोईकरितां व वखारीच्या रक्षणाकरितां पहिल्यानें बंदरांच्या सभोंवतालीं कांहीं आपली सत्ता असावी असें त्यांस वाटलें. पुढें त्यांस ज्यांनीं उपद्रव केला त्यांचें पारिपत्य करून त्यांचा कांहीं मुलूक घेतला; व ज्यांस इंग्लिशांनीं मदत केली, त्यांनीं त्यांस संतोषानें कांहीं मुलूक दिला. त्या मुलकाच्या बचावाकरितां फौजा ठेवणें प्राप्त झालें; त्यांचा खर्च निभेना म्हणून मुलकांतील संस्थानिकांचें रक्षण करण्याचें कबूल करून व आपले फौजेपैकीं कांहीं फौज त्यांजवळ ठेवून तिच्या चरितार्थाकरितां त्यांजकडून ते द्रव्य घेऊं लागले. तें द्रव्य ठरवलेल्या मुदतीस येईना. म्हणून त्या संस्थानिकांचें तालुके आपणाकडे लावून घेत चालिले; त्यामुळें इंग्लिशांची गणना हिंदुस्थानांतील संस्थानिकांत झाली. †

हिंदुस्थानच्या इतिहासावरील निरनिराळे ग्रंथ

इ. स. १८५१ त ' शब्दालंकार ' या पुस्तकाच्या कर्त्यानें ' भरतखंडपर्व ' या नांवाचा एक लहानसा इतिहासग्रंथ लिहिला. त्यांत भारतवर्षाच्या इतिहासाचे

* दादोबा पांडुरंग – आत्मचरित्र, पृ. २२

† हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास, पृ. ९०–९१

पौराणिक, प्राचीन व अर्वाचीन असे तीन कालखंड पाडून त्यांमधील मुख्य मुख्य गोष्टींचें थोडक्यांत वर्णन केलें आहे. हें पुस्तक स्वतंत्र रीतीनें लिहिलें असलें, तरी अगदींच संक्षिप्त असल्यामुळें ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीनें त्याला फारसें महत्त्व नाहीं. यानंतर मरे, एल्फिन्स्टन, मॉरिस वगैरे इतिहासकारांच्या इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं. "Of the fourteen which relate to India, the translations of Elphinstone's and Murray's Histories, and of Grant-Duff's Maratha history, are the only ones which possess any literary merit."¶ या न्यायमूर्ति रानड्यांच्या अभिप्रायावरून मरे व एल्फिन्स्टन यांच्या इतिहास-ग्रंथांचीं भाषांतरें सरस वठलीं आहेत हें उघड होतें. इ. स. १८५९–६० मध्यें नरसिंह विनायकशास्त्री ओक यांनीं मरेंकृत हिंदुस्थानच्या इतिहासाच्या पहिल्या दोन भागांचें मराठींत भाषांतर केलें. त्यानंतर इ. स. १८६१ त विष्णुशास्त्री पंडित यांनीं या ग्रंथाच्या तिसऱ्या भागाचें भाषांतर प्रसिद्ध केलें. ह्याशिवाय या काळांत हिंदुस्थानाच्या इतिहासावर आणखीहि अनेक भाषांतरित व आधाररचित ग्रंथ तयार झाले.

विश्वनाथ नारायण मंडलीक (इ. स. १८३३–१८८९)

विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं इ. स. १८६१–६२ त एल्फिन्स्टनच्या इतिहासाचें भाषांतर प्रसिद्ध केलें. हा ग्रंथ विस्तृत आणि माहितीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं या ग्रंथांतील भाषेच्या अशुद्धतेबद्दल त्यावर कडक टीका करून त्यांतील दोषस्थळें दाखविलीं आहेत. मंडलिक यांचा जन्म इ. स. १८३३ त झाला. नवव्या वर्षीं त्यांचें मराठी शिक्षण पुरें झालें. मुंबई येथील एल्फिन्स्टन विद्यालयांत त्यांचें इंग्रजी शिक्षण झालें. "सुमारें बारा वर्षें अनेक सरकारी हुद्द्यांवर नोकरी केल्यानंतर वकिलीची परीक्षा देऊन ते हायकोर्टांत वकिली करूं लागले." थोड्याच अवधींत या धंद्यांत त्यांनीं चांगला नांवलौकिक मिळविला. वक्तशीरपणाबद्दल त्यांची फार प्रसिद्धी होती. त्यांनीं मराठी भाषेंत 'संवयी आणि अभ्यास', 'द्यूतवर्जक संवाद', 'एल्फिन्स्टनच्या इतिहासाचें भाषांतर', 'हिंदु लोकांचा मध्यंतरीय अवस्थेविषयीं विचार', 'हिंदुधर्मशास्त्र' इत्यादि ग्रंथ लिहिले. त्यांचें विस्तृत चरित्र ग. रा. हवालदार यांनीं लिहिलें आहे.

इ. स. १८५७ सालच्या बंडाचा इतिहास

इ. स. १८५७ सालच्या बंडासंबंधीं त्या काळीं मराठी भाषेंत दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. खंडेराव बाळाजी फडके यांनीं पुस्तकें, वर्तमानपत्रें व इतर माहिती

¶ **M. G. Ranade**—*Remarks on the Marathi Catalague.*

यांवरून एक टांचण तयार केलें व त्याचें संक्षिप्त सार इ. स. १८६० त पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें. यांत शेवटीं इंग्रजांना जय देऊन बंडाचा मोड केल्याबद्दल परमेश्वराचें अंतःकरणपूर्वक स्तवन केलें आहे. विनायक कोंडदेव ओक यांनीं इ. स. १८७४ त 'शिपायांच्या बंडाचा इतिहास' या नांवाचा ग्रंथ लिहिला. लोकांच्या बंडाविषयींच्या भ्रामक समजुती दूर करण्याच्या उद्देशानें ग्रंथकर्त्यानें हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. 'हिंदुस्थानकथारस' हा त्यांचा दुसरा स्वतंत्र ग्रंथ त्यांनीं इ. स. १८७१ तच छापला. खंडेराव बाळाजी फडके यांच्या 'हिंदुस्थानांतील बंड' पुस्तकांतील एक उतारा सादर करितों.

"मध्यहिंदुस्थानांत बंडवाल्यांनीं सरकारशीं टकरा दिल्या त्यांत तात्या टोप्याप्रमाणें शूर दुसरा कोणी नसेल. त्यानें सरकारी फौजेशीं पुष्कळ लढाया मारिल्या व पुष्कळ शिपायांस जेर करून त्यांवरील पुष्कळ ऑफिसरांचे टांके ढिले केले. त्याचें धारिष्ट तर एवढें होतें कीं, जनरल स्मिथ, जनरल मिचल, जनरल व्हाइट, लाक, सर ह्यू रोस वगैरे फौजबंद ९ सेनापति पाठीशीं लागले असतां तो निर्धास्त आपली मंडळी शेंदोनशें कोस मागें टाकून एकटाच नर्मदा नदी उतरून थेट दक्षिणेस वळून अशिरगडावर आला. वर्तुळाचा परिघासारिखें इंग्रजी सैन्य त्याचे सभोंवार असून तो मध्यबिंदुसारखा आंत होता व कधीं कधीं त्याचें अंतर कोसा दोन कोसांचेही टप्प्यांत येत असे. परंतु कोणास त्यावर चालून जाऊन त्यास पकडण्याचा हिय्या झाला नाहीं. शेवटीं तात्याचा अत्यंत जवळचा मित्र मानशिंग यानें विश्वासघातानें तारीख ७ माहे एप्रिल सन १८५९ इसवी रोजीं सिरोंग जंगलांत त्यास पकडून मिड साहेबाचे स्वाधीन केलें; नंतर त्यांनीं १८ वे तारखेस शिप्री येथें त्यास फांशीं दिले." ×

ह्याशिवाय शामराव मोरोजी यांची 'श्रीक्षत्रियवंशोद्गममाला', गोविंद रावजी मांडे यांची 'हिंदुस्थानाची शकावळी', विठोबा सोनजी चव्हाण यांचा 'हिंदुस्थानांतील ऐतिहासिक कालक्रम' इत्यादि अनेक महत्त्वाचीं पुस्तकें त्या काळांत प्रसिद्ध झालीं.

हिंदुस्थानांतील अन्य प्रांत आणि संस्थानें यांचा इतिहास

ह्या काळांत गुजराथ, मध्यहिंदुस्थान आणि गोमांतक या प्रांतांचें इतिहास प्रसिद्ध झाले. कॅप्टन आर्चिबाल्ड म्याकडोनल्ड यांनीं इ. स. १८५० त जेम्सबर्ड याच्या अली महमदखान यांच्या इंग्रजी भाषांतरावरून 'गुजराथ देशाचा इतिहास'

× हिंदुस्थानांतील बंड, पृ. २७

लिहिला. विनायक जनार्दन कीर्तने यांनीं इ. स. १८७१ त मालकमच्या ‘ Central India ’ या ग्रंथाचें मराठींत भाषांतर केलें. इ. स. १८७३ त यशवंत फोंडबा नाईक दणाईत व रामचंद्र गोविंद वागळे यांनीं गोमांतकाचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास ’ लिहिला. याशिवाय अर्काट येथील रामचंद्रराव यांचा ‘ टिपुसुलतानपदच्युति ’ (इ. स. १८५०) आणि विश्वनाथ कृष्ण यांचा ‘ कोल्हापूर प्रांताचें वर्णन ’ (इ. स. १८५७) हे दोन ग्रंथहि प्रसिद्ध झाले.

इंग्लंडचा इतिहास

इ. स. १८३२-३४ सालीं मुंबईच्या शिक्षा मंडळीनें इंग्लंड देशाची बखर दोन भागांत प्रसिद्ध केली. हा ग्रंथ बहुधा बाळशास्त्री जांभेकर यांनीं लिहिला असावा असें वाटतें; कारण हरि केशवजींनीं आपल्या इंग्लंडाच्या वृत्तान्तात त्यांचा उल्लेख+ केला आहे. यानंतर नाना नारायण यांनीं इ. स. १८३५ त मिस् बर्ड हिच्या इंग्रजी ग्रंथावरून ‘ इंग्लंड देशाचें वर्णन ’ लिहिलें. त्यांत या देशांतील लोकांची स्थिति आणि व्यावहारिक नीति यांचें कार्यकारणभावासहित विवरण केलें आहे. इ. स. १८३८ त हरि केशवजी यांनीं ‘ इंग्लंडाचा वृत्तान्त ’ हें भाषांतरात्मक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत बापानें मुलांस पत्ररूपानें इंग्लंडचा इतिहास निवेदन केला आहे, “ त्या देशींचे लोक आतां येथें राज्य करतात, ते शाहाणे व गुणी आहेत. याजकरितां येथील लोकांनीं त्यांचा वृत्तान्त जाणून घ्यावा. ते जेणेंकरून इतक्या चातुर्यास व वैभवास पावले, त्या गोष्टी समजल्या असतां मोठ्या उपयोगी पडतील, याजकरितां तो वृत्तान्त मीं थोडक्यांत लिहावयास आरंभिला आहे. ” असें हरि केशवजींनीं ह्या भाषांतराच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. या पुस्तकांतील एक परिच्छेद खालीं उद्धृत करितों:—

> “ विलियम मोठा धैर्यवान, बुद्धिवान, अभिमानी, मसलती, क्रूर, खुनसी, बलात्कारी असा असे. आपला चहुंकडेस डंका वाजवावा असें यास फार आवडे, याणें संग्रह करीत असावा, आणि तें डौल दिमाखाखालीं उडवीत असावें. हा एकाएक उतावळीनें कामास हात घाली खरा, परंतु संकटसमयीं हा शांत असे, विचार करी, आणि त्रासत नसे. नार्मोडीकरांच्या लेखांत असें आहे कीं, हा आठ फुटीवर उंच, याचें शरीर चांगलें सुदृढ व अवयव सुशोभित असत; याचें धनुष्य याच्या दर्बारी लोकांतील कोणासही वांकत नसे इतकें याचें आंगी बळ असे. हा थोडें बोले, आणि लान्फ्रयांक म्हणून जो क्यांतृबरीचा मुख्य धर्माध्यक्ष, त्यावांचून कोणाशींही प्रसन्नवदन

+ इंग्लंडाचा वृत्तान्त, पृ. २७९

नसे, हा सर्वांस भयरूप व बहूतांस त्रासरूप असतांही याने मोठी युक्ति करून आपल्या वंशास राज्य मिळे असें करून ठेविलें, त्याप्रमाणें त्याचा वंश त्या राज्याचा उपभोग अजून करीत आहे. या पत्रांत जें वर्तमान लिहिलें आहे त्याचें चांगलें मनन करून पुढें प्रश्न लिहिले आहेत त्यांचीं उत्तरें सांगावीं. लो. हे. आशीर्वाद. "×

परराष्ट्रांचा इतिहास

मुंबई येथील मिसेस विल्सन या खिस्ती धर्मप्रचारिकेनें इ. स. १८३५–३६ च्या सुमारास आशूरी (Assyrians), बाबेली (Babylonians), मेदी (Medes), पार्शी (Persians) आणि ग्रेकी (Grecians) ह्या लोकांचे वृत्तान्त पुस्तकरूपानें वर्णिले. त्यानंतर बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दिग्दर्शन' मासिकांत 'ग्रीस देशाचा इतिहास' प्रसिद्ध झाला होता. त्रैमासिक 'ज्ञानदर्शनांत' हि (इ. स. १८५४) युरोप खंडाच्या अर्वाचीन इतिहासाची देशवार माहिती दिली होती. याशिवाय भाऊशास्त्री पेठकर यांनींहि मराठी ज्ञानप्रसारकांत (इ. स. १८५८–५९) 'ग्रीस देशाचा इतिहास' लिहिला होता.

याखेरीज 'ग्रीस आणि रोम या देशांच्या इतिहासावर' आणखीहि दोनतीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. शिवराम गणपतराव बाव्रस यांनीं इ. स. १८७४ त 'फ्रेंच आणि जर्मन लोकांच्या लढाईचा इतिहास' लिहिला.

जगाचा इतिहास

जगाच्या सामान्य इतिहासावर या काळांत पांचसहा पुस्तकें प्रसिद्ध झालीं. हरी रघुनाथ गाडगीळ यांनीं मार्शमनच्या "Brief survey of History" या ग्रंथाचें भाषांतर केलें. हरी बळवंत जोशी यांची 'इतिहासरूपदर्शिका' आणि जनार्दन बाळाजी मोडक यांचें 'जगाच्या इतिहासाचें सामान्य निरूपण' (Outline of Universal History) हीं दोन्हीं पुस्तकें बऱ्यापैकीं आहेत. इंग्रजी भाषेंतील इतिहास-ग्रंथांचीं भाषांतरें करून या काळांतील लेखकांनीं आपल्या देशबांधवांना हिंदुस्थानाच्या व जगांतील इतर देशांच्या इतिहासाची माहिती करून दिली. कीर्तने-भिडे-सरंजामे यांनीं मात्र स्वतंत्र ग्रंथरचनेचा प्रयत्न करून स्वदेशाच्या इतिहासाविषयीं महाराष्ट्रांत आस्था उत्पन्न केली.

× इंग्लंडाचा वृत्तान्त, पृ. १३–१४

चरित्रें

प्राचीन चरित्रग्रंथ

प्राचीन मराठी वाङ्मयांतील चरित्र-ग्रंथांची संख्या फार थोडी असून ते ग्रंथहि प्रायः पद्यमयच आहेत. त्यांतहि पराक्रमी पुरुषांच्या जीवनक्रमापेक्षां अद्‌भुत चमत्कारांनीं भरलेल्या साधुसंतांच्या चरित्राकडेच लेखकांचा जास्त कल दिसून येतो. महानुभावीय वाङ्मयांतलि लीलाचरित्रादि ग्रंथ आणि मराठेशाहींतील ऐतिहासिक बखरी एवढेंच काय ते मराठी भाषेंतील प्राचीन चरित्रात्मक गद्यग्रंथ होत. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं इंग्रजी वाङ्मयाच्या संसर्गानें मराठी वाङ्मयांत विलक्षण स्थित्यंतर घडलें. आणि त्यामुळें लौकिक क्षेत्रांतील थोर व्यक्तींचीं चरित्रें लिहिण्याची प्रवृत्तीहि वाढत चालली. चमत्कारांचें प्रस्थ कमी होऊन सत्य आणि संभाव्य गोष्टींवरच भर देण्यांत येऊं लागला; तरी अद्‌भुताचा पगडा अजिबात नाहींसा झाला होता असें दिसून येत नाहीं. मराठी भाषेंत सुरुवातीला प्रसिद्ध झालेलीं चरित्रें हीं इंग्रजींतील अगदीं सामान्य ग्रंथांचीं भाषांतरें होतीं, त्यामुळें चरित्रलेखन ही एक कला आहे याची आमच्या लेखकांना मुळींच कल्पना आली नाहीं. अर्थात् त्या वेळचे चरित्रात्मक स्वतंत्र वाङ्मयहि अत्यंत निकृष्ट प्रतीचें उतरलें असलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

स्वकीयांचीं चरित्रें

कलकत्ता येथील फोर्ट विल्यम कॉलेजमधील मराठीचे अध्यापक पंडित वैजनाथ शर्मा यांनीं इ. स. १८१६ सालीं श्रीरामपूर येथें ‘ राजा प्रतापादित्याचें चरित्र ’ मराठी भाषेंत छापिलें. हें पुस्तक प्रथमतः पंडित रामराय बसू यांनीं इ. स. १८०१ मध्यें बंगालींत प्रसिद्ध केलें. त्याचेंच भाषांतर पंडित वैजनाथ यांनीं केलें. अर्वाचीन मराठी वाङ्मयांतील हा पहिला चरित्रग्रंथ होय. यानंतर क्यापटन म्याकडोनल्ड यांनीं इ. स. १८५२ त खासगी दप्तरावरून व प्रसिद्ध पुस्तकांवरून ‘ नाना फडणवीस यांची बखर ’ लिहिली. तिचाच सुबोध सारांश विष्णुशास्त्री पंडित यांनीं पुढें इ. स. १८५९ त प्रसिद्ध केला. क्यापटन म्याकडोनल्ड यांच्या बखरींतील एक उतारा येथें उदधृत करितों.

> “ माधवराव पेशवे यांस नानांनीं दाबांत ठेविलें होतें, त्याविषयीं त्यांस मुळापासूनच त्रास आलेला होता, व त्यांचे चुलत भावाचे त्यांस वारंवार कपटी निरोप येत, तेणेंकरून त्यांस फारच राग येऊन निराशा व दुःख झालें. ते अगदींच आपल्या महालांतून बाहेर निघतनासे झाले व दरबारामध्यें येतनासे झाले. ते तापाचें निमित्त सांगत. अकटोबरचे बाविसाव्या तारखेस दसरा आला ते दिवशीं पेशवे आपले फौजेसुद्धां मोठ्या डामडौलानें आणि

वैभवानें सीमोल्लंघनास निघाले. आणि संध्याकाळीं सरकार वाड्यांत आल्यावर सर्व बडे लोकांचा व मोठाल्या वकीलांचा दरसालाप्रमाणें दरबार झाला. परंतु अंतःकरणांत दुःख व खेद होऊन ते प्राणावर उदार झाले. मनांमध्यें फारच खेद उत्पन्न होऊन अकटोबरचे पंचविसाव्या तारिखेस प्रातःकाळीं त्यांनीं समजून उमजून राजवाड्याचे बाराद्वारीवरून खालीं उडी टाकिली; तों शरिराचे दोन अवयव तुटले व कारंजाचे नळीवर पडल्यामुळें ते फारच जखमी झाले होते. त्यानंतर पुढें ते दोन दिवसपर्यंत होते. शेवटीं त्यांनीं बाजीरावास गादीवर बसवावें असें मोठ्या उत्सुकतेनें सांगून बाबूराव फडके यांचा त्यांजवर फारच लोभ होता, त्यांस त्यांनीं कवटाळून धरिलें असतां प्राण सोडला. " §

भास्कर हरि भागवत यांनीं इ. स. १८५८ त 'कलकत्ता रिव्यू' नामक इंग्रजी त्रैमासिकावरून राजा राममोहन राय' यांचें चरित्र लिहिलें. यानंतर जनार्दन रामचंद्रजी यांनीं इ. स. १८६० मध्यें 'कविचरित्र' या नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला. हा ग्रंथ अनेक संस्कृत, प्राकृत व इंग्रजी पुस्तकांच्या आधारें लिहिला आहे, यांत हिंदुस्थानांतील प्राचीन व अर्वाचीन कवि आणि ग्रंथकार यांचा इतिहास वर्णिला आहे. महाराष्ट्रांतील प्रमुख विद्वान् म्हणून बाळशास्त्री जांभेकर यांचेंहि चरित्र यांत आलें आहे. हनुमंतस्वामी यांनीं लिहिलेल्या श्रीरामदास-चरित्राच्याहि दोन भिन्न प्रती त्या काळीं प्रसिद्ध झाल्या.

श्रीविष्णुबावा ब्रह्मचारी यांचें चरित्र

रामचंद्र पांडुरंग आजरेकर यांनीं इ. स. १८७३ त वेदोक्तधर्ममंडळीच्या आज्ञेवरून 'श्रीविष्णुबावा ब्रह्मचारी यांचें चरित्र' लिहिलें. यांत बावांनीं स्वमुखानें सांगितलेल्या व ग्रंथकारानें स्वतः अनुभविलेल्या गोष्टी ग्रथित केल्या आहेत. यांमधील खालील उताऱ्यावरून या ग्रंथाची धाटणी लक्षांत येईल.

"हल्लीं या भूगोलावर जे साधु म्हणविणारे किंवा म्हणून घेणारे असे क्वचित् क्वचित् सत्पुरुष आहेत; परंतु त्यांचें साधुत्व स्वतःपुरतेंच आहे. कारण या साधूंनीं कोणास सदुपदेश केला किंवा वेदप्रतिपाद्य धर्माचा खरेपणा दाखविला असें कोठेंच दिसण्यांत आलें नाहीं. कारण त्या साधूंनीं कोणाशीं बोलूंच नये आणि जर कदाचित् बोलले तर भ्रमिष्टाप्रमाणें संबंधरहित अनेक भाषांत बडबडावें व मंत्रचळ्याप्रमाणें सोंवळेपणाचा आव घालून कोणाशीं धडपणीं बोलूंच नये, शिवूं नये; आणि जर क्वचित् बोललेच तर मनुष्य पाहून बोलावें

§ नाना फडनवीस यांची बखर, पृ. १२५

यामुळें अशा भितऱ्या साधूंचा लोकांस उपयोग नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. जो साधु स्वतःचें हित करून दुसऱ्याचेंही हित करील तो मात्र साधु, जगदोद्धारक, परोपकारी व दयाळू समजावा. पाहा, या बावाजींनीं लोकहितार्थ अनेक ग्रंथ करून व बहुत सभा करून वेदोक्तधर्माचा सिद्धान्त व धर्म म्हणजे काय व त्याचा विचार करण्याची रीत कोणती व तरणोपाय होण्याचा सुलभ मार्ग कोणता हें सर्व जागोजाग दाखविलें आहे. " ‡

परकीयांचीं चरित्रें

या काळांत पाश्चात्य देशांतील साक्रेतिस, कोलंबस, कप्तान कुक, मार्तिन लूथर, जॉर्ज वाशिंग्टन, बेंजामिन फ्रांकलीन इत्यादि थोर पुरुषांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं. महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं इ. स. १८४९ त रॉबर्टसन कृत अमेरिकेच्या इतिहासाच्या द्वितीय पुस्तकावरून 'कोलंबसाचा वृत्तान्त' लिहिला. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं 'साक्रेतिसाचा इतिहास' (इ. स. १८५२) लिहिला. गणेशशास्त्री लेले यांनीं 'कप्तान कुक याच्या जलपर्यटणाचा वृत्तान्त' (इ. स. १८५३) प्रसिद्ध केला. विष्णु परशुराम रानडे यांनीं 'जॉर्ज वाशिंग्तन याचा इतिहास' (इ. स. १८७२) निवेदन केला. अशा तऱ्हेचे इंग्रजी पुस्तकांच्या आधारें लिहिलेले अनेक चरित्रग्रंथ प्रसिद्ध झाले. 'बॉम्बे ट्रॅक्ट आणि बुक सोसायटी' या खिस्तीधर्मप्रसारक संस्थेनेंहि 'रोम बादशहांचा वृत्तान्त' (इ. स. १८५१), 'लुथरचा इतिहास' (इ. स. १८५२), 'महंमदाचा वृत्तान्त' (इ. स. १८५३), इत्यादि चरित्रें प्रसिद्ध केलीं. महादेवशास्त्री कोल्हटकर यांच्या 'कोलंबसाचा वृत्तान्त' या ग्रंथांतील एक उतारा खालीं देत आहे.

> " अशी निराशा होत गेल्यामुळें कोलम्बसास परम दुःख झालें, आणि यानें जो आपला भाऊ इंग्लान्दचे दरबारांत पाठविला होता त्याजकडील कांहीं वर्तमान न आल्यामुळें तर त्या दुःखांत फारच भर पडली. बार्थोलोमेओ हा जलमार्गानें इंग्लान्दास जात असतां, दुर्दैवामुळें तो समुद्रांतील चांचे लोकांच्या हातीं सांपडला. त्यांनीं त्यास सर्वस्वीं नागवून किती एक वर्षें बंदिशाळेंत अडकवून टाकिला होता. शेवटीं तो तेथून पळून गेला आणि लंडन शहरास जाऊन पोंचला. परंतु ते वेळेस त्यास दरिद्रानें इतकें पीडिलें होतें, कीं दरबारांत घालून जाण्याजोगा जामानिमा करण्यापुरता तरी पैसा मिळविण्याकरितां बरेच दिवस त्याला नकाशे काढून विकण्याचें प्राप्त पडलें. नंतर कोलम्बसानें इंग्लान्दचा राजापाशीं निवेदन करण्याकरितां ज्या गोष्टी त्यास सांगितल्या होत्या, त्या त्यानें त्या राजापाशीं निवेदन केल्या. हेन्री राजा

‡ श्री. विष्णुबावा ब्रह्मचारी यांचें चरित्र, पृ. ४७

अतिशय संशयी, आणि कृपण स्वभावाचा होता, त्यामुळें तो नवीन आणि खर्चाचे कामांत मन घालीत नसे, तथापि कोलम्बसाचे बोलण्याचा त्यानें जसा अधिक खुष मर्जीनें स्वीकार केला, तसा ज्या अन्य राजांकडे तें बोलणें लाविलें होतें त्यांनीं केला नाहीं." ×

मराठी ज्ञानप्रसारक मासिकांतूनहि शिवाजी महाराज, अहल्याबाई, बुद्ध, महंमद, सर आयझक न्यूटन, ग्रीस देशांतील सप्तज्ञानी, विलियम जोन्स इत्यादि अनेक थोर व्यक्तींचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं होतीं.

* * *

परिशिष्ट

इतिहास

मराठ्यांचा इतिहास

१. रघूजी भोंसल्याची वंशावळी, श्रीरामपूर, इ. स. १८१६
२. मराठ्यांची बखर–ग्रांट डफच्या मराठ्यांच्या इतिहासाचें भाषांतर, क्याप्टन डेविड केपन मुंबई, इ. स. १८२९
३. महाराष्ट्र देशाचें वर्णन–दे. अ. इजदेल साहेबानें केलेल्या ग्रांट डफच्या सारांशरूप ग्रंथाचें भाषांतर, कुशाबा लिमये पुणें, इ. स. १८४०
४. मराठ्यांचा संक्षिप्त इतिहास–प्र. गणपत कृष्णाजी मुंबई, इ. स. १८३१ (म. वा.)
५. शाळांकरितां महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास बाबा पदमनजी, मुंबई, इ. स. १८६६
६. ग्रांट डफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका–पुणें कॉलेजांतील एक विद्यार्थी (नीळकंठ जनार्दन कीर्तने) मुंबई, इ. स. १८६८

मराठेशाहींतील सरदार घराण्यांचा इतिहास

७. सातारचे श्रीमंत छत्रपति शिवाजी महाराज यांचें वंशाचा व प्रतिनिधि आणि अष्टप्रधान यांचा इतिहास–विष्णु गोपाळ भिडे, भोर, इ. स. १८६६

× कोलम्बसाचा वृत्तान्त, पृष्ठ २२–२३.

८. सातारचे छत्रपति यांचे प्रतिनिधि घराण्याचा इतिहास—गोपाळ बल्लाळ ढापरे, पुणें, इ. स. १८६७ (इं. ऑ.)

९. शिंदे अलिजाबहादर ह्यांचे घराण्याचा इतिहास—जगन्नाथ प्रभाकर सरंजामे पुणें इ. स. १८७२

हिंदुस्थानचा इतिहास

१०. हिंदुस्थानचा इतिहास–एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानच्या–इतिहासाचा सारांश–बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, इ. स. १८४६

११. हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास–बाळशास्त्री जांभेकर मुंबई, इ. स. १८४९

१२ भरतखंडपर्व–' शब्दालंकार ' नामक ग्रंथाच्या कर्त्यानें रचिलें. पुणें, इ. स. १८५१

१३. हिंदुस्थानचा इतिहास–भाग १–२ (मरेचें भाषांतर) नरसिंह विनायकशास्त्री ओक, मुंबई, इ. स. १८५९–६०

१४. हिंदुस्थानचा इतिहास–भाग ३ (मरेचें भाषांतर) विष्णुशास्त्री पंडित मुंबई, इ. स. १८६१

१५. हिंदुस्थानांतील बंड–खंडेराव बाळाजी फडके, रत्नागिरी, इ. स. १८६०

१६. हिंदुस्थानचा इतिहास–भाग ३ (एल्फिन्स्टनचें भाषांतर) विश्वनाथ नारायण मंडलिक मुंबई, इ. स. १८६१–६२

१७. हिंदुस्थानचा इतिहास–विश्वनाथ महादेव गोखले, इ. स. १८६३ (ब्रि. म्यु.)

१८. हिंदुस्थानचा इतिहास– मुंबई, इ. स. १८६८

१९. हिंदस्थानचा संक्षिप्त इतिहास–विनायक कोंडदेव ओक, मुंबई इ. स. १८६८

२०. हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास–शि. भा. काणे, रा. ह. आगाशे, रत्नागिरी इ. स. १८६९ (इं. ऑ.)

२१. हिंदुस्थानाचा इतिहास–कृष्णाजी प्रभाकर काळे (मॉरिसचा सारांश) ठाणें, इ. स. १८६९

२२. हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास–वासुदेव रामचन्द्र मोहोनी, इ. स. १८६९ (म. वा.)

२३. अर्वाचीन बखर–पिनॉकच्या ' Modern History ' या ग्रंथाचें भाषांतर–सदोबा पवार, मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)

२४. श्रीहरिचरित्रमंजरी-(भरतखंडभूपतिकथातत्त्व) शामराव मोरोजी, मुंबई, इ. स. १८७०
२५. हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास-गोविंद रामचन्द्र फणसळकर, मुंबई, इ. स. १८७१ (इं. ऑ.)
२६. हिंदुस्थानकथारस-विनायक कोंडदेव ओक, मुंबई, इ. स. १८७१
२७. इतिहासावर संक्षिप्त टांचण-लक्ष्मण वामन खोत, इ. स. १८७१ (म. वा.)
२८. इतिहासपत्रक-त्रिविक्रम रामचंद्र आठल्ये इ. स. १८७२ (म. वा.)
२९. हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास-भगवंत रावजी बोरामणीकर, भुजंग आबाजी कानडे, सोलापूर, इ. स. १८७३ (म. वा.)
३०. हिंदुस्थानाचा इतिहास-भास्कर धोंडदेव गोखले, बेळगांव, इ. स. १८७३ (इं. ऑ.)
३१. शिपायांच्या बंडाचा इतिहास-विनायक कोंडदेव ओक, मुंबई, इ. स. १८७४

किरकोळ ग्रंथ

३२. श्रीक्षत्रियवंशोद्गममाला-शामराम मोरोजी-मुंबई, इ. स. १८५५
३३. हिंदुस्थानाची शकावळी-(इंग्रजीवरून भाषांतर) गोविंद रावजी मांडे, मुंबई, इ. स. १८६०
३४. हिंदुस्थानांतील ऐतिहासिक कालक्रम-विठोबा सोनजी चव्हाण, रत्नागिरी, इ. स. १८७१ (इं. ऑ.)
३५. सनसमूह-बाळकृष्ण केशव पारखी, पुणें इ. स. १८७२ (इं. ऑ.)

हिंदुस्थानांतील अन्य प्रांत आणि संस्थानें यांचा इतिहास

३६. गुजराथ देशाचा इतिहास-ए. म्याकडोनल्ड, मुंबई, इ. स. १८५०
३७. टिपूसुलतानपदच्युति-रामचंद्रराव मद्रास, (मोडींत छापिली) मद्रास, इ. स. १८५० (इं. ऑ.)
३८. कोल्हापूर प्रांताचें वर्णन-विश्वनाथ कृष्ण, कोल्हापूर, इ. स. १८५७ (ग्रां. कॅ.)
३९. मध्य हिंदुस्थानाचा इतिहास-विनायक जनार्दन कीर्तने, मुंबई, इ. स. १८७१

४०. गोमांतकाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास-यशवंत फोंडबा नाईक दणाईत, व रामचंद्र गोविंद वागळे, मुंबई, इ. स. १८७३

४१. कोल्हापूर संस्थानाचा प्रश्नोत्तररूप इतिहास (भाग २), बाळाजी प्रभाकर मोडक, इ. स. १८७३-७४ (म. वा.)

इंग्लंडचा इतिहास

४२. इंग्लंड देशाची बखर-भाग २ मुंबईचे शिक्षा मंडळीकरितां- पुणें, इ. स. १८३२-३४

४३. इंग्लंड देशाचें वर्णन-नाना नारायण, मुंबई, इ. स. १८३५

४४. इंग्लंडचा वृत्तान्त-हरि केशवजी, मुंबई, इ. स. १८३८

४५. इंग्लिश इतिहाससार-खंडेराव बाळाजी फडके-रत्नागिरी, इ. स. १८६०

४६. इंग्लंड देशाचा इतिहास-भिकाजी कृष्ण, धारवाड, इ. स. १८६० (ग्रां. कॅ.)

४७. इंग्लंडाचा प्रश्नोत्तररूप संक्षिप्त इतिहास-रामचंद्र विनायक रणजित, मुंबई, इ. स. १८७०

४८. इंग्लंडचा प्रश्नोत्तररूप इतिहास-गो. रा. वझे आणि श्री. म. शौचे, मुंबई, इ. स. १८७१

परराष्ट्रांचा इतिहास

४९. आशुरी आणि बाबेली लोकांचे वृत्तान्तकथन- मडम् विलसन, मुंबई, इ. स. १८३५

५०. मेदी आणि पार्शी लोकांचे वृत्तान्तकथन-मडम् विलसन, मुंबई, इ. स. १८३८

५१. ग्रेकी लोकांचे वृत्तान्तकथन-मडम् विलसन, मुंबई, इ. स. १८३८

५२. प्राचीन मिस्त्री लोकांचे वृत्तान्तकथन-मडम् विलसन मुंबई, इ. स. १८३९

५३. रोम शहराचा संक्षिप्त इतिहास-वासुदेव कृष्ण म्हाले, मुंबई, इ. स. १८५७

५४. ग्रीस देशाचा संक्षिप्त इतिहास-आसेंब्लीच्या शाळेंतील एक विद्यार्थी, मुंबई, इ. स. १८६७

५५. फ्रेंच आणि जर्मन लोकांच्या लढाईचा इतिहास–
शिवराम गणपतराव बाब्रस, पुणें, इ. स. १८७४

जगाचा इतिहास

५६. जगाच्या इतिहासाचें संक्षिप्त निरीक्षण (भाग २)
हरि रघुनाथ गाडगीळ, मुंबई, इ. स. १८५२–५७ (ग्रां. कॅ.)

५७. इतिहासरूपदर्शिका–बळवंत हरि जोशी, बोरगांवकर,
पुणें, इ. स. १८६७ (ब्रि. म्यु.)

५८. जगाचा संक्षिप्त इतिहास–व्यंकोजी गोपाळ बेहेरे
बेळगांव, इ. स. १८७१

५९. जगाचा संक्षिप्त इतिहास–रघुनाथ आबाजी नारूरकर,
सातारा, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

६०. जगाच्या इतिहासाचें सामान्य निरूपण–
जनार्दन बाळाजी मोडक, मुंबई, इ. स. १८७२

६१. जगाच्या इतिहासावर संक्षिप्त प्रश्नोत्तरें–कुकडे आणि
धनेश्वर, अहमदनगर, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

चरित्रें

स्वकीयांचीं चरित्रें—

१. राजा प्रतापादित्याचें चरित्र–(बंगालीवरून) वैजनाथ शर्मा, श्रीरामपुर
इ. स. १८१६ (ब्रि. म्यु.)

२. नाना फडनवीस यांची बखर–ए. म्याक्डोनल्ड, मुंबई, इ. स. १८५२

३. राजा राममोहन राय यांचें चरित्र–(इंग्रजीवरून) भास्कर हरि भागवत,
मुंबई, इ. स. १८५८

४. नाना फडनवीस ह्यांची संक्षिप्त बखर–विष्णुशास्त्री पंडित
मुंबई, इ. १८५९

५. कविचरित्र––जनार्दन रामचंद्रजी, मुंबई, इ. स. १८६०

६. श्रीरामदासस्वामींचे चरित्रांची बखर—(हनुमंतस्वामीकृत)
प्र. वि. रा. बापट आणि ना. ल. दिघे, मुंबई, इ. स. १८७०

७. श्रीरामदासस्वामींचें चरित्र–(हनुमंतस्वामीकृत)
प्र. महादेव विनायक चौबळ, ठाणें, इ. स. १८७१

८. तुकाराम याची गोष्ट--बॉंबे बुक आणि ट्राक्ट सोसैटी. मुंबई, (आवृत्ति ४ थी) इ. स. १८७१

९. विष्णुबावा ब्रम्हचारी यांचें चरित्र—रामचन्द्र पांडुरंगशास्त्री आजरेकर, मुंबई, इ. स. १८७३

१०. चांदबी इतिहास—सायन्ना सोमण्णा, पुणें, इ. स. १८७३

परकीयांचीं चरित्रें

११. कोलंबसाचा वृत्तान्त-(इंग्रजीवरुन) महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर, मुंबई, इ. स. १८४९

१२. रोम बादशहाचा वृत्तान्त-बॉ. बु. ट्रा. सो. मुंबई, इ. स. १८५१

१३. साक्रेतिसाचा इतिहास-(रोलिनच्या ग्रंथावरुन) कृष्णशास्त्री चिपळूणकर, पुणें, इ. स. १८५२.

१४. लुथराचा इतिहास-बॉ. बु. ट्रा. सो. मुंबई, इ. स. १८५२

१५. खुसरू राजाचा इतिहास-(रोलिनवरुन) विष्णु मोरेश्वर भिडे पुणें, इ. स. १८५२

१६. कप्तान कुक साहेब याचे जलपर्यटणाचा वृत्तान्त - (रेव्हरंड बिंगलेच्या ग्रंथावरुन) गणेश सदाशिवशास्त्री लेले, पुणें, इ. स. १८५३

१७. तेलेमेकस ह्याचा वृत्तान्त-गणेश सदाशिवशास्त्री लेले

१८. महंमदाचा वृत्तान्त-बॉ. बु. ट्रा. सो. मुंबई, इ. स. १८५३

१९. कॅथेरिनचा इतिहास-(The story of Catherine of Russia) (भाषांतर) कृष्णाजीपंत जोगळेकर मुंबई इ. स. १८६० (ग्रा. कॅ.)

२०. बेंजामिन फ्रांकलिन याचें चरित्र-रामचंद्र गोविंद करंदीकर मुंबई, इ. स. १८७१

२१. जार्ज वाशिंग्तन याचा इतिहास-(इंग्रेजीवरुन) विष्णु परशुराम रानडे, मुंबई, इ. स. १८७२

२२. राबर्त क्लैव याचा वृत्तान्त-(मेकॉलेच्या निबंधावरुन) विनायक नारायण भागवत, मुंबई, इ. स. १८७३

२३. पीतर धि ग्रेत ह्यांचें चरित्र (इंग्रेजीवरुन)- विनायक कोंडदेव ओक, मुंबई, इ. स. १८७४

* * *

७ : व्याकरण–कोश–भाषा इत्यादि

व्याकरण–भाषाशास्त्र

बाराव्या शतकापासून मराठी भाषेमध्यें उत्तमोत्तम ग्रंथ निर्माण होत असतांहि आमच्यांतील शास्त्री–पंडितांना आपल्या मातृभाषेचें व्याकरण रचण्याची इच्छा झाली नाहीं. महानुभावी पंडितांनीं कांहीं व्याकरण–ग्रंथ लिहिले; परंतु ते सांकेतिक लिपींत असल्यामुळें त्या विशिष्ट पंथांतील लोकांनाच त्यांचा उपयोग झाला. हिंदुस्थानांत खिस्ती धर्माचा प्रसार करीत असतां मिशनरी लोकांना देशभाषा शिकण्याची आवश्यकता वाटूं लागली, आणि त्यासाठीं त्यांनीं निरनिराळ्या प्रांतिक भाषांचीं व्याकरणें तयार करण्याचा उपक्रम केला. इंग्रजी राज्य स्थापन होण्यापूर्वींच मराठीचीं व्याकरणें पोर्तुगीज भाषेंत लिहिलीं गेलीं होतीं. परंतु महाराष्ट्रांतील लोकांसाठीं मराठी भाषेचें व्याकरण इ. स. १८३६ सालींच प्रथम प्रसिद्ध झालें.

मराठीचें व्याकरण (मराठी)

इ. स. १८२४ पर्यंत मराठी भाषेच्या व्याकरणाचा महाराष्ट्रांत मागमूसहि नव्हता. बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी जॉर्ज जर्व्हिस यांनीं आपल्या हाताखालील तिघां पंडितांना मराठी भाषेचें व्याकरण करण्याविषयीं आज्ञा केली. त्यांनीं संस्कृत व्याकरणाच्या धर्तीवर एक वर्षांत मराठीचें व्याकरण तयार केलें. त्यानंतर रामचंद्रशास्त्री जान्हवेकर यांनीं त्याचाच सारांश प्रश्नोत्तररूपानें लिहून काढिला. या दोन्ही व्याकरणांच्या हस्तलिखित प्रतींवरूनच बारा वर्षेंपर्यंत व्याकरण शिकविण्याचें काम चाललें होतें. इ. स. १८३१ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'सारसंग्रह' पुस्तकांत व्याकरणविषयक एक प्रकरण आहे. त्यांतील कांहीं ओळी खालीं देत आहे.

" प्र० व्याकरण म्हणजे काय ?

उ० व्याकरण म्हणजे अर्थानुसंधानानें शुद्ध आणि चांगलें बोलायची विद्या.

प्र० व्याकरणाचे भाग किती ?

उ० शब्दशुद्धि आणि वाक्ययोजना

प्र० शब्दशुद्धि म्हणजे काय ?

उ० शब्दांचे स्वरूपाचा शोध, त्यांचे प्रकार आणि त्यांचा अनेक जातींचीं रूपें हीं ज्या भागांत सांगितलीं आहेत त्याचें नांव शब्दशुद्धि.

प्र० वाक्ययोजना म्हणजे काय ?

उ० वाक्यांत शब्द कसे योजावे, व कोणता शब्द कोठें लिहावा हा विचार ज्या भागांत आहे त्याचें नांव वाक्ययोजना.

प्र० महाराष्ट्रभाषेंत शब्दांच्या जाती किती ?

उ० पांच. नाम, सर्वनाम, क्रियापद, विशेषण आणि अव्यय.

प्र० नाम म्हणजे काय ?

उ० दृश्य किंवा अदृश्य वस्तूंचीं जीं नांवें तीं या जातींचीं आहेत जसें-मुंबई, घोडा, ज्ञान इत्यादिक. " *

बालबोध व्याकरण-ग्रंथ

इ. स. १८३६ त बाळशास्त्री जांभेकर आणि गंगाधरशास्त्री फडके, यांनीं आपलीं मराठी व्याकरणें प्रसिद्ध केलीं. या दोन्ही व्याकरणाच्या प्रथमावृत्तीच्या प्रती उपलब्ध नसल्यामुळें यांपैकीं कोणतें आधीं छापलें गेलें हें सांगणें कठीण आहे. ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालयांत इ. स. १८३८ सालीं छापलेली बालव्याकरणाची एक प्रत आहे. ही जांभेकरांच्या व्याकरणाचीच दुसरी आवृत्ति असावी असें वाटतें. गंगाधरशास्त्री यांनीं आपल्या ग्रंथांत पुणें प्रांतींची भाषा मुख्य धरून तदनुसार प्रकृतिप्रत्ययभावविचार केला आहे....हा ग्रंथ फार संक्षिप्त झाला आहे. यामुळें बारीक विषय तसेच राहिले आहेत. " मुंबईच्या शिक्षामंडळीनें 'महाराष्ट्र भाषेचा कोश' तयार करण्यासाठीं जें शास्त्रीपंचक नेमलें होतें, त्यांत गंगाधरशास्त्री हे एक होते. त्यांनीं बाळशास्त्री जांभेकर यांच्या सांगण्यावरून विधवाविवाहावर एक अनुकूल ग्रंथ लिहिल्याचा उल्लेख जांभेकरांच्या चरित्रांत आढळतो. त्यांचें 'हिंदुधर्मतत्व' (इ. स. १८५२) हें पुस्तकहि चांगलें प्रसिद्ध होतें.

दादोबा पांडुरंग (इ. स. १८१४-१८८२)

याच वर्षीं (इ. स. १८३६) दादोबा पांडुरंग यांनीं आपलें 'मराठी भाषेचें व्याकरण' प्रसिद्ध केलें. त्याच्या प्रस्तावनेंत आपल्या अंगीं पुरेशी पात्रता नसतांहि आपण या कामाला कां प्रवृत्त झालों त्याबद्दल दादोबा पांडुरंग यांनीं खालीलप्रमाणें खुलासा केला आहे. " कोश, व्याकरणादि ग्रंथ जांस चौघांचें अनुमत अवश्य असलें पाहिजे, असे ग्रंथ सिद्ध करणें हीं आश्रयाचीं कामें पंडितांकरवीं चालविलीं पाहिजेत. तेव्हां त्यांजपासून जें निष्पन्न होईल तें जगमान्य पडेल. जा समयीं कोश झाला, ती एक विस्ताररूपानें व्याकरण करण्याची उत्कृष्ट संधि होती.

---

* सारसंग्रह (प्र. २९) पृ. १००-१०४

.........आतां ती अमोलिक संधि गेली म्हणोन शोक मानितच हातपाय आटोपून निराश बसणें हेंही विचार करून पाहिलें असतां नीट नव्हे, यथासामर्थ्य आपणही आपले हातपाय हालवून पहावे, मग जितकें व जसें साध्य होईल तसें होऊ असा निश्चय करून हा पुढील लहानसा ग्रंथ लिहिण्याकरितां मी लेखणी उचलली." § दादोबांनीं इंग्रजी व्याकरणाचा सूक्ष्म व धार्मिक दृष्टीनें अभ्यास केला असल्यामुळें त्या वर्षीं प्रसिद्ध झालेल्या तिन्ही व्याकरणांत त्यांचें व्याकरण उत्कृष्ट उतरलें आहे. अवघे बावीस वर्षांचें वय असतानांच हा ग्रंथ प्रसिद्ध केला; तेव्हां त्यांत कांहीं उणेपणा राहणें स्वाभाविकच होतें. इ. स. १८५० त त्यांनीं या ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढली, त्या वेळीं त्यांनीं पहिल्या आवृत्तींतील दोष काढून टाकून हा ग्रंथ शक्य तितक्या पूर्णतेस नेण्याचा प्रयत्न केला. या व्याकरणानें त्या काळीं कित्येक वर्षेंपर्यंत आपली लोकप्रियता अबाधित राखली होती.

दादोबांचा जन्म मुंबईस इ. स. १८१४ मध्यें झाला. त्यांचें सर्व शिक्षण शिक्षामंडळीच्याच शाळेंत झालें. बापूशास्त्री शुक्ल हे त्यांना लेखन व व्याकरण शिकवीत असत. त्यांची शिकविण्याची हातोटी अप्रतिम होती. त्यामुळेंच दादोबांना लहानपणापासून मराठी व्याकरणाची गोडी लागली. त्यांनीं आपले वडील व मातोश्री यांच्या स्मरणार्थ मोरोपंतांच्या केकावलीवर 'यशोदापांडुरंगी' या नांवाची एक विस्तृत टीका (इ. स. १८६५) प्रसिद्ध केली. याशिवाय त्यांनीं 'विधवाश्रुमार्जन', 'लघुव्याकरण', 'इंग्लिश व्याकरणाची मूळपीठिका' इत्यादि गद्यग्रंथ लिहिले. त्यांच्या भाषानैपुण्याबद्दल बाळशास्त्री जांभेकर यांनीं खालील अभिप्राय व्यक्त केला आहे.

"I have known Dadoba Pandurang for many years. In the knowledge of the English Language, general literature, and science. I consider him equal to the best educated natives of Bombay, while no one among them that I know of, is so well acquainted with the grammatical structure of the Marathi language. He is the author of a grammar of that language, which is deservedly esteemed as the best work on the subject. His writing is correct and idiomatic, and is such as has not been acquired by any traslator of English works, perhaps with one or two exceptions."

30th April 1840. BAL. G. SHASTRI †

§ प्रस्तावना–महाराष्ट्र भाषेचें व्याकरण–(आवृत्ति–पहिली)

† प्रस्तावना–मराठी भाषेचें व्याकरण (आवृत्ति सातवी)

त्यांच्या ‘ मराठी भाषेचें व्याकरण ’ (इ. स. १८३६) या ग्रंथाच्या प्रस्तावनेंतील एक लहानसा उतारा येथें उद्‌धृत करितों.

“ या देशांत अद्यापि व्याकरण म्हणजे काय वस्तु आहे हें बहुत जनांस माहीत नाहीं, व त्यांत आणखी आश्चर्य हें आहे कीं, त्यांत थोर थोर व्युत्पन्न व पुराणिक असतात तेही तें समजून घेण्याविषयीं तादृश श्रम घेत नाहींत; म्हणून त्यांची व्युत्पात्ति कांहीं कच्ची असते; कारण, व्याकरण हे व्युत्पत्तीस नेत्र होत. ते म्हणतात कीं, व्याकरण हा विषयच निराळा, तो आम्हां पुराणिकांस कशास पाहिजे, तर हें त्यांचें म्हणणें नीट नव्हे, त्याचे ज्ञानाशिवाय जी व्युत्पात्ति ती पोपटाची लटपटपंची जाणावी; आतां केवळ वादाकरितां व्याकरणाचा अभ्यास करणें, हा विषय पुराणिकांचा नव्हे, ही गोष्ट खरी आहे, आणि त्याचा विचार करून पाहिलें असतां तादृश उपयोगही नाहीं, परंतु उपयोगी शब्दज्ञान म्हणून पुराणिकांसच काय, सर्वांस अवश्य असलें पाहिजे, मग त्याचा उपयोग किती आहे हें चागलेंच अनुभवास येईल. आतां हें शब्दज्ञान जसें आपल्या भाषेचे द्वारानें त्वरित सुलभ होईल तसें इतरांचे योगानें होणार नाहीं, म्हणोन आपण जी भाषा बोलतों तिचें शब्दज्ञान मुळीं झालें पाहिजे, म्हणजे पुढें त्याचा आधारानें परभाषा त्वरित व शुद्ध रीतीनें ग्रहण करावयास येईल. यास्तव मुलांस स्वभाषेचें ज्ञान मुळीं झालें पाहिजे. ”*

अमेरिकन मिशन–मराठी भाषेचें व्याकरण

इ. स. १८४८ त अमेरिकन मिशनच्या विद्यमानें अहमदनगर येथें ‘ मराठी भाषेचें व्याकरण ’ प्रसिद्ध झालें. “ या ग्रंथांतील अभिप्राय असा आहे कीं, मराठी भाषेचीं मूळतत्त्वें संक्षेपानें स्पष्ट करून दाखवावीं. शब्द व तत्त्वें यांचा वर्ग करण्याकरितां हा ग्रंथ पूर्वीं केलेल्या व्याकरणापेक्षां पूर्ण आहे, असें वाटतें. कांहीं कांहीं गोष्टींविषयीं महाराष्ट्र देशांतील मोठमोठे शास्त्री व पंडित यांचीं मतें घेतलीं आहेत. ” ‡

गंगाधर रामचंद्र टिळक (इ. स. १८२०–१८७२)

गंगाधर रामचंद्र टिळक यांच्या ‘ लघुव्याकरणा ’ ची दुसरी आवृत्ति इ. स. १८५९ त निघाली. ह्यांनीं स्वतःच्या प्रयत्नानें संस्कृत व गणित या दोन विषयांत प्राविण्य मिळविलें होतें, परंतु इंग्रजी शिक्षण न मिळाल्यामुळें ते मागें पडले व शालोपयोगी पुस्तकें लिहूनच त्यांना आपला उदरनिर्वाह चालवावा लागला.

---

* मराठी भाषेचें व्याकरण (आवृत्ति पहिली) प्रस्तावना पृ. ७–८

‡ प्रस्तावना–मराठी भाषेचें व्याकरण (अहमदनगर–इ. स. १८४८)

कृष्णशास्त्री गोडबोले (इ. स. १८३१–१८८६)

इ. स. १८६७ त कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं ' मराठी भाषेचें नवीन व्याकरण ' प्रसिद्ध केलें. यांत संस्कृत आणि प्राकृत भाषांशीं मराठीचा किती निकट संबंध आहे ते दाखवून शेवटीं प्राकृत भाषेचें संक्षिप्त व्याकरण आणि संस्कृत प्राकृत शब्दकोश दिला आहे. यांचा जन्म वाई येथें इ. स. १८३१ त झाला. त्यांचें सगळें शिक्षण पुण्यास झालें. त्यांना लहानपणापासून गणिताचा नाद असल्यामुळें त्यांनीं ज्योतिःशास्त्राचा सखोल अभ्यास केला. ते अखेरपर्यंत सरकारी शिक्षणखात्यांत नोकरीस होते. त्यांचे ' ग्रहलाघव ' आणि ' ज्योतिःशास्त्र ' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. भाषाशास्त्रांतील त्यांचें नैपुण्य त्यांच्या वरील व्याकरणांत फार चांगलें दृष्टीस पडतें. या काळांत दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री गोडबोले आणि कृष्णशास्त्री चिपळूणकर या तीन लेखकांनींच मराठी गद्याच्या व्याकरणविभागांत महत्त्वाची भर घातली. ' शाला-पत्रक ' मासिकांत प्रसिद्ध झालेले कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे व्याकरणावरील निबंध फारच मार्मिक व उद्बोधक आहेत.

मराठी शुद्धलेखनाविषयीं ' महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि ', ' मराठी लेखन-शुद्धि ', ' मराठी शुद्ध लिहिण्याविषयीं अनुगम ' इत्यादि सातआठ पुस्तकें या काळीं प्रसिद्ध झालीं. त्याप्रमाणेंच व्युत्पत्तिविषयकहि दोनतीन ग्रंथ तयार झाले.

मराठीचीं व्याकरणें (इंग्रजी)

ख्रिस्तीधर्मप्रचारक व परकीय अधिकारी वर्ग यांना मराठी भाषा शिकतां यावी म्हणून मराठी भाषेचीं व्याकरणें इंग्रजींत तयार होऊं लागलीं. प्रथमतः इ. स. १८०५ मध्यें डॉ. केरी यांनीं मराठी भाषेचें इंग्रजी व्याकरण लिहिलें. त्यानंतर ड्रमंडचें गुजराथी व मराठी भाषांचें व्याकरण प्रसिद्ध झालें. इ. स. १८२६ त कर्नल व्हान्स केनेडी यांनीं महंमद इब्राहिम मखबा यांनीं लिहिलेलें मराठीचें व्याकरण सुधारून छापलें. यानंतर रेव्हरंड स्टिव्हेन्सन यांनीं इ. स. १८३३ मध्यें कलकत्त्यास " मराठी व्याकरणाची मूळपीठिका " हें पुस्तक प्रसिद्ध केलें. रेव्हरंड बर्जेस यांनीं आपलें व्याकरण इ. स. १८५४ त लिहिलें. त्याच्या प्रस्तावनेंत त्यांनीं आपल्या आधीचे मराठी भाषेचे व्याकरणकार म्हणून केरी, केनेडी, स्टिव्हेन्सन, ब्यालंटिन, जांभेकर, फडके आणि दादोबा यांचा उल्लेख करून त्या सर्वांच्या व्याकरणग्रंथांत स्टिव्हेन्सनचें व्याकरण उत्कृष्ट आहे असा अभिप्राय दिला आहे. ¶ याशिवाय आणखीहि कांहीं मराठीचीं व्याकरणें इंग्रजींत प्रसिद्ध झालीं.

¶ E. Burgess "Dr. Stevenson's grammar is decidedly the best that has appeared."

इतर भाषांचीं व्याकरणें

रेव्हरंड जे. स्टिव्हेन्सन यांनीं " इंग्लिश भाषेचा व्याकरणाची मूळपीठिका " (आवृत्ति २ री–इ. स. १८३३) लिहिली. राघोबा जनार्दन वसईकर यांनीं जांभेकरांच्या साह्यानें ' मरेच्या इंग्रजी व्याकरणाचा सारांश ' (इ. स. १८३७) प्रसिद्ध केला. इ. स. १८३९ त जॉन विल्सनच्या ' वाक्यावळी ' ची दुसरी आवृत्ति निघाली. याखेरीज इंग्रजी व्याकरणासंबंधीं आणखीहि चारपांच पुस्तकें प्रसिद्ध झालीं. सदाशिव अनंतशास्त्री लेले यांनीं इ. स. १८४५ त ' संस्कृत वाक्यरत्नावलि ' तयार केली. त्यानंतर इ. स. १८५९ त कृष्णशास्त्री चिपळूणकरांचें संक्षिप्त संस्कृत व्याकरण प्रसिद्ध झालें. श्रीकृष्णशास्त्री तळेकर यांनीं इ. स. १८६६ त संस्कृत भाषेचें विस्तृत व्याकरण रचिलें. याशिवाय संस्कृत व्याकरणासंबंधीं आणखीहि दोनतीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. त्या सर्वांत कृष्णशास्त्री भाटवडेकर यांचा ' सुबंतप्रकाश ' (इ. स. १८६७) अत्यंत महत्त्वाचा आहे. जॉन विल्सन यांनीं इ. स. १८३२ त " इब्री भाषेचें व्याकरण " (Rudiments of Hebrew grammar) प्रसिद्ध केलें.

२

कोश

भाषेच्या वाढीला व्याकरणाप्रमाणें कोशग्रंथहि अत्यंत आवश्यक असतात. मराठी भाषेचा पहिला कोश इ. स. १८१० मध्यें डॉ. केरी यांनीं तयार केला. त्यानंतर बॉम्बे नेटिव एज्युकेशन सोसायटीनें महाराष्ट्र भाषेच्या कोशाची रचना करण्यासाठीं बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखाराम जोशी, दाजीशास्त्री शुक्ल आणि परशुरामपंत गोडबोले असे पांच पंडित नेमिले. त्यांनीं महत्प्रयासानें इ. स. १८२९ त " महाराष्ट्र भाषेचा कोश " प्रसिद्ध केला. इ. स. १८३१ त त्याला पुरवणीखंड जोडण्यांत आला. हा कोश अत्यंत विस्तृत असून त्यांत महाराष्ट्राच्या सर्व भागांत प्रचलित असलेले अधिकांत अधिक शब्द समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या कोशासंबंधीं तत्कालीन वाङ्मयांत अनेक गौरवपर उल्लेख आढळतात. याची प्रस्तावना प्रौढ, भारदस्त व मार्मिक आहे. त्यांतील लहानसा उतारा येथें सादर करितों.

> " या भाषेवर आजपर्यंत कोशव्याकरणादि व्यवस्थापन कांहींच झालें नाहीं. हा प्रथमच संस्कार आहे. हा ग्रंथ करण्याविषयीं बुद्धीस आधार मिळून लोकांचा वाग्व्यवहार तो तरी एकरूप आहे असें नाहीं. देशपरत्वें, जातिपरत्वें किंबहुना व्यक्तिपरत्वेंही भिन्न भिन्न आहे. अशा आधाराचे बळानें जी रचना करायची ती निर्दोष आणि सर्वांस आनंदजनक कशानें

होणार ? परंतु जसा जितका लोकांचा व्यवहार आढळांत आला तितक्याचें बुद्धीनें आकलन करून यथामति हा ग्रंथ केला आहे हें मनांत आणून सज्जनांनीं दोषदर्शनानें विरस न होतां यांतील गुणलेश असतील ते आदरावें.

या ग्रंथानें भाषागत सर्व अज्ञानाचा नाश होईल असें नाहीं. जसें अरुणोदयानें सर्व अंधकाराचा नाश होतो असें नाहीं, यत्किंचित् मात्र होतो. परंतु तेणेंकरून सकलांधकारनाशकर्ता जो सूर्य त्याला उदय पावायास योग्यता होत्ये, तसें या ग्रंथानें बुद्धिमान् विद्वान् असे थोर लोक त्यांस भाषागत अज्ञानाचा नाश व्हावयाजोगा ग्रंथ करण्याविषयीं योग्यता येईल." *

मराठी-इंग्रजी कोश

जे. टी मोलस्वर्थ यांनीं इ. स. १८३१ त मराठी-इंग्रजी कोश प्रसिद्ध केला. त्याच्या रचनेसंबंधीं त्यांनीं प्रस्तावनेंत खालील उद्गार काढले आहेत. "This work is the product of unremitted labour through six years. It was undertaken from a desire to promote the propagation of the glorious gospel."

मेजर टी क्यांडी (इ. स. १८०६–१८७७)

यानंतर मेजर क्यांडी यांनीं मोलस्वर्थ साहेबानें आरंभिलेल्या इंग्रजी-मराठी कोशाचें काम इ. स. १८४७ त पुरें केलें. मेजर क्यांडी यांचा जन्म इ. स. १८०६ त झाला. इ. स. १८२२ त ते हिंदुस्थानांत आले. आरंभीं कांहीं दिवस त्यांनीं कंपनी सरकारच्या लष्करांत नोकरी केली. पुढें मोलस्वर्थ यांना मराठी–इंग्रजी कोशाच्या कामीं त्यांनीं भरपूर साह्य केलें. इ. स. १८३७ मध्यें पुणें पाठशाळेच्या व्यवस्थापकाच्या जागीं त्यांची योजना झाली. त्या काळीं सरकारी शाळांतून चालू असणारीं बहुतेक सर्व क्रमिक पुस्तकें त्यांच्या हातचीं आहेत. याशिवाय त्यांनीं नीतिज्ञान परिभाषा, विरामचिन्हपरिभाषा, वाचनपाठमाला, भूगोलाचें वर्णन (भाग १।२) इत्यादि बरींच पुस्तकें प्रसिद्ध केलीं. इ. स. १८७७ त ते महाबळेश्वरीं दिवंगत झाले. क्यांडी व मोलस्वर्थ यांच्या कोशाखेरीज मराठी-मराठी, इंग्रजी-मराठी, मराठी-इंग्रजी, संस्कृत-प्राकृत असे अनेकविध कोश त्या काळीं रचले गेले.

---

* प्रस्तावना–महाराष्ट्र भाषेचा कोश (इ. स. १८२९)

३

म्हणी–पत्रलेखन

म्हणी

मराठी भाषेंत म्हणींचा संग्रह भरपूर आहे. मोलस्वर्थ–कोशाला जोडलेल्या निबंधांत विल्सन साहेब म्हणतात–“ The proverbs of the Maratha amount to about three thousand; and they form most valuable illustrations of the sentiments and customs of those who use them, as well as striking exemplification of native idiom. ” मराठी भाषेंतील म्हणींच्या सग्रहाचीं तीनचार पुस्तकें या काळांत प्रसिद्ध झालीं. इतर देशांतीलहि निवडक म्हणींचा संग्रह कांहीं पुस्तकांत भाषांतरासह छापला आहे. मोलस्वर्थकृत मराठी–इंग्रजी कोशांतहि मराठी म्हणींचा समावेश केला आहे.

पत्रलेखन

पत्रलेखनाची कला मराठेशाहीच्या काळांत फार उच्च दशेला जाऊन पोहोंचली होती. याविषयासंबंधींही ‘ लेखनपद्धतीचें बुक ’, ‘ लेखनकल्पतरु ’ वगैरे तीनचार पुस्तकें या काळांत छापलीं गेलीं.

४

अलंकार–साहित्य–पद्यरचना

अलंकारविवेक

इ. स. १८५१ त पुणें येथें शब्दालंकार नामक पुस्तक प्रसिद्ध झालें. यानंतर कृष्णशास्त्री राजवाडे यांनीं ‘ अलंकारविवेक ’ वा नांवाचा ग्रंथ (इ. स. १८५३) मराठींत लिहिला. यांत मुख्यतः अर्थालंकाराचें सोदारण निरूपण केलें आहे. ग्रंथ लहानच पण उपयुक्त व मार्मिक आहे. कृष्णशास्त्री आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात–

> “ अलंकारशास्त्र म्हणून एक स्वतंत्र शास्त्र आहे. न्यायव्याकरणादिक अनेक शास्त्रें आहेत. त्यांचा जसा निरनिराळा उपयोग आहे, तसा ह्या अलंकारशास्त्राचाहि फार उपयोग आहे. जसें देहास शोभादायक जीं वस्त्रें-भूषणें त्यांस अलंकार नांव आहे, तसें भाषणास शोभा आणणारे उपमारूपक इत्यादि जे अर्थाचे प्रकार त्यांस अलंकार हें नांव योग्य ठेविलें आहे. पूर्वीं भोजराजा होता. त्याचे वेळेस अलंकारशास्त्राची प्रवृत्ति फार होती. सांप्रत काळीं करनाटक देशांत व द्राविड देशांत ह्या शास्त्राची प्रवृत्ति फार आहे.

अलंकार-शास्त्राच्या योगानें भाषणाचें चातुर्य विशेष येतें व ग्रंथास चमत्कारिक मनोरंजकता येते. ज्या वाक्यांत किंवा काव्यांत अलंकार नाहींत त्याचा रस सपक लागतो. अन्न हें सामान्यतः गोड खरें, परंतु त्याला मिठानें किंवा साखरेनें जशी विशेष गोडी येती, तशी अलंकाराच्या योगानें भाषणास विशेष चमत्कारिक रस येतो. " ¶

रसमाधव

दाजी शिवाजी प्रधान यांनीं इ. स. १८६८ त 'रसमाधव' या नांवाचा ग्रंथ रचिला. " पूर्वीं रसज्ञ पंडितांनीं रस कसे निर्माण करावे आणि त्यांची पद्धति कशी असावी, हें सर्वांस कळावें, म्हणून संस्कृत भाषेनें नियम करून ग्रंथ बांधिले, ते संस्कृतांत प्रसिद्ध झाले आहेत......परंतु प्राकृत जनाचे उपयोगी कांहीं प्राकृत ग्रंथ असावा आणि तेणेंकरून संस्कृत ग्रंथाचा आशय लोकांस कळावा....याकरितां उद्योग करून, श्रमानें हा लहानसा ग्रंथ केला आहे. " यांतील एक छोटासा उतारा खालीं देत आहे.

" अनेक चातुर्य चमत्कार व शास्त्रार्थ वाक्यें करून युक्त, असे सुभाषित अथवा गायन किंवा स्त्रीलीला, शृंगाररसादि येणेंकरून ज्याचें चित्त द्रवत नाहीं, तो जीवन्मुक्त, देही असून विदेही किंवा पशु याशिवाय कोणाचें चित्त रममाण होणार नाहीं, असें नाहीं. पाषाण पाण्याचे डोहांत भिजत घातला, तरी तो अंतरीं भिजतच नाहीं. किंवा मलयादि पर्वतावर चंदनाच्या सुगंधी करून खेर, बाबुळी, बोरी इत्यादि सर्व झाडें चंदन होतात. परंतु वेळू तेथेंच असतां, तो जशाचा तसाच राहतो. त्याला सौगंध्य येत नाहीं. कारण तो अंतरीं पोकळ, निःसार; तसे जे शून्यहृदय त्याला रसांनीं काय करावें, अंधास दीपानें काय दाखवावें; बधिरास ऐकावयास येतच नाहीं. त्याला गायन काय संतुष्ट करील; तसे जे अरसिक त्यांच्या मनाला रसानें विश्राम कसा होईल. " $

साहित्यशास्त्र

गणेश सदाशिवशास्त्री लेले यांनीं १८७२ त कित्येक संस्कृत ग्रंथांच्य आधारानें 'साहित्यशास्त्र' नामक ग्रंथ लिहिला. " त्यांत एकंदर आठ प्रकरणें आहेत, व प्रत्येकांत या शास्त्राच्या एकेक विभागाविषयीं संक्षेपानें माहिती दिली

¶ प्रस्तावना—अलंकारविवेक.

$ रसमाधव पृ. ५

आहे. विषय सुलभ रीतीनें समजण्याकरितां बहुतेक ठिकाणीं प्रश्नोत्तरांची योजना केली आहे." ¶

पद्यरचना

'पद्यरचना' व 'वृत्तदर्पण' या दोन पुस्तकांत मराठी भाषेंतील वृत्तांचीं लक्षणें उदाहरणासह दिलीं आहेत.

* * *

परिशिष्ट

१

व्याकरण-भाषाशास्त्र

मराठीचें व्याकरण (मराठी)

१. बालव्याकरण-बाळशास्त्री जांभेकर,

२. महाराष्ट्र भाषेचें व्याकरण-गंगाधरशास्त्री फडके,
(द्वितीयावृत्ति-इ. स. १८३८) प्रथमावृत्ति, पुणें, इ. स. १८३६.

३. मराठी भाषेचें व्याकरण-दादोबा पांडुरंग तर्खडकर,
(आवृत्ति २-३; इ. स. १८५०-५७) मुंबई. इ. स. १८३६.

४. मराठी आणि इंग्रेजी क्रियापदांच्या काळाचा परिपाठ,
मुंबई, इ. स. १८४०.

५. मराठी भाषेचें व्याकरण-अमेरिकन मिशन, अहमदनगर,
इ. स. १८४८.

६. लघुव्याकरण-गंगाधर रामचंद्र टिळक, (द्वितीयावृत्ति)
इ. स. १८५९.

७. मराठी लघुव्याकरण-दादोबा पांडुरंग इ. स. १८६५.

¶ विष्णुशास्त्री चिपळूणकर-किरकोळ लेखांचा संग्रह; पृ. १८७
(भाग १ ला.)

८. मराठी भाषेचें नवीन व्याकरण—कृष्णशास्त्री गोडबोले,
इ. स. १८६७.
९. व्याकरणासंबंधीं उपयुक्त संग्रह—भास्कर बापूजी आठल्ये,
मुंबई, इ. स. १८६७.
१०. व्याकरणसार—सखाराम बापूशेट दांडेकर, मुंबई,
इ. स. १८७०. (इं. ऑ.)
११. व्याकरणसाह्य—विनायक गोपाळ कयाळ, रत्नागिरी, इ. स. १८७१.
१२. व्याकरणासंबंधीं सोपे धडे (भाग १ ला) – मुंबई, इ. स. १८७३.

व्युत्पत्ति—

१३. शब्दसिद्धिनिबंध—विनायकशास्त्री दिवेकर आणि गोविंद विठ्ठल महाजन,
(पृ. ६४) मुंबई, इ. स. १८४३.
(compiled with the assistance of बाळशास्त्री जांभेकर)
(ब्रि. म्यु.)
१४. शब्दसिद्धिनिबंध—विष्णु वासुदेव गडबोले आणि भास्कर अनंतशास्त्री ताम्हनकर,
पुणें, इ. स. १८६८.
१५. शब्दसिद्धिनिबंध—जनार्दन हरी आठल्ये आणि विनायकशास्त्री आगाशे,
मुंबई, इ. स. १८६८.

शुद्धलेखन—

१६. शुद्ध लिहिण्याचा अनुगम—रामचंद्र विनायक ओक, पुणें,
इ. स. १८६२. (ग्रां. कॅ.)
१७. महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि—रामचंद्र भिकाजी गुंजीकर, मुंबई,
इ. स. १८६९.
१८. मराठी शुद्ध लिहिण्याचे नियम—गोविंद बल्लाळ बापट, इ. स. १८६९.
१९. मराठी लेखनशुद्धि—नारो रामचंद्र महाडेश्वर, मुंबई, इ. स. १८७०.
२०. शुद्ध लिहिण्याविषयीं अनुगम—रामचंद्र आपाजी चितळे, सातारा,
इ. स. १८७३. (इं. ऑ.)
२१. मराठी शुद्धलेखनाचे नियम—नारायण दामोदर छत्रे, पुणें,
इ. स. १८७४.

इतर भाषाविषयक ग्रंथ

२२. सुलेखनविद्या—गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८६०.

२३. लिपिप्रकाश— इ. स. १८६०. (म. वा.)

मराठीचें व्याकरण (इंग्रजी)

२४. Grammar of the Mahratta Language. W. Carey, Serampore 1805.

२५. Illustrations of the grammatical parts of the Guzerattee, Mahratta and English Languages—Dr. Drummond. Bomb. 1808.

२६. A Grammar of the Mahratta Language—Mahomed Ibrahim Makba, (Revised by Vans Kennedy) Bomb. 1826.

२७. The Principles of Murathee Grammar—Rev. J. Stevenson—Calcutta, 1833.

२८. Mahratta Grammar—Ballantyne, Edinburgh. 1839.

२९. Grammar of the Marathi Language—E. Burgess—Bomb. 1854

३०. Grammar of the Marathi Language—Bellairs, Askedkar—Bomb. 1868.

३१. Hand Book of the Marathi Grammar [For Matriculation Students] Poona 1872;

इंग्रजी भाषेचें व्याकरण

३२. साह्यकारी—(इंग्रजी भाषणाचें ज्ञान मिळवायासाठीं) मुंबई, इ. स. १८३१.

३३. इंग्लिश भाषेच्या व्याकरणाची मूळ पीठिका–(आवृत्ति २ री) रे. जे. स्टिव्हेन्सन, मुंबई, इ. स. १८३३.

३४. मरे याच्या इंग्रेजी व्याकरणाचा संक्षेप—राघोबा जनार्दन वसईकर, (तपासनीस—बाळशास्त्री जांभेकर) मुंबई, इ. स. १८३७.

३५. वाक्यावळि—जॉन विल्सन (आवृत्ति २ री) मुंबई, इ. स. १८३९. (ब्रि. म्यु.)

३६. इंग्लिश व्याकरण आणि भाषण–सांप्रदायिक वाक्यें—मुंबई, इ. स. १८५१. (ब्रि. म्यु.)

३७. इंग्लिश व्याकरणाची मूळपीठिका—दादोबा पांडुरंग, पुणें,
इ. स. १८६३ (ब्रि. म्यु.)

३८. संभाषणांतील वाक्यें —(इंग्रजी–मराठी) वामन कृष्णशास्त्री गर्दे,
मुंबई, इ. स. १८७२.

३९. इंग्रजी भाषांतर करण्याचे नियम—खंडो कृष्ण गद्रे, इ. स. १८७३.

संस्कृत भाषेचें व्याकरण

४०. भाषामंजरी—(संस्कृत शब्द व वाक्यें–मराठी अर्थासह)
मुंबई, इ. स. १८४०.

४१. संस्कृत वाक्यरत्नावलि—सदाशिव अनंतशास्त्री लेले,
मुंबई, इ. स. १८४५ (इं. ऑ.)

४२. संस्कृत भाषेचें लहान व्याकरणाचें पुस्तक—
कृष्णशास्त्री चिपळूणकर, मुंबई, इ. स. १८५९.

४३. पाठावलि—संस्कृत भाषेचें प्रथम पुस्तक, पुणें,
इ. स. १८६३. (ब्रि. म्यु.)

४४. संस्कृत व्याकरण—श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर,
मुंबई, इ. स. १८६६.

४५. सुबंतप्रकाश—कृष्णशास्त्री भाटवडेकर, इ. स. १८६७. (ब्रि. म्यु.)

४६. संस्कृत प्रथम पुस्तक (भांडारकरकृत) मराठी भाषांतर—
भा. क. विनायकशास्त्री, इ. स. १८७३.

हिब्रू व्याकरण

४७. इब्री भाषेचें व्याकरण (Rudiments of Hebrew Grammar)
जॉन विल्सन, मुंबई, इ. स. १८३२. (इं. ऑ.)

२

कोश

मराठी–मराठी कोश

४८. महाराष्ट्र भाषेचा कोश—बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखाराम जोशी, दाजीशास्त्री शुक्ल, परशुरामपंत गोडबोले,
मुंबई, इ. स. १८२९.

४९. महाराष्ट्र भाषेचा कोश-पुरवणी खंड इ. स. १८३१.
५०. हंसकोश—रघुनाथ भास्कर गोडबोले, पुणें, इ. स. १८६३.
५१. रत्नकोश-बाळकृष्ण मल्हार बीडकर, मुंबई, इ. स. १८६९.
५२. मराठी भाषेचा नवीन कोश-रघुनाथ भास्कर गोडबोले, मुंबई इ. स. १८७०.

मराठी-इंग्रजी कोश

५३. मराठी-इंग्रजी कोश. डॉ. केरी, श्रीरामपुर इ. स. १८१०.
५४. मराठी-इंग्रजी कोश-व्हान्स केनेडी— मुंबई, इ. स. १८२४.
५५. मराठी-इंग्रजी कोश-जे. टी. मोलस्वर्थ— (द्वितीयावृत्ति – इ. स. १८५७) मुंबई, इ. स. १८३१.
५६. मराठी-इंग्रजी कोश (संक्षिप्त—केनेडी व मोलस्वर्थवरून) मुंबई, इ. स. १८५१.
५७. मराठी-इंग्रजी कोश—बाबा पदमनजी, मुंबई, इ. स. १८६३.
५८. मराठी-इंग्रजी लघुकोश—भिकाजी वासुदेव आठल्ये, इ. स. १८७१.

इंग्रजी-मराठी कोश

५९. इंग्रजी-मराठी कोश-व्हान्स केनेडी, मुंबई, इ. स. १८२४.
६०. इंग्रजी-मराठी कोश—क्यांडी—मोलस्वर्थ, इ. स. १८४७. (आवृत्ति २ री, इ. स. १८७३).
६१. शब्दरत्नावलि-बाबा पदमनजी, मुंबई, इ. स. १८६०.
६२. इंग्लिश आणि मराठी कोश—श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर, मुंबई, इ. स. १८६१.
६३. इंग्रजी-मराठी कोश—विष्णुशास्त्री पंडित, मुंबई, इ. स. १८६४.
६४. शब्दसंग्रह—विठ्ठल गोपाळ करंदीकर, पुणें, इ. स. १८६४.
६५. इंग्रजी मराठी कोश—भगवंत वासुदेव घुमरे, इ. स. १८७२.

संस्कृत—मराठी कोश

६६. संस्कृत-प्राकृत शब्दकोश-अनंतशास्त्री तळेकर, पुणें, इ. स. १८५३.
६७. संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश-विष्णुशास्त्री पंडित, मुंबई, इ. स. १८६५.
६८. शब्दरत्नाकर-माधव चंद्रोबा, मुंबई, इ. स. १८७०.

६९. संस्कृत–प्राकृत कोश–नारो आप्पाजी गोडबोले,
गोपाळ जिवाजी केळकर, पुणें, इ. स. १८७२.

संकीर्ण

७०. राजव्यवहारकोश–काशिनाथ गंगाधर, मुंबई, इ. स. १८५० (ग्रां.कॅ.)
७१. दासबोध—शब्दपरिभाषा–सदाशिवराव गोडबोले, सातारा,
इ. स. १८६२, (ग्रां. कॅ.)
७२. हिंदुशास्त्रांतील संख्यावाचक दुर्बोधशब्दार्थकोश–
रखमाजी देवजी मुळे, मुंबई, इ. स. १८६७.
७३. विग्रहकोश–गोपाळशास्त्री घाटे, मुंबई, इ. स. १८६७.
७४. विद्याकल्पतरू–रावजी केशवराव सांबारे, ठाणें, इ. स. १८६८.

३

म्हणीपत्र–लेखन

म्हणी—

७५. फर्दुकवही— पुणें, इ. स. १८४२. (ग्रां. कॅ.)
७६. सर्व देशांतील निवडक म्हणी—सदाशिव विश्वनाथ,
मुंबई, इ. स. १८५८.
७७. म्हणीरत्नमाला–कृष्णशास्त्री भाटवडेकर. (ग्रां. कॅ.).
७८. मराठी व्यवहारांतील म्हणी–नारायण दामोदर छत्रे,
(इंग्रजी भाषांतरासह) पुणें, इ. स. १८७०. (ग्रां. कॅ.)
७९. मराठी प्रचारांतील म्हणी—गंगाधर गोविंद सापकर,
पुणें, इ. स. १८७२.

पत्र–लेखन

८०. लेखनपद्धतीचें बुक— पुणें, इ. स. १८५०.
८१. हेमाद्रीकृत लेखनकल्पतरु—मुनशी गणपतराव सातारकर,
मुंबई, इ. स. १८५३
८२. लेखनपद्धती (मोडी)— बेळगांव, इ. स. १८६३.
८३. लेखनपद्धती— पुणें, इ. स. १८७१

४

साहित्य-अलंकार-पद्यरचना

साहित्यशास्त्र

८४. रसमाधव-दाजी शिवाजी प्रधान, रत्नागिरी, इ. स. १८६८.

८५. साहित्यशास्त्र-गणेश सदाशिवशास्त्री लेले, मुंबई, इ. स. १८७२.

अलंकारशास्त्र

८६. शब्दालंकार— पुणें, इ. स. १८५१. (ग्रां. कॅ.)

८७. अलंकारविवेक—कृष्णशास्त्री राजवाडे, पुणें, इ. स. १८५३.

पद्यरचना

८८. पद्यरचना (निबंध)—भास्कर दामोदर पाळंदे

८९. वृत्तदर्पण—परशुरामपंत गोडबोले, पुणें, इ. स. १८६० (ग्रां. कॅ.)

* * *

८ : धर्म–नीति तत्त्वज्ञान

१

धर्म

हिंदु लोक स्वभावतःच धर्मशील असल्यामुळें मराठी वाङ्मयांत धार्मिक ग्रंथ मुबलक झाले, परंतु नित्यपठणाच्या सोयीसाठीं त्यांतील पुष्कळसा भाग पद्यामध्यें ग्रथित केला आहे. मराठी भाषेंतील धार्मिक गद्यग्रंथांत संस्कृत धर्मग्रंथांवरील प्राकृत टीकांचाच भरणा जास्त आहे. स्वतंत्र रीतीनें लिहिलेले धर्मविषयक वाङ्मय फारच थोडें आहे.

श्रुतिविषयक ग्रंथ

मराठी भाषेंत वेदविषयक ग्रंथ छापण्याचा उपक्रम प्रथम रेव्हरंड जे. स्टिव्हेन्सन यांनीं केला. त्यांनीं इ. स. १८३३ त ' त्रिविद्या त्रिगुणात्मिका ' या नांवाचें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत त्यांनीं ऋग्वेदाच्या कांहीं सूक्तांचें भाषांतर (मूळ संहितेसह) दिलें आहे. भाषांतर शब्दशः केलें असून नेहमींच्या प्रचारांतील शब्दयोजना करण्याकडे विशेष लक्ष पुरविलें आहे. यांतील एका सूक्ताचें भाषांतर येथें सादर करितों:—

" (१) हे इच्छित पदार्थ देणाऱ्या इंद्रा, तुझे हरी नामक घोडे तुला सोमपानार्थ आणोत आणि सूर्यासारखे प्रकाशमान् ऋत्विज जे ते तुजप्रत विख्यात करोत ॥

(२) अहो, इंद्राचे दोघे हरी नामक अश्वानों, यज्ञार्थ पुढें चालणारे असे जे तुम्ही ते आमचे घृतयुक्त धान्यातें पाहून सुखरूप रथाचे ठायीं इन्द्राला बसवून या वेदीचे समीप आणा ॥

(३) अम्ही प्रातःकाळचे यज्ञाविषयीं इंद्राप्रत बोलावितों, तसेंच मध्यानकाळच्या यज्ञाचा आरंभ झाला असतां इंद्राप्रत बोलावितो, तसेंच संध्याकाळीं सोमपानार्थ इंद्राप्रत बोलावितों ॥

(४) हे इंद्र, लांब केशाही युक्त हरी नामक अश्वासह वर्तमान तूं अमच्या सिद्ध केलेल्या सोमाप्रत अमचे समीप ये, कारण कीं देवाचें यज्ञाजवळ प्रसिद्ध झालेल्या सोमाविषयीं तुला अम्ही बोलविताहो ॥

(५) हे इंद्रा, तो तूं अमच्या ह्या स्तुतिप्रत ये कारण कीं देवाचे यज्ञाजवळ प्रसिद्ध झालेल्या सोमयुक्त प्रातःकाळचें कर्म होत आहे. म्हणून गौर मृगाचे परितृषित होत्साता त्या सोमातें प्राशन कर ॥

(६) हे रसवंत उत्तम प्रकारें सिद्ध केले सोम जे ते यज्ञाचे ठायीं दर्भांवर पात्रांत ठेविले आहेत हे इंद्रा बळ प्राप्त व्हावयाकारणें तूं त्यातें प्राशन कर ॥

(७) हे इंद्रा अम्ही केलेल्या श्रेष्ठ स्तोत्रविशेष तुझ्या मनामध्यें आला असतां अत्यंत सुखकारक असो त्यानंतर सिद्ध केलेल्या सोमाप्रत प्राशन कर ॥

(८) शत्रु मारणारा जो इंद्र तो सोमपानार्थ त्या पानाच्या हर्षा कारणें संपूर्ण सिद्ध केलेल्या सोमयुक्त प्रातःकाळचे यज्ञाप्रत जात आहे ॥

(९) बहुकर्मन् इंद्रा तो तूं अमच्या ह्या इच्छित फळातें गायी घोड्यासह वर्तमान सर्वकाळ पूर्ण कर मग अम्हीहि उत्तम ध्यानयुक्त होत्साते तुजप्रत स्तवन करूं ॥ " ×

डाक्तर मार्तिन हौग (इ. स. १८२५–७१)

पुणें पाठशाळेंतील संस्कृत भाषेचे मुख्य गुरू डाक्तर मार्तिन हौग यांनीं वेदांवर इंग्रजींत दोन व्याख्यानें दिलीं. पहिलें व्याख्यान ' यंग मेन्स असोसिएशन ' पुढें झालें. त्यांतील कांहीं भागाचें भाषांतर इ. स. १८६३ त प्रसिद्ध झालें. हौग साहेबांचें दुसरें व्याख्यान ' युनैटेड सर्व्हिस इन्स्टिटयूशन ' या सभेपुढें झालें. त्याचें मराठी भाषांतर ' ब्राह्मणवर्णाचें मूळ ' या नांवानें इ. स. १८६४ त छापलें गेलें. त्या काळांतील या दोन पुस्तकांतच हिंदु धर्मग्रंथांची चिकित्सक दृष्टीनें माहिती दिली आहे. याशिवाय काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांनीं आपलें वेदावरील व्याख्यान इ. स. १८७९ त पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें.

विष्णुबावा ब्रह्मचारी (इ. स. १८२५–१८७१)

विष्णुबावा ब्रह्मचारी यांनीं इ. स. १८५९ त कापला ' वेदोक्तधर्मप्रकाश ' हा प्रख्यात ग्रंथ लोकहितार्थ प्रसिद्ध केला. ' वेदप्रतिपाद्य धर्म आबालवृद्धांस कळावा अशा हेतूनें ' ह्या ग्रंथांत धर्मविषयक अनेक गोष्टींची प्रश्नोत्तर पद्धतीनें चर्चा केली आहे. विष्णुबावांची विचारसरणी स्वतंत्र पण अशास्त्रीय आणि विक्षिप्त आहे. त्यांचा धर्मग्रंथांचा अभ्यासहि बेताचाच असावा असें दिसतें. ईश्वरी साक्षात्कार झाल्यामुळें त्यांनीं खऱ्या खऱ्या वेदप्रणीत धर्माचा प्रसार करण्याचं कंकण बांधलें होतें. त्यांचें संपूर्ण नांव विष्णु भिकाजी गोखले. त्यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यांत शिरवली गांवीं

× त्रिविद्या त्रिगुणात्मिका (भाग १) पृ० २४–२५.

इ. स. १८२५ त झाला. घरच्या गरिबीमुळें यांनीं आरंभीं कांहीं दिवस शेतकी व नंतर कस्टम खात्यांत नोकरी केली. लहानपणापासूनच त्यांची मनःप्रवृत्ति अंतर्मुख होती. कामधंद्याव्यतिरिक्त त्यांचा सारा काळ आत्मचिंतनांत जाई. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांना साक्षात्कार झाला आणि पुढें तीन वर्षांतच भगवीं वस्त्रें धारण करून एकान्तवास पतकरला. इ. स. १८६५ पासून त्यांच्या सार्वजनिक कार्याला आरंभ झाला. ते नामांकित वक्ते होते. त्यांनीं मिशनरी लोकांशीं वेळोवेळीं वाद करून त्यांच्या धर्मप्रसाराच्या चळवळीला अंशतः आळा घातला. इ. स. १८७१ त ते काळपुळीच्या रोगानें दिवंगत झाले. त्यांनीं ' वेदोक्तधर्मप्रकाश ', ' सेतुबंधनी टीका ', ' सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध ', ' सहजास्थितीचा निबंध ', ' भावार्थ-सिंधु ', इत्यादि दहाबारा लहानमोठे ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यांच्या बहुमोल उपदेशाचा सुबोध सारांश मंगेश हरी नेरूरकर यांनीं इ. स. १८७४ त प्रसिद्ध केला. बावांच्या विचारांची ठेवण लक्षांत यावी म्हणून ' वेदोक्तधर्मप्रकाश ' ग्रंथांतील एक लहानसा उतारा उद्धृत करितों:—

> " गणेशचतुर्थीस चंद्र पाहूं नये हा अर्थ वेदान्तशास्त्रपर आहे. म्हणजे इंद्रियगणांचा पती (म्हणजे धनी) जो आत्मा, त्याची जी शिवस्वरूपी म्हणजे स्वस्वरूपीं रमण्याची तूर्या नांवाची चतुर्थ अवस्था आहे, तीच वरदचतुर्थी समजावी. अशा त्या अवस्थेंत जातांना मनापासून पुरुषसूक्तांत कथिल्याप्रमाणें झालेले मनाचे संकल्प जे चंद्ररूपी आहेत, त्यांजकडे जो पाहील, तो जन्ममरणाच्या अपजाळांत पडेल. यास्तव तीन अवस्थारूपी सर्पकाळांत मनाचे संकल्परूपी चंद्राकडे पाहणें तर पहा, कारण हा व्यवहारच आहे. परंतु जीवात्म्याची चवथी जी वरद अवस्था, (म्हणजे चतुर्थी अवस्था) तिच्या कालांत आत्मा जो गणपती, त्याजकडेच सर्वांनीं लक्ष द्यावें, मनाचे संकल्परूपी चंद्राकडे पाहूं नये. या आत्मज्ञानाच्या स्मरणार्थ भाद्रपद शुद्ध चतुर्थीस बाह्य क्रिया स्मारक आहेत व अवतारपूजा आहे. यास्तव शहाणे लोकहो, वेदांतील वेदान्तशास्त्राचा वेदोक्तधर्माच्या ग्रंथांना आधार आहे, म्हणूनच या वेदोक्तधर्माच्या सर्व ग्रंथांतील कल्पनांची एकवाक्यता करणें हें तर सहज आहे. पहा, कीं उन्मत्तपणानें बडबड करणाराच्याही शब्दाचा वेदान्तपर अर्थ होतो, यास्तव वेदान्ताचा आधार धरा, आणि संशयज्याल जाळून तरा. "*

पुराणें

आबालवृद्ध हिंदुधर्मीयांच्या अंतःकरणावर पुराणग्रंथांचा विलक्षण पगडा असल्यामुळें त्यांचीं मराठींत भाषांतरें होणें क्रमप्राप्तच होतें. गोविंद रघुनाथ केतकर

---

* वेदोक्तधर्मप्रकाश पृ. ७०४–७०५

यांनीं कृष्णशास्त्री साठे यांच्या साह्यानें इ. स. १८४५-४६ त स्कंदपुराणान्तर्गत काशीखंडाचें गद्यात्मक भाषांतर प्रसिद्ध केलें. विष्णुबावा ब्रह्मचारी यांनीं 'चतुःश्लोकी भागवताचा अर्थ' (इ. स. १८६७) मराठी भाषेंत लिहिला. जनार्दनाचार्य वळे, अनंताचार्य अष्टपुत्रे वगैरे मंडळींनीं प्राकृत गद्य-टीकेसहित मत्स्यपुराण (भाग १-२; इ. स. १८७०-७४) छापण्याचा उपक्रम केला. निर्णयसागर छापखान्यांत 'वाल्मीकिरामकथा-महोदया' चा पहिला खंड (इ. स. १८७४) प्रसिद्ध झाला. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं विद्वान् मंडळींच्या साह्यानें श्रीमन्महाभारतसाराचे दोन भाग (इ. स. १८७३) प्रकाशित केले. याशिवाय ह्या काळांत प्रसिद्ध झालेल्या पौराणिक बखरींची माहिती कथावाङ्मयाच्या प्रकरणांत दिलेलीच आहे.

धर्मविषयक सामान्य ग्रंथ

धर्माच्या विविध अंगांवर प्रकाश पाडणारीं अनेक पुस्तकें त्या काळीं प्रसिद्ध झालीं. 'अशौचविचार' या नांवाचें एक पुस्तक बाळकृष्ण भिकाजी राजवाडे यांनीं इ. स. १८४१ त लिहिलें. त्यानंतर गंगाधरशास्त्री फडके यांचा 'हिंदुधर्म-तत्त्व' (इ. स.१८५२) हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्या काळांतील हा अत्यंत प्रख्यात आणि महत्त्वाचा धर्मग्रंथ आहे. इ. स. १८५८ त भर्तृहरीचें वैराग्यशतक आणि नीतिशतक प्राकृत टीकेसहित छापलें गेलें. सीताराम रावजी जुन्नरकर यांनीं इ. स. १८६२ त 'परमधर्मतत्त्व' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला. याचीं चार प्रकरणें असून त्यांत 'हिंसानिषेध', 'विपरीत वाममार्ग-विडंबन' वगैरे विषयांचें विवेचन केलें आहे. इ. स. १८७४ त बापूशास्त्री मोघे यांनीं धर्मसिंधूचा सारांश मराठींत लिहिला. याशिवाय 'प्रश्नोत्तरमालिका' (इ. स. १८६०), 'मुलांस उपदेश' (इ. स. १८६२), 'गुणसागर' (इ. स. १८६८) इत्यादि धर्मपर ग्रंथ त्या काळांत प्रकाशित झाले. सृष्टिजन्य ईश्वरज्ञानाविषयींहि (Natural Theology) दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं. न्यायमूर्ति रानडे यांनीं आपल्या खालील अभिप्रायांत या काळांतील उत्कृष्ट धर्मग्रंथांचा उल्लेख केला आहे. 'The principles of the Hindu religion (हिंदुधर्मतत्त्व), the pleasures of the self-enjoyin g s oul, and the Vedokta Dharma Prakas, represent the best portion of orthodox thought stated so as to be generally acceptable to all parties.*

ब्राह्मसमाज

ब्राह्मसमाजाच्या तत्त्वांचें प्रतिपादन करण्यासाठीं या काळीं दोन पुस्तकें लिहिलीं गेलीं. 'ब्राह्मधर्मप्रतिपादकवाक्यसंग्रह' या नांवाचा एक ग्रंथ इ. स. १८७० त

* M. G. Ranade *Remarks on the Marathi Catalogue.*

प्रसिद्ध झाला. यांत ब्राह्मसमाजाच्या तत्त्वांना पोषक अशा सर्व धर्मग्रंथांतील वाक्यांचा मराठींत संग्रह केला आहे. इ. स. १८७३ त विठ्ठल कृष्णाजी खेडकर यांनीं 'धर्मशिक्षा अथवा ब्राह्मधर्माचीं मूलतत्त्वें' हें पुस्तक लिहिलें. त्यात १. ईश्वर एक व तोच पूज्य. २. नीतिपूर्वक सप्रेम ईश्वरभक्ति हाच धर्म. ३. मनुष्यमात्राचा पारमार्थिक धर्म एक होय. ४. प्रत्येक मनुष्यास विचार करण्याचें स्वातंत्र्य आहे. ५. नित्यनैमित्तिक कर्में विवेकास अनुसरून असावीं. ६. मनुष्यमात्राची एक ज्ञाति, ७. सर्वांस ज्ञानशिक्षा असावी, अशा सात तत्त्वांचें प्रामुख्यानें विवरण केलें आहे.

२

नीति

विदुर–नीति

हिंदु संस्कृतीच्या दृष्टीनें धर्म आणि नीति या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत; त्यामुळें आमच्या नीतिविषयक कल्पना आमच्या धर्म-ग्रंथांतूनच प्रगट झाल्या आहेत. इ. स. १८२३ सालीं मुंबई येथें कुरियर छापखान्यांत विदुरनीति 'मूळ संस्कृतावरून महाराष्ट्र भाषेंत गद्यरूप करून छापिली.' 'नारदनीति' मुंबईसच मराठी भाषांतरासह इ. स. १८५८ त प्रसिद्ध झाली. "They (विदुरनीति–नारदनीति) represent the highest moral and economical notions of the people on these subjects, and serve the place of more systematic works" †

विदुरनीतींतील एक उतारा येथें सादर करितों—

"जसा सहवास करावा तसा गुण प्राप्त होतो. साधूचे संगानें साधु होतो. मूर्खांचे संगानें मूर्ख होतो. चोराचे संगानें चोर होतो. जसें शुभ्र धुतलेलें वस्त्र ज्या रंगांत घालावें तो रंग घेऊन उठतें, स्वयें कोणास छळित नाहीं व दुसऱ्याचे हातून छळवित नाहीं. आपल्यास उपद्रव झाला असतांही जो दुसऱ्यास नडायाची इच्छा करित नाहीं, मग न झाल्यास नडत नाहीं म्हणून काय सांगावें. असा जो पुरुष त्याचे संगतीची देवही वांछा करितात. मुकें राहावें त्यापेक्षां सत्य बोलावें हें बरें. सत्य असून प्रिय बोलावें हें त्याहून अधिक. सत्य प्रिय असून धर्मयुक्त बोलावें तें सर्वोत्कृष्ट. जश्या पुरुषांबरोबर बसतो, जशा पुरुषांची संगत करितो, जशी स्थिति धरावयास इच्छितो तसा तसा पुरुष होतो. ज्या ज्या दुःखदायक गोष्टीपासून सुटायास इच्छील त्या

† M. G. Ranade–*Remarks on the Marathi Catalogue.*

त्यापासून सुटेल. जो सर्व प्रपंच सोडील त्याला काडीमात्रही दुःख होणार नाहीं. जें जें साधील तें तें साधेल. पुरुषास असाध्य कांहींच नाहीं. या प्रकारें आत्रेयऋषि साध्य देवाशीं बोलून तपोवनास जाता जाहाला. " *

मुंबईच्या शिक्षामंडळीनें इ. स. १८३१ त (आवृत्ति ३ री) 'मराठी बोधवचनें' प्रसिद्ध केलीं; त्यांत 'मोठे पहाटेस उठून ईश्वराचें स्मरण करावें, 'द्रव्याचें सार्थक हेंच कीं, परोपकार घडावा' अशा तऱ्हेचीं बोधपर वाक्यें आहेत. दे. अ. इजदेल साहेबांच्या ग्रंथावरून मेजर क्यांडी यांनीं 'नीतिज्ञानाची–परिभाषा' (इ. स. १८३१) हा ग्रंथ लिहिला, याशिवाय 'नीतिशतक' (इ. स. १८५३), 'नवीन लघुहितोपदेश' (इ. स. १८४५), 'पन्दनामा' (इ. स. १८५८) इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध झालीं.

राजनीति

राजनीतिसंबंधीहि त्या काळीं तीनचार पुस्तकें प्रसिद्ध झालीं. इ. स. १८४७ त रानड्ये, मावळंकर आणि सबनीस या त्रिवर्गानें बाळकृष्णशास्त्री यांचें सहाय्यतेनें गद्यात्मक प्राकृत टीकेसह वृद्धचाणाख्यग्रंथ प्रसिद्ध केला; यानंतर धार येथें इ. स. १८६७ त गणपती गंगाधर यांनीं शार्ङ्गधरपंडितविरचित नीतिपद्धत्ति नामक ग्रंथाचें मराठींत भाषांतर केलें. सरदार रघुनाथराव विठ्ठल विंचूरकर यांनीं इ. स. १८६९ त 'महाभारत ग्रंथांतील राजधर्म' प्रकरणाचें मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें. यांतील एक उतारा खालीं सादर करितों—

"भीष्म म्हणतात, हे राजा, धनुष्याचें धारण, शत्रूचा नाश, कृषिकर्म, वाणिज्य, पशूंचें पालन, द्रव्याकरितां इतर वर्णांची सेवा, राजाची चाकरी, कपट-वंचना इत्यादिक, परस्त्रीगमन, धान्याच्या वाढीनें जीवन, हीं कर्मे ब्राह्मणांस अति निंद्य आहेत; यास्तव अशीं कर्में करणारा, वृषलीपति, चाहाडी करणारा, नृत्य करणारा, निर्मर्याद असा ब्राह्मण वेदाभ्यास करो किंवा न करो तो केवळ शूद्रच असें मानून दासादिकांस पंक्तिबाहेर बसवून भोजनास घालितात, त्यासारिखे त्या ब्राह्मणांस पंक्तिबाहेर भोजन घालावें आणि श्राद्धहोमादि कृत्यांत सर्वदा वर्जावा व दानादिकहि त्यास देऊं नयेत. तस्मात् ब्राह्मणाला बाह्याभ्यंतर शुद्धि व इंद्रियनिग्रह असून ब्रह्मचर्यादि आश्रमधर्मांचें यथार्थ पालन हे मुख्य धर्म आहेत. यास्तव जो जितेंद्रिय, यज्ञ करून सोमपान करणारा, सुशील, दयावान्, शीतोष्णादि सहन करणारा, आशारहित, दुसऱ्याचा घात न करणारा, असा जो त्यासच ब्राह्मण असें म्हणावें. " ×

---

* विदुरनीति पृ. ५४–५५

× महाभारत ग्रंथांतील राजधर्म, पृ. ४६

श्रीमद्भगवद्गीता

श्रीमद्भगवद्गीतेवर या काळांत तीन–चार गद्यात्मक प्राकृत टीका प्रसिद्ध झाल्या. इ. स. १८३९ त 'भावचंद्रिका–श्रीकृष्णार्जुन संवाद' या नांवानें बाळजी सुंदरजी यांनीं रामचंद्रशास्त्री मुंडले यांचें सहाय्यानें भगवद्गीतेचें मराठींत शब्दशः भाषांतर प्रसिद्ध केलें. त्यातील एक उतारा खालीं देत आहें.

"अल्पमति पुरुष वेदवादीं रत होत्साते, क्षणभंगुर स्वर्गसुखाला, आत्मज्ञान आणि तत्फल मोक्ष यांहून अधिक मानून त्यापरतें दुसरें कांहीं नाहीं असें म्हणतात; आणि अमृतपान पावूं, अजरामर होऊं, इत्यादिक जीं पुष्पित वाक्यें त्यांहींकरून भुलूं, जन्मकर्मं देणारी आणि नानाप्रकारचा कर्मांनीं व्याप्त अशा भोगैश्वर्य प्राप्तीची इच्छा करितात. परंतु हा त्यांचा निश्चय अविचार सिद्ध आहे. अशा पुरुषांची चित्तवृत्ति एकाग्र होत नाहीं. ४४. वेद तीन गुणाचा कार्याचें प्रतिपादन करितात. तूं त्रैगुण्यातीत हो. आणि द्वंद्वरहित तसाच निरंतर सत्वस्थ राहा. श्रम आणि काळजी यातें टाक आणि जितचित्त हो. ४५. भरपूर जलाशयांत जितुकें स्नानादिक प्रयोजन घटमात्र जलानें होतें, तितुकें जाणत्या जिज्ञासूला सर्व वेदीं, उपनिषद्द्वारानें होतें." ४६ *

त्यानंतर बापसोबा श्रीकृष्णजी क्षत्री यांनीं सदाशिवशास्त्री फाळके त्र्यंबककर यांच्या सहाय्यानें 'पदबोधिनी गीता' (इ. स. १८५३) हें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत गीतेचा अन्वय लावून मराठी भाषेंत पदशः अर्थ दिला आहे.

रघुनाथशास्त्री पर्वते

रघुनाथशास्त्री पर्वते यांनीं 'भाषाविवृतिसहितगीता' हा ग्रंथ इ. स. १८६० त छापला त्यांत गीताशास्त्रावर श्लोकवार मार्मिक टीका केली आहे. यांतील एका श्लोकावरील टीका खालीं देत आहें :—

"विषयांचे ठायीं ज्ञान्याची दृष्टि नाहीं तर त्यास विषयभोग कसा होतो अशी शंका होईल तर त्याविषयीं सांगतात ॥ अनंत नद्यांनीं पूर्ण झाला तरी ज्याची मर्यादा चंचल होत नाहीं अशा समुद्रांत दुसरीं उदकें जशीं प्रवेश करितात तसे अंतर्दृष्टि जो ज्ञानी त्याप्रत प्रारब्धकर्मानें अवश्य प्राप्त होणारे सर्व काम म्हणजे सर्व विषय किंवा त्यांचे भोग किंवा त्यांविषयींच्या इच्छा ह्या प्राप्त होतात ॥ तो ज्ञानी समुद्र जसा नद्यादिकांचे दुसरे उदकानें चंचल न होतां पूर्वीची अवस्था सोडीत नाहीं तसा प्रारब्धकर्मानें विषयभोग करीत

---

* भावचंद्रिका–श्रीकृष्णार्जुनसंवाद, पृ. १५–१६

असतांही ब्रह्मनिष्ठेपासून चंचल न होतां प्रारब्ध कर्म–भोग देऊन–समाप्त झाल्यानंतर शांतीप्रत म्हणजे विदेह कैवल्याप्रत पावतो ॥ विषयांची इच्छा करणारा शांति पावत नाहीं ॥ ७० ॥ " †

याशिवाय शिवराम भास्कर काणे यांनींहि इ. स. १८६८ त 'गीतार्थ–मंजरी' हा ग्रंथ लिहिला.

इतर ग्रंथ

रेव्हरंड जे. स्टिव्हेन्सन यांनीं इ. स. १८५२ त 'काल्पनिक विज्ञानाविषयींचें संक्षेपेंकरून कथन' हें पुस्तक प्रसिद्ध केलें. यांत जगांतील अनेक तत्त्ववेत्त्यांचीं मतें व सिद्धान्त संकलित केले आहेत. ग्रंथकर्त्यानें आपला उद्देश खालील वाक्यांत व्यक्त केला आहे.

"In the present day it is necessary that all well educated persons should have a general idea of the different systems of speculative philosophy that prevail, and have prevailed in the world. Such a general idea it is our wish to present, divesting the subject as far as possible of technicalities and using the plain and simple language of ordinary intercourse."

यानंतर जनार्दन रामचंद्रजी यांनीं इ. स. १८६७ त सदानंदस्वामीकृत 'वेदान्तसार' या संस्कृत ग्रंथाचें मराठींत भाषांतर केलें. ह्यांत वेदान्तशास्त्राचीं मूळ तत्त्वें संक्षेप रीतीनें वर्णिलीं आहेत. हा ग्रंथ सर्व वेदान्तविषयाच्या ग्रंथांमध्यें 'लघु असून प्रधान व व्यापक' आहे. रघुनाथशास्त्री अभ्यंकर यांनीं 'श्रीमद् विद्यारण्य-विरचित पंचदशी' या ग्रंथाची महाराष्ट्र–व्याख्या इ. स. १८७३ त प्रसिद्ध केली. ही टीका मुख्यतः रामकृष्ण पंडितांच्या संस्कृत टीकेच्या आधारानें केली आहे. याशिवाय ह्या काळांत 'आत्म्याचें अमरत्वाविषयीं' (इ. स. १८५५), आणि 'ब्रह्मविचार' (इ. स. १८७०) हे दोन तत्त्वज्ञानविषयक ग्रंथहि प्रसिद्ध झाले.

* * *

† भाषाविवृतिसहित गीता (अ. २, श्लो. ७०) पृ. ३९

परिशिष्ट

धर्म

श्रुतिविषयक

१. त्रिविद्या त्रिगुणात्मिका–(ऋग्वेदाचें भाषांतर) रेव्हरंड जे. स्टिव्हेन्सन, मुंबई, इ. स. १८३३

२. वेदोक्तधर्मप्रकाश–(स्वतंत्र ग्रंथ) विष्णुबावा ब्रह्मचारी, मुंबई, इ. स. १८५९

३. वेदाविषयीं–(मार्तिन हौग यांच्या व्याख्यानाचें व निबंधाचें भाषांतर) एक स्वदेशहितेच्छु, मुंबई, इ. स. १८६३

४. ब्राह्मणवर्णाचें मूळ–(मार्तिन हौग यांच्या व्याख्यानाचें भाषांतर) एक स्वदेशहितेच्छु, मुंबई, इ. स. १८६४ (ब्रि. म्यु.)

५. पुरुषसूक्तव्याख्या–स्वधर्महितेच्छु. मुंबई, इ. स. १८६४ (ब्रि. म्यु.)

६. वेदाविषयीं निबंध–(व्याख्यान) काशिनाथ बाळकृष्ण मराठे, नागपूर, इ. स. १८६९ (इं. ऑ.)

७. वेदोक्तधर्माचा विचार–मंगेश हरी नेरूरकर, मुंबई, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

पुराणें

८. काशीखंड–(स्कंदपुराणांतर्गत) गोविंद हरी केतकर, (सहाय्यक–कृष्णशास्त्री साठे) मुंबई, इ. स. १८४५–४६ (ग्रां. कॅ.)

९. व्रतप्रकाश–प्र.–नारायण मोरेश्वर केळकर, इ. स. १८६२ (म. वा.)

१०. विष्णुसहस्रनामाचा अर्थ–काशीनाथशास्त्री आगाशे, इ. स. १८६४ (म. वा.)

११. संक्षिप्त गुरुचरित्र— इ. स. १८६५ (म. वा.)

१२. मारुतीची बखर—(प्र. बुद्धिप्रकाश छापखाना) पुणें, इ. स. १८६५ (म. वा.)

१३. अनंतकथा—(बुद्धिप्रकाश छापखाना) पुणें, इ. स. १८६६(म.वा.)

१४. चतुःश्लोकी भागवताचा अर्थ—विष्णुबावा ब्रह्मचारी, मुंबई,
इ. स. १८६७

१५. मत्स्यपुराण—जनार्दनाचार्य वळे व अनंताचार्य अष्टपुत्रे
(भाग १-२-३) पुणें, इ. स. १८७०-७४

१६. श्रीमन्महाभारतसार—(भाग १-२) प्र. रावजी श्रीधर गोंधळेकर,
पुणें, इ. स. १८७३

१७. वाल्मीकिरामकथामहोदय (खंड १ ला)—निर्णयसागर प्रेस,
मुंबई, इ. स. १८७३

धर्मविषयक सामान्य ग्रंथ

१८. अशौचविचार—बाळकृष्ण भिकाजी राजवाडे, इ. स. १८४१

१९. हिंदुधर्मतत्त्व—गंगाधरशास्त्री फडके, मुंबई, इ. स. १८५२ (ग्रां. कॅ.)

२०. वैराग्यशतक—(भर्तृहरीकृत-सटीक) मुंबई, इ. स. १८५८ (ब्रि. म्यु.)

२१. प्रश्नोत्तरमालिका—(संस्कृत-मराठी)
मुंबई, इ. स. १८६० (ब्रि. म्यु.)

२२. परमधर्मतत्त्व—सिताराम रावजी जुन्नरकर, मुंबई, इ. स. १८६२

२३. मुलांस उपदेश—विनायक कोंडदेव ओक,
पुणें, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)

२४. गुणसागर—आपाजी लक्ष्मण टिकेकर,
मुंबई, इ. स. १८६८ (इं. ऑ.)

२५. धर्मविवेचन—एक जगद्वासी आर्य, मुंबई, इ. स. १८६८ (इं. ऑ.)

२६. विचारसागर—गणेश सखाराम हरबरे, इ. स. १८७१

२७. प्रश्नोत्तरशेखर—रावजी श्रीधर गोंधळेकर, पुणें, इ. स. १८७१

२८. धर्मसिंधुसार—(मराठी टीकेसहित) बापूशास्त्री मोघे,
इ. स. १८७४ (ब्रि. म्यु.)

सृष्टिजन्य ईश्वरज्ञान

२९. सृष्टिजन्य ईश्वरज्ञान—पांडुरंग गणोबा, मुंबई, इ. स. १८४२

३०. सृष्टिजन्य ईश्वरज्ञान—बॉम्बे ट्राक्ट आणि बुक सोसैटी,
मुंबई, इ. स. १८६३

ब्राह्मसमाज

३१. ब्राह्मधर्मप्रतिपादकवाक्यसंग्रह—(मराठी भाषांतरासह)
मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)

३२. धर्मशिक्षा अथवा ब्राह्मधर्माचीं मूलतत्त्वें (बंगालीवरून)–
विठ्ठल कृष्णाजी खेडकर, मुंबई, इ. स. १८७३

नीति

३३. विदुरनीति––कुरियर छापखाना, मुंबई, इ. स. १८२३

३४. मराठी बोधवचनें—(आवृत्ति ३ री)
मुंबई, इ. स. १८३१

३५. नीतिज्ञानाचीपरिभाषा—(Principles of morality)
मेजर–क्यांडी (आवृत्ति २ री) पुणें, इ. स. १८५१ (ग्रां. कॅ.)

३६. नवीन लघुहितोपदेश– मुंबई, इ. स. १८४५ (ग्रां. कॅ.)

३७. नीतिशतक–(भर्तृहरीकृत, मराठी टीकेसहित)
मुंबई, इ. स. १८५८ (ब्रि. म्यु.)

३८. नारदनीति– मुंबई, इ. स. १८५८ (ब्रि. म्यु.)

३९. पंदनामा– पुणें, इ. स. १८५८ (ग्रां. कॅ.)

राजनीति

४०. वृद्धचाणाख्य–रावजी भास्कर रानडये, धोंडो मोरेश्वर
मावळंकर, नारो पांडुरंग सबनीस, मुंबई, इ. स. १८४७

४१. नीतिपद्धति–(शार्ङ्गधरपंडितविरचित) मराठी
भाषांतर—गणपती गंगाधर, धार, इ. स. १८६७

४२. संस्कृत महाभारत ग्रंथांतील राजधर्म—सरदार रघुनाथराव
विठ्ठल विंचूरकर, मुंबई, इ. स. १८६९

४३. सुबोध राजनीति–नारायण भिकाजी नेने,
मुंबई, इ. स. १८७२

तत्त्वज्ञान

भगवद्गीता

४४. भावचंद्रिका-श्रीकृष्णार्जुनसंवाद-बाळाजी सुंदरजी (रामचंद्रजीशास्त्री मुंडले यांचे साह्यानें मुंबई, इ. स. १८३९

४५. पदबोधिनी गीता- (अन्वयार्थ) बापसोबा श्रीकृष्णजी क्षत्री (सदाशिवशास्त्री फाळके यांच्या साह्यानें) मुंबई, इ. स. १८५३

४६. भाषाविवृतिसहित गीता-रघुनाथशास्त्री पर्वते पुणें, इ. स. १८६०

४७. गीतार्थमंजरी-शिवराम भास्कर काणे, रत्नागिरी. इ. स. १८६८

सामान्य ग्रंथ

४८. काल्पनिक विज्ञानविषयींचें संक्षेपेंकरून कथन. रेव्हरंड जे. स्टिव्हेन्सन, मुंबई, इ. स. १८५२

४९. आत्म्याचें अमरत्वाविषयीं-गोविंद गंगाधर. मुंबई, इ. स. १८५५ (ग्रां. कॅ.)

५०. वेदान्तसार (मराठी भाषांतर) जनार्दन रामचंद्रजी मुंबई, इ. स. १८६७

५१. ब्रह्मविचार (संस्कृत-मराठी) वासुदेव आत्माराम मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)

५२. पंचदशी-(मराठी भाषांतर) रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकर मुंबई, इ स. १८७२

* * *

९ : शास्त्र–व्यवसाय–कला

भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाविषयीं उदासीनता

जग मिथ्या आहे, संसार असार आहे, आयुष्य क्षणभंगुर आहे अशा तऱ्हेच्या मायावादी विचारसरणीमुळें मध्यन्तरींच्या काळांत हिंदुस्थानांतील लोक भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाविषयीं उदासीन होते. इह लोकींच्या नश्वर वैभवापेक्षां परलोकांतील शाश्वत सुखाची विवंचना करण्यांतच आमच्यांतील विचारवंत गढून गेलेले असत. सृष्टींतील अनंत चमत्कारांचा शोधपूर्वक अभ्यास करण्यापेक्षां भक्तियुक्त अंतःकरणानें सृष्टिकर्त्याच्या सगुण स्वरूपाचें ध्यान करणेंच त्यांना अधिक श्रेयस्कर वाटे. यामुळें एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत हिंदुस्थानांतील इतर भाषांप्रमाणें मराठी भाषेंतहि शास्त्रीय ग्रंथलेखनाचा परिपाठ पडला नाहीं.

परंपरागत शास्त्र–वैद्यक आणि ज्योतिष

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनीं भा. इ. सं. मंडळाच्या षाण्मासिक वृत्तान्तांत * मराठी गद्याविषयीं एक निबंध लिहिला होता. त्यांत त्यांच्या संग्रहीं गणित–ज्योतिष, फल–ज्योतिष आणि वैद्यक या विषयांचे प्राचीन गद्यग्रंथ असल्याचा उल्लेख केला आहे. वैद्यक आणि ज्योतिष हीं दोन्हीं शास्त्रें आर्यावर्तांत फार उच्च दशेला जाऊन पोहोंचलीं होतीं आणि त्यासंबंधीं संस्कृत भाषेंत बरेच ग्रंथहि लिहिले गेले. उपरिनिर्दिष्ट मराठी पुस्तकें हीं ह्या संस्कृत ग्रंथांचींच भाषांतरें असलीं पाहिजेत. याव्यतिरिक्त मराठी भाषेंत शास्त्रीय ग्रंथलेखनाचा प्रयत्न झाल्याची माहिती कोठेंहि आढळत नाहीं.

शास्त्रीय ग्रंथलेखनाचा उपक्रम

इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर इ. स. १८२० पासून मुंबई सरकारनें शिक्षणप्रसाराचें कार्य हातीं घेतलें. देशी भाषांच्या द्वारें एतद्देशीय लोकांना भौतिक शास्त्रांचें ज्ञान करून देणें हेंहि या नवीन शिक्षणक्रमांतील एक प्रमुख अंग होतें. शाळांतील विद्यार्थ्यांना शास्त्रीय विषय शिकवितांना क्रमिक पुस्तकांची उणीव भासूं लागली, आणि ती भरून काढण्यासाठीं इंग्रजी पुस्तकांच्या आधारानें मराठी भाषेंत शालोपयोगी शास्त्रीय ग्रंथ प्रसिद्ध होऊं लागले. प्रत्येक शास्त्राची परिभाषा नवीन तयार करण्याचें काम अत्यंत बिकट व त्रासदायक असल्यामुळें ह्या काळांतहि शास्त्रीय

---

* भा. इ. सं. मंडळ—षाण्मासिक वृत्त (शके १८३४) पृ. १३१.

वाङ्मयाची वाढ मंदगतीनेंच झाली असल्यास नवल नाहीं. मराठी भाषेंतील सुरुवातीच्या शास्त्रीय ग्रंथांत प्रतिपाद्य विषयाचें सांगोपांग विवेचन केलेलें आढळत नाहीं. विद्यार्थ्यांच्या मनांत त्या त्या शास्त्राविषयीं जिज्ञासा जागृत करण्याच्या उद्देशानेंच हे ग्रंथ लिहिले गेले. स्वतंत्र ग्रंथाखेरीज दिग्दर्शन, मराठी ज्ञानप्रसारक व त्रैमासिक ज्ञानदर्शन, या मासिकांतील अनेक मनोरंजक व उपयुक्त लेखांमुळेंहि शास्त्रीय वाङ्मयांत बरीच भर पडली.

वैद्यक

मराठी वाङ्मयांतील शास्त्रीय विभागांत वैद्यकीय ग्रंथांची संख्या सर्वांत अधिक आहे.‡ मुंबईचें ग्रांट मेडिकल कॉलेज इ. स. १८३८ सालीं स्थापन झालें. या कॉलेजांत इंग्रजी वैद्यक मराठी भाषेच्या द्वारें शिकविण्याचे वर्ग असत. यांतील विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं तेथील शिक्षकांनीं इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें मराठी भाषेंत सातआठ पुस्तकें लिहिलीं. याशिवाय संस्कृत भाषेंतील वैद्यकीय ग्रंथांचींहि मराठी भाषांतरें प्रसिद्ध झालीं.

जॉन मॅक्लेनन

डॉ. जॉन मॅक्लेनन यांनीं इ. स. १८२८ त 'औषधकल्पनाविधि' आणि 'निदान' हे दोन भाषांतरात्मक ग्रंथ लिहिले. 'औषधकल्पनाविधि' या ग्रंथांत पाश्चात्य आणि पौरस्त्य औषधांचें वर्णन असून त्यांचीं लॅटिन, इंग्रजी, प्राकृत, संस्कृत, हिंदुस्थानी, फारशी व अरबी इतक्या भाषांतील नांवें दिलीं आहेत. निदानावरील ग्रंथांत रोगांच्या मुख्य जाति, त्यांचे पोटभेद आणि प्रत्येक रोगाचीं ठळकठळक लक्षणें सांगितलीं आहेत. जॉन मॅक्लेनन हे मुंबईस असिस्टंट सर्जन व नेटिव मेडिकल स्कूलचे सुपरिंटेंडेंट होते. त्यांच्या 'निदान' या ग्रंथांतील एक लहानसा उतारा सादर करितों.

"मुखमौक्तिक. ल० आप्थे. इं थ्रश्.

> पूर्वीं जिव्हा सुजलेलीशी होऊन तिचा व तोंडांतील पदार्थांचा वर्ण मेचकसा होतो. नंतर ओष्ठ जिव्हा आंतडें यांचे ठायीं मुग गुंज जोंधळा याचे इतके मोठे वर्तुलसे मोत्यांसारखे असे फोड होतात. ते कधीं निरनिराळे व कधीं संलग्न असतात व एकदां जाऊन पुनः होतात. व त्यांजपासून दह्याचे सायीसारखा पदार्थ निघतो. या रोगाला मुसलमान छारु व निनान्व म्हणतात. त्याचे स्वतंत्र आणि परतंत्र असे दोन प्रकार आहेत.

‡ " Under Science proper medicine appears to have attracted the chief attention "

—**M. G. Ranade**—'*The Growth of Marathi Literature.*'

१. स्वतंत्र—हा बालांनाच होतो. यांत मुखापासून आंतड्यापर्यंत फोड होत जातात व याजबरोबर किंचित् ज्वर असतो.

२. परतंत्र—हा बालांस व मोठ्ये मनुष्यांस होतो. याचे फोड बहुतकरून गळ्यापासून तोंडांत होत येतात. ते कधीं काळेसे होतात व निर्बलपणा फार होतो. सन्निपात ज्वर येतो. *

निघंटप्रकाश व निघंटरत्नाकर

बापू गंगाधर जोशी यांनीं चिंतामण जोशी वैद्य व रामचंद्रभट्टयोगी यांच्या साह्यानें इ. स. १८३९ त 'निघंटप्रकाश' या नांवाचा एक विस्तृत ग्रंथ लिहिला. गुणदोषप्रकरण, परिभाषाप्रकरण, परीक्षाप्रकरण, दिनचर्या, शारीर, निदान, धातूपधातू, चिकित्सा आणि पथ्यापथ्य अशीं या ग्रंथाचीं एकंदर नऊ प्रकरणें आहेत. याच धर्तीचा 'निघंटरत्नाकर' हा ग्रंथ दातार, ताम्हनकर, महाबळ आणि पाटील या चौघांनीं शेठ हंसराज करमसी यांच्या साह्यानें इ. स. १८६७ सालीं तीन भागांत प्रसिद्ध केला.

कृष्णशास्त्री भाटवडेकर (–१८८६)

कृष्णशास्त्री भाटवडेकर यांनीं संस्कृत ग्रंथांवरून 'वैद्यावतंस', 'वैद्य-जीवन,' 'वैद्यामृत,' 'त्र्यंबकी' इत्यादि पांचसहा ग्रंथ लिहिले, आणि मराठी वाङ्मयाच्या वैद्यक शाखेंत बहुमोल भर घातली. कृष्णशास्त्री हे डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर ह्यांचे वडील. "हे चांगले वैद्य, चांगले व्युत्पन्न आणि इंग्राजी चांगले शिकलेले होते. आकाशसौंदर्य, माधवनिदान, वैद्यसारसंग्रह, मेघदूतकाव्य, सुभाषित-रत्नाकर, इत्यादि कितीएक ग्रंथ त्यांनीं लिहिलेले प्रसिद्ध आहेत." $ यांच्याइतकी विस्तृत व भारदस्त स्वरूपाची ग्रंथरचना त्या काळीं फारच थोड्या लोकांच्या हातून झाली आहे.

पांडुरंग गोपाळ मंत्री

पांडुरंग गोपाळ मंत्री यांनीं इ. स. १८६८ सालीं "महामारीच्या रोगावर लोकोपयोगी सूचना" या नांवाचें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यानंतर इ. स. १८७२ त त्यांनीं 'बालरोगचिकित्सा' हा ग्रंथ लिहिला. "यांत डॉक्टर स्थान्नर ह्यांच्या बालरोगाच्या ग्रंथाचा बराच आधार घेतला आहे....ठिकठिकाणीं वैद्यकसंबंधी शब्दांची परिभाषा, प्राचीन संस्कृत वैद्यक ग्रंथांत जी उपलब्ध आहे

* निदान–पृ. ३३.

$ बालबोध (डिसेंबर १८९५) पृ. १९४.

तीच घेतली आहे. " ‡ या पुस्तकावर ' दंमहारक ' मासिकांत विस्तृत अभिप्राय § प्रसिद्ध झाला होता.

गोपाळ शिवराम वैद्य (इ. स. १८४०-१८९९)

गोपाळ शिवराम वैद्य यांनीं इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें ' शस्त्रवैद्यक ' (Surgery) आणि ' न्यायवैद्यक ' (Medical Jurisprudence) हे दोन ग्रंथ लिहिले. ग्रांट मेडिकल कॉलेजांत वरील दोन्ही विषयांचे ते शिक्षक होते. त्यांचें इंग्रजी शिक्षण मुंबईस एल्फिन्स्टन विद्यालयांत झालें. पुढें त्यांनीं मेडिकल कॉलेजांतील पगारी विद्यार्थ्यांची जागा मिळवून आपला वैद्यकीय शिक्षणक्रम पुरा केला. इ. स. १८६४ त त्यांना एल्. एम्. ही पदवी मिळाली. याच वर्षीं बाटलीवाल्याच्या दवाखान्यांत असिस्टंट सर्जनच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. या काळीं मुंबईतील नामांकित शस्त्रवैद्यांत त्यांची गणना होत असे.

सखाराम अर्जुन (इ. स. १८३९-१८८५)

डॉ. सखाराम अर्जुन यांनीं ' वैद्यतत्त्व ' आणि 'गर्भविद्या आणि प्रसूतिकरण' हे दोन ग्रंथ लिहिले. यांचें शिक्षण मुंबईस एल्फिन्स्टन विद्यालयांत झालें. इ. स. १८६३ त त्यांनीं एल्. एम्. ची पदवी मिळविली. हे " ग्रांट मेडिकल कॉलेजांत वनस्पतिशास्त्राचे प्रोफेसर, व्हॅक्सिनेशन खात्याचे सुपरिंटेंडेंट, नामदार व्हाइसराय साहेबांचे ऑनररी असिस्टंट सर्जन, आणि मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो होते; इतकेंच नाहीं, तर वैद्यकीच्या संबंधानें यांची मुंबई शहरांत जितकी चहा होती, तितकी डॉक्टर भाऊ दाजींचे मागें थोड्याच डाक्तरांची होती. "* यांच्या ' वैद्यकतत्त्व ' या ग्रंथांतील एक उतारा खालीं देत आहें—

> " शुचिर्भूतपणाची आवश्यकता वाढवून सांगणें तर अवघडच आहे. सर्वांग प्रत्यहीं धुवावें आणि धुतेवेळीं यथास्थित चोळावें. बहुतेक लोकांना ऊन पाण्यापेक्षां थंड पाणी चांगलें; परंतु नाजुक मनुष्यास शीतोदक स्नान नेहमीं सोसत नाहीं. स्नान केल्यानंतर शिरशिरी आलीशी वाटली, तर थंड पाण्याबद्दल कोंबट पाणी घ्यावें. उत्तरेकडील लोकांच्या धर्मशास्त्राप्रमाणें त्यांस वारंवार स्नानें करावीं लागतात, त्यावरून हिंदुस्थानामध्यें मलीनता हें रोगाचें साधारण कारण नाहीं, असें वाटेल; परंतु हीं स्नानें वास्तविक असण्यापेक्षां केवळ आचारानिमित्तानें असतात. मलीन वस्त्रें वापरणें, आणि ज्या घरांत

---

‡ प्रस्तावना—बालरोगचिकित्सा.

§ दंभहारक पु. २, अं. ६.

* वि. ज्ञा. वि. पु. १७, अं. १०.

सर्व प्रकारची घाण सांचून राहिली आहे, अशा घरांत राहणें, ह्या चाली-बरोबर तीं चालत असतात, आणि सर्व एतद्देशीय लोकांमध्यें असें एक ठेंग मत आहे कीं, ज्या रोगामध्यें ज्वर असतो, त्यांत स्नान केलें असतां मोठी दुखापत होते; म्हणून ज्यांनीं आठवड्याचे आठवडे किंवा महिनेहि अंग धुण्याची उपेक्षा केली आहे, असे लोक पुष्कळ पाहण्यांत येतात, व ते उंचवर्णांतही असतात. ''*

जनार्दन हरी आठल्ये यांनीं इ. स. १८६१ त 'Domestic Guide to Mothers in India' या इंग्रजी ग्रंथाच्या आधारें 'बालवैद्य' या नांवाचें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें, इ. स. १८६५ त नारायण दाजी यांनीं 'औषधिविद्या' नामक ग्रंथ लिहिला. याशिवाय 'अमृतसागरवैद्यकग्रंथ,' 'आरोग्यचिंतामणि,' 'स्त्रियांचे विकार,' 'वनौषधिसंग्रह' इत्यादि अनेक लहानमोठे वैद्यकीय ग्रंथ ह्या काळांत प्रसिद्ध झाले.

शारीरशास्त्र–इंद्रियविज्ञानशास्त्र

जॉन मॅक्लेनन् यांनीं इ. स. १८५२ त शरीरशास्त्रावर एक लहानसें भाषांतरात्मक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यानंतर भिकाजी अमृत चोभे यांनीं इ. स. १८६३ सालीं 'मानुषशारीरशास्त्र' या नांवाचा एक विस्तृत ग्रंथ लिहिला. ह्यांत ग्रँट मेडिकल कॉलेजांतील मराठी वर्गामध्यें दिलेल्या त्यांच्या छत्तीस व्याख्यानांचा सारांशरूपानें समावेश केला आहे. इ. स. १८६५ त त्यांचा 'मानुष इंद्रियविज्ञान-शास्त्र' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. यांत मानवी शरीराच्या निरनिराळ्या इंद्रियांची रचना व क्रिया ह्यांविषयीं सविस्तर वर्णन केलें आहे. हा ग्रंथ प्रथम इंग्रजींत लिहिला आणि मग त्याचें मराठींत भाषांतर केलें. व्यंकट रंगो कट्टी यांनीं डॉक्टर कार्पेंटर यांच्या इंद्रियविज्ञानशास्त्रावरील इंग्रजी ग्रंथाच्या आधारें 'नरतनु' या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यावर वि. ज्ञा. विस्तारांत × डॉ. सखाराम अर्जुन यांनीं परीक्षणात्मक लेख लिहिला होता. भिकाजी अमृत चौभे यांच्या 'मानुष इंद्रिय-विज्ञानशास्त्र' या ग्रंथांतील एक उतारा सादर करितों.

"मनुष्याचें अन्न प्राणिज व उद्भिज अशा पदार्थांचें मिश्रण असावें अशी ईश्वरी योजना आहे, व त्यांच्या दांताच्या व आंतड्याच्या स्थितीवरून व अनुभवावरून ती प्रदर्शित होते. मांसाहारी प्राण्यांचें अन्न इतर प्राण्यांच्या शरीरांतल्या रक्तमांसादि पदार्थांनीं झालें असतें. त्यांत मांसाहारी

---

* वैद्यतत्त्व पृ. १७०.

× वि. ज्ञा. वि. पु. ४, अं. ४.

प्राण्यांचे रक्तमांसादि भाग घटित करणारीं मूलतत्त्वें असतात, व तीं तत्त्वें प्रायशः ह्याच्या शरीरांतल्या तत्त्वाप्रमाणेंच संयोग पावलेलीं असतात. हें अन्न रक्ताशीं मिळून त्यास पुन्हा सेंद्रियस्थिति प्राप्त होण्यास त्याचें द्रावण होणें मात्र अवश्य असतें. आतां ज्यांचें उपजीवन फक्त उद्भिज पदार्थांवर होतें, असे जे वनस्पत्याहारी प्राणी त्यांच्या मांसरक्तादि भागांशीं ज्यांची विपाकानें एकरूपता होऊन जाणार असें अन्न प्राप्त होण्यास अधिक अडचण पडावी असें वाटेल; परंतु अन्नाच्या सामान्य उद्भिज्ज पदार्थांपैकीं मुख्यांत प्राणिज पदार्थांतल्या अलब्यूमन, फैब्रीन व केजीन, ह्या मुख्य पोषक पदार्थांशीं एकरूप असे पदार्थ असतात. उद्भिज्ज अलब्यूमन हें बहुतेक वनस्पतींच्या रसांत व बीजांत विपुल असतें व तें एथें प्राणिज्य अलब्यूमनाच्या ठिकाणीं आहे. ग्लूतिन हें दाण्यांत म्हणजे गहूं, बाजरी, ज्वारी, मका इत्यादिकांत, व ह्याच जातीच्या दुसऱ्या वनस्पतींच्या बीजांत व रसांत असतें व हे प्राणिज फैब्रीनासारखें आहे. आणि लेग्युमिन हें हरबरा, तूर, चवळी, मूग, उडीद, वाटाणा, पावटा, घेवडा इत्यादि लेग्यूमिनस म्हणजे ज्यांस शेंगा असतात त्या वनस्पतींत व बटाट्यांत असतें. तें दुधांतल्या केजीनाशीं एकरूप आहे. ह्या सर्व उद्भिज पदार्थांचें वर सांगितलेल्या प्राणिज पदार्थांप्रमाणेंच रूपांतर होऊन मांसरक्तादि भाग होतात, आणि मांसाहारी व वनस्पत्याहारी प्राण्यांच्या मांसरक्तादि भागांप्रमाणें त्यांचें नैत्रोजनविशिष्ट अन्नहि सर्व मुख्य लक्षणांनीं सारखें आहे असें मानतां येतें." ¶

ज्योतिःशास्त्र — फलज्योतिष

वैद्यकाप्रमाणेंच खगोलविद्या आणि फलज्योतिष ह्यांसंबंधींहि या काळांत बरेच ग्रंथ लिहिले गेले. इ. स. १८३२ त मुंबईच्या शिक्षामंडळीसाठीं पुणें येथें 'भूगोल आणि खगोल इत्यादि विषयक संवाद' या नांवाचा ग्रंथ छापण्यांत आला. बाळशास्त्री जांभेकर यांनीं आपल्या भूगोलशास्त्राला जोडलेल्या निबंधांत भास्कराचार्यांच्या मताचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. इ. स. १८४६ सालीं अमेरिकन मिशनच्या विद्यमानेंहि खगोलविद्येवर लहानसें शालोपयोगी पुस्तक प्रसिद्ध झालें.

सिद्धान्तशिरोमणिप्रकाश

'मालवदेशीय सिहोरनगरथ सुबाजी बापू' यांनीं इ. स. १८३६ त 'सिद्धान्तशिरोमणिप्रकाश' या नांवाचा ग्रंथ लिहिला. त्यांत पौराणिक, सिद्धान्तिक आणि कोपरनिकस ह्या तिन्ही मतांचा तुलनात्मक विचार केला आहे. भाषेच्या दृष्टीनें

¶ मानुष–इंद्रियविज्ञानशास्त्र, पृ. २४.

या पुस्तकांत पुष्कळ दोष आहेत, परंतु त्या काळांतील बहुतेक ग्रंथ भाषांतरात्मक असल्यामुळें स्वतंत्र-ग्रंथरचनेचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे. त्यांतील एक उतारा खालीं उद्धृत करितों.

"या भूगोलखगोलाविषयीं श्रीमद्भागवतांतर्गत पंचम स्कंधीं वर्णन आहे. याप्रमाणेंच महाभारतांतर्गत भीष्मपर्वांतही आदिभागीं आहे आणि वायु पुराणादिकांतही आहे. सारें व्यासकृत बहुधा एक प्रकारेंच आहे. याला कांहीं विरुद्ध भास्कराचार्यकृत सिद्धान्तशिरोमणींत लिहिलें आहे. या दोहींमध्यें पुराण कांहीं प्रत्येक या गोलाविषयींच सांगितलें नाहीं, सिद्धान्त तर प्रत्येक या गणिताविषयींच उत्पन्न जाला आहे म्हणोन सिद्धान्त प्रबल आहे. याहीवर ऐलीवर साहेब लोकांही प्रत्यक्ष दर्याप्ती करून बयानही लिहिलें आहे आणि तदनुसार नकशे गोल हेही केले आहेत. या तीन प्रकारांमध्यें कोणता विषय कोठें सत्य आहे, कोणता विषय कोठें भ्रमिष्ट आहे, हें आपल्या बुद्धीनें यथामति विचारून सांगतों. तरी विचक्षणाही कृपा करून चित्त देऊन श्रवण करावें आणि कोठें कांहीं दुरुक्त असल्यास परिहास न करितां शोधावें." *

कृष्णशास्त्री गोडबोले; वामन कृष्ण जोशी गद्रे

कृष्णशास्त्री गोडबोले आणि वामन कृष्ण जोशी गद्रे यांनीं इ. स. १८५६ त गणेश दैवज्ञाच्या ग्रहलाघवाचें मराठींत भाषांतर केलें. यांत ज्योतिष ग्रंथांपैकीं तिथि वर्तविणें, ग्रहण वर्तविणें वगैरे सामान्य गोष्टींची माहिती दिली आहे. त्यानंतर कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं विलियम् चेंबर्स आणि रॉबर्ट चेंबर्स यांच्या इंग्रजी ग्रंथाच्या आधारानें 'ज्योतिःशास्त्री' (A Treatise on Astronomy) हा ग्रंथ लिहिला. वामन कृष्ण जोशी यांनीं इ. स. १८७० त 'पंचांगसाधनसार' हें पुस्तक प्रसिद्ध केलें. गोडबोले यांच्या 'ज्योतिःशास्त्र' या ग्रंथांतील एक लहानसा उतारा खालीं देत आहें.

"ताऱ्याचे गमनमार्गांचा विचार करितांना जसा आपण एक एक तारा पाहिला, तसें न करितां आपण आपली दृष्टि दोन ताऱ्यांचे पुंजाकडे, तीन ताऱ्यांचे पुंजाकडे, किंवा कोणतेही एखादे पुंजाकडे लावली तर असें दिसतें कीं, ते सर्व एका मेळींत भ्रमण करून सदा एकमेकांपासून आपापलीं अंतरें सारखीं राखितात; ह्यामुळेंच त्यांच्या आकाशांतील प्रदक्षिणा सारखे कालांत होतात. वस्तुतः हें सर्व भचक्र एका ध्रुवापासून दुसऱ्या ध्रुवापर्यंत जी रेषा म्हणजे आंस त्याभोंवतीं फिरते. एका आंसाभोंवतीं सदा व हळूहळू फिरणाऱ्या आणि

* सिद्धान्तशिरोमणिप्रकाश—पृ. ८

सुमारें चोवीस तासांत पूर्ण प्रदक्षिणा करणाऱ्या अशा एखाद्या पोकळ गोलांत बसविल्याप्रमाणें ह्या ताऱ्यांची स्थिति आहे. आतां एक ध्रुव क्षितिजापासून बराच वर आणि दुसरा बराच खालीं आहे, म्हणून हें उघड आहे, कीं ह्या भचक्राचें भ्रमण तिर्यक् दिशेनें होतें. हें गमन जर क्षितिजसमांतर दिशेनें होतें तर एक ध्रुव आकाशांत आपले डोकीवर असतां आणि दुसरा त्यांच्या-समोर आपले पायांखालीं असतां आणि हें भ्रमण जर जसें जमिनीवर चाक फिरतें तसें क्षितिजास लंब दिशेनें होतें, तर एक ध्रुव क्षितिजाचे बराबर उत्तर बिंदूंत असता आणि दुसरा क्षितिजाचे बराबर दाक्षिण बिंदूंत असता; परंतु हें भ्रमण ह्या दोन दिशांचें मध्यें होतें. " $

केरो लक्ष्मण छत्रे (इ. स. १८२४–१८८४)

केरो लक्ष्मण छत्रे यांनीं इ. स. १८६० मध्यें युरोप खंडांतील मोठमोठाले गणकांचे ग्रंथ व प्रत्यक्ष वेध यांवरून 'ग्रहसाधनाचीं कोष्टकें' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. यापूर्वींच त्यांनीं मराठी ज्ञानप्रसारकांत ज्योतिःशास्त्रासंबंधीं दोनतीन लेख लिहिले होते. हवेसंबंधींचा त्यांचा विस्तृत ग्रंथहि याच मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाला. केरोपंत छत्रे यांचा जन्म इ. स. १८२४ त झाला. त्यांचें शिक्षण मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांत झालें. इ. स. १८६५ सालीं त्यांना पुण्याच्या पाठशाळेंत गणित-शास्त्राच्या मुख्य गुरूची जागा मिळाली. नामांकित गणितज्ञ म्हणून त्यांची महाराष्ट्रांत सर्वत्र प्रसिद्धी होती.

आकाशसौंदर्य

कृष्णशास्त्री भाटवडेकर यांनीं चार्ल्स् एफ्. ब्लंट यांच्या इंग्रजी ग्रंथावरून महाराष्ट्र-भाषेंत 'आकाशसौंदर्य' या नांवाचा ग्रंथ लिहिला. "ह्यांत आकाशांतील ग्रह, तारे, नक्षत्रें, इत्यादिकांचें यथार्थ वर्णन केलें आहे; व हा विषय स्पष्ट समजावा म्हणून त्या त्या ग्रहनक्षत्रादिकांचीं सुंदर चित्रें काढून त्यांस यथायोग्य रंग दिला आहे......जरी हा विषय शास्त्रीय आहे तरी प्राकृत जनांस आणि मुख्यत्वेंकरून मुलांस याचा बोध व्हावा या उद्देशानें यामध्यें सुलभ शब्दांची योजना करून सरळ भाषेनें लिहिला आहे. "*

ह्याशिवाय ज्योतिःशास्त्र व फलज्योतिष यांसंबंधीं ज्योतिषसार, ज्योतिषरत्न, मुहूर्तमार्तंड, ज्योतिषचक्र, तिथिचिंतामणि इत्यादि अनेक ग्रंथ या काळीं प्रसिद्ध झाले.

$ ज्योतिःशास्त्र पृ. ४–५

* प्रस्तावना—आकाशसौंदर्य

कायदा

हिंदुधर्मशास्त्र

रघुनाथ शास्त्री दात्ये यांनीं सरकारच्या आज्ञेवरून इ. स. १८४४ त ' मिताक्षरा व्यवहाराध्याय व मयूख दायभाग ' यांचें मराठींत अक्षरशः भाषांतर केलें. त्यानंतर इ. स. १८६७ त विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं ' हिंदुधर्मशास्त्र व्यवहारखंड, हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें. शास्त्राचे उगम, विवाहाविषयीं, दत्तविधान, दायविभाग, स्त्रीधनाविषयीं, पोषण आणि पोष्यवर्ग स्वत्वनिवृत्ती देणें, विकणें, इत्यादि; अज्ञान व त्यांचें पालन करणार, किरकोळ विषय, अशीं या पुस्तकाचीं एकंदर नऊ प्रकरणें आहेत. जनार्दन सखाराम गाडगीळ यांनीं रेमंड वेस्ट आणि जोहान जॉर्ज बूलर यांच्या ग्रंथावरून ' हिंदुधर्मशास्त्रसार ' (२ भाग) हा ग्रंथ मराठी भाषेंत लिहिला. याशिवाय काशिनाथ महादेव फडके यांनींहि ' धर्मशास्त्र ' (इ. स. १८६४) या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. मंडलीक यांच्या ' हिंदुधर्मशास्त्र ' ह्या ग्रंथांतील एक उतारा येथें सादर करितों :—

" (१६) प्राचीन कालीं असवर्ण स्त्रीशीं विवाह होत असे; तो अनुलोभ मात्र वर्ण असला पाहिजे; म्हणजे उंच वर्णाच्या पुरुषानें नीच वर्णाच्या स्त्रीशीं लग्न होत असे. या नियमामुळें ब्राह्मणास चारहि वर्णांच्या कन्यांशीं विवाह करण्यास अनुकूल होतें.

क्षत्रियांस, ब्राह्मण वर्ज करून बाकी तिन्ही वर्णांच्या मुली करितां येत असत. वैश्यांस, स्ववर्णाची व शूद्राची कन्या करितां येत होती. शूद्रास मात्र आपल्या वर्णाबाहेर लग्न करण्याची परवानगी नव्हती. सांप्रत तर सवर्णांचें मात्र लग्न होतें. असवर्णाचा विवाह झाला असतां त्यापासून सशास्त्र संबंध होत नाहीं.

(१७) कन्येचा विवाहकाल आठांपासून दहा वर्षेपर्यंत मानिला आहे. पुढें अविवाहित ठेविल्यास कांहीं अदृष्ट दोष मानितात. परंतु सांप्रत दहा वर्षांनंतरहि मुलीचा विवाह होतो; व पूर्वीं प्राप्तयौवन स्त्रियांनीं तीन वर्षें वाट पाहून पित्यानें लग्न न केल्यास, स्वयंवर करावा, असें म्हटलें आहे. यावरून सर्वत्रच सारखा पाठ होता असें दिसत नाहीं; तसेंच जे प्राप्तयौवन कन्येचा विवाहास दोष सांगितले ते अदृष्ट आहेत; म्हणून जेथें तशी रूढी असेल, अथवा शिष्टसम्मतें नवी पडेल, तेथें व्यवहाररीत्या तो विवाह रद्द होईल असें वाटत नाहीं. " †

---

† हिंदुधर्मशास्त्र पृ. १०–११

नेहमींच्या व्यवहारांत कायद्याचें ज्ञान उपयुक्त असल्यामुळें त्या विषयाचीं पुस्तकें जास्त प्रमाणांत प्रसिद्ध होणें स्वाभाविक आहे. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणेंच मुसलमानी कायद्यासंबंधींहि दोन पुस्तकें लिहिलीं गेलीं. यांशिवाय मेजर क्यांडी, गणेश बाबाजी माटे, जनार्दन हरी आठल्ये, नारायण मोरेश्वर केळकर, मुकुंदराव, भास्करजी, वासुदेव जगन्नाथ कीर्तीकर इत्यादि लेखकांनीं निरनिराळ्या कायद्यांसंबंधींचीं बरींच पुस्तकें प्रसिद्ध केलीं. वाङ्मयाच्या दृष्टीनें त्यांना फारसें महत्त्व नसल्यामुळें या ठिकाणीं त्याचें विस्तृत विवेचन करणें इष्ट होणार नाहीं.

अर्थशास्त्र

लक्ष्मीज्ञान–संपत्तिविवेचन

'कामगार लोकांशीं संभाषण' या ग्रंथाच्या कर्त्यानें इ. स. १८४९ त क्लिप्ट साहेबाच्या इंग्रजी ग्रंथावरून लक्ष्मीज्ञान (Political Economy) या नांवाचा एक लहानसा ग्रंथ लिहिला. ज्ञान, उद्योगाचे विभाग, क्रयविक्रय भांडवल, निर्भयपणा, किंमत, धारा–नफा–मजुरी अशीं या पुस्तकाचीं एकंदर सात प्रकरणें आहेत. प्रस्तावनेच्या शेवटीं 'लोकहितवादी' यांचें नांव आढळतें, तेव्हां कदाचित् त्यांनींच हा ग्रंथ लिहिला असण्याचा संभव आहे. त्यानंतर इ. स. १८५३ सालीं नारो बाळकृष्ण पटवर्धन यांनीं 'Money Matters' ह्या इंग्रजी पुस्तकाचें 'संपत्ति-विवेचन' या नांवानें मराठी भाषांतर केलें. 'लक्ष्मीज्ञान' ह्या पुस्तकांतील खालील उताऱ्यावरून मराठी भाषेंतील सुरवातीच्या शास्त्रीय ग्रंथांचें स्वरूप लक्षांत येईल.

"उद्योगाची वांटणी केल्याचें फळ असें आहे, कीं उद्योग होतो, व जो येका कामांत प्रवीण असतो तें काम तो लौकर करितो, याचमुळें थोडा वेळ लागतो. आणखी कितीएक कामें असीं आहेत; कीं येक काम संपवून दुसरे कामास लागण्यास हत्यारें बदलावीं लागतात, जागा बदलावी लागते व येकाचें चित्त येका कामाकडे असलें म्हणजे त्यांत त्याला सुधारणा करावयास सांपडते. तो नवीं हत्यारें व नव्या युक्ती करून सुलभ काम करितो, तसें येकाकडे सर्व कामें असल्यानें होत नाहीं; पूर्वीं सुईचा दाखला लिहिला आहे. तेंच काम चौघांनीं केलें तर येका तासांत हजार सुया करितात आणि येकटा करणार कसबीही असला तरी येक तासांत शंभरांहून अधिक करीत नाहीं. जसें सैंपाक करणार व वाढणार, गंध लावणार, पाट मांडणार, वेगळाले असले तरी काम किती लौकर होतें व तीं सर्व कामें येकट्याकडे असल्यानें तशीं होणार नाहींत, व सर्व बिघडतील तसें हें आहे." *

* लक्ष्मीज्ञान पृ. २७–२८

हरि केशवजी पाठारे (इ. स. १८०४-१८५८)

हरि केशवजी पाठारे व विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं इ. स. १८५४ त मिसेस मार्सेट हिच्या इंग्रजी ग्रंथावरून ' देश व्यवहार व्यवस्था ' या नांवाचा गुरुशिष्य–संवादरूप ग्रंथ मराठी भाषेंत लिहिला. या पुस्तकांत एकंदर बावीस संवाद असून त्यांमध्यें संपत्तीचीं मुख्य कारणें, मालाचें रक्षण, उद्योगाची वांटणी, भांडवल, रोजमुरा व लोकसंख्या इत्यादि गोष्टींचें थोडक्यांत विवरण केलें आहे. हरि केशवजी यांनींच मराठी भाषेंतील शास्त्रीय वाङ्मयाचा पाया घातला असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांचे सर्व ग्रंथ भाषांतरात्मक असले तरी ते मुळाप्रमाणेंच सरस व उत्कृष्ट वटले आहेत. हरि केशवजी हे मुंबई येथें दिवाणी कोर्टांत चीफ ट्रान्सलेटर होते. हुबेहूब भाषांतर करण्याविषयीं त्यांची फार प्रसिद्धी होती. आपलें सरकारी कामकाज सांभाळून त्यांनीं ' सिद्धपदार्थ विज्ञानशास्त्र, ' रसायनशास्त्र, ' ' इंग्लंडचा इतिहास, ' ' यात्रिक-क्रमण, ' ' शालोपयोगी नीतिग्रंथ, ' आणि ' देशव्यवहारव्यवस्था ' असे सहा ग्रंथ लिहिले. त्यांची भाषा शुद्ध व सोपी होती. त्यांनीं आपल्या मातृभाषेची अत्यंत निष्ठा-पूर्वक सेवा केली. ह्यांचे चिरंजीव रामचंद्र हरि यांनीं त्यांचें विस्तृत चरित्र प्रसिद्ध केलें आहे.

अर्थशास्त्रपरिभाषा

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं इ. स. १८५५ त जॉन स्टुअर्ट मिल् यांच्या ग्रंथावरून ' अर्थशास्त्रपरिभाषा ' या नांवाचा ग्रंथ लिहिला. " प्रकृत ग्रंथ लिहिणारास ह्या देशांतील व्यापाराची, शेतकीची, व राज्यव्यवस्थेची, विशेष तपशीलवार माहिती असती, तर ह्या ग्रंथाच्या ठायीं व्यावहारिक उपयोगिता विशेष येती, हें ग्रंथ करणारा संतोषानें कबूल करतो. ह्या प्रकारें व्यवहारासंबंधानें ह्या ग्रंथास कांहीं न्यूनता असली, तरी शास्त्रांतील मूल विषयांच्या प्रतिपादनाविषयीं तादृश न्यूनता ह्या ग्रंथांत आढळणार नाहीं, अशी प्रकृत ग्रंथकर्त्याची समजूत आहे. "‡ यांतील एक उतारा खालीं देत आहें :—

> " जर सर्व मनुष्यें आपापल्या श्रमाच्या सर्व उत्पन्नाचा व्यय करूं लागलीं तर भांडवल कदापि वाढावयाचें नाहीं. प्रायः सर्व भांडवल संग्रहमूलक आहे. प्रायः पद घालण्याचें कारण असें आहे, कीं जो मनुष्य आपल्याच करतां श्रम करतो तो निर्धन न होतां त्याला आपल्या श्रमाच्या सर्व उत्पन्नाचा स्वसुखार्थ व्यय करतां येतो. ह्या मनुष्याच्या उदाहरणांत त्याचा माल तयार होईतोंपर्यंत तो ज्या पदार्थांचा व्यय करतो, त्या पदार्थांस भांडवल म्हणावें असें कोणी म्हटल्यास तें म्हणणें एक प्रकारें बरें दिसतें. परंतु वास्तविक पाहतां त्या

‡ प्रस्तावना–अर्थशास्त्रपरिभाषा

पदार्थांस भांडवल म्हणतां येत नाहीं कां कीं, त्या पदार्थांचा तो मनुष्य उत्पादक बुद्धीनें व्यय करीत नाहीं, तर स्वसुखार्थ करतो; म्हणून तेथें स्वोपभोगाचा प्रतिबंध झाला असें म्हणतां येत नाहीं. आतां बारीक विचार केल्यास ह्या स्थळींसुद्धां पुढल्या उत्पन्नाकरितां बियांचा वगैरे संचय प्रकृत सुखाचा प्रतिबंध करूनच करावा लागतो. तस्मात् लोकांची कितीही साधी अवस्था घेतली तरी तितकाही संग्रह असला पाहिजे. किंवा उत्पन्नापेक्षां खर्च तरी कमी असला पाहिजे. आतां मजूर चाकरीस ठेवून त्याच्याकडून संपत्ति उत्पन्न करण्याचें म्हटलें तर या अवस्थेंत पहिल्या साध्या अवस्थेंतल्यापेक्षांही अधिक संग्रह असला पाहिजे. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याकडून संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामांत जें धन खर्चतो तें सर्व मुळीं संग्रहापासून झालेलें असतें; म्हणजे तें कोणी तरी उत्पन्न केलें पाहिजे व उत्पन्नकर्त्यानें त्याचा उपभोग न घेतला पाहिजे. " §

पदार्थविज्ञानशास्त्र

हरी केशवजी यांनीं इ. स. १८३३ त 'सिद्धपदार्थविज्ञानविषयक संवाद' हा ग्रंथ लिहिला. ह्या शास्त्राची परिभाषा तयार करण्याचें अवघड काम त्यांनीं फार उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे. दार्ढ्य, निर्भेद्यता, निरवरोध, परिमेयता वक्रीभवन, प्रतिष्टंभ, विशिष्टगुरुत्व, स्थितिस्थापकत्व, स्नेहाकर्षत्व, इत्यादि नवीन योजलेले शब्द मार्मिक व अर्थपूर्ण आहेत. "हरि केशवजी यांची मराठी लिहिण्याची इतकी खुबी होती कीं, हा ग्रंथ इंग्लिश ग्रंथाचें भाषांतर असतांहि तसें त्या वेळेस कोणास वाटलें नाहीं. मूळचाच मराठी ग्रंथ असावा असें बहुतेकांस वाटलें. त्या वेळेस 'विद्येचे उद्देश लाभ आणि संतोष' व 'सिद्धपदार्थविज्ञान' हे मोठे व सरस ग्रंथ झाले." * केरो लक्ष्मण छत्रे यांनीं इ. स. १८५५ त पदार्थविज्ञानशास्त्रावर एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्या वेळीं असलेले ग्रंथ फार महाग म्हणून हा स्वल्प ग्रंथ काढिला असें प्रस्तावनेंत म्हटलें आहे. याशिवाय महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर यांनींहि इ. स. १८६१ त चेंबर्सकृत 'Matter and motion' ह्या ग्रंथाचें मराठींत भाषांतर केलें. हरि केशवजी यांच्या 'सिद्धपदार्थविज्ञानविषयक संवाद' या ग्रंथांतील एक उतारा येथें उद्‌धृत करितों.

"पदार्थाचें सामान्य ज्ञान होण्यास आपल्या देहावयवामध्यें ज्ञानतंतूचे ठायीं मात्र योग्यता आहे. अतएव मनास पदार्थांचें विशेष ज्ञान व्हावयास हे ज्ञानतंतू साधन होत; तर पदार्थांचें सामान्य ज्ञान ज्ञानतंतूवर होतें,

§ अर्थशास्त्रपरिभाषा पृ. ६५-६६

* दादोबा पांडुरंग-आत्मचरित्र पृ. १९

तेणेंकरूनच त्या पदार्थांचे मनास विशेष ज्ञान होतें. आतां अनुभवावरून असें कळून येतें कीं, पदार्थांचा ज्ञानतंतूशीं स्पर्श झाल्याविना त्यांजवर त्या पदार्थांचें सामान्यज्ञान उमटत नाहीं, आणि असा अनुभव आहे, म्हणून ज्ञानतंतूविशिष्ट जीं इंद्रियें, तीं दूर असलेल्या पदार्थांना जाणावयास समर्थ होत नाहींत. यास दृष्टान्त जो सुगंध द्रव्याचे परमाणूंचा वस्तुतः आपल्या नासिकेस स्पर्श होतो, त्यांचा मात्र आपणांस गंध येतो. आणखी मागेंही तुम्हांस सांगितलें होतें कीं, पुष्पाचे जे पराग उडून आपल्या नाकांत शिरतात, आणि तेथील आघ्राण ज्ञानतंतूवर आदळतांच त्या ज्ञानतंतूद्वारा मनास पुष्पगंधाचें विशेष ज्ञान होतें. " ×

रसायनशास्त्र

हरि केशवजी यांनीं इ. स. १८३७ सालीं 'रसायनशास्त्रविषयक संवाद' या नांवाचा भाषांतरात्मक ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांच्या इतर पुस्तकांप्रमाणेंच हा ग्रंथहि गुरुशिष्यसंवादरूप असून त्यांतील विवेचनपद्धति सुबोध मनोरंजक आहे. रामजी गणोजी चौघुले यांनीं 'रसायनशास्त्र अथवा हुन्नेरनिधि' या पुस्तकाचे तीन भाग प्रसिद्ध केले. ग्रँट मेडिकल कॉलेजांतील औषधिविद्या व रसायनशास्त्र या विषयांचे अध्यापक नारायण दाजी यांनीं इ. स. १८६२ त रशायनशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला. याशिवाय ह्या विषयावर हरहुन्नर स्नेही आणि उपयुक्त चमत्कारसंग्रह हे दोन ग्रंथ प्रसिद्ध झाले.

यंत्रशास्त्र

इ. स. १८३५ त विलियम हेनरी बेल यांनीं नारायणशास्त्री जोशी चौलकर यांच्या साह्यानें 'शिल्पविद्या या विषयाचे निबंध' (Treaties on Mechanics) हें पुस्तक प्रसिद्ध केलें. यांत स्थैर्यविज्ञान, क्रियाकलाप, शूलदंत, चक्रसंघात, समसूत्रस्थ, पार्थिवगुरुत्व इत्यादि अनेक शब्द नवीन बनविले आहेत. इ. स. १८४६ त अमेरिकन मिशनच्या विद्यमानें या विषयावर एक पुस्तक प्रसिद्ध झालें. त्यानंतर गोविंद गंगाधर फडके यांनीं इ. स. १८५३ त 'यंत्रशास्त्राचीं मुळें' हा ग्रंथ लिहिला. यांत 'चलन आणि यंत्रशास्त्र' यांच्या नियमांचें सविस्तर वर्णन केलें आहे. विलियम हेनरी बेल यांच्या वरील पुस्तकांतील एक उतारा येथें सादर करितों.

" ईश्वरानें मनुष्यांचा स्वाधीन जीं नानाप्रकारचीं शिल्पसाधनें ठेविलीं आहेत तीं शिल्पसाधनें अशीं. अप्रवाही पदार्थांचा भार आणि त्यांचा गतींतलें चालकत्व व पातळ पदार्थांचे भार आणि चेपण वायु आणि गास

× सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद पृ. ४३५–३६

म्हणजे, एका जातीचा वायुस्वरूप पदार्थ त्याचे भार आणि चेपण उष्णतेचे योगानें जी प्रवाही पदार्थांची वाफ होती, तिचें स्थितिस्थापकबल कमाणीचें स्थितिस्थापकत्व व जीवाचे शारीरबल हीं साहजिक शिल्पसाधनें आहेत, परंतु त्यांचा शक्ति अनेका जातींचा आणि अनेका मानांचा आहेत. यास्तव या बलांनीं कांहीं प्रतिरोध दूर करावयाचा असतां यांस पूर्वीं कांहीं रूपांतर दिल्यावांचून हीं प्रायः कामांत घेतां येत नाहींत. उदाहरण जा शक्ति आपल्या स्वाधीन आहेत त्यांमधून कोणीएक शक्ति घेतली असतां ती विवक्षित दिशेंत क्रिया करीत नाहीं किंवा तिचा वेग किंवा मान इच्छानुरूप नसतें. यास्तव ती शक्ति कार्यस्थलापर्यंत जातांना तिची दिशा किंवा वेग किंवा मान कामांत यथायोग्य उपयुक्त पडेल अशी कांहीं कळ केली पाहिजे. अशी जी कळ करितात तिला " यंत्र " म्हणतात. " *

शेतकी व बागाईत

नाशिक येथील रेव्हरेंड सी. पी. फारार यांचा विद्यार्थी रामचंद्र अमृत दुगल यांनीं इ. स. १८३८ त 'जागती जोत किंवा शेतपोत रीतभात याविषयीं वाद' हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यानंतर इ. स. १८४६ त आलेक्झांडर गिबसन यांनीं 'शेतकी आणि घरगुती व्यवस्था' हा ग्रंथ लिहिला. गोविंद नारायण यांनीं 'उद्भिज्जन्य पदार्थ' [इ. स. १८५६] आणि 'वृक्षवर्णन' [इ. स. १८५७] हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं. याशिवाय ह्या विषयावर 'पुष्पवाटिका,' 'वृक्षविनोद,' 'खताचे प्रकार,' इत्यादि पुस्तकें त्या काळीं प्रसिद्ध झालीं. 'शेतकी आणि घरगुती व्यवस्था' या पुस्तकांतील एक उतारा खालीं उद्धृत करितों.

" जीं धान्यें पेरावयास सतत ओलावा पाहिजे त्यांची क्षितिजाजवळ वळवांचे ढगाप्रमाणें चंचळ ढगें असतील त्याजवर विश्वास ठेवून पेरणी करूं नये. तसेंच लहान लहान प्राणी यांच्या कृतींवरून जीं लक्षणें दिसून येतात, तींही क्षुल्लक आहेत असें समजूं नये. पाऊस लागण्याचे पूर्वीं चिमण्या उंच उडत नाहींत. कारण कीं, जे उडणारे लहान जीव त्या शोधीत असतात त्या जिवांच्यानें हवेचे ओलसरपणामुळें वर जाववत नाहीं, ते जमिनीबरोबर उडतात. तसेंच सुके जमिनीवर बेडूक उड्या मारतात, दुतोंडें शब्द करूं लागतें. तसेंच लहान लहान जीव रात्रीचे फार येतात, त्यांत विशेषेंकरून चांचड, टोळ आणि माशा यांचा प्रादुर्भाव फार होतो. हीं सर्व चिन्हें, उष्णता आणि हवा, हीं एकत्र आहालीं असतां पावसाळा लागल्याच्या या निभ्रांत खुणा समजाव्या. परंतु या उपयोगी विषयासंबंधीं तपशीलवार मजकूर

---

* शिल्पविद्या या विषयाचे निबंध, पृ. ८३

लिहिण्याचा माझा अभिप्राय नाहीं, परंतु ईश्वरानें जी तुम्हांस बुद्धि आणि शहाणपण दिलें आहे त्याचा उपयोग करावयास तुम्ही प्रवृत्त व्हावें हा माझा उद्देश आहे. "¶

संगीत

भाऊशास्त्री अष्टपुत्रे यांनीं इ. स. १८५० त 'गायनप्रकाश' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें. त्यानंतर विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं इ. स. १८६४ सालीं गोवर्धन लक्ष्मण छत्रे यांचा 'गीतलिपी' हा लहानसा ग्रंथ प्रसिद्ध केला. ह्यांत पाश्चात्य संगीताच्या धर्तीवर भारतीय संगीताची 'नोटेशन-पद्धति' बसविण्याचा प्रयत्न केला आहे. सूर्याजी सदाशिव महात्मे आणि विश्वनाथ रामचंद्र काळे ह्या दोघांनीं इ. स. १८७२ त 'तंतुवाद्य-सतार शिकण्याचें पहिलें पुस्तक' तयार केलें.

संकीर्ण

इ. स. १८४६ त अमेरिकन मिशनच्या विद्यमानें तर्कशास्त्रावर एक लहानसें पुस्तक लिहिलें गेलें. त्यानंतर बाळकृष्ण विद्याधर हळबे यांनीं इ. स. १८७२ त तर्कसंग्रहाची 'न्यायसिंधुपोत' या नांवाची प्राकृत टीका प्रसिद्ध केली. सीताराम खंडेराव यांनीं इ. स. १८७१ त 'शिल्पोपयुक्तसंग्रह' हें पुस्तक लिहिलें. ह्याशिवाय भूगोलशास्त्र, फोटोग्राफी, शिवणकला, शास्त्रीयज्ञानदर्शन, कालमापकयंत्रपरिभाषा, इत्यादि अनेक शास्त्रीय ग्रंथ त्या काळीं प्रसिद्ध झाले. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं इ. स. १८६१ त 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह' या नांवाचा अत्यंत उपयुक्त ग्रंथ लिहिला. त्यांत निरनिराळ्या शास्त्रीय विषयांची थोडक्यांत माहिती दिली आहे. त्यांतील एक उतारा येथें सादर करितों.

"वातावरणाचा दाब समजण्यापासून व्यवहारांतल्या शेंकडों साधारण गोष्टींची उपपत्ति कळते. आपण भांड्यांतून पाण्याचा घोट घेऊं लागलों असतां, पाण्यास तोंड लावून तें आंत घेण्याकरितां जो यत्न करितो, तेणेंकरून तोंडांतला वारा संकुचित होऊन तेथें रिकामी जागा होते व बाहेरच्या पाण्यावर वातावरणाचा दाब असतो, ह्यामुळें तें तोंडांतल्या रिकाम्या जागेंत शिरतें. मोठ्या पाटावर पालथें भांडें ठेवून त्याच्या तोंडाच्या कडेस शेण वगैरे लावून आंतल्या व बाहेरच्या वाऱ्याचा संबंध बंद केला असतां, तें भांडें उचलूं लागल्यास त्याबरोबर पाटा उचलतो, याचें कारणही वातावरणाचा दाबच होय. पोटांस भांड्यांच्या तुंबड्या लाविल्या असतां चिकटण्याचें बीज हेंच आहे. तसेंच बंबांत व पिचकाऱ्यांत पाणी चढतें; माशांस व मुंग्यांस

¶ शेतकी आणि घरगुती व्यवस्था-पृ. १४

वगैरे तक्तपोशींच्या खालच्या बाजूवरून चालतां येतें; अभिषेकपात्राच्या तोंडावर हात ठेविला असतां त्यांतून पाणी गळण्याचें बंद होतें; इत्यादि अनेक गोष्टींचें कारण वातावरणाचा दाब होय. " *

मराठी भाषेंतील मालापूर्वकालीन शास्त्रीय वाङ्मयाचा आपण थोडक्यांत आढावा घेतला. हरी केशवजी, भाऊ महाजन, गोविंद नारायण, कृष्णशास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री भाटवडेकर, डॉ. सखाराम अर्जुन, नारायण दाजी इत्यादि तत्कालीन विद्वज्जनांनीं इंग्रजी व संस्कृत ग्रंथांच्या आधारानें मराठी भाषेंत शास्त्रीय ग्रंथलेखनाचा पाया घातला. संस्कृत भाषेच्या साह्यानें पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, शिल्पशास्त्र, इत्यादि भौतिक शास्त्रांची परिभाषा तयार करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. ज्या ठिकाणीं नवीन अन्वर्थक शब्द बनवितां आले नाहींत, त्या ठिकाणीं मूळचे इंग्रजी शब्दच त्यांनीं उपयोगांत आणले. ह्या काळांतील बहुतेक शास्त्रीय ग्रंथ मुख्यतः शाळेंतील विद्यार्थ्यांसाठीं लिहिले असल्यामुळें त्यांतलि माहिती अगदीं प्राथमिक स्वरूपाची आहे.

* * *

---

* अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह– पृ. ११९

परिशिष्ट

वैद्यक

१. औषधकल्पनाविधि–जॉन मॅक्लेनन, मुंबई, इ. स. १८२८
२. निदान–जॉन मॅक्लेनन, मुंबई, इ. स. १८२८
३. निघंटप्रकाश–बापू गंगाधर जोशी, मुंबई, इ. स. १८३९
४. शार्ङ्गधरवैद्यक ग्रंथ–चिंतामण जोशी नागांवकर,
मुंबई, इ. स. १८५४
५. बोपदेवशतक–कृष्णशास्त्री भाटवडेकर,
मुंबई, इ. स. १८६० (ब्रि. म्यु.)
६. वैद्यावतंस–कृष्णशास्त्री भाटवडेकर,
मुंबई, इ. स. १८६० (ब्रि. म्यु.)
७. वैद्यजीवन (लोलिंबराज)–कृष्णशास्त्री भाटवडेकर,
मुंबई, इ. स. १८६१ (ब्रि. म्यु.)
८. बालवैद्य–जनार्दन हरी आठल्ये, रत्नागिरी, इ. स. १८६१
९. वैद्यामृत (मोरेश्वर)–कृष्णशास्त्री भाटवडेकर,
(आवृत्ति ४ थी) मुंबई, इ. स. १८६२ (ब्रि. म्यु.)
१०. माधवनिदान–कृष्णशास्त्री भाटवडेकर, मुंबई, इ. स. १८६२.
११. चिकित्सासार–विनायकशास्त्री पिटकर,
पुणें, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)
१२. त्र्यंबकी–कृष्णशास्त्री भाटवडेकर, (आवृत्ति ४ थी)
मुंबई, इ. स. १८६३ (ब्रि. म्यु.)
१३. अमृतसागरवैद्यग्रंथ–(जयपूरचे राजे प्रतापसिंह यांच्या मारवाडी भाषेंतील ग्रंथाचें मराठी भाषांतर)
मुंबई, इ. स. १८६४ (ब्रि. म्यु.)
१४. पुणें शहाराच्या स्थितीविषयीं डॉक्टर लीथसाहेब यांचा रिपोर्ट–
(मराठी भाषांतर) इ. स. १८६४
१५. वैद्यसारसंग्रह–कृष्णशास्त्री भाटवडेकर, रघुनाथशास्त्री दात्ये,
(आवृत्ति ३ री) मुंबई, इ. स. १८६५ (ब्रि. म्यु.)

१६. औषधिविद्या-नारायण दाजी, मुंबई. इ. स. १८६५
१७. निघंटरत्नाकर-(भाग १-२-३) गणेश रामचंद्रशास्त्री दातार, भास्कर अनंतशास्त्री ताम्हनकर, कृष्णशास्त्री महाबळ, विश्वनाथ विनायक पाटील, मुंबई, इ. स. १८६७
१८. महामारीच्या रोगावर लोकोपयोगी सूचना-पांडुरंग गोपाळ मंत्री, मुंबई, इ. स. १८६८
१९. आरोग्यचिंतामणी-गोविंद बल्लाळ बापट सातारा, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
२०. वैद्यतत्त्व—डॉ. सखाराम अर्जुन, मुंबई, इ. स. १८६९
२१. शस्त्रवैद्यक—गोपाळ शिवराम वैद्य, मुंबई, इ. स. १८६९
२२. बहात्तर रोगांवर मात्रा-पुणें, इ. स. १८७० (इं. ऑ.)
२३. न्यायवैद्यक-गोपाळ शिवराम वैद्य, मुंबई, इ. स. १८७१
२४. स्त्रियांचे विकार-अहमदनगर, इ. स. १८७१. (इं. ऑ.)
२५. वनौषधिसंग्रह—विठ्ठल बाजीभट्ट काळे, विनायक गोपाळ कयाळ, रत्नागिरी, इ. स. १८७२
२६. बालरोगचिकित्सा-पांडुरंग गोपाळ मंत्री, मुंबई, इ. स. १८७२
२७. त्र्यंबकीप्रकाश-बापूशास्त्री मोघे, मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
२८. गृहोपयोगी मित्र— मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
२९. गर्भविद्या आणि प्रसूतिकरण-डॉ. सखाराम अर्जुन, मुंबई, इ.स.१८७३
३०. आरोग्यसाधन-गोपाळ गंगाधर गोखले, पुणें इ. स. १८७४(इं.ऑ.)

शारीर (Anatomy)

१. शारीर-जॉन मॅक्लेनन, मुंबई, इ. स. १८५२
२. मानुष शारीरशास्त्र-भिकाजी अमृत चोभे, मुंबई, इ. स. १८६३

इंद्रियविज्ञानशास्त्र—(Physiology)

१. मानुष इंद्रियविज्ञानशास्त्र-भिकाजी अमृत चोभे, मुंबई, इ. स. १८६५
२. नरतनु—व्यंकट रंगो कट्टी; मुधोळकर, बेळगांव, इ. स.१८७१

ज्योतिषशास्त्र (Astronomy)—फलज्योतिष (Astrology)

१. भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद— पुणें, इ. स. १८३२
२. भास्कराचार्य—[निबंध] बाळशास्त्री जांभेकर, मुंबई. इ. स. १८३६

३. सिद्धान्तशिरोमणिप्रकाश–सुब्राजी बापु, मुंबई, इ. स. १८३६
४. वीस वर्षांचें पंचांग—वि. स. आग्निहोत्रि, पुणें, इ. स. १८४५
५. खगोलविद्या–अमेरिकन मिशन, मुंबई, इ. स. १८४६
६. ज्योतिषसार–जनार्दन भास्कर क्रमवंत, मुंबई, इ. स. १८४८
७. ज्योतिषरत्न–वि. स. अग्निहोत्रि, पुणें, इ. स. १८५३
८. ग्रहलाघव—वामन कृष्ण जोशी गद्रे, कृष्णशास्त्री गोडबोले, मुंबई, इ. स. १८५६
९. स्फुट ज्योतिष–[आवृत्ति ४ थी] मुंबई, इ. स. १८५६ (ब्रि. म्यु.)
१०. स्फुट ज्योतिष [Astrology] रत्नागिरी, इ. स. १८५७
११. मुहूर्तमार्तंड—महादेवशास्त्री जोशी, रत्नागिरी, इ. स. १८५८
१२. ग्रहसाधनाचीं कोष्टकें–केरो लक्ष्मण छत्रे, मुंबई, इ. स. १८६०
१३. ज्योतिषचक्र– मुंबई, इ. स. १८६०. (ब्रि. म्यु.)
१४. आकाशसौंदर्य–कृष्णशास्त्री भाटवडेकर, मुंबई, इ. स. १८६१
१५. ज्योतिष-शास्त्र–कृष्णशास्त्री गोडबोले, मुंबई, इ. स. १८६२
१६. सामुद्रिक– पुणें, इ. स. १८६३ (ग्रां. कॅ.)
१७. पंचांगदर्शन–परशुरामपंत गोडबोले, पुणें, इ. स. १८६३ (ग्रां. कॅ.)
१८. नारायणी प्रश्नावली— मुंबई, इ. स. १८६४ (ग्रां. कॅ.)
१९. ज्योतिष—कृष्ण फौजदार, इ. स. १८६६ (म. वा.)
२०. सहदेवकृत ज्योतिष इ. स. १८६७ (म. वा.)
२१. तिथिचिंतामणि—गोपिनाथ सदाशिव परांजपे, कोल्हापूर, इ. स. १८६८.
२२. प्रश्नभैरव—लक्ष्मण गोपाळ दीक्षित, पुणें, इ. स. १८६८ (इं. ऑ.)
२३. गर्गाचार्यकृत प्रश्नावली— पुणें, इ. स. १८६८ (इं. ऑ.)
२४. चमत्कारचिंतामणि—लक्ष्मण गोपाळ दीक्षित, (आवृत्ति २ री) पुणें, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
२५. घटित पाहण्याची रीत—चिंतामण सदाशिव वाघ, इ. स. १८६९ (म. वा.)
२६. सहदेव मताचें ज्योतिषरत्न—नारो आप्पाजी गोडबोले, (आवृत्ति ३ री) पुणें, इ. स. १८७०
२७. पंचांगसाधनसार—वामन कृष्ण जोशी गद्रे, मुंबई, इ. स. १८७०

२८. छायायंत्राचा नकाशा—बाळाजी नारायण फडके,
इ. स. १८७१ (म. वा.)

२९. केशवीप्रकाश—आत्माराम धोंडभट साधले, वामन लक्ष्मण जोशी,
मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

३०. जातकालंकार—आत्माराम काशिनाथशास्त्री, मुंबई,
इ. स. १८७३ (इं. ऑ.)

३१. बृहत्संहिता [वराहमिहिरकृत] मराठी भाषांतरासह
जनार्दन हरी आठल्ये, रत्नागिरी, इ. स. १८७३

३२. श्रीमत्वराहमिहिराचार्यकृत बृहज्जातक—(मराठी भाषांतर)
माधवराव ब्रह्माजी संगमनेरकर, मुंबई, इ. स. १८७४

३३. शुक्रग्रस्तविचित्रसूर्यग्रहण—गणेश जनार्दन आगाशे,
पुणें, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

कायदा*

हिंदुधर्मशास्त्र (Hindu Law)

१. मिताक्षरा व्यवहाराध्याय व मयूख दायभाग–मराठी भाषांतर
(न्यायाचे उपयोगासाठीं) रघुनाथशास्त्री दात्ये, पुणें, इ. स. १८४४

२. धर्मशास्त्र–काशिनाथ महादेव फडके, पुणें, इ. स. १८६४ (ग्रां. कॅ.)

३. हिंदुधर्मशास्त्र [व्यवहारखंड] विश्वनाथ नारायण मंडलीक,
मुंबई, इ. स. १८६७

४. हिंदुधर्मशास्त्रसार भाग (१।२) जनार्दन सखाराम गाडगीळ,
मुंबई, इ. स. १८६८–७०

मुसलमानी कायदा

५. मुसलमानी दिवाणी कायदा–व्यंकटराव रामचंद्र, मुंबई,
इ. स. १८६७

६. महमदीशास्त्र–रामचंद्र मोरेश्वर गुप्ते, कऱ्हाडकर,
योगीराज व्यंकाजी रिसबुड, मुंबई, इ. स. १८६७

* ह्या काळांत कायद्याचीं बरींच पुस्तकें प्रसिद्ध झालीं. विस्तारभयास्तव त्यांपैकीं जीं विशेष महत्त्वाचीं वाटलीं तेवढींच ह्या यादींत दाखल केलीं आहेत.

संकीर्ण

७. पोलिस कायदा–जेम्स स्पीअर्स– मुंबई, इ. स. १८५५
८. गांवचे वहिवाटीविषयीं वही–गणेश बाबाजी माटे, पुणें, इ. स. १८५६ (ग्रां. कॅ.)
९. न्यायाब्धिसेतु भाग २–मोरेश्वर सखाराम चितळे, जनार्दन हरि आठल्ये, रत्नागिरी, इ. स. १८५६–५७
१०. मुलकी उमेदवार–जनार्दन हरि आठल्ये, रत्नागिरी, इ. स. १८५९ (ग्रां. कॅ.)
११. दिवाणी काम चालविण्याचे रीतीविषयींचा कायदा– मेजर टी. क्यांडा, मुंबई, इ. स. १८५९ (ग्रां. कॅ.)
१२. हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा– (Indian Penal Code) मेजर टी. क्यांडी मुंबई, इ. स. १८६० (ग्रां. कॅ.)
१३. फौजदारी कायदा–खंडेराव बाळाजी फडके, रत्नागिरी, इ. स. १८६१ (ग्रां. कॅ.)
१४. दिवाणी कायदा–नारायण मोरेश्वर केळकर, पुणें, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)
१५. अपराधबोधक–चिंतो विश्वनाथ पेठे, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)
१६. फौजदारी सर्वसंग्रह–नारायण मोरेश्वर केळकर, पुणें, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)
१७. न्यायदर्पण–गणेश बाबाजी माटे, बाळकृष्ण वामन चोळकर, पुणें, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)
१८. प्रमाणशास्त्र–मुकुंदराव भास्करजी, मुंबई, इ. स. १८६३
१९. करारशास्त्र–बाबाजी गणेश देशपांडे, पुणें, इ. स. १८६४ (ग्रां. कॅ.)
२०. मुलकी सर्वसंग्रह–नारायण मोरेश्वर केळकर, पुणें, इ. स. १८६४ (ग्रां. कॅ.)
२१. करारशास्त्र–वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर, मुंबई, इ. स. १८६५ (इं. ऑ.)
२२. कायद्यासंबंधीं नियम–व्यंकटराव रामचंद्र, मुंबई, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
२३. अपकृत्यशास्त्र–महादेव चिमणाजी आपटे, मुंबई, इ. स. १८७०

२४. रेव्हेन्यु-तत्त्वसंग्रह—धोंडो गोपाळ मुजुमदार,
पुणें, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

अर्थशास्त्र

१. व्याज—बाळ रघुनाथ, मुंबई, १८४३ (ग्रां. कॅ.)

२. लक्ष्मीज्ञान—' कामगार लोकांशीं संभाषण ' या ग्रंथाच्या
कर्त्यानें केलें. पुणें, इ. स. १८४९

३. संपत्तिविवेचन—नारो बाळकृष्ण पटवर्धन,
मुंबई, इ. स. १८५३ (ग्रां. कॅ.)

४. देशव्यवहारव्यवस्था—हरि केशवजी पाठारे,
विश्वनाथ नारायण मंडलीक, मुंबई, इ. स. १८५४

५. अर्थशास्त्रपरिभाषा—कृष्णशास्त्री चिपळूणकर, पुणें, इ. स. १८५५

व्यापार

१. व्यापारदर्पण—शंकरशास्त्री गोखले, पुणें, इ. स. १८५२ (ग्रां. कॅ.)

२. दलालांची ठकबाजी— पुणें, इ. स. १८६४ (ग्रां. कॅ.)

३. व्यवहारदर्पण—शंकरशास्त्री गोखले, मुंबई, इ. स. १८७१

पदार्थविज्ञानशास्त्र

१. सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद—हरि केशवजी,
मुंबई, इ. स. १८३३

२. पदार्थविज्ञानशास्त्रांतील कितीएक विषयांवर व्याख्यानें—पुणें,
इ. स. १८५२

३. पदार्थविज्ञानशास्त्र—केरो लक्ष्मण छत्रे, पुणें, इ. स. १८५५ (ग्रां. कॅ.)

४. पदार्थविज्ञानशास्त्र—पदार्थ आणि चलन ह्यांविषयीं,
महादेव गोविंदशास्त्री, मुंबई, इ. स. १८६१

५. सृष्टपदार्थदर्पण—महादेव श्रीधर भावे, मुंबई, इ. स. १८७३. (इं.ऑ.)

रसायनशास्त्र

१. रसायनशास्त्रविषयक संवाद—हरी केशवजी, मुंबई इ. स. १८३७

२. रसायनशास्त्र अथवा हुन्नरनिधि (भाग ३)
रामजी गणोजी चौधुले, मुंबई, इ. स. १८५९ (ग्रां. कॅ.)

३. रसायनशास्त्र–नारायण दाजी, मुंबई, इ. स. १८६३ (ग्रां. कॅ.)
४. हरहुन्नर–स्नेही (भाग २)—आत्माराम विनायक पाटकर, पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)
५. उपयुक्त चमत्कारसंग्रह–गंगाधर गोविंद सापकर, पुणें, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

यंत्रशास्त्र

१. शिल्पविद्या या विषयाचे निबंध–विलियम हेनरी वेल, नारायणशास्त्री जोशी, मुंबई, इ. स. १८३५
२. पदार्थविद्या (भाग १)—शिल्पविद्या, मुंबई, इ. स. १८४६
३. यंत्रज्ञान–पंदनाम्याचें भाषांतर करणाऱ्यानें केलें. पुणें, इ. स. १८५०
४. यंत्रशास्त्राचीं मुळें–गोविंद गंगाधर फडके, मुंबई, इ. स. १८५३

शेतकी व बागाईत

१. दक्षिण देशांत तुतीचें झाड करण्याची व रेशिमाचे किडे पाळण्याची व रेशीम उत्पन्न करण्याची रीति–सीनियर जी. मटि इ. स. १८३८
२. जागती जोत–शेतपोत रीतभात यांविषयीं वाद, रामचंद्र अमृत दुगल, नासिक, इ. स. १८३८
३. शेतकी आणि घरगुती व्यवस्था–आलेक्झांडर गिबसन, पुणें, इ. स. १८४६
४. उद्भिज्जन्यपदार्थ–गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८५६
५. वृक्षवर्णन–गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८५७
६. Notes on the cultivation of mulberry trees and preparation of silk जी. मटि. पुणें, इ. स. १८६७ (इं. ऑ.)
७. खानदेशकृषिकर्मोत्तेजक प्रदर्शन, मुंबई, इ. स. १८७१ (इं. ऑ.)
८. खताचे प्रकार– मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)
९. पुष्पवाटिका–लक्ष्मण जयदेव गोरे, ठाणें, इ. स. १८७३ (इं. ऑ.)
१०. वृक्षविनोद–वामनशास्त्री बेदरकर, पुणें, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

संगीत

१. गायनप्रकाश–भाऊशास्त्री अष्टपुत्रे, पुणें, इ. स. १८५०
२. गीतलिपि–गोवर्धन लक्ष्मण छत्रे, मुंबई, इ. स. १८६४

३. तंतुवाद्य-सतार शिकण्याचें पहिलें पुस्तक-सूर्याजी सदाशिव महात्मे, विश्वनाथ रामचंद्र वकील, मुंबई, इ. स. १८७२

तर्कशास्त्र

१. तर्कशास्त्र-अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई, इ. स. १८४६
२. न्यायसिंधुपोत-तर्कसंग्रहाची प्राकृत टीका-बाळकृष्ण विद्याधर हळबे, मुंबई, इ. स. १८७२

शिल्पशास्त्र

१. सर्वैपरिज्ञान-चिंतो विश्वनाथ, पुणें, इ. स. १८६७
२. शिल्पोपयुक्तसंग्रह-सिताराम खंडेराव, मुंबई, इ. स. १८७१
३. शिल्पशास्त्रावर व्याख्यान-(लॉर्ड नेपियर यांचें) मराठी भाषांतर-उइलियम हेनरी ह्यावलक, पुणें, इ. स. १८७१
४. सर्वेक्षुब्दोध-बाळ गंगाधर तांबे, गोविंद लक्ष्मण गुरल्हासुरकर, पुणें, इ. स. १८७२

प्राणिशास्त्र

१. कित्येक जनावरांचें वर्णन- पुणें, इ. स. १८३९ (ग्रां. कॅ.)
२. जनावरांच्या गोष्टी-नारो रामचंद्र, पुणें, इ. स. १८५६ (ग्रां. कॅ.)
३. शालिहोत्र टीका- मुंबई, इ. स. १८६३ (ब्रि. म्यु.)
४. सृष्टिजन्य श्वापदचित्रसंग्रह-कृष्णशास्त्री भाटवडेकर, मुंबई, इ. स. १८६४ (ग्रां. कॅ.)
५. अश्वपरीक्षा-सटीक, नारो आपाजी गोडबोले, पुणें, इ. स. १८६७ (ब्रि. म्यु.)

सृष्टिशास्त्र

१. सृष्टींतील चमत्कार-गोविंद नारायण माडगांवकर, मुंबई, इ. स. १८५३ (इं. ऑ.)
२. सृष्टींतील चमत्कार-डेविड हाइम, मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)
३. सृष्टिज्ञानपरिभाषा-सखाराम बापूशेट दांडेकर, ठाणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

भूप्रकृतिविद्या

१. वाय्वावरण आणि त्यांतील चमत्कार–(टामस डिक साहेबाच्या इंग्रजी ग्रंथावरून) भाऊशास्त्री येऊरकर, मुंबई, इ. स. १८५७

२. भूप्रकृतिविद्या–सखाराम बापू दांडेकर, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

३. भूगोल व भूप्रकृतिविद्या व ज्योतिषासंबंधीं सामान्य माहिती–भिकाजी धोंडदेव निगुडकर, इ. स. १८७४ (म. वा.)

संकीर्ण ग्रंथ

१. विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष या विषयांचे वाद–जॉर्ज जर्व्हिस (जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांचे साह्यानें) मुंबई, इ. स. १८२९

२. सारसंग्रह– मुंबई, इ. स. १८३१

३. गणितशास्त्राच्या उपयोगाविषयीं संवाद, मुंबई, इ. स. १८३५

४. भूगोलशास्त्र—गणितभाग (Mathematical Geography) बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, इ. स. १८३६

५. शास्त्रीय ज्ञानदर्शन–सखाराम रामचंद्र दीक्षित, विष्णु अमृतराव, मुंबई, इ. स. १८५६

६. शंकुच्छेद–दाजी नीळकंठ नगरकर, पुणें, इ. स. १८५६

७. फोटोग्राफी–हरिश्चंद्र चिंतामण, मुंबई, इ. स. १८६० (ग्रां. कॅ.)

८. अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह मुंबई, इ. स. १८६१

९. कालमापक यंत्रपरिभाषा—बाळाजी नारायण फडके, पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

१०. मल्लविद्याप्रकाशक—सिताराम बल्लाळ महाजन— पुणें, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

११. शिवणकला—विष्णु मोरेश्वर थत्ते, पुणें, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

* * *

१० : ख्रिस्ती वाङ्मय

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील ख्रिस्ती धर्मप्रसारकांचें प्रचारकार्य मराठी गद्य–वाङ्मयाच्या वाढीला कसें उपकारक झालें, तें 'सामान्य निरूपण' या प्रकरणांत दिग्दर्शित केलें आहेच. ख्रिस्ती धर्म व पाश्चात्य संस्कृति यांचें श्रेष्ठत्व एतद्देशीय लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठीं त्यांनीं मराठी भाषेंत निरनिराळ्या प्रकारचीं लहानमोठीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं. ख्रिस्ती धर्मग्रंथ व प्रार्थना यांचीं भाषांतरें केलीं, मुद्रणकलेच्या साह्यानें हिंदुधर्म व समाजव्यवस्था यांवर टीकेची झोड उठविली, आणि त्याबरोबरच गोष्टी आणि संवाद यांच्या रूपानें येशू ख्रिस्ताची शिकवण आबालवृद्धांना सुगम करून सांगण्याचा प्रयत्न केला. व्याकरणाच्या दृष्टीनें हीं पुस्तकें कितीहि अशुद्ध व सदोष असलीं, तरी मराठी भाषेंत गद्यलेखनाची प्रथा रूढ होण्यास त्यांचा पुष्कळच उपयोग झाला यांत कांहीं शंका नाहीं.

ख्रिस्ती धर्मग्रंथ व प्रार्थना

प्रथमतः श्रीरामपूर येथील मिशनऱ्यांनीं ख्रिस्ती धर्मग्रंथांचीं भाषांतरें करण्यास प्रारंभ केला. त्यानंतर मुंबईस अमेरिकन मिशनच्या प्रचारकांनीं हें काम हातीं घेतलें. ख्रिस्ती शास्त्राची सर्व भाषांत भाषांतरें छापण्यासाठीं इ. स. १८१३ त 'मुंबई बायबल सोसायटी' स्थापन झाली. इ. स. १८२६ सालीं अमेरिकन मिशनच्या विद्यमानें नव्या करारांचें संपूर्ण भाषांतर प्रसिद्ध झालें. यानंतरच्या काळांत 'बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटीनें'हि बरींच पुस्तकें प्रकाशित केलीं. रेव्हरंड जे. बी. डिक्सन यांनीं दाजीशास्त्री शुक्ल यांच्या साह्यानें जुन्या करारांचें मराठींत भाषांतर केलें. याशिवाय 'पावसाविषयीं प्रार्थना,' 'देवाच्या दहा आज्ञा', 'प्रेषितांचीं कृत्यें', 'पश्वादि भूतदया', 'शाब्बाथ निरूपण' इत्यादि अनेक ख्रिस्ती धर्मविषयक ग्रंथ या काळीं छापले गेले. यांपैकीं नव्या करारांतील एक उतारा खालीं देत आहें.

> आणि ते वाटेनें जात असतां । असें जालें । कोणी त्याला बोलिला । प्रभू । जेथें जेथें तूं जातोस । तेथें मी तुला अनुसरेन ॥ ५८ ॥ तेव्हां येशू त्याला बोलिला । कोल्ह्यास बिळें । आणि आकाशांतल्या पांखरांस वस्त्या आहेत । परंतु मनुष्याच्या पुत्राला जेथें डोकें टेकावें तें नाहीं ॥ ५९ ॥ मग तो दुसऱ्याला बोलिला तूं मला अनुसर । परंतु तो बोलिला । हे प्रभू । पहिलें माझ्या बापाला पुरायास मला जाऊं दे ॥ ६० ॥ तेव्हां येशू त्याला बोलिला । मेलेल्यास आपल्या मेल्यास पुरूं दे । परंतु तूं जाऊन देवाच्या राज्याचें वर्तमान प्रगट सांग ॥ ६१ ॥ तेव्हां दुसराही बोलिला । हे प्रभू ।

मी तुला अनुसरेन। परंतु पहिले माझ्या घरीं जे। यांची निरवणी मला करूं दे ॥ ६१ ॥ तेव्हां येशू त्याला बोलिला। कोणी आपला हात नांगरास लावतो। आणि माघारें पाहातो तो देवाच्या राज्याजोगा नाहीं!" ‡

हिंदूंचे धर्मग्रंथ व चालीरीती यांवर टीका

खिस्ती धर्माचें श्रेष्ठत्व स्थापित करण्यासाठीं हिंदुधर्मांतील वैगुण्य व दोष दाखविणें अवश्य होतें, यासाठीं खिस्ती धर्म–प्रसारकांनीं हिंदूंचें धर्मग्रंथ व चालीरीती यांचा बारकाईनें अभ्यास करून त्यांवर टीका करण्यास सुरुवात केली. 'उपदेशचंद्रिका' मासिकाचे संपादक मोरभट दांडेकर आणि सातारा विद्यालयांतील अध्यापक नारायण यांचा मुंबईचे प्रसिद्ध मिशनरी जॉन विल्सन यांच्याशीं हिंदुधर्मप्रकरणीं कडाक्याचा वादविवाद झाला. * त्यांतील आक्षेपांना प्रत्युत्तर म्हणून विल्सन साहेबानें 'हिंदुधर्मप्रसिद्धीकरणाचे' दोन भाग प्रसिद्ध केले. रॉबर्ट निज्बिट यांनीं 'भगवद्गीतेचें सार' या पुस्तकांत गीतेंतील सिद्धान्त खोडण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला आहे. मूर्तिपूजा, जातिभेद, पुनर्जन्म इत्यादि अनेक विषयांवर मिशनरी लोकांनीं पुस्तकें लिहिलीं. त्यांच्या लेखणीच्या कचाट्यांतून हिंदूंचा सामाजिक प्रश्न सुटला आहे असें दिसत नाहीं. बाबा पदमनजी यांनीं 'हिंदुधर्म व खिस्ती धर्म यांची तुलना' व 'कृष्ण आणि खिस्त यांची तुलना,' 'मतपरीक्षा' इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध केले. याशिवाय 'ब्राह्मणांचें महत्त्व', 'मूर्तींचा उच्छेद', 'होळीविषयीं उपदेश', 'तुळशीचें लग्न' इत्यादि अनेक टीकात्मक पुस्तकें त्या काळीं छापलीं गेलीं.

बोधपर मनोरंजक गोष्टी व संवाद

मनोरंजक गोष्टी व संवाद यांच्या द्वारेंहि खिस्ती धर्मांतील तत्त्वें सामान्य लोकांच्या मनावर ठसविण्याचा मिशनरी लोकांनीं उपक्रम केला. मिसेस फारार या खिस्ती लेखिकेनें लहान लहान गोष्टींचीं चारपांच पुस्तकें प्रसिद्ध केलीं. याशिवाय 'बावाजीची बखर', 'राधानाथाची गोष्ट', 'गरीब शेरा हिची गोष्ट' इत्यादि गोष्टीरूप ग्रंथ या काळीं प्रसिद्ध झाले. त्या सर्वांत हरी केशवजी यांचें 'यात्रिक क्रमण' (Pilgrim's Progress ह्या रूपकात्मक कथाग्रंथाचें भाषांतर) हें पुस्तक उत्तम वटलें आहे. त्यांतील एक उतारा खालीं देत आहें.

"मग सुवार्तिक बोलूं लागला कीं, तुला ज्या गोष्टी सांगतों त्यांविषयीं जपून रहा, तुला ज्यानें भुलविलें तो कोण आणि तो ज्याकडेस तुला पाठवित

‡ नवा करार (इ. स. १८३०) पृ. १७४

* पुढें मोरभट दांडेकर यांनीं आपले विचार ग्रंथरूपानें प्रसिद्ध केले. त्यांच्या ग्रंथाचें नांव 'हिंदुधर्मस्थापन' (१८३१) असें होतें.

होता तो कोण हें मी तुला सांगतों. तुला जो भेटला त्याचें नांव प्रपंच सुज्ञ; हें त्याचें नांव वास्तविक आहे. कां तर त्यांचे मनांत प्रपंचाचेंच मत वागतें, म्हणून तो सुवर्तन गांवींच्या भजनसभेस जातो; त्याला प्रपंचाचें मत अतिशय आवडतें, त्याचें कारण असें आहे कीं, या मतांत त्याला क्रुसाचे श्रम सोसावे लागत नाहींत; आणखी त्याचा शारीर स्वभाव आहे. म्हणून माझा मार्ग नीट असतांही त्या मार्गास तो दूषितो. या मनुष्यानें तुला विचार सांगितला त्यांत तीन गोष्टी आहेत. त्यांचा त्वां सर्वस्वें त्रास मानावा. त्या अशा, त्यानें तुला तुझा मार्ग सोडावयास सांगितलें–क्रूस त्रासदायक आहे असें सुचविलें–आणि ज्या मार्गानें मरण प्राप्त व्हावें अशा मार्गानें तुझी योजना केली. " *

रॉबर्ट निज्बिट (इ. स. १८०३–५५)

ह्या काळांतील कांहीं प्रमुख ख्रिस्ती धर्मप्रसारकांची या ठिकाणीं थोडक्यांत माहिती देणें अवश्य आहे. रॉबर्ट निज्बिट हे इ. स. १८२७ त हिंदुस्थानांत आले. त्यानंतर त्यांनीं मराठी भाषेचा अभ्यास केला. शुद्ध व स्पष्ट उच्चाराबद्दल त्यांची फार ख्याति होती. त्यांनीं 'खरा पश्चात्ताप' (इ. स. १८३०), 'भगवद्गीतेचें सार' (इ. स. १८३२), 'ब्राह्मणांचें महत्त्व' (इ. स. १८३३) आणि 'Worship of elements', (इ. स. १८३५) प्रसिद्ध केलीं. त्यापकीं 'भगवद्गीतेचें सार' या पुस्तकांतील एक उतारा खालीं उद्धृत करितों.

" सोन्याच्या गोळ्यास कलंक लागत नाहीं आणि त्या सोन्याचा कितीहि लहान तुकडा जरी केला तरी त्यालाहि कलंक लागणार नाहीं ॥ गोळ्याचे गुण जे असतील ते तुकड्यामध्येंहि राहतात ॥ मनुष्याचा जीव देवाचा अंश असता तर जे देवाचे गुण असतील ते त्या जीवामध्येंहि राहते ॥ देवाला अज्ञान नाहीं आणि जर मनुष्याचा जीव त्याचा अंश असतां तर त्या जीवालाहि अज्ञान नसतें ॥ मनुष्याचे जीवाला तर अज्ञान आहे, यावरून जाणावें कीं तो जीव देवाचा तुकडा नाहीं ॥ सोन्यासारिखा एक धातुचा तुकडा आहे ॥ त्याची परीक्षा पाहिल्यावर मला समजतें कीं त्याला कलंक लागतो ॥ यावरून मी जाणतों कीं, तो सोन्याचा तुकडा नाहीं ॥ सोन्याचे गुण त्याजमध्यें नाहींत. यावरून सोन्याचा तुकडा नाहीं असा माझा निश्चय होतो ॥ तसें ह्या जिवाला देवाचे गुण नाहींत. यावरून सिद्ध होतें कीं, तो देवाचा तुकडा नाहीं ॥ "†

* यात्रिक क्रमण, पृ. ३०–३१.
† भगवद्गीतेचें सार, पृ. ४९–५०.

डॉ. जॉन विल्सन (इ. स. १८०४–१८७५)

डॉ. जॉन विल्सन हे इ. स. १८२९ सालीं हिंदुस्थानांत आले. धर्मप्रसाराच्या कार्यासाठीं त्यांनीं संस्कृत, मराठी, गुजराथी, हिंदुस्थानी, फारशी इत्यादि अनेक पौरस्त्य भाषांचें परिश्रमपूर्वक अध्ययन केलें. विद्वत्ता, दीर्घोद्योग, कर्तव्यनिष्ठा, मनुष्य-मात्राविषयीं प्रेमभाव इत्यादि अलौकिक गुणांमुळें त्यांनीं आपल्या विद्यार्थ्यांवर व सहकारी मित्रांवर विलक्षण छाप बसविली होती. त्यांच्या कार्याचा व्याप दांडगा असल्यामुळें मुंबई इलाख्यांत ते फार प्रसिद्धी पावले. मोरभट दांडेकर व साताऱ्चे नारायणराव (स्वदेशधर्माभिमानी) यांच्या आक्षेपांना प्रत्युत्तर म्हणून त्यांनीं हिंदुधर्म-प्रसिद्धीकरणाचे दोन भाग (इ. स. १८३२–३५) प्रसिद्ध केले. याशिवाय त्यांचे भाषाविषयक बरेच इंग्रजी निबंध तत्कालीन मासिकांतून प्रसिद्ध झाले होते. त्यांच्या ' हिंदुधर्मप्रसिद्धीकरण ' (भाग २ रा) या ग्रंथातील एक उतारा खालीं देत आहें.

> " सर्व वस्तूमात्रांत देवाची व्याप्ति आहे अशा मतेंकरून ईश्वराचें आत्मत्व जें स्पष्ट वादावरून सिद्ध होतें त्याचें खंडण होतें अथवा सर्व वस्तु ज्या दृष्टीस पडतात त्या मिथ्या असें दर्शवितें. सर्व पदार्थमात्र ईश्वरप्रकृतीचे अंश आहेत असें म्हटलें असतां प्रत्यक्षेंकरून असा सिद्धान्त होतो कीं, ईश्वर द्विभागिला जातो. त्याचे तुकडे व रक्षा होते व पृथ्वीवर प्रसूत होतो, मिश्र होतो, त्याचीं अनेक स्वरुपें होतात आणि तो असंख्य प्रकारें बदलला जातो. ह्या सर्व गोष्टी मायारूपी असें म्हटलें असतां साधारण बुद्धीस आणि खऱ्या विद्येस अगदीं विपरीत होतें. देव फसवलेला आणि फसवणारा आहे असें ह्या हिंदूमतावरून दिसतें. वाहवा जी वाहवा. "*

स्टिव्हेन्सन

रेव्हरंड जे. स्टिव्हेन्सन यांनींहि मराठी भाषेचा फार चांगला अभ्यास केला होता. त्यांनीं ' मराठी भाषेचें व्याकरण ' व ' इंग्लिश भाषेच्या व्याकरणाची मूळपीठिका ' हे दोन व्याकरणविषयक ग्रंथ लिहिले. इ. स. १८३३ त त्यांनीं ऋग्वेदाच्या कांहीं भागाचें मराठीं भाषांतर प्रसिद्ध केलें. याशिवाय त्यांचीं अनेक लहान लहान पुस्तकें या काळीं छापलीं गेलीं.

मिसेस फारार

नाशिक येथील खिस्ती–धर्मप्रचारक सी. पी. फारार यांच्या पत्नी मिसेस फारार मांनीं ' शास्त्रांतील सुबोध धडे ' (इ. स. १८३५), ' बाळबोध गोष्टी '

---

* दुसरें हिंदुधर्मप्रसिद्धीकरण पृ. १९–२०.

(इ. स. १८३८), ' यात्रेकऱ्याचा वृत्तान्त ' (इ. स. १८३८) इत्यादि पांच-सहा मराठी पुस्तकें लिहिलीं. अर्वाचीन काळांतील पहिल्या स्त्रीलेखिका म्हणून मिसेस फारार यांचा प्रयत्न विशेष कौतुकास्पद आहे.

बाबा पदमनजी (१८३१–१९०६)

मालापूर्वकालीन गद्यवाङ्मयांतील प्रमुख लेखकांत बाबा पदमनजी यांची गणना केली पाहिजे. त्यांनीं मराठी भाषेंत चाळीस-पन्नास पुस्तकें लिहिलीं. त्यांपैकीं स्त्री-विद्याभ्यास, व्यभिचारनिषेधक बोध, यमुनापर्यटन, निबंधमाला इत्यादिकांची माहिती मागील प्रकरणांतून आलेली आहेच. याशिवाय त्यांनीं ' खिस्ती धर्मासंबंधीं मतपरीक्षा, ' ' कृष्ण आणि खिस्त यांची तुलना, ' निःशास्त्रवादपरीक्षा, ' ' आत्मा-रामपंत आणि मृत्यु शिपाई, ' ' सिद्धान्तरत्नमाला ' इत्यादि अनेक पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्यांची भाषा शुद्ध, सुबोध व गोड असून तिच्यांत ईश्वरभक्तीचा जिव्हाळाहि आहे. त्यांच्या इतकी विस्तृत ग्रंथरचना त्या काळच्या दुसऱ्या कोणाहि लेखकाच्या हातून झालेली नाहीं. बाबांचा जन्म इ. स. १८३१ त झाला. विद्यार्थिदशेंत असतां-नाच डॉक्टर विल्सन, जेम्स मिचल, रॉबर्ट निज्बिट ह्या खिस्ती धर्मप्रचारकांच्या शुद्ध व प्रेमळ वर्तनाचा त्यांच्या मनावर बराच परिणाम झाला व तेव्हांपासूनच त्यांची हिंदुधर्मावरील श्रद्धा डळमळूं लागली होती. इ. स. १८५४ त त्यांनीं खिस्ती धर्म स्वीकारला. त्यांनीं आपल्या धर्मांतराचा विस्तृत वृत्तान्त ' अरुणोदय ' या ग्रंथांत निवेदन केला आहे. ' सत्यदीपिका ' ह्या खिस्ती मासिकाचें ते काम पहात असत. त्यांच्या ' कृष्ण आणि खिस्त यांची तुलना ' या पुस्तकांतील एक उतारा खालीं देत आहें. "

" हिंदु लोक असें समजतात कीं, कृष्ण अवतारी पुरुष होता म्हणून त्याची बाळपणींची क्रीडा निर्दोष होती. आणखी ते असें म्हणतात कीं, अवतार घेतला तर मनुष्याप्रमाणें आचरण केलेंच पाहिजे. ह्यास आमचें असें उत्तर आहे कीं, कृष्णास अवतारी पुरुष मानल्यानें त्याची बालक्रीडा विशेष दूषणार्ह होते. जर तो देव असून मनुष्यरूप घेऊन आला असें मानिलें तर त्याची वर्तणूक विशेषें निर्मळ असावयाची होती. तो मनुष्य कशाला झाला ! पापी मनुष्यांस सद्वर्तनाचा धडा घालून द्यायास कीं नाहीं ? मनुष्याचा अवतार ईश्वर घेईल तर तो त्याच्या पापाचाही अवतार घेईल काय ? जसा प्रारंभीं मनुष्य पवित्र होता तसा तो होऊन त्यास पूर्वीसारखा पवित्र करायचा उपाय योजील. कृष्णास साधारण मनुष्य कल्पून त्याच्या बालक्रीडेचा विचार केला असतां त्यापासून आतां कोणाचें विशेष अनहित होणार नाहीं. त्याप्रमाणें अनेक दुर्गुणी लेंकरें आजपर्यंत होऊन गेलीं, आणि त्यांनीं व कृष्णानें जे

अनाचार केले असतील त्यांपासून त्यांच्याच वेळच्या लोकांचें अनहित झालें असेल. पण कृष्णास देव मानल्यानें आज शतावधि वर्षांपासून लक्षावधि लोकांचा नाश होत आहे. "*

याशिवाय जे. बी. डिक्सन, हेनरी ब्यालंटिन, जेम्स मिचल, नारायण शेषाद्रि इत्यादिं लेखकांनींहि खिस्ती धर्मासंबंधीं अनेक लहानमोठीं पुस्तकें लिहिलीं.

* * *

परिशिष्ट

ख्रिस्ती धर्मग्रंथ व प्रार्थना

१. सेंट मॅथ्यू श्रीरामपुर, इ. स. १८०५
२. होली बायबल–पांच भाग, श्रीरामपुर, इ. स. १८०७–२१
३. मंगळसमाचार—(New Testament) श्रीरामपुर, इ. स. १८११ (ब्रि. म्यु.)
४. नवा करार—(कोंकणी भाषेंत), श्रीरामपुर, इ. स. १८१८ (ब्रि. म्यु.)
५. होली बायबल (कोंकणी) श्रीरामपुर, इ. स. १८२१ (इं. ऑ.)
६. सेंट मॅथ्यू मुंबई, इ. स. १८२०
७. नवा करार—अमेरिकन मिशन—मुंबई, इ. स. १८२६ (इं. ऑ.)
८. खरें प्रायश्चित्त—रॉबर्ट निज्बिट मुंबई, इ. स. १८३०
९. पहिली प्रश्नोत्तरावलि मुंबई, इ. स. १८३३
१०. Wrath to come मुंबई, इ. स. १८३३
११. पावसाविषयीं प्रार्थना मुंबई, इ. स. १८३३
१२. The way of Salvation—रे. मिचेल, मुंबई, इ. स. १८३३
१३. ईश्वराचें पवित्रत्व—रे. सी. पी. फारार नाशिक, इ. स. १८३५ (इं. ऑ.)

* कृष्ण आणि खिस्त यांची तुलना पृ. १०

१४. साधारण प्रार्थना—रे. जे. डिक्सन, मुंबई, इ. स. १८३५ (इं. ऑ.)

१५. पुरातन परम पवित्र लेख—जे. डिक्सन,
मुंबई, इ. स. १८३७ (इं. ऑ.)

१६. शास्त्रांतील सुबोध धडे–मिसेस फारार,
मुंबई, इ. स. १८३८ (इं. ऑ.)

१७. आमचा तारणारा प्रभु येशु ख्रिस्त याविषयीं शुभवर्तमान—
अमेरिकन मिशन, मुंबई, इ. स. १८४०

१८. प्रार्थना (आवृत्ति ४ थी) मुंबई, इ. स. १८४१

१९. देवाच्या दहा आज्ञा मुंबई, इ. स. १८४१ (ब्रि. म्यु.)

२०. देवाचें भजन करण्याची रीत—मुंबई, इ. स. १८४१ (ब्रि. म्यु.)

२१. एका दिवशीं कोणी एक ख्रिस्ती, मुंबई, इ. स. १८४५ (ब्रि. म्यु.)

२२. एस्त्राएलास हितोपदेश मुंबई, इ. स. १८४५ (ब्रि. म्यु.)

२३. शुभवर्तमानसंबंधीं प्रश्नोत्तरावळी— मुंबई, इ. स. १८४५
(बॉ. ट्रा. बु. सोसायटी)

२४. यथातथ–अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई, इ. स. १८४६

२५. पहिलें पुस्तक (Genesis) रे. जे. डिक्सन,
मुंबई, इ. स. १८४६

२६. दुसरें पुस्तक (Genesis) रे. डिक्सन, मुंबई, इ. स. १८४६

२७. पांचवें पुस्तक—नेमप्रकरण, रे. डिक्सन, मुंबई, इ. स. १८४६

२८. शुभ वेळांचें पहिलें पुस्तक—सॅम्युअल, मुंबई, इ. स. १८४६

२९. प्रेषितांचीं कृत्यें मुंबई, इ. स. १८४७ (इं. ऑ.)

३०. ज्ञानमार्गाची सूचना (आवृत्ति २ री)
बॉ. ट्रा. बु. सोसायटी मुंबई, इ. स. १८४९

३१. ख्रिस्ती मंडळीची बखर–Rev. Barth मुंबई, इ. स. १८५०

३२. विश्वासकथा (On Faith) मुंबई, इ. स. १८५० (इं. ऑ.)

३३. ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेचीं प्रमाणें– मुंबई, इ. स. १८५०

३४. धर्मशास्त्रप्रसार— मुंबई, इ. स. १८५१ (इं. ऑ.)

३५. भाव कोणावर ठेवावा (मोडी) मुंबई, इ. स. १८५२ (इं. ऑ.)

३६. पापपीडितांस शांति (मोडी) मुंबई, इ. स. १८५२ (इं. ऑ.)

३७. पश्वादि भूतदया (Kindness to Animals) मुंबई, इ. स. १८५३

३८. नवा उत्पन्न जो त्याचें निरूपण, मुंबई, इ. स. १८५३ (इं. ऑ.)
३९. खिस्ती लोकांचें कर्तव्यसार—बाबा पदमनजी मुंबई, इ. स. १८५६
४०. येशू खिस्तानें जी प्रार्थना आपल्या शिष्यांस सांगितली तिजवर
टीका [बॉ. ट्रा. बु. सो.] मुंबई, इ. स. १८५६
४१. खिस्ती धर्माचा प्रसार होण्याविषयींच्या भविष्यवचनांची
पूर्णता–शेख दाऊद, इ. स. १८५७
४२. देव दयाळू असतां मनुष्यांनीं कां दुःखी रहावें–
(बॉ. ट्रा. बु. सो.) मुंबई, इ. स. १८५७
४३. मात्थीनें केलेलें शुभवर्तमान यावरील टीका– मुंबई, इ. स. १८५८
४४. प्रार्थनेचें सामर्थ्य– रे. बिसेल (बॉ. ट्रा. बु. सो.), इ. स. १८५९
४५. आमचीं भक्तीसंबंधीं पापें वाहणारा उपाध्या—बाबा पदमनजी
मुंबई, इ. स. १८६२
४६. खिस्ती धर्म कसा उत्पन्न झाला आणि कसा वाढला
ह्याची गोष्ट, इ. स. १८६२
४७. शाब्बाथनिरूपण–बॉ. ट्रा. बु. सो. मुंबई, इ. स. १८६३
४८. सुप्रभात–बॉ. ट्रा. बु. सो. मुंबई, इ. स. १८६४
४९. हृदयदर्पण मुंबई, इ. स. १८६४ (ब्रि. म्यु.)
५०. आकाश लोकाविषयीं संवाद–(आवृत्ति २ री) मुंबई, इ. स. १८६६
५१. खिस्ती धर्म ईश्वरस्थापित आहे ह्याविषयीं वाद– इ. स. १८६७
५२. आत्मारामपंत आणि मृत्यु शिपाई—बाबा पदमनजी,
मुंबई, इ. स. १८६७
५३. शास्त्रांतील प्रकरणें (आवृत्ति २ री) मुंबई, इ. स. १८६७
५४. प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना– मुंबई, इ. स. १८६७
५५. खऱ्या धर्माची कसोटी–नारायण शेषाद्रि, इ. स. १८६८
५६. खरा पश्चात्ताप—रे. नारायण शेषाद्रि, मुंबई,
इं. स. १८६८. (इं. ऑ.)
५७. धर्माविषयीं संवाद—रे. बोवेल इ. स. १८७०
५८. पाप्यांचा सखा— इ. स. १८७१
५९. प्रभूच्या प्रार्थनेचा उलगडा— मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
६०. सुभक्ति उत्तेजक— रे. शेषाद्रि, मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

६१. क्रूस वाहणारा— मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
६२. ईस्टर राणीचा संक्षिप्त वृत्तान्त— मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
६३. पवित्र शास्त्राचा इतिहास—रे. स्वार्त्झ, मुंबई, इ. स. १८७३
६४. कॅथॉलिक धर्मासंबंधीं प्रश्नोत्तरावलि— मुंबई, इ. स. १८७३
६५. मादागास्कर बेटांतील खिस्ती धर्माचा इतिहास— इ. स. १८७४
६६. परमेश्वराप्रीत्यर्थ दशमांश—अप्पाजी बापूजी, इ. स. १८७४ (इं. ऑ.)
६७. खरा मार्ग— मुंबई, इ. स. १८७४ (इं. ऑ.)
६८. बेने इस्राइल लोकांचा इतिहास—तळेकर, डेविड हाइम, इ. स. १८७४ (ब्रि. म्यु.)

हिंदुधर्मावर टीका

१. भगवद्गीतेचें सार–रॉबर्ट निब्बिट, मुंबई इ. स. १८३२
२. पहिलें हिंदुधर्मप्रसिद्धीकरण— जॉन विल्सन, मुंबई, इ. स. १८३२
३. ब्राह्मणांचें महत्त्व—रॉबर्ट निब्बिट, मुंबई, इ. स. १८३३
४. दुसरें हिंदुधर्मप्रसिद्धीकरण—जॉन विल्सन, मुंबई, इ. स. १८३५
५. मत्स्यपुराण आणि इब्री शास्त्र—(तुलना) इ. स. १८४५
६. मूर्तींचा उच्छेद—(बॉं. ट्रा. बु. सो.) मुंबई, इ. स. १८५० (ब्रि. म्यु.)
७. पुनर्जन्मनिर्णय-- मुंबइ, इ. स. १८५३ (इं. ऑ.)
८. मतपरीक्षा--(भाग २) बॉं. ट्रा. बु. सो. मुंबई, इ. स. १८५६–५८
९. हिंदुधर्म व खिस्ती धर्म यांची तुलना—बाबा पदमनजी, आवृत्ति २ री) [बॉं. ट्रा. बु. सो.] (प्रथमावृत्ति इ. स. १८५४) मुंबई, इ. स. १८६७
१०. कृष्ण आणि खिस्त यांची तुलना–बाबा पदमनजी, इ. स. १८७१
११. सिंहस्थमाहात्म्य-- रे. प्राईस, मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
१२. मूर्तिपूजेविषयीं जें जें शास्त्रांत लिहिलें आहे तें—मुंबई, इ. स. १८७३
१३. हिंदुधर्माविषयीं प्रश्न-- इ. स. १८७३ (इं. ऑ.)
१४. खंडोबाची गोष्ट, (बॉं. ट्रा. बु. सो.) मुंबई, इ. स. १८७४
१५. तुळशीचें लग्न— मुंबई, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

हिंदुसमाजरचना व चालीरीती यांवर टीका

१. होळीविषयीं उपदेश (बॉं. ट्रा. बु. सो.) मुंबई, इ. स. १८४७
२. हिंदु लोकांच्या सणाविषयीं निबंध–बाबा पदमनजी,
(बॉं. ट्रा. बु. सो.) मुंबई, इ. स. १८५३
३. ज्ञातिभेदादिनिर्णय–(बॉं. ट्रा. बु. सो.) मुंबई, इ. स. १८६५
४. नवसाला पावणें याविषयीं विचार–रेव्ह. ए. व्हाइट, मुंबई, इ.स.१८६८

बोधपर गोष्टी आणि संवाद

१. हेन्री आणि त्याचा सांभाळणारा गडी संभू ह्याची गोष्ट—
मिसेस फारार, नाशिक, इ. स. १८३५
२. चमत्कारिक गोष्टी–मिसेस फारार, नाशिक, इ. स. १८३५
३. बालबोध गोष्टी–मिसेस फारार, नाशिक, इ. स. १८३८ (ग्रां. कॅ.)
४. शास्त्रांतल्या गोष्टी–आवृत्ति २ री (बॉं. ट्रा. बु. सो.) इ. स. १८४०
५. यात्रिक क्रमण—हरि केशवजी, मुंबई, इ. स. १८४१
६. बाबाजीची बखर–बाबाजी रघुनाथ मराठे
मुंबई, इ. स. १८४४ (ब्रि. म्यु.)
७. राधानाथाची गोष्ट– मुंबई, इ. स. १८४४ (ब्रि. म्यु.)
८. काफर देशाची मुलगी इची गोष्ट–मुंबई, इ. स. १८४५ (ब्रि. म्यु.)
९. अविचार, पश्चात्ताप व प्रायश्चित्त यांविषयीं गोष्ट–
मुंबई, इ. स. १८४५ (ब्रि. म्यु.)
१०. गरीब शेरा हिची गोष्ट– मुंबई, इ. स. १८५२ (ब्रि. म्यु.)
११. सालसबेरी मैदानांतील धनगर– मुंबई, इ. स. १८५२ (इं. ऑ.)
१२. सिद्दी चाकर माणसाची गोष्ट (आवृत्ति २ री)
मुंबई, इ. स. १८५२ (इं. ऑ.)
१३. एक नास्तिक मनुष्य ख्रिस्ती झला ह्याविषयींची हकीकत
मुंबई, इ. स. १८५८
१४. बाला सुंदराबाई ठाकूर–रे. नारायण शेषाद्रि,
मुंबई, इ. स. १८६८ (इं. ऑ.)
१५. लहान जेन (आवृत्ति २ री) मुंबई, इ. स. १८६८ (इं. ऑ.)

१६. दोन मेंढा राणीची गोष्ट— मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
१७. देवप्रीतीची प्राचीन गोष्ट मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)
१८. फुलें वेचणाऱ्या मुलीची गोष्ट— मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)
१९. रागेनबाख गांवांतील लोहार इत्यादिकांच्या गोष्टी
(बॉ. ट्रा. बु. सो.) इ. स. १८७४
मुंबई, इ. स. १८७४ (इं. ऑ.)
२०. राजाचा पुत्र

संकीर्ण ग्रंथ

१. देव कसा आणि खरे भक्त कसे (आवृत्ति ३ री)
मुंबई, इ. स. १८३३
२. यात्रेकऱ्याचा वृत्तान्त, मिसेस फारार, नाशिक, इ. स. १८३८
३. चांगले मुलगे किंवा तुम्ही आपली परीक्षा करा. इ. स. १८३८
४. संभाषणें (ख्रिस्ती धर्मासंबंधीं) मुंबई, इ. स. १८३८
५. ज्या बायकांस लेंकरें आहेत त्यांस सुबोध.
मुंबई, इ. स. १८४१ (ब्रि. म्यु.)
६. जरीमरीविषयीं संवाद मुंबई, इ. स. १८४५ (ब्रि. म्यु.)
७. पावसाविषयीं विचार मुंबई, इ. स. १८४५ (ब्रि. म्यु.)
८. निरनिराळे धर्म— रे. एच. ब्यालंटाइन, इ. स. १८५१
९. मनोरंजक गोष्टी मुंबई, इ. स. १८५१ (इं. ऑ.)
१०. उरूस व यात्रेसंबंधीं जरीमरी, मुंबई, इ. स. १८५१ (इं. ऑ.)
११. कोकरांचा चारा (आवृत्ति २ री) मुंबई, इ. स. १८५३ (इं. ऑ.)
१२. सचोटीविषयीं मुंबई, इ. स. १८५३ (इं. ऑ.)
१३. मुलांसाठीं बोधाच्या गोष्टी मुंबई, इ. स. १८५४
१४. सदाचरणाच्या गोष्टी (आवृत्ति ६ वी) मुंबई, इ. स. १८५४
१५. रत्नमाला मुंबई, इ. स. १८५४ (इं. ऑ.)
१६. बालमोतांतलें शाळेचें वर्णन मुंबई, इ. स. १८६२
१७. गालिप्रदान मुंबई, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
१८. ईश्वरभक्तास सर्व गोष्टी कल्याणकारक होतात. इ. स. १८६९
१९. देव, मनुष्य आणि शास्त्र यांविषयीं विचार, इ. स. १८७०
२०. धार्मिक व अधार्मिक यांचा भेद मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)

२१. माणसाचा जीव मौल्यवान आहे	मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)
२२. गुरुजनांचें अर्थशास्त्र	मुंबई, इ. स. १८७० (इं. ऑ.)
२३. मोठा विचार	मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
२४. उद्धारमहिमा	मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

* * *

११ : संकीर्ण वाङ्मय

स्थलवर्णन

गोविंद नारायण यांनीं इ. स. १८६३ त ' मुंबईचें वर्णन ', या नांवाचा माहितीपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. यांत भौगोलिक, सामाजिक व राजकीय दृष्टीनें मुंबई शहराचें इत्थंभूत वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. " मुंबईची पूर्वींची कशी स्थिति होती व सध्यां कशी आहे, हा सर्व मजकूर जेवढा साध्य झाला तेवढा यामध्यें केवळ प्राकृत भाषेंत लिहिला आहे. शब्दचातुर्याकडे व वाक्यसौंदर्याकडे तादृश लक्ष दिल्याशिवाय केवळ बालबोध भाषेचाच क्रम अनुलक्षून ही रचना केली आहे. " मराठी भाषेंतील वर्णनात्मक पुस्तकांत हा ग्रंथ निःसंशय पहिल्या प्रतीचा आहे. यांतील माहिती परिश्रमपूर्वक मिळविलेली असून लिहिण्याची शैलीहि सुबोध व मनोरंजक आहे. याच धर्तीवर नारायण विष्णु जोशी यांनीं इ. स. १८६८ त ' पुणें शहराचें वर्णन ' लिहिलें. उपयुक्त माहितीच्या दृष्टीनें हें पुस्तकहि उत्कृष्ट वठलें आहे. याशिवाय ज्ञानप्रसारक मासिकांतहि अनेक स्थलवर्णनपर लेख प्रसिद्ध झाले होते. ' मुंबईचें वर्णन ' या ग्रंथांतील एक उतारा येथें सादर करितों :—

" माहीम हें लहानसें गांव मुंबईच्या वायव्येस किल्ल्यापासून सुमारें तीन कोशांच्या अंतरावर आहे. एथें जिकडे तिकडे माड आहेत. बाजारांत मात्र थोडीशी दाट वस्ती आहे, तीही पांचकळसी, वाडवळ, सुतार, भंडारी, कांसार, सोनार, कोळी, मुसलमान, किरिस्तांव यांची आहे. एथें नारळाचें उत्पन्न फार व येथील नारळ उत्तम प्रकारचे असून ते महाग खपतात. एथील वाडवळ लोक राहातात. तेच माडांची व इतर झाडांची देखरेख करितात. एथें पोर्तुगीझ लोकांचीं एक दोन देउळें व पाठशाळा आहेत. हिंदू

लोकांचीं दोन-चार देवळें व मुसलमान लोकांची एक मोठी मशीद आहे.
मुकदम बाबा नांवाच्या एका पिराची तींत कबर आहे. ह्या मुकदम साहेबाचा
मार्गशीर्षच्या सुमारास मोठा उरूस भरतो. तो पांचसहा दिवसपर्यंत असतो.
तेथें शेंकडों व्यापारी लोकांचीं दुकानें पडतात. ही एक मुंबईतील प्रख्यात
जत्राच आहे. सर्व प्रतीचे लोक ह्या ठिकाणीं जातात. हिंदू लोक तर सर्वांपुढें
जाऊन याची पूजा करावयास सिद्ध असतात. शेवटास मांडवी आहे. त्याच्या
शेजारीं आगीच्या गाडीचें ठाणें आहे. एथें वांदऱ्याचा पूल सुरू होतो.
वांदऱ्याचा पूल सर जमशेटजी जिजीभाई यांनीं १,५५,००० रुपये खर्च
करून लोककल्याणार्थ सन १८४३ त बांधिला व २२,००० रुपये खर्च
करून त्यांच्या पत्नीनें तेथील मोठा रस्ता बांधिला. माहिमाची हद्द संपते तेथें
मोठा दरवाजा आहे. माहिमास भंडारी लोकांची वस्ती फार आहे. ते लोक
माडापासून सूर काढितात व त्याची दारू व गूळ तयार करितात. माहिमास
किल्ला आहे. तो लहान असून साधारण आहे. एथें बंदर आहे. त्यांत बहुधा
मासाळी उतरते. हा पदार्थ एथें उत्तम प्रकारचा सांपडतो असें सांगतात." $

प्रवासवर्णन

शामराव मोरोजी यांनीं इ. स. १८५२ त अनेक ग्रंथ, यात्रेकरू व देशाटन
करणारे लोक यांच्या साह्यानें 'काशिप्रकाश म्हणजे महायात्रावर्णन' हें पुस्तक
लिहिलें. यांतील माहिती साधारण बरी आहे. पण भाषा मात्र अशुद्ध आहे. मराठी
भाषेंतील हें पहिलेंच प्रवासवर्णन होय. यानंतर दाजीसाहेब किबे यांनीं महाराष्ट्र व
गुजराथ प्रांतांतील आपल्या दौऱ्याचें वर्णन 'प्रसिद्ध स्थळें' (भाग २) या नांवानें
लिहून छापिलें. जगन्नाथ विठोबा क्षत्री यांनीं 'गोकर्ण महाबलेश्वराचा यात्रेप्रकरणीं
वृत्तान्त,' (इ. स. १८६३ त) प्रश्नोत्तररूपानें प्रसिद्ध केला. इ. स. १८६७ त
भास्कर हरी भागवत यांनीं करसनदास मुलजी यांच्या मूळ गुजराथी ग्रंथावरून
'इंग्लंडांतील प्रवास' हें पुस्तक मराठींत लिहिलें. शामराव मोरोजी यांच्या 'काशि-
प्रकाश' या ग्रंथांतील एक उतारा खालीं सादर करितों.

"हें शहर प्राचीन मैधुर्व देशीं श्रीउग्रसेन रायाचें आहे. धर्मा आरण्यांत
ते मुंबईहून ३९० कोसांवर उत्तर दिशेस आहे तेथें एक तारामंडळ यमुने-
तीरीं पाहाण्याची माडि किंवा इमारत माहारज जयशिंग राजे जयनगरचे
त्याणी केली आहे महाराज विर्शिंग राजे याणी छत्तीस लक्ष रुपये लावून
श्रीकृष्णजीचीं देवालयें किंवा मंदिरें बांधिलीं आहेत तेणेंकरून ही एक कृष्ण-
पुरी झाली आहे आणि निरंतर किंवा अहर्निश भक्तजन आळऊन, आळऊन

$ मुंबईचें वर्णन, पृ. ७१–७२.

मुखानें गातात व कृष्ण नामोच्चारण करितात सकल मथुरेंत व ब्रीज चौऱ्याशित सर्व साधुसंत इत्यादि चारीवर्ण मानव आबालवृद्ध आणि स्त्रिया-सहित त्याचे कारण कीं, श्रीकृष्ण ध्यावा, पाहावा किंवा मनी ठसावा असे इतर तीर्थ स्थानी अति उत्कृष्ट कृष्ण नामोत्साह नाहीं म्हणोन मथुरेस मोक्ष पुरी म्हणतात. " ¶

भूगोल

बाळशास्त्री जांभेकर यांनीं इ. स. १८३६ त शाळेंतील विद्यार्थ्यांकरितां 'भूगोलविद्या' या नांवाचें लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यानंतर महादेवशास्त्री पुराणिक यांनीं इ. स. १८५४ त सलेवन (Sulivan) साहेबाच्या इंग्रजी ग्रंथा-वरून भूगोल विद्येचीं आणि खगोल विद्येचीं मूलतत्त्वें 'भूगोलखगोल' या पुस्तकांत ग्रथित केलीं. मेजर क्यांडी यांनीं 'हिंदुस्थानचें वर्णन' (भाग २) हीं पुस्तकें लिहिलीं. याशिवाय महाराष्ट्रांतील पुणें, नाशिक, सातारा, सोलापूर इत्यादि निर-निराळ्या जिल्ह्यांचेहि भूगोल प्रसिद्ध झाले. महादेवशास्त्री पुराणिक यांच्या 'भूगोल-खगोल' या ग्रंथांतील एक उतारा खालीं उद्धृत करितों.

"समुद्र, सरोवरें, नद्या आणि पृथ्वीवरचे ओलसर प्रदेश ह्यांपासून सूर्य व हवा ह्यांच्या योगानें पाण्याची वाफ होऊन वर जाते, त्या क्रियेस बाष्पभवन म्हणतात. पृथ्वीजवळच्या हवेपेक्षां वाफ हलकी असते, ह्यामुळें ती वर जाऊन जेथें तिच्या इतक्या वजनाची हवा असते तेथें ती राहाते. जों-पर्यंत ती हवेंत मिसळलेली असते, तोंपर्यंत पाण्यांत विरलेल्या मिठाप्रमाणें ती अदृश्य असते. पण आंत न राहील इतकी वाफ हवेंत मिसळली, तर, किंवा उष्णता कमी होऊन हवेच्या ठायी वाफ वितळवण्याची शक्ति कमी झाली, तर, वाफ घन होऊन आकाशांत मेघरूपानें दिसते, किंवा पर्जन्य, गारा आणि बर्फ ह्यांतून एखाद्याच्या रूपानें जमिनीवर पडतांना ती दिसते."*

दळणवळणाचीं साधनें

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं भौतिक शास्त्रांच्या वाढीबरोबर दळण-वळणाचीं नवीन नवीन साधनें उपलब्ध होऊं लागलीं होतीं. महाराष्ट्रांतील सामान्य जनांना त्यांची माहिती व्हावी म्हणून त्यासंबंधीं या काळांत चारपांच पुस्तकें प्रसिद्ध झालीं. कृष्णशास्त्री भाटवडेकर यांनीं 'लोखंडी रस्त्याचें संक्षिप्त वर्णन' व 'वर्तमान वाहक–विद्युद्यंत्र' हे ग्रंथ लिहिले. त्यानंतर 'लोखंडी सडकांचे चमत्कार' व 'नौकानयनाचा इतिहास' हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. विष्णुशास्त्री चिपळूणकर

¶ काशिप्रकाश, पृ. ५८

* भूगोलखगोल, पृ. १४०

व 'नौकानयनाचा इतिहास' हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं 'शालापत्रक' मासिकांत नौकानयनाच्या इतिहासावर मार्मिक परीक्षण लिहिलें होतें.

पाठमाला

माधवराव मोरोजी आणि नाना मोरोबा यांनीं इ. स. १८४८ त 'विद्योपक्रमाचा ग्रंथ' प्रसिद्ध केला. मराठी भाषेंत 'योग्य पुस्तकांची' उणीव आहे म्हणून हा पाठसंग्रह आपण प्रकाशित केला असें या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत प्रकाशकांनीं नमूद केलें आहे. इ. स. १८५० त मेजर क्यांडी यांनीं "इंग्रेजी पुस्तकांतील कितीएक गोष्टींचें मराठी भाषांतर करून" 'वाचनपाठमाला' या नांवाचें पुस्तक रचिलें. याशिवाय 'ज्ञानबोधक,' 'कथितपाठमाळा,' 'मधुमक्षिका,' 'गद्यरत्नावलि' इत्यादि पुस्तकें या काळीं प्रसिद्ध झालीं. मेजर क्यांडी यांची 'पाठमाला' या पुस्तकांतील एक उतारा खालीं देत आहें.

"तुमच्या मातापितरांच्या आज्ञा ईश्वराच्या आज्ञांशीं विरुद्ध नसल्यास त्या कानीं पडतांच, अलंघ्य अशा समजून, अनन्य भावानें तुम्ही मानाव्या. जे आईबाप तुम्हांपेक्षां फार केलेले पाहिलेले आहेत, त्यांहून आपण शहाणे असा अभिमान बाळगूं नका. आणि जर करतां ईश्वरकृपेनें तुम्हांस त्यांच्यापेक्षां विद्या अधिक झाली, किंवा संपत्ति अधिक मिळाली, तर तुम्ही त्यांची हेळणा करूं नका. त्यांशीं तुमची वागणूक नेहमीं मर्यादेची असावी; आणि विशेष-करून उलट जाब न जाण्याविषयीं व दुर्मुख न होण्याविषयीं, तुम्हीं फार जपत जावें. जर कधीं ते तुमच्या छंदास आड आले, तर तुम्हांवर जी जो त्यांची प्रीति आहे तिजवांचून दुसरें कांहीं कारण नाहीं, असें समजावें. त्यांनीं जे जे श्रम तुम्हांसाठीं केले आहेत, व जीं जीं दुःखें तुम्हांसाठीं भोगिलीं आहेत, त्यांचें स्मरण ठेऊन तुम्ही त्यांच्या आज्ञाभंगापासून दूर राहावें; आणि तुम्हांकरितां ज्यांनीं पूर्वी दुःख सोशिलें, अशा त्यांच्या मायाळू अंतः-करणास फिरून तुम्हीं दुःख न द्यावें. मुलांनीं आईबापांवर ममता केली, ह्याचीं उदाहरणें पुढें लिहिलीं आहेत, तीं पाहून त्या मुलांनीं चांगलें केलें असें मानून त्यांचा कित्ता घ्यावा."*

संस्कृत काव्यांचीं भाषांतरें

संस्कृत भाषेंतील दोनतीन काव्यांचीं गद्यात्मक भाषांतरें या काळीं प्रसिद्ध झालीं. इ. स. १८५३ त जयदेवकृत गीतगोविंदाची प्राकृत टीका लिहिली गेली. इ. स. १८६२ सालीं पांडुरंग विठ्ठल रानडे यांनीं भर्तृहरीचें 'शृंगारशतक' मराठी

* वाचनपाठमाला [पाठ ३७] पृ. १६६–६७.

भाषांतरासह छापिलें. त्यानंतर बाळाजी नारायण फडके यांनीं इ. स. १८७३ त ' नैषध चरित्राचें ' मराठींत भाषांतर केलें.

विशिष्ट ज्ञातिविषयक ग्रंथ

विशिष्ट ज्ञातीसंबंधीं लिहिलेलीं सातआठ पुस्तकें इ. स. १८७४ पूर्वीं प्रसिद्ध झालीं. शामराव मोरोजी यांनीं पाठारे प्रभु ज्ञातीच्या संबंधानें ' पत्तनप्रभुलेखमणी ' आणि ' श्रीमत् सभाविजय ' हीं पुस्तकें लिहिलीं. भवानी विश्वनाथ कानविंदे यांनीं " सारस्वत ब्राह्मण ऊर्फ शेणवी किंवा कोकणे ब्राह्मण याविषयीं आक्षेपकांचें यथार्थ खंडन " हें पुस्तक लिहिलें. याशिवाय ' गोत्रमालिका, ' ' कऱ्हाडा ब्राह्मणांचे प्रवर ', ' दशप्रकरण, ' चित्पावनविनोद ' इत्यादि विशिष्ट ज्ञातिविषयक पुस्तकें या काळीं लिहिलीं गेलीं.

यशोदापांडुरंगी–केकादर्श

दादोबा पांडुरंग यांनीं इ. स. १८६५ त मोरोपंतांच्या ' केकावलीवर ' ' यशोदा-पांडुरंगी ' या नांवाची ' विस्तीर्ण ' टीका लिहिली. तिच्या प्रस्तावनेंत त्यांनीं परशुरामतात्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. दादोबांचा हा ग्रंथ पाल्हाळिक असून त्यांतील भाषाहि कांहींशी क्लिष्ट आहे. इ. स. १८६७ त परशुरामपंत गोडबोले यांनीं आपला ' केकादर्श ' प्रसिद्ध केला. ' यशोदापांडुरंगी ' च्या प्रस्तावनेंतील एक उतारा खालीं उद्धृत करितों.

> " कालीदास, भवभूति, माघ आणि श्रीहर्ष यांचीं अनुक्रमें रघुवंशकिरातादि जीं प्रसिद्ध महाकाव्यें आहेत, त्यांमध्यें शब्दांच्या काठिन्यावरून आणि अर्थान्वयाच्या गूढत्वावरून श्रीहर्षाचें जे शेवटलें नैषधकाव्य, त्याचें दुर्बोधत्व बहुधा लोकानुभूत आहे; तसेंच ज्यांस संस्कृत भाषा अवगत नाहीं, अशा प्राकृत जनांस मोरोपंतांच्या काव्यांत संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ असल्यानें साहजिक त्या शब्दांच्या अपरिचयामुळें आणि प्राकृत जनांस अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द आणि निव्वळ प्राकृत व ग्राम्य शब्द, यांचें मिश्रण असल्यानें संस्कृत भाषाभिज्ञ अशा पंडितांसहि त्यांची निवड करून अर्थयोजना करण्यांत अवघड प्रसंग असण्याच्या दृढ संभवामुळें, तसेंच समयविशेषी शब्दांचा दूरान्वय असल्यानें अर्थज्ञानाच्या दुःसाध्यत्वामुळें, मोरोपंतांचें काव्यहि दुर्बोध आणि कठिण म्हणूनच बहुधा सर्व जनांस अनुभूत आहे ."‡

याशिवाय ' पल्लीपतनकारिका, ' वृंदसतरायी,' ' संचारचोपडी,' ' स्वप्नाध्याय, ' ' अग्निक्रीडा ' इत्यादि पुस्तकें या काळीं प्रसिद्ध झालीं.

* * *

‡ यशोदापांडुरंगी–प्रस्तावना, पृ. ५

परिशिष्ट

स्थलवर्णन

१. मुंबईचें वर्णन–गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८६३
२. पुणें शहराचें वर्णन–नारायण विष्णु जोशी, मुंबई, इ. स. १८६८

प्रवासवर्णन

१. काशिप्रकाश–शामराव मोरोजी, मुंबई, इ. स. १८५२
२. प्रसिद्ध स्थळें–[भाग २] दाजीसाहेब किबे, पुणें, इ. स. १८६१–६४ (ग्रां. कॅ.)
३. गोकर्ण महाबळेश्वराचे यात्रेप्रकरणीं वृत्तान्त–जगन्नाथ विठोबा क्षत्री मुंबई, इ. स. १८६३
४. इंग्लंडांतील प्रवास–[गुजराथीवरून भाषांतर] भास्कर हरि भागवत मुंबई, इ. स. १८६७
५. राणीचें पुस्तक–[हायलंडमधील आमचा दिनक्रम] गणपतराव मोरोबा पितळे, मुंबई, इ. स. १८७१
६. काशीयात्रा–हरी गणेश पटवर्धन, पुणें, इ. स. १८७२

भूगोल

१. भूगोलविद्या–बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, इ. स. १८३६
२. भूगोलखगोल–महादेवशास्त्री पुराणिक, मुंबई, इ. स. १८५४
३. हिंदुस्थानाचें वर्णन–मेजर क्यांडी, मुंबई, इ. स. १८६०
४. आशिया खंडाचें वर्णन–मेजर क्यांडी, मुंबई, इ. स. १८६२
५. भूगोलाचें वर्णन [भाग २]–मेजर क्यांडी, मुंबई, इ. स. १८६३–६५
६. संक्षिप्त भूगोलवर्णन–परशुरामपंत गोडबोले, मुंबई, इ. स. १८६५ (ग्रां. कॅ.)
७. हिंदुस्थानचा भूगोल–बापू पुरुषोत्तम जोशी, टोंकेकर, मुंबई, इ. स. १८६७ (ब्रि. म्यु.)
८. भूगोलविद्या–नारो अप्पाजी गोडबोले, पुणें, इ. स. १८६८ (इं. ऑ.)

९. मुंबई इलाख्याचें वर्णन–सखाराम बापूशेट दांडेकर,
ठाणें, इ. स. १८६९ (इं. ऑ.)

१०. संक्षिप्त भूगोल–खगोलविद्या–वासुदेव रामचंद्र मोहनी,
पुणें, इ. स. १८७० (इं. ऑ.)

११. धारवाड जिल्ह्याचें वर्णन–लक्ष्मण बळवंत सोमण,
पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

१२. खानदेश जिल्ह्याचें वर्णन–गो. अ. थत्ते, गो. प्र. पंडित,
पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

१३. मध्यप्रदेशाचें वर्णन–हरी गोपाळ पाध्ये, नागपूर,
इ. स. १८७१ (इं. ऑ.)

१४. पुणें जिल्ह्याचा भूगोल– राघो काशिनाथ लेले,
पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

१५. ठाणें व कुलाबा जिल्ह्याचें वर्णन–सखाराम बापूशेट दांडेकर,
ठाणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

१६. सातारा जिल्ह्याचें वर्णन–बलवंत हरी जोशी, बोरगांवकर,
सातारा, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

१७. रत्नागिरी जिल्ह्याचें वर्णन–शिवराम भास्कर काणे,
रत्नागिरी, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

१८. रत्नागिरी जिल्ह्याचा भूगोल–रा. भि. जोशी, वि. दि. वैद्य,
रत्नागिरी, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

१९. सोलापूर जिल्ह्याचें वर्णन–गणेश बळवंत लिमये,
सोलापूर, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

२०. खानदेश जिल्ह्याचा भूगोल–गोविंद हरी थत्ते, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

२१. हिंदुस्थानवर्णनसार–भास्कर बल्लाळ आपटे,
पुणें, इ. स. १८७२ (इं. ऑ.)

२२. अहमदनगर जिल्ह्याचें वर्णन–विष्णु वासुदेव साठ्ये,
गोविंद महादेव पुंडलीक, अहमदनगर, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

२३. वऱ्हाड प्रांताची भूगोलविद्या–चिमणाजी राजाराम पाठक,
मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

२४. भूगोलविद्या–भिकाजी धोंडदेव निगुडकर,
पुणें, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

२५. नाशिक जिल्ह्याचें संक्षिप्त वर्णन–विष्णु रामचंद्र देवधर, पुणें, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

२६. प्रश्नोत्तररूप भूगोलविद्या–जनार्दन महादेव गुर्जर, मुंबई, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

दळणवळणाचीं साधनें

१. लोखंडी रस्त्याचें संक्षिप्त वर्णन–कृष्णशास्त्री भाटवडेकर, मुंबई, इ. स. १८५४

२. लोखंडी सडकांचे चमत्कार–गोविंद नारायण, मुंबई, इ. स. १८५८

३. वर्तमानवाहक विद्युद्यंत्र याचें संक्षिप्त वर्णन, कृष्णशास्त्री भाटवडेकर, मुंबई, इ. स. १८५९

४. नौकानयनाचा इतिहास–गोविंद शंकरशास्त्री बापट, मुंबई, इ. स. १८७२

पाठमाला

१. विद्योपक्रमाचा ग्रंथ–माधवराव मोरोजी, नाना मोरोबा, मुंबई, इ. स. १८४८

२. वाचनपाठमाला–मेजर क्यांडी, पुणें, इ. स. १८५०

३. ज्ञानबोधक–(पुस्तक २ रें) मुंबई, इ. स. १८५२

४. कथितपाठमाला–नारायणभाई दांडेकर, मुंबई, इ. स. १८६०

५. बालोपयोगी सर्वसंग्रह–विनायक कोंडदेव ओक, सातारा, इ. स. १८६१ (ग्रां. कॅ.)

६. वाचनमाला–नारायणभाई दांडेकर, पुणें, इ. स. १८६७ (इं. ऑ.)

७. स्त्रीकंठभूषण–बाबा पदमनजी, मुंबई, इ. स. १८६८

८. मधुमक्षिका–विनायक कोंडदेव ओक, मुंबई, इ. स. १८७१

९. गद्यरत्नावलि–विनायक कोंडदेव ओक, मुंबई, इ. स. १८७३

संस्कृत काव्याचीं भाषांतरें

१. गीतगोविंद–(प्राकृत टीकेसहित) मुंबई, इ. स. १८५३

२. शृंगारशतक–पांडुरंग विठ्ठल रानडे, पुणें, इ. स. १८६२

३. नैषधचरित्र–रामचंद्रशास्त्री तळेकर, पुणें, इ. स. १८६९ (इं. ऑ.)
४. नैषधचरित्र–बाळाजी नारायण फडके, पुणें, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

केकावलीवर टीका

१. यशोदापांडुरंगी–दादोबा पांडुरंग, मुंबइ, इ. स. १८६५
२. केकादर्श–परशुरामपंत गोडबोले मुंबई, इ. स. १८६७ (म. वा.)

विशिष्ट–ज्ञातिविषयक ग्रंथ

१. पत्तनप्रभुलेखमणि– शामराव मोरोजी, मुंबई, इ. स. १८६२
२. पेशव्यांचा कावा–सुंदरराव रावजी, मुंबई, इ. स. १८६३
३. श्रीमत्सभाविजय–शामराव मोरोजी, मुंबई, इ. स. १८६६
४. गोत्रमालिका–वामन कृष्ण जोशी गद्रे, सदाशिव बजाबाशास्त्री, अमरापूरकर, पुणें, इ. स. १८६८ (इं. ऑ.)
५. कऱ्हाडा ब्राह्मणांचे प्रवर–रत्नागिरी, इ. स. १८६८ (इं. ऑ.)
६. सारस्वत ब्राह्मण (आक्षेपकांचें यथार्थखंडन) भवानी विश्वनाथ कानविंदे आणि इतर, मुंबई, इ. स. १८७०
७. समस्त कोंकणस्थ नामदेव शिंपी जातीस पत्र– जगन्नाथ अंतोबा निर्गुडे, मुंबई, इ. स. १८७१
८. गोत्रावलि–आबा जोशी मोघे, वसईकर, मुंबई, इ. स. १८७२ (इं. ऑ.)
९. दशप्रकरण–लक्ष्मण नारायण केणी, मुंबई, इ. स. १८७२
१०. मुखमासीत्–ब्राह्मणमाहात्म्य–नारायण केशव वद्य, मुंबइ, इ. स. १८७३
११. चित्पावनविनोद–ल. ना. केणी, मुंबई, इ. स. १८७३
१२. देवरुख्याविषयीं विचार–विष्णुशास्त्री पंडित, मुंबई, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

खेळ

१. चेंडुफळी–अनंतसुत, पुणें, इ. स. १८५८ (ग्रां. कॅ.)
२. बालखेळ– इ. स. १८५९ (म. वा.)
३. मुलींचा खेळ– पुणें, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)

४. मुलांसाठीं कसरत—नारायण विष्णु जोशी,
पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

बैठे खेळ

१. बुद्धिबळें खेळणारांचा मित्र—हरिश्चंद्र चंद्रोबा जोशी,
मुंबई, इ. स. १८५४

२. बुधबळाचा ग्रंथ—सिताराम रावजी जुन्नरकर, इ. स. १८५४

३. कालकरमणूक—अष्टमकर, मुंबई, इ. स. १८७३ (इं. ऑ.)

जादू

१. जादूचा तमाशा—परशुराम रघुनाथ फडके,
सातारा, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

२. जादुप्रकाशज्ञान—आत्माराम विनायक पाटकर,
पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

गृहव्यवस्था

१. संसारचोपडी—(गुजराथीवरून) पुणें, इ. स. १८४७ (इं. ऑ.)

२. बैठक चावडी—काशिनाथपंत काळे, मुंबई, इ. स. १८५६ (ग्रां. कॅ.)

३. घरचें आयव्यय कोष्टक—जनार्दन हरी आठल्ये,
रत्नागिरी, इ. स. १८६३ (ग्रां. कॅ.)

४. जमाखर्चाची माहिती—कृष्णाजी प्रभाकर काळे,
रत्नागिरी, इ. स. १८७४ (इं. ऑ.)

इतर ग्रंथ

१. पल्लीपतनकारिका— मुंबई, इ. स. १८४४ (ब्रि. म्यु.)

२. वृंदसतसयी—केशव बाजी परचुरे, मुंबई, इ. स. १८४५ (ग्रां. कॅ.)

३. स्वप्नचिंतामणी—गोपाळ दीक्षित, सातारकर, इ. स. १८४८

४. स्वप्नाध्याय—रामचंद्र सदाशिव जोशी, पुणें, इ. स. १८४९ (ग्रां. कॅ.)

५. पुष्पवन—'यंत्रज्ञान' वगैरेंचा कर्ता— पुणें, इ. स. १८५१

६. बॉम्बे असोसिएशन सभेचें हकीगतीचें पुस्तक—
मुंबई, इ. स. १८५२ (ग्रां. कॅ.)

७. बॉम्बे असोसिएशनची पहिली अर्जी— इ. स. १८५२

८. बॉम्बे असोसिएशनची दुसरी अर्जी— इ. स. १८५३

९. पाडवही–(Table of wages) इ. स. १८५७ (ब्रि. म्यु.)
१०. कितानावरील लोकरी कशिदा पाडण्याची रीति–
(Canvas embroidery) काशिनाथ गंगाधर क्षत्री
मुंबई, इ. स. १८५८
११. सूपशास्त्र–रामचंद्र सखाराम गुप्ते, इ. स. १८६७ (ब्रि. म्यु.)
१२. अग्निक्रीडा–गणेश बाबाजी माटे, पुणें, इ. स. १८७१ (इं. ऑ.)

* * *

१२ : नियतकालिकें

१

मासिकें

मराठी भाषेंतील पहिलें मासिक ‘ दिग्दर्शन ’ (इ. स. १८४०)

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं ज्या कांहीं थोर पुरुषांनीं आपलें शक्तिसर्वस्व वेचलें, त्यांत बाळशास्त्री हे अग्रगण्य होत. या काळांतील प्रत्येक सामाजिक, धार्मिक किंवा शैक्षणिक उपक्रमाशीं त्यांचा थोडा-बहुत संबंध आल्यावांचून राहिला नाहीं. बाळशास्त्री यांनीं इ. स. १८४० त ‘ दिग्दर्शन ’ या नांवाचें मराठी भाषेंतील पहिलें मासिक सुरू केलें. “ या पुस्तकांत बातमीचें सार व भूगोल, इतिहास, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र व साधारणविद्या यांविषयीं थोडथोडा मजकूर दुसऱ्या ग्रंथांतून घेतलेला किंवा नवा लिहिलेला छापला ” जाई; आणि “ प्रसंगोपात्त समजूत पडण्याकरितां ” चित्रेंहि देण्यांत येत. यांत ‘ हिंदुस्थानचा इतिहास ’, ‘ ग्रीस देशाचा इतिहास ’, ‘ ग्रेटब्रिटन देशाची राज्यरीति’, ‘ सिद्धपदार्थविज्ञान ’, ‘ ज्योतिःशास्त्र ’, ‘ सामान्य नीति ’ इत्यादि अनेक उपयुक्त विषयांवर लेख आले होते. या मासिकाच्या तिसऱ्या पुस्तकांतील एक उतारा खालीं उद्धृत करितों.

“ आतां परमेश्वराचे सर्व व्यापकतेचा विचार केला असतां असें दिसतें कीं परमात्मा सर्वांतर्यामी होत्साता या सर्व जगाला प्रेरणा व साहाय्य करतो.

तो सर्व सृष्टींत जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं भरलेला आहे. या सृष्टींत असा एकही पदार्थ नाहीं कीं ज्यांत त्याची वस्ती नाहीं, व दूर, जवळ, लहान, मोठा, या कारणांही त्याचे व्याप्तीस कांहीं हरकत आहे, असा अर्थ नाहीं. परमात्मा प्रति व्यक्तीमध्यें आहे, मग ती व्यक्ति पार्थिव असो, आणि तो परमात्मा स्वतापाशीं जेवढा सन्निध आहे, तेवढाच तो प्रतिव्यक्तीशीं सन्निध आहे. एके स्थानापासून दुसरे स्थानीं जाणें व या सृष्टींतील स्वनिर्मित पदार्थांपासून व या अनंत ब्रह्मांडांतील अमुक ठिकाणापासून निघून जाणें हें जर परमेश्वराच्या ठायीं असलें तर हा त्याजमध्यें अपूर्णपणा आहे, असें होईल. सारांश, एके प्राचीन विद्वानानें परमात्म्याचें स्वरूप वर्णिलें आहे, तें फार बरोबर आहे. तें असें कीं परमेश्वर अशी व्यक्ति आहे, कीं जिचा मध्यबिंदु सर्वत्र आहे, परंतु जिचा परिधि कोठेंहि नाहीं.

दुसरी गोष्ट :—जसा परमेश्वर सर्वव्यापक, तसा तो सर्वज्ञही आहे. त्याचे सर्वव्यापकतेमुळें अर्थातच त्याचा ठायीं सर्वज्ञता येती. ज्यापेक्षां वा सर्व ब्रह्मांडांत त्याची व्याप्ति आहे, त्यापेक्षां तेथें जे प्रकार होत जातील, ते सर्व त्याचे समजण्यांत आल्यावांचून राहावयाचे नाहींत. तसेंच ज्ञानमय जगत् म्हणजे अंतःकरणें यांत जे जे विचार उत्पन्न होतील, तेही त्यास कळतील, कारण सर्वांचे अंतर्यामीं त्याची वस्ती आहेच. देहापासून आत्म्याला जर निराळें केलें, आणि तो आत्मा लिंगदेह धरून मनोवेगेंकरून डोळ्याचें पातें लवे न लवे इतके काळांत या सृष्टीची मर्यादा उल्लंघन करून गेला, व तेवढ्यांच चापल्यतेंकरून कोट्यावधि वर्षें अव्याहत त्याणें पर्यटन केलें, तथापि तो आत्मा, परमेश्वराचें भुजांतर्गत, व त्याचे अनंत ब्रह्मांडांही वेष्टित आहे, असें आपणांस पाहील. या प्रकारें सर्व शक्तिमान् परमात्म्याची सर्व व्यापकता आणि सर्वज्ञता यांचा विचार केला असतां सर्व दुःखकारक कल्पना विलयाप्रत जातात. ज्या वस्तुस स्थिति आहे, त्याजवर परमेश्वराचें लक्ष असतें, व त्यांत विशेषेंकरून जे प्राणी आपण परमेश्वराचें लक्षांत नसूं म्हणून भय मानितात, त्यांजवर त्याचें लक्ष असतेंच असतें. त्याचे सर्व विचार, व विशेषेंकरून त्यास वरीलप्रमाणें जी काळजी लागती, तिचा परमेश्वर मनोमय साक्षी असतो, कारण स्वनिर्मित प्राण्यांतून कोणी त्याचे लक्षांत नसावा, हें जसें केवळ अशक्य आहे, तसें परमेश्वराचें आपणांवर लक्ष असावें, अशी जे काळजी वाहातात, व निष्कपटपणें परमेश्वरास शरण जाऊन त्यानें आपणांवर लक्ष द्यावें, असें आपण योग्य नाहीं असें जे मानितात त्यांजवर परमेश्वर कृपादृष्टी करील, अशी आपण पूर्ण खात्री बाळगावी. ” $

$ दिग्दर्शन (पु. ३, अं. ८) पृ. २३६–३८

उपदेशचंद्रिका (इ. स. १८४४)

इ. स. १८४२ पासून खिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं 'ज्ञानोदय' पत्र निघूं लागलें. त्यामध्यें वारंवार हिंदुधर्मावरील टीकात्मक लेख प्रसिद्ध होत असत. मिशनरी लोकांच्या या हिंदुधर्मविरोधी प्रचाराचें खंडण करण्यासाठीं मोरभट दांडेकर यांनीं इ. स. १८४४ त 'उपदेशचंद्रिका' या नांवाचें मासिक सुरू केलें. यापूर्वींच त्यांनीं 'हिंदुधर्मस्थापन' या पुस्तकांत जॉन विल्सन साहेबाच्या आक्षेपांना उत्तर दिलें होतें. हिंदु लोकांस आपल्या पवित्र धर्माचें यथार्थज्ञान व्हावें व त्यांनीं मिशनरी लोकांच्या जाळ्यांत सांपडूं नये म्हणून मोरभट यांनीं हें मासिक काढिलें. यांत पाद्री लोकांचीं पत्रें छापलीं जाणार नाहींत असें पहिल्या अंकांतच जाहीर केलें होतें. श्रीपत शेषाद्रि यांच्या शुद्धिकरणाचा सर्व पत्रव्यवहार या मासिकांत प्रसिद्ध झाला होता. या मासिकाच्या पहिल्या अंकांतील प्रस्तावनेमधील एक उतारा खालीं देत आहें.

" माझे देशचे लोक हो—कांहीं महिन्यावर मी तुम्हास वचन दिलें होतें कीं आपला पवित्र हिंदुधर्म याचें संरक्षण होण्याकरितां मी दरमहा एक लहानसें पुस्तक काढणार आहे. तें वचन पार पाडण्याची मी योजना आतां केली आहे. परंतु या ग्रंथाचा उद्देश, व त्यांत कोणकोणते विषय येत जातील व हें पुस्तक काढण्यास मी कोणत्ये कारणामुळें प्रवृत्त जाहालों याचें संक्षेपतः तुम्हास प्रथमारंभीं निवेदन करणें अवश्य आहे, हें जाणून तें मी खालीं लिहितों.

हिंदु लोकहो, तुम्हास माहितच आहे कीं या देशांत पाद्रीचा संचार होऊं लागल्यापासून आपले पवित्र धर्मास धक्का येत चालला आहे. त्यांहीं जागोजाग शाळा घालून व खिस्ती धर्माची पुस्तकें फुकट लोकांस वाटून या लोकांस बाटविण्याचा महत् प्रयत्न चालविला आहे, व आपले लोकांस धर्माचें ज्ञान नसतें यांजमुळें कित्येकांस हिंदुधर्माचा कंटाळा येऊन खिस्तीधर्म खरासा वाटूं लागला आहे. तेव्हां हे लोकहो हा अनर्थ फार विस्तृत होण्याचें पूर्वीं तत्प्रतिबंधार्थ कांहीं तरी तजवीज या प्रसंगीं योजणें अवश्य आहे कीं नाहीं ? माझें मतें दरमाहा एक पुस्तक काढून त्यांत हिंदुधर्माची लोकांस माहितगारी होई, व खिस्ती लोक आपले धर्मावर दोष देतात त्याचें खंडन होई असें करावें ही चांगली युक्ति आहे व पाद्री लोक दबले तर अशानें दबतील. यांस हरवायास दुसरी युक्ति नाहीं. " *

मराठी ज्ञानप्रसारक (इ. स. १८५०)

स्वदेशामध्यें उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं इ. स. १८४७ त स्थापन झालेल्या 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभे'ची माहिती 'सामान्य निरूपण' या

* उपदेशचंद्रिका (पु. १, अं. १) प्रस्तावना.

प्रकरणांत आलेली आहेच. या सभेच्या विद्यमानें इ. स. १८५० पासून 'मराठी ज्ञानप्रसारक' मासिक प्रसिद्ध होऊं लागलें. या लहानशा पुस्तकांत मराठी ज्ञानप्रसार सभेमध्यें जीं व्याख्यानें होत आणि जे निबंध वाचले जात त्यांचा संग्रह करण्यांत येई. मालापूर्वकालीन मराठी गद्यवाङ्मयाच्या विकासाला ह्या मासिकानें पुष्कळच हातभार लाविला आहे. ह्यांतील बरेचसे लेख एल्फिन्स्टन विद्यालयांतील होतकरू विद्यार्थ्यांनीं अभ्यासपूर्वक लिहिलेले असत. त्यांची भाषा शुद्ध व सोपी असे. निबंध, गोष्टी, संवाद, इतिहास, चरित्रें, वर्णनें इत्यादि सर्व प्रकारच्या लिखाणाला या मासिकांत वाव मिळे. अशा उपयुक्त व मनोरंजक लेखांच्या द्वारें ज्ञानप्रसारकानें सतरा वर्षेंपर्यंत मराठी भाषेची उत्कृष्ट सेवा बजाविली. वा मासिकाच्या पहिल्या पुस्तकांत 'एकीपासून लाभ,' 'भरती आणि ओहोटी याविषयीं निबंध,' 'मराठ्यांच्या राज्याचा उत्कर्ष आणि अपकर्ष', विद्योद्भवलाभ' इत्यादि लेख प्रसिद्ध झाले होते. याच पुस्तकांतील सखाराम दीक्षित मनोहर यांचा 'हिंदुस्थानाची प्राचीन स्थिति, सांप्रतची स्थिति आणि या देशाचा पुढें होणारा परिणाम' हा लेख फारच सरस उतरला आहे. या मासिकांतून बेंजामिन फ्रांकलीन, जॉन हॉवर्ड, ग्रीस देशांतील सप्तज्ञानी, महंमद, शिवाजी महाराज, अहल्याबाई इत्यादि अनेक थोर व्यक्तींचीं चरित्रें लिहिण्यांत आलीं. याशिवाय स्थलवर्णन, प्रवासवर्णन, लोकस्थिति आणि इतिहास यासंबंधींहि ह्या मासिकांत बरेच लेख प्रसिद्ध झाले होते, विष्णु घनःशाम, महादेव गोविंदशास्त्री, भास्कर दामोदर पाळंदे, गोविंद नारायण माडगांवकर, परशुराम विष्णु योगी, बाळ भास्कर शिंत्रे, नारायण विष्णु बापट, केरो लक्ष्मण छत्रे, केशव जनार्दन पुनाळेकर, विनायक जनार्दन कीर्तने इत्यादि अनेक उदयोन्मुख लेखकांनीं या मासिकाच्या आश्रयानेंच लिहिण्याची कला साध्य करून घेतली. विष्णु घनःशाम यांनीं 'नेत्र', 'कालाची शीघ्रगति', 'भूताविषयीं निबंध', 'काल-क्रमणाचे नियम' इत्यादि लेख लिहिले. केरोपंत छत्रे यांचें 'हवाप्रकरण' याच मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालें. 'विक्रमोर्वशीय', व्यवहारोपयोगी नाटक' आणि 'रात्रिभ्रम' हीं तीन नाटकें या मासिकांत छापलीं गेलीं. याशिवाय निरनिराळ्या विषयांवर अनेक उपयुक्त आणि वाचनीय लेख 'मराठी ज्ञानप्रसारकां'त प्रसिद्ध झाले. या मासिकाच्या पहिल्या पुस्तकांतील सखाराम दीक्षित मनोहर यांच्या लेखा-मधील एक उतारा येथें उद्धृत करितों.

"राज्य गेलें; द्रव्य गेलें; प्रतिष्ठा गेली; व्यापार बुडाला; प्राचीन विद्येचा ऱ्हास झाला; नुतन विद्या शिकण्यास उत्तेजन नाहींसें झालें; अज्ञान वाढत चाललें; आकाशांतून पडलों आणि धरणीनें सांवरलें अशी अवस्था झाली; जीं शहरें पूर्वीं केवळ इंद्रभुवनासारिखीं शोभायमान व लंकेसारिखीं कनकमय होतीं, तीं रसातळास पोंचून तेथें केवळ पिशाचपुरी बसल्याशा दिसूं लागल्या;

ज्या शिवारांमध्यें शेतकऱ्यांचे थवेचे थवे मोठ्या उमेदीनें खपत असत, तेथें आतां कंबरेइतकें तृण वाढून त्यांत गरीबदुबळे लोक मोठ्या कष्टानें कोरभर भाकरीकरितां मजुरी करितात, तथापि तीहि मिळत नाहीं. जा शहराच्या रस्त्यांमधून अमीर उमराव लोकांच्या स्वाऱ्या हमेशा जात असत, त्यांमधून तैलंग व इतर भिकाऱ्यांच्या झुंडी तांदळाच्या चार दाण्याकरितां दारोदार फिरताहेत; व अंधळेपांगळे हे रस्त्यांत गडबडां लोळून करुणास्वर काढिताहेत; जां लोकांस मद्यपान हें केवळ विषतुल्य व मोठें पातक असें वाटत होतें, तेच लोक आतां दारूच्या अमलानें लुंड होऊन रस्त्यांत पडतात. यावरून व्यसनी लोकांच्या मनांतून ईश्वराचें भय अगदीं नाहींसें झालें असें दिसून आलें; उदरनिर्वाहार्थ किंवा यथेच्छ सुख भोगण्याच्या हेतुने स्त्रिया स्वतंत्र व निर्भिड होऊन रस्तोरस्तीं व्यभिचार केवळ मूर्तिमंत दृष्टीस पडूं लागला, जांमध्यें पूर्वी मोठमोठे लष्करी कारखाने होते, अशा इमारती अथवा जीं उमराव लोकांची विश्रांतिस्थानें; त्यांचे आतां तुरुंग होऊन ती खुनी व व्यसनी लोकांनी भरून गेलीं; वीतभर कागदाचीं किंमत हजारों रुपयेपर्यंत चढली असतां तसल्या कागदांस पैसा भरून आपल्या इष्टमित्रांचीं घरें बुडविण्याची इच्छा वाढत चालली आणि इतके अनर्थ घडघडीत होत असून माझे स्वदेशी लोक अज्ञानरूप गाढ निद्रेंतून जागृत होऊन ज्ञानप्रभेमध्यें अद्याप येत नाहींत. असे नाना प्रकारचे खेदकारक विचार एकामागून एक मनांत आल्यामुळें चित्त व्यग्र होतें परंतु महाप्रतापी विद्वान् असे जे लोक पूर्वी कधीं आपल्या पाहण्यांत किंवा ऐकण्यांतही आले नसते, त्यांचा प्रत्यक्ष सहवास घडूं लागला; अद्वितीय राज्यनियमांचीं पुस्तकें सिद्ध होऊं लागलीं; न्यायमनसुबीच्या उत्तम रीति, राज्याचे बंदोबस्ताच्या व फौजेचे कवायतीच्या शिस्ती नजरेस पडूं लागल्या, टांकसाळ, गोदी यांतील वाफयंत्रांसारिखीं अपूर्व व महदुपयोगी यंत्रें, वाफेच्या गाड्या व जहाजें, घड्याळें व नाना तऱ्हेचीं वस्त्रें इत्यादिक अलौकिक चमत्कार, जे पूर्वीं कधीं ऐकलेही नवते, ते आतां नेहमी नजरेखालून जाऊं लागले. मोठे उपयोगी व केवळ दुर्लभ अशा ग्रंथांचे संग्रह पाहून त्यांच्याठायीं चित्त रमूं लागले; छापखान्याच्या योगें बरींच वर्तमानपत्रें (ती बहुधा परभाषेंतलीं) वाचावयास मिळूं लागलीं; प्रजेचीं दुःखें प्रसिद्ध होण्यास तेंच यंत्रसाधन झालें; आणि त्याच अमूल्य यंत्राच्यायोगें सर्वनाशक रूढींचे व स्त्रियांच्या असह्य दुःखांचे उद्गार निघूं लागले. धर्मसंबंधीं असत्य विचार प्रगट होऊं लागले, थोड्याबहुत शाळा झाल्या; यांच्यायोगें देशाची स्थिति व विद्या म्हणून काय या गोष्टी समजूं लागल्या, स्वच्छ व निर्भय रस्ते झाले; मोठमोठ्या प्रचंड तारवांनीं समुद्र आच्छादित झाला; इत्यादिक

आनंदजनक चमत्कार पाहून मात्र मनास विस्मय होतो. तस्मात् असे परस्पर-विरुद्ध विचार अंतःकरणात येतात यामुळें मति कुंठित होऊन भगवंताची करणी अतर्क्य होय, हा निश्चय होतो आणि भगवच्चरणांस जो विन्मुख झाला त्यास कृत्यकर्मांचा पश्चात्ताप व्हावा, त्याणें सर्व अहंकार सोडून या जगामध्यें मी म्हणजे काय पदार्थ, हें ध्यानांत ठेवावें, अशी विश्वाची व्यवस्था आणि संरक्षण करणारा जो प्रभु त्याची इच्छा असाही तर्क होतो. "‡

त्रैमासिक ज्ञानदर्शन (इ. स. १८५४)

बाळशास्त्री जांभेकर यांचे वृत्तपत्रव्यवसायांतील सहकारी भाऊ महाजन यांनीं इ. स. १८५४ त ' ज्ञानदर्शन ' या नियतकालिकाच्या पहिल्याच अंकांत आपला उद्देश खालीलप्रमाणें नमूद केला आहे. " मराठी भाषेंत विद्यांच्या विषयांवर व त्यांत विशेषेंकरून पाश्चिम देशांतील विद्यांच्या विषयांवर फारच थोडे ग्रंथ आहेत व कित्येक विषयांवर तर अजून मुळींच जाहाले नाहींत; तेव्हां अशा विषयांची लोकांस माहितगारी होण्याकरितां कांहीं तरी साधन उपस्थित केलें असतां त्यापासून उपयोग पडेल असें मनांत आणून, हें त्रैमासिक पुस्तक काढण्याची योजना केली आहे. " हें त्रैमासिक तीन वर्षेंपर्यंत चाललें आणि त्यांत ' युरोप खंडाचा अर्वाचीन इतिहास ', ' न्यायशास्त्र ', ' नीतिशास्त्र, ' संपत्तिशास्त्र ', ' मानसशास्त्र ' भूगर्भशास्त्र ' इत्यादि विषयांवर विस्तृत आणि विद्वत्ताप्रचुर लेख प्रसिद्ध झाले. त्यांपैकीं ' मानसशास्त्र ' या लेखांतील एक लहानसा उतारा येथें सादर करितों.

" इंद्रियजन्यज्ञान आणि मानसव्यापारानुचिंतन यांजपासून आपणाला होणाऱ्या बहुतेक सर्व भानांशीं संतोष किंवा असंतोष यांतून कोणा एकाचा तरी योग असतो; आणि जेणेंकरून आपणाला सुख किंवा दुःख होत नाहीं असा एकही आपल्या मनाचा विचार किंवा बाह्य पदार्थांपासून जाहालेला इंद्रियविकार आपणांस आढळणार नाहीं. जें कांहीं आपणांस संतुष्ट किंवा असंतुष्ट करितें त्यास सुख आणि दुःख असें म्हणावें. मग हें सुख आणि दुःख आपल्या मनाच्या विचारांपासून उत्पन्न जाहालेलें असो किंवा आपल्या शरिरावर कांहीं पदार्थांची क्रिया घडून त्याजपासून उत्पन्न जाहालेलें असो. समाधान, संतोष, आनंद आणि सुख किंवा असमाधान, असंतोष, कष्ट, विपत्ति आणि दुःख हे एकाच वस्तूचे निरनिराळे प्रकार आहेत, व ते सर्व सुख आणि दुःख यांच्या भानासंबंधीं आहेत. " $

‡ मराठी ज्ञानप्रसारक (पु. १, अं. ४) पृ० ११३–१५

$ त्रैमासिक ज्ञानदर्शन (पु. २, अं. १) पृ. १

पुणें पाठशाला-पत्रक (इ. स. १८६१)

मराठी ज्ञानप्रसारकाप्रमाणेंच पुणें-पाठशाळा-पत्रकानेंहि मालापूर्वकालीन गद्यवाङ्मयांत बहुमोल भर घातली. हें मासिक इ. स. १८६१ त निघालें. याचे पहिले संपादक श्रीकृष्णशास्त्री तळेकर हे होते. सुरवातीचीं तीनचार वर्षे यांमध्यें मुख्यतः शिक्षणविषयक लेखच जास्त येत. ऑगस्ट १८६३ पासून केरो लक्ष्मण छत्रे हे शालापत्रकाचें काम पाहूं लागले. केरोपंत छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यासारखे रसज्ञ व मार्मिक संपादक लाभल्यामुळें या मासिकाची उत्तरोत्तर प्रगतीच होत गेली असली, तर त्यांत कांहीं नवल नाहीं. कृष्णशास्त्री यांचे मराठी व्याकरणावरील निबंध, नवीन पुस्तकांचीं परीक्षणें, रासेलसचें भाषांतर इत्यादि बरेंच लिखाण या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालें. 'जयपाळ' 'थोरले माधवराव पेशवे यांजवर नाटक', 'घाशीराम कोतवाल', 'चंद्रकांत', 'विलक्षण न्यायचातुर्य', 'अवलिया अथवा मानी स्वभावाचा दारुण परिणाम', नौकानयनाचा इतिहास इत्यादि पुस्तकांवर या नियतकालिकांत अभिप्राय आले होते. याशिवाय 'लघुरसायनशास्त्र,' 'वाचनाविषयीं,' कवितेविषयीं,' 'मराठी भाषेविषयीं निबंध,' 'इंग्रजांचें सर्वांशीं अनुकरण करणें अयोग्य होय' इत्यादि लहान लहान पण मार्मिक व मुद्देसूद निबंध, या मासिकांत छापले गेले.

विविधज्ञानविस्तार (इ. स. १८६७)

इ. स. १८६७ त विविधज्ञानविस्तार मासिकाचा जन्म झाला. ह्या नव-बालकाच्या आगमनानें मराठी नियतकालिकस्पर्धेत विलक्षण स्थित्यंतर घडून आलें. मराठी मासिकें हळूहळू स्वतंत्र व स्वावलंबी होण्याच्या मार्गाला लागलीं. ह्या मासिकाच्या पहिल्याच अंकांतील उपोद्‌घातांत संपादकांनीं आपली मनीषा खालीलप्रमाणें व्यक्त केली आहे.

> "याच्या परिमाणानुसार यांत नानाविध विषयांचा संग्रह केला जाईल. शास्त्रीय विषय; स्त्रियांच्या उपयोगास्तव, मनोरंजक असून सन्मार्गवर्ती अशा गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांच्या उपयोगास्तव अन्य भाषेंतून घेतलेलीं भाषांतरें, इतिहास, देशज्ञान, विख्यात पुरुषांचीं आजन्म चरित्रें, शरीरसंपत्ति रक्षणार्थ उत्तम वैद्यकाच्या आधारें घेतलेले नियम, नवीन जाहलेल्या पुस्तकांचें गुणावगुणविवेचन, नित्य व्यवहारसंबंधीं नीतिवादाचे निबंध इत्यादि अनेक विषयांचा संग्रह करणार आहों आणि राजे व रंक, पुरुष व स्त्रिया, लहान व थोर, यांतून कोणाच्याही हातीं हें पुस्तक लागलें असतां, तें आपल्या संग्रहीं असावें, अशी पूज्य बुद्धि त्यांच्या ठायीं उत्पन्न करण्याचा निश्चय केला आहे."

त्या वेळच्या अनेक प्रसिद्ध विद्वानांचें या मासिकाला पूर्ण पाठबळ मिळाल्यामुळें
त्यानें मराठी मासिकांना प्रौढ व भारदस्त स्वरूप प्राप्त करून दिलें. या मासिकांत
अर्थशास्त्र, आरोग्यशास्त्र, भाषाशास्त्र, काव्यचिकित्सा, साहित्यसमीक्षा, इतिहास
इत्यादि विषयांवर माहितीपूर्ण लेख येत असत. " त्यांची भाषा शुद्ध व प्रौढ असून
त्यांतील विषयहि महत्त्वाचे असतात. तारखेच्या तारखेस अंक काढून वर्गणीदारांच्या
ठपक्यांतून सुटावे एवढीच इच्छा न धरतां हातीं घेतलेल्या कामाचा बोजा त्यास
चांगलासा कळतोसें स्पष्ट दिसतें. त्यांतील लेखांवरून लिहिणारांचा देशाभिमान,
निर्भीडपणा, निर्मत्सरता, गुणग्राहित्व वगैरे उत्कृष्ट गुण सर्व व्यक्त होतात. "‡
असा या मासिकाविषयीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपला अभिप्राय व्यक्त
केला आहे.

दंभहारक (इ. स. १८७१)

ता. १० ऑक्टोबर १८७१ पासून 'दंभहारक' मासिक निघूं लागलें.
संपादकांनीं आपला मुख्य उद्देश खालील वाक्यांत निवेदन केला आहे. " दर
महिन्यास एकदां सर्वांच्या भेटीस आम्ही येणार आहों. आम्ही येतेवेळीं सर्वांस विश्रांति
देण्यास्तव आमच्या सामर्थ्यानुसार नानाविध विषय आणीत जाऊं. धर्म, नीति,
व्यवहार यांविषयीं निबंध, मनोरंजक असून सन्मार्गदर्शक अशी कविता, गोष्टी, रूपकें
इत्यादि अनेक विषय, ज्यांच्यायोगें श्रीमंत, गरीब, विद्वान, अविद्वान, पुरुष, स्त्रिया,
यांतून कोणासही आमच्या सहवासाची इच्छा व्हावी......पण माझ्या बाळकाच्या
नांवाप्रमाणें दुर्व्यसन व दुराचरण निषेधार्थ एकादे वेळेस निस्पृह भाषणाचा त्याला
प्रसंग आल्यास सज्जन विद्वानांनीं क्षमा करावी. "

या मासिकांत 'परागंदा झालेल्या गृहस्थाची कन्या', 'स्त्रियांचीं स्वाभाविक
भूषणें', 'सृष्टिचमत्कार', 'एतद्देशीय भाषांचें इंग्लिश लोकांचें ज्ञान', 'धर्म',
'क्रियेवांचून ज्ञान पंगु' इत्यादि लेख प्रसिद्ध झाले होते. त्यांपैकीं 'गृहधर्म' यांतील
एक लहानसा उतारा खालीं देत आहें.

" आत्मविषयक कर्तव्य कर्मांचें विवरण केलें; आतां दुसऱ्याशीं कसें
वागावें त्याविषयीं विवरण करितों. घड्याळाचें प्रत्येक चक्र पृथक् असून जसीं
परस्परांशीं सुदृढ जोडिलीं असतात, तसें प्रत्येक मनुष्य स्वतंत्र असूनही अनेक
प्रकारच्या संबंधानें परस्पर जोडलेलीं आहेत. मोठी धामधूम चाललेला व
मनुष्यांनी भरलेला जनसमूह, हें एक नियमसंपन्न मनोहर यंत्रच होय. त्या
यंत्राचें प्रत्येक मनुष्य हें एक एक चाक आहे. तरी असीं मानवरूपीं सर्व

‡ निबंधमाला—'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति.'

चक्रें परस्पर संयुक्त होऊन जें कार्य होतें, तें वेगळेपणानें कधीं व्हावयाचें नाहीं. " †

ज्ञानसंग्रह (इ. स. १८७२)

इ. स. १८७२ पासून अकोलें येथें 'ज्ञानसंग्रह' मासिक प्रसिद्ध होऊं लागलें. यांत महाजनी प्रभृति विद्वान लोकांचे लेख येत असत. बोधपर निबंध, शास्त्रीय विवेचन, मनोरंजक गोष्टी, शिक्षणविषयक लेख, ग्रंथपरीक्षण, नाटकें, चरित्रें, देश-वर्णनें इत्यादिकांचा ह्या मासिकांत समावेश होत असे. यांत मत्सर, परोपकार, मैत्री, वेळेचें मूल्य, उद्योग आणि दृढनिश्चय इत्यादि विषयांवर निबंध आले होते; तसेंच मोहना आणि विक्रमोर्वशी हीं नाटकेंहि प्रसिद्ध झालीं होतीं.

चंद्रिका (इ. स. १८५४); सत्यदीपिका (इ. स. १८६१)

इ. स. १८५४ त 'चंद्रिका' या नांवाचें मासिक निघालें. पहिल्या वर्षीं यांत 'सर विलियम जोन्स याचें चरित्र', 'शिक्षणपद्धतीविषयीं विचार', 'गोऱ्या लोकांचा काळेपणा', 'राजसत्ताक व लोकमतानुसारी राज्यांतील सौकर्याविषयीं विचार', 'निरिच्छतेविषयीं निबंध' इत्यादि लेख आले होते. बॉम्बे ट्राक्ट आणि बुक सोसायटीच्या विद्यमानें इ. स. १८६१ पासून 'सत्यदीपिका' हें मासिक प्रसिद्ध होऊं लागलें. यांत खिस्ती धर्मग्रंथ व मिशनरी लोकांच्या हालचाली यांची माहिती येत असे.

विद्याकल्पतरू (इ. स. १८६८); स्त्रीज्ञानप्रदीप (इ. स. १८६९)

रावजी केशवराव सांबारे यांनीं इंग्रजी भाषेंतील ज्ञानकोशांच्या धर्तीवर इ. स. १८६८ त 'विद्याकल्पतरू' (Marathi Cyclopaedia) हें मासिक सुरू केलें होतें. लक्ष्मण शंकर अभ्यंकर यांनीं इ. स. १८७० त 'स्त्रीज्ञानप्रदीप' या नांवाचें मासिक काढिलें. यापूर्वीं स्त्रीशिक्षणाच्या विषयाला वाहिलेलीं 'सुमित्र' आणि 'स्त्रीभूषण' हीं दोन मासिकें मराठींत निघालीं होतीं.

याशिवाय 'ज्ञानदर्पण', 'ज्ञानाकर', 'गायनाब्धि सेतु,' 'न्यायदीपिका' इत्यादि अनेक मासिकें या काळीं प्रसिद्ध होऊं लागलीं होतीं. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं महाराष्ट्रांत स्वत्व आणि स्वाभिमान जागृत करण्यासाठीं इ. स. १८७४ सालीं निबंधमाला सुरू केली आणि त्याबरोबर नियतकालिकांच्याच नव्हे, तर अखिल मराठी वाङ्मयाच्या इतिहासांतील नवीन युगाला आरंभ झाला.

---

† दंभहारक (पु. १, अं. ८) पृ. १४२

२

वर्तमानपत्रें

दर्पण (इ. स. १८३२)

मराठी भाषेंतील पहिलें वृत्तपत्र 'दर्पण' हें होय. हें इ. स. १८३२ त
निघालें. "त्या वेळेस मराठी व इंग्रजी भाषेंत नेटिव्ह लोकांनीं चालविलेलें असें एकहि
वर्तमानपत्र नव्हतें. तेव्हां एक दोन पैकेवाले गृहस्थ मिळून दर्पण या नांवाचें मराठींत
व इंग्रजींत वर्तमानपत्र काढण्याचें योजिलें व त्याचे बाळशास्त्री यांस एडिटर नेमिलें.
शास्त्रीबोवांनीं तें काम मोठ्या मनोत्साहानें कांहीं दरमहा न घेतां पत्करिलें. त्या
वर्तमानपत्रानें त्यांची मोठी कीर्ति वाढविली व त्या वेळचे गव्हर्नर सर जेम्स कार्नाक
यांहीं त्यांच्या लिहिण्यावरून खूष होऊन त्यांस 'जस्टिस ऑफ धी पीस' ही
पदवी दिली." $

प्रभाकर (इ. स. १८४१)

यानंतर गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन यांनीं इ. स. १८४१ मध्यें
'प्रभाकर' पत्र काढिलें. हें दर रविवारीं निघत असे व वार्षिक वर्गणी १२ रु.
होती. रयतेच्या 'अडचणी' व 'गाऱ्हाणीं' स्पष्टपणें सरकारच्या नजरेस आणण्याचें
धोरण या पत्रानें स्वीकारलें होतें व तदनुसार 'वेठबिगार', 'युरोपियन अधि-
काऱ्यांचा अरेरावीपणा व बेफिकीर वृत्ति' इत्यादि गोष्टींसंबंधींचे लेख या पत्रांत
प्रसिद्ध झाले होते. याशिवाय 'ग्रेटब्रिटन देशाची राजनीति', 'विधवाविवाह',
'स्त्रीशिक्षण', 'इंग्रजी राज्यामुळें झालेले तोटे' (संवाद), 'ताबुताची चाल'
इत्यादि लेख ह्या साप्ताहिकांत आले होते.

भाऊ महाजन (इ. स. १८१५-१८९०)

भाऊ महाजन यांचा जन्म पेण येथें इ. स. १८१५ सालीं झाला. मराठी
गद्यवाङ्मयाचे जनक सदाशिव काशिनाथ छत्रे यांचे हे मेहुणे. आठ वर्षांचे असतांना
ते विद्यार्जनासाठीं मुंबईस आले. त्यांनीं इंग्रजी, मराठी, संस्कृत, फारशी इत्यादि
अनेक भाषांचें सूक्ष्म व सखोल अध्ययन केलें होतें. 'दर्पण' पत्र चालविण्याच्या
कामीं बाळशास्त्री जांभेकर यांना त्यांचें पुष्कळ साहाय्य मिळालें. त्यांनीं 'प्रभाकर'
व धूमकेतू' ही पत्रें सुरू केलीं होतीं. त्याप्रमाणेंच इ. स. १८५४ त त्यांनीं

$ दादोबा पांडुरंग—आत्मचरित्र, पृ. २२.

'ज्ञानदर्शन' या नांवाचें त्रैमासिकहि काढिलें होतें. त्यांचें 'शब्दसिद्धि निबंध' हें पुस्तक इ. स. १८४३ त प्रसिद्ध झालें. त्यांचा स्वभाव निःस्पृह होता. त्यांचे लेख स्पष्ट व सडेतोडपणें लिहिलेले असत. परधार्जिणेपणाचा त्यांना मनापासून तिटकारा असे. त्यांच्या मानी स्वभावामुळेंच या परतंत्र देशांत त्यांच्या विद्वत्तेचें व अलौकिक गुणांचें चीज होऊं शकलें नाहीं. त्यांच्या 'प्रभाकर' पत्रांतील एक उतारा खालीं देत आहें.

"मनुष्य जात ही सर्व सृष्टींत मुख्य आहे व ज्ञानेंकरून इतर सर्व पशुपक्ष्यादिक प्राण्यांवर तिची सत्ता राहिली आहे. इतर पशुप्राण्यादि प्राण्यांत सर्वांचा कोणी संरक्षक, किंवा राजासारखा सत्ताधारी कोणी नाहीं, सर्व जनावरें आपआपल्या मर्जीस येतें त्याप्रमाणें वागतात. परंतु मनुष्यजातीची तशी गोष्ट नाहीं. मनुष्यजातीनें आपले बुद्धिबलेंकरून असें पाहिलें कीं इतर प्राण्यांप्रमाणें केवळ स्वतंत्र वागावें यापासून फार तोटा आहे, व अगदीं स्वतंत्रताही इतर प्राण्यांस जरी नीट आहे तथापि ती मनुष्यजातीस योग्य नाहीं. तेव्हां कांहीं नियम करून मनुष्यजातीस प्रतिबंध केला असतां त्यापासून अनंत फायदे होऊन सर्वांस सौख्य होईल. यास दृष्टान्त जर मनुष्यांस अगदीं स्वतंत्रता दिली तर एकानें दुसऱ्यास ठार मारलें तर त्यास शासन कांहींच होणार नाहीं, व हरएक मनुष्यानें आपले मर्जीस येईल त्याप्रमाणें चालावें असें केलें असतां जो शरीरेंकरून सुदृढ असेल तो सर्वकाळ अशक्तास मारील व सर्वत्र झोटिंगपाछाई होऊन कोणा एकासही सौख्य होणार नाहीं. तस्मात् मनुष्यजातीचे स्वतंत्रतेस कांहीं तरी प्रतिबंध करणें अवश्य आहे. तेव्हां पुढें अशी अडचण प्राप्त होती कीं हे असे नियम कोणी करावे व त्या नियमाप्रमाणें सर्व लोक चालत आहेत कीं नाहीं याची चौकशी कोणी करावी ते सर्व लोकांचे हितार्थ ठरविलेले नियम उल्लंघन करील त्यास कोणी शिक्षा करावी. या सर्व गोष्टीचा निर्णय जा रितीने हरएक मुलखांत जाहला असतो त्याप्रमाणें तेथील राज्यनीति भिन्नभिन्न प्रकारची होती, व हा सर्व अधिकार मग तो एके पुरुषास दिला असो किंवा बहुतांस दिला असो त्यास 'प्रभुसत्ता' असें म्हणतात."*

ज्ञानोदय (इ. स. १८४२)

'दर्पण' नंतर निघालेलें मराठी भाषेंतील सर्वांत जुनें पाक्षिक 'ज्ञानोदय' (इ. स. १८४२) हें होय. "हें पत्र रेव. आर. डब्ल्यू. ह्यूम साहेब उत्तम प्रकारें चालवीत असत; हे गृहस्थ विद्वान् असून हिंदु लोकांचे खरे मित्र होते. यांनीं

* प्रभाकर—२७ मार्च १८४२.

त्यांच्या कल्याणार्थ अनेक उद्योग व बहुत श्रम केले. " § यांत विविध विषयांवरील स्वतंत्र व भाषांतरात्मक लेख प्रसिद्ध होत असत. खिस्ती धर्माचा प्रसार करणें हें या पत्राचें मुख्य धोरण होतें. ह्या पत्राच्या पांचव्या पुस्तकांत 'कलकत्ता शहराचें वर्णन', 'खिस्ती मंडळीची बखर', 'चीन देशांतील भाषा व पुस्तकें', 'पुनर्विवाह', 'ब्राह्मणांची दुर्दशा', 'मधमाशी आणि गांधीलमाशी', 'लग्नासंबंधी हिंदु लोकांचें मूर्खपण,' 'सौम्यता' इत्यादि लेख आढळतात. त्यांपैकीं 'बाळ गंगाधरशास्त्री यांचें वर्णन' या लेखांतील एक उतारा खालीं देत आहें.

"बाळ गंगाधरशास्त्री मोठा विद्वान् होता आणि त्यास साहेब लोक व नेटिव लोकहि मानीत होते. महाराष्ट्रांतील सर्व नेटिव लोकांपेक्षां तो शिकलेला होता व आपल्या लोकांमध्यें विद्या वाढवावी असी त्याची इच्छा होती. त्यानें आपल्या चांगल्या वर्तणुकीच्या योगाने व प्रोफेसरचें काम चांगलें चालविल्याने कित्येक विद्यार्थी बरे सुधारले. त्यांतील कित्येकांनी विद्येची मोठी आवड धरून त्यासारखेंच विद्या वाढविण्याविषयीं उत्कंठित व्हावें अशी आमची इच्छा आहे.

बाळ गंगाधरशास्त्री ऐन उमेदीमध्यें आणि पुढें कसें काय करायाचें या मसलती मनामध्यें करीत असतां मरण पावला. आणि याचप्रमाणें अतिशय मनुष्यांची गत आहे. लोक विद्या, द्रव्य, मान इत्यादि संपादन करायास फार उत्सुक असतात. परंतु ज्या परलोकीं आपले विशेष गुण व ऐहिक संपादलेलें एथच्यासारखें दिसणार नाहीं तेथें आम्ही लवकर जाणार हें मनांतहि आणीत नसतात. तर आपण लवकर जाणार असें समजून जे नेहमीं ईश्वराची प्रार्थना करितात कीं मी आपले दिवस मोजीत राहावें व आपला जीव खऱ्या ज्ञानमार्गाकडे लावावा, त्यालाच ज्ञानी म्हणावें. जे द्रव्यवान, विद्वान, आणि सर्वमान्य ते मरणाला भीत नाहींत असें नाहीं आणि ते परलोकीं जाऊन सुख भोगितील असेंहि नाहीं. परंतु जे पापाविषयीं मनःपूर्वक पश्चात्ताप करून ईश्वराच्या प्रीतीने मन पूर्ण झाले तेच परलोकसंबंधींचें सुख भोगतील." ¶

ज्ञानप्रकाश (इ. स. १८४९)

इ. स. १८४९ सालीं पुणें येथें '**ज्ञानप्रकाश**' या नांवाचें साप्ताहिक पत्र सुरू झालें. कृष्णाजी त्र्यंबक रानडे हे ह्या पत्राचे प्रकाशक होते. "या पत्रास प्रथम

§ बाबा पदमनजी—अरुणोदय पृ. ८७.

¶ ज्ञानोदय (पु. ५) पृ. १६५.

आश्रय रा. मोरो रघुनाथ ढमढेरे व गोपाळराव हरी देशमुख यांचा होता. यांनीं मनःपूर्वक श्रम घेऊन हें काम चालविलें. तें काम बरेंच रेंगाळत चाललें होतें. कारण लोकांस वर्तमानपत्र वाचण्याची गोडी नव्हती व उपयोग काय हाही माहीत नव्हता. तरी त्यांच्या कर्त्यांनी धैर्य सोडलें नाहीं. एकानें द्रव्यबळ व दुसऱ्यानें विद्याबळ खर्चून त्याला उत्तम स्थितीस आणलें. "*

विचारलहरी; सद्धर्मदीपिका

मिशनरी लोकांच्या वाढत्या प्रचाराला आळा घालण्यासाठीं कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं इ. स. १८५२ त 'विचार-लहरी' पत्र सुरू केलें. त्यानंतर इ. स. १८५५ त बापू सदाशिव शेट यांनीं सद्धर्म-मंडळीच्या आज्ञेवरून 'सद्धर्मदीपिका' या नांवाचें पाक्षिक काढिलें. तें दर एकादशीला प्रसिद्ध होत असे. "हिंदु लोकांस हिंदुधर्मतत्त्व कळावें व ख्रिस्तीधर्मी जे पाद्री यांचे धर्माचा पोकळपणा त्यांच्या ध्यानांत आणून द्यावा" या उद्देशानें हें पत्र सुरू करण्यांत आलें.

इंदुप्रकाश (इ. स. १८६२)

इ. स. १८६२ सालीं 'इंदुप्रकाश' पत्र सुरू झालें. याच्या सुरवातीच्या व्यवस्थापक मंडळांत लक्ष्मणशास्त्री हळबे, केशवशास्त्री गाडगीळ आणि महादेव-शास्त्री कोल्हटकर यांचीं नांवें आढळतात. न्यायमूर्ति रानडे व जनार्दन सखाराम गाडगीळ हे या पत्रासाठीं लेख लिहीत. इ. स. १८६४ पासून विष्णुशास्त्री पंडित यांनीं ह्या पत्राचें संपादकत्व पतकरलें आणि त्याच्या द्वारें मराठी भाषेची व महाराष्ट्रीय जनतेची बहुमोल सेवा केली.

याशिवाय धूमकेतु, वर्तमानदीपिका, नेटिव्ह ओपिनियन, वृत्तवैभव, वृत्तप्रकाश इत्यादि अनेक वृत्त-पत्रें त्या काळीं प्रसिद्ध होत होतीं.

* * *

---

* ना. वि. जोशी–पुणें शहरचें वर्णन, पृ. १२१

परिशिष्ट

१

मासिकें

१. दिग्दर्शन–बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, इ. स. १८४०
२. ज्ञानचंद्रोदय–पांडुरंग बापू जोशी; पावसकर, मुंबई, इ. स. १८४०
३. उपदेशचंद्रिका–मोरभट दांडेकर, मुंबई, इ. स. १८४४
४. मराठी ज्ञानप्रसारक– मुंबई, इ. स. १८५०
५. चंद्रिका– मुंबई, इ. स. १८५४
६. त्रैमासिक ज्ञानदर्शन–भाऊ महाजन, मुंबई, इ. स. १८५४
७. सुमित्र–(स्त्रियांसाठीं) मुंबई, इ. स. १८५५
८. सर्वसंग्रह–माधव चंद्रोबा, मुंबई, इ. स. १८६०
९. विचारदर्पण–(क्षत्रियांसाठीं) मुंबई, इ. स. १८६०
१०. पुणें पाठशालापत्रक–श्रीकृष्णशास्त्री तळेकर, पुणें, इ. स. १८६१
११. आनंदलहरी–(लहान मुलांसाठीं) मुंबई, इ. स. १८६१
१२. कथाकल्पद्रुम–बापूजी मल्हार चिटणीस, मुंबई, इ. स. १८६१
१३. ज्ञानदर्पण– मुंबई, इ. स. १८६१
१४. ज्ञानाकर– धारवाड, इ. स. १८६२
१५. स्त्रीभूषण– मुंबई, इ. स. १८६४
१६. विविधज्ञानविस्तार–रामचंद्र भिकाजी गुंजीकर, मुंबई, इ. स. १८६७
१७. विद्याकल्पतरु–रावजी केशवराव सांबारे, ठाणें, इ. स. १८६८
१८. ईस्ट इंडिया असोसिएशन सभेचें मराठी मासिक पुस्तक–
मुंबई, इ. स. १८६९
१९. स्त्रीज्ञानप्रदीप–लक्ष्मण शंकर अभ्यंकर, मुंबई, इ. स. १८६९
२०. काव्यार्थदीपिका–वामन गोविंदशास्त्री इसलामपूरकर,
मुंबइ, इ. स. १८७०
२१. गायनाब्धिसेतु–मौलाबक्ष बिनकार, विश्वनाथ रामचंद्र वकील,
बडोदें, इ. स. १८७०

२२. वऱ्हाड रिपोर्टर– अकोले, इ. स. १८७०
२३. न्यायदीपिका–महादेव विनायक चौबळ, वामन रामचंद्र ओक, यशवंत महिपत खारकर, ठाणें, इ. स. १८७०
२४. दंभहारक– मुंबई, इ. स. १८७१
२५. ज्ञानसंग्रह– अकोलें, इ. स. १८७२
२६. बालबोधमेवा– मुंबई, इ. स. १८७३
२७. सत्यदीपिका– पुणें, इ. स. १८७३
२८. बृहत्संहिता–(वराहमिहिरकृत) जनार्दन हरी आठल्ये, रत्नागिरी, इ. स. १८७३
२९. श्रीवाल्मीकिरामकथामहोदय– मुंबई, इ. स. १८७४
३०. सुज्ञानामृत– कोल्हापूर, इ. स. १८७४
३१. निबंधमाला–विष्णुशास्त्री चिपळूणकर, पुणें, इ. स. १८७४

२

वृत्तपत्रें

१. दर्पण–बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, इ. स. १८३२
२. प्रभाकर–भाऊ महाजन, मुंबई, इ. स. १८४०
३. ज्ञानोदय– मुंबई, इ. स. १८४२
४. ज्ञानप्रकाश– पुणें, इ. स. १८४९
५. विचारलहरी–कृष्णशास्त्री चिपळूणकर, पुणें, इ. स. १८५२
६. धूमकेतु–भाऊ महाजन, मुंबई, इ. स. १८५३
७. वर्तमानदीपिका–भवानी विश्वनाथ कानविंदे, मुंबई, इ. स. १८५४
८. सद्धर्मदीपिका–बापू सदाशिवशेठ, मुंबई, इ. स. १८५५
९. वर्तमानसंग्रह–विश्वनाथ कृष्णनाथ, कोल्हापूर, इ. स. १८५५ (ग्रां. कॅ.)
१०. शुभसूचक–रामचंद्र आपाजी चितळे, सातारा, इ. स. १८५८ (ग्रां. कॅ.)
११. वृत्तवैभव–खंडेराव बाळाजी, अहमदनगर, इ. स. १८६१ (ग्रां. कॅ.)

१२. इंदुप्रकाश— मुंबई, इ. स. १८६२

१३. वृत्तप्रकाश—नारायण मोरेश्वर केळकर, पुणें, इ. स. १८६२ (ग्रां. कॅ.)

१४. नेटिव्ह ओपिनियन—विश्वनाथ नारायण मंडलिक, मुंबई, इ. स. १८६३

१५. बेळगांव समाचार—भिकाजी हरि सावंत, बेळगांव, मुंबई, इ. स. १८६४ (ग्रां. कॅ.)

१६. जगाद्धितेच्छु— पुणें, इ. स. १८७०

१७. ज्ञानचक्षु—गंगाधर गोविंद सापकर, पुणें, इ. स. १८७२

१८. कथारत्नावली— मुंबई, इ. स. १८७४

१९. सुबोधपत्रिका— मुंबई, इ. स. १८७४

* * *

संदर्भ-साहित्य-सूचि*

ग्रंथ

अण्णासाहेब किर्लोस्कर यांचें चरित्र—शं. बा. मुजूमदार; पुणें, १९०४

अरुणोदय (आत्मवृत्त) बाबा पदमनजी; मुंबई, १८८८
(सुधारलेली द्वितीयावृत्ति–मुं. १९०८; पुनर्मुद्रण–मुं. १९५५)

अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक खंड, १–२–३–गं. दे. खानोलकर; मुंबई, १९३१, १९३८, १९४९

अर्वाचीन मराठी साहित्य [लेखसंग्रह] बडोदें, १९३५

अर्वाचीन महाराष्ट्रांतील सहा थोर पुरुष (लोकहितवादी, फुले, भांडारकर, रानडे, टिळक, गोखले)–न. र. फाटक; मुंबई, १९५०

आजकालचा महाराष्ट्र (वैचारिक प्रगति)—प्रभाकर पाध्ये; श्री. रा. टिकेकर; मुंबई, १९३५

आत्माराम पांडुरंग—द्वा. गो. वैद्य; मुंबई, १८९८

आद्य महाराष्ट्र नाटककार : विष्णुदास—वा. ग. भावे; सांगली, १९४३

आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति—कृ. भि. कुलकर्णी, मुंबई, १९५६

एकोणिसाव्या शतकांतील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना–भाग १ —रा. शं. वाळिंबे, पुणें, १९६२

कादंबरी—वि. का. राजवाडे; सातारा, १९२८

गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांचें संक्षिप्त चरित्र— रा. ग. बोरवणकर; ठाणें, १९२५

गोविंद नारायण माडगांवकर—व्यक्ति आणि वाङ्मय – संपा.–अ. का. प्रियोळकर, मुंबई, १९६५

गोविंद नारायण माडगांवकर यांचें संकलित वाङ्मय–खंड १ व खंड २— – संपा.–अ. का. प्रियोळकर व स. गं. मालशे मुंबई, १९६८-१९६९

---

* ही सूचि विस्तृत आहे; पण परिपूर्ण नाहीं, तरी देखील इ. स. १८००–१८७४ या कालखंडांतील गद्य–वाङ्मयाचें सांगोपांग परिशीलन करूं इच्छिणाऱ्यांना ती उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व—ग. त्र्यं. माडखोलकर; अमरावती १९५४
जगन्नाथ शंकरशेट ऊर्फ नाना शंकरशेट ह्यांचें चरित्र—वि. मा. पितळे, मुंबई, १९१६
जावजी दादाजी चौधरी यांचें चरित्र—वि. कों. ओक; मुंबई, १८९२
ज्योति-निबंध—लक्ष्मणशास्त्री जोशी; वाई, १९४७
त्रिमूर्तिदर्शन (फुले, गोवंडे, जोशी)—वि. भा. गोवंडे; पुणें, १९५३
दर्पणसंग्रह—संपा.-वि. कृ. जोशी, श्री. म. सहस्रबुद्धे; मुंबई, १९४६
दादोबा पांडुरंग : आत्मचरित्र व चरित्र—अ. का. प्रियोळकर; मुंबई, १९४७
नाट्यकवितासंग्रह (आद्य नाटककार विष्णुदास भावे यांची नाट्यकविता, पदें)—वि. अ. भावे; पुणें, १८८५
नाना शंकरशेट यांचें चरित्र—पु. बा. कुलकर्णी, मुंबई, १९५९
नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध—का. बा. मराठे; मुंबई, १८७२
[नवी आवृत्ति, पुणें १९६२]
निबंधसंग्रह [प्रथमांश]—गोपाळ हरि देशमुख (लोकहितवादी); अहमदनगर, १८६६
[दुसरी आवृत्ति, संपा-अ. का. प्रियोळकर, मुंबई १९६७]
परमहंस सभा व तिचे अध्यक्ष रामचंद्र बाळकृष्ण— – संपा.-अ. का. प्रियोळकर, मुंबई, १९६६
पुणें शहरचें वणन-ना. वि. जोशी; मुंबई, १८६८
प्रार्थनासमाजाचा इतिहास—द्वा. गो. वैद्य; मुंबई, १९२७
प्रो. केरूनाना छत्रे यांची टिपण वही मुंबई, १९५८
बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचें चरित्र—बा. ना. देव; पुणें, १८९२
बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर खंड-१-२-३—ग. गं. जांभेकर; पुणें, १९५०
भाऊ दाजी लाड यांचें चरित्र—श्री. ना. कर्नाटकी; मुंबई, १९३१
भास्करराव दामोदर पांळदे यांचें लघुचरित्र—भा. ब. निमकर; पुणें, १८७८
मराठी कादंबरी : पहिलें शतक (१८५०—१९५०) भाग १ ला कुसुमावती देशपांडे; मुंबई, १९५३
मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचा इतिहास (महाराष्ट्रांतील ख्रिस्ती साहित्यसेवा मंडळ-प्रथम गुच्छ) प्रका. भा. कृ. उजगरे; सासवड, १९३१
मराठी गद्याचा इंग्रजी अवतार (इ. स. १८१०-१८७४)— दत्तो वामन पोतदार; पुणें, १९२२

मराठी नियतकालिकांचा इतिहास—रा. गो. कानडे; मुंबई, १९३८
मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरणप्रबंधकार—मो. स. मोने; पुणें, १९२७
मराठी रंगभूमि—आ. वि. कुलकर्णी; पुणें, १९०३
मराठी वाङ्मय विवेचन—रा. भि. जोशी; पुणें, १९२२
मराठी वाङ्मयाचा इतिहास–खंड ४—संपा–रा. श्री. जोग, पुणें, १९६५
मराठी वाङ्मयाची अभिवृद्धि (म. गो. रानडे यांच्या इंग्रजी लेखाचा मराठी अनुवाद)—चिं. नी. जोशी; मुंबई, १९१३
मराठी वाङ्मयाची गेल्या शंभर वर्षांतील वाढ—ल. ज. खरे; मुंबई, १९१६
मराठी व्याकरणाची कुळकथा—अ. का. पियोळकर; मुंबई, १९३६
मराठी साहित्य–समालोचन—(१८१८–१९३४)—वि. सी. सरवटे इंदूर, १९३७
मराठी साहित्यांतील उपेक्षित मानकरी—चिं. ग. कर्वे, पुणें, १९५७
मराठी ज्ञानप्रसारक–इतिहास व वाङ्मय विचार – वा. ल. कुलकर्णी, औरंगाबाद, १९६५
महात्मा जोतीराव फुले—धनंजय कीर, मुंबई, १९६८
महात्मा फुले—ए. के. घोरपडे; पुणें, १९५३
महात्मा फुले यांचें समग्र वाङ्मय—संपा.–धनंजय कीर व स. गं. मालशे, मुंबई, १९६९
महादेव गोविंद रानडे यांचें चरित्र—न. र. फाटक; मुंबई, १९२४
महाराष्ट्र नाट्यकला व नाट्यवाङ्मय—ग. रं. दंडवते; बडोदें, १९३१
महाराष्ट्र भाषेचें व्याकरण—जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके व बाळशास्त्री घगवे, १८२४
[नवी आवृत्ति, मुंबई १९५८]
महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी—गं. बा. सरदार; पुणें, १९४१
महाराष्ट्रीय नाटककार याचीं चरित्रें—भाग १ ला–शं. बा. मुजूमदार; पुणें
मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड—पु. बा. कुलकर्णी, मुंबई, १९६३
मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी–प्रसिद्धीपत्र (ग्रंथांचीं भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणारास बक्षिसांविषयींचें)–जॉर्ज जर्विस; मुंबई, १८२५
मुंबईचें वर्णन—गो. ना. माडगांवकर; मुंबई, १८६३
[नवी आवृत्ति, मुंबई, १९६३]

मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांचें चरित्र—कृ. ब. गोडबोले; मुंबई, १९११
युरोपियनांचा मराठीचा अभ्यास व सेवा—श्री. म. पिंगे, मुंबई, १९६०
राजा प्रतापसिंहाची रोजनिशी व इतर कागद (पेशवे दप्तरांतून निवडलेले)
—गो. स. सरदेसाई मुंबई, १९३४
रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचें चरित्र—श्री. ना. कर्नाटकी; मुंबई, १९२७
रामचंद्र भिकाजी गुंजीकर याचे संकलित लेख (प्रथम खंड)—
[प्रस्तावना—अ. का. प्रियोळकर] मुंबई, १९४२
लोकहितवादी—ग. ह. केळकर; पुणें, १९२३
लोकहितवादी—कृ. ना. आठल्ये; पुणें, १९२६
वासुकाका जोशी आणि त्यांचा काल—त्र्यं. र. देवगिरीकर, पुणें, १९४८
वासुदेव बळवंत फडके—रा. ग. बोरवणकर, मुंबई, १९२९
विनायक जनार्दन कीर्तने यांचें चरित्र—बा. ना. देव; इंदूर, १९०४
विराम चिन्हांची परिभाषा—मेजर कँडी १८५०
[नवी आवृत्ति, मुंबई, १९५७]
विलियम केरी—(भाषांतर—डी. जी. मल्हार) मुंबई, १८९५
विविधज्ञानविस्तार—सूचि—संपा. सौ. पुष्पा भावे, मुंबई, १९६८
विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र—भाग १—२—ग. रा. हवालदार
मुंबई, १९२७
विष्णु कृष्ण चिपळूणकर (द्विविध दर्शन)—ग. त्र्यं. माडखोलकर,
श्री. ना. बनहट्टी; मुंबई, १९३४
विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांचें चरित्र—श्री. स. पंडित; पुणें, १९३६
विष्णुबावा ब्रह्मचारी यांचें चरित्र—रा. पां. आजरेकर; मुंबई, १८७३
विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह—भाग १ ला
(इ. स. १८७१—७५)—संग्राहक—खं. भि. बेलसरे; मुंबई; १८९६
विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र (आ. २ री)—ल. कृ. चिपळूणकर;
पुणें, १९२१
शंकर पांडुरंग पंडित यांचें चरित्र—श्री. ना. कर्नाटकी; मुंबई, १९३५
संक्षिप्त अर्वाचीन मराठी वाङ्मय (१८०५—१९२७) ग. रं. दंडवते;
बडोदें, १९२९
सातारचे छत्रपति प्रतापसिंह महाराज—र. गो. राणे; सातारा, १९२९

सार्वजनिक सभा, पुणें–लेखसंग्रह (अर्धशत सांवत्सरिक उत्सवाप्रीत्यर्थ प्रसिद्ध केलेला)— पुणें, १९२०
हरि केशवजी यांचें चरित्र—रामचंद्र हरि; मुंबई, १९११
ज्ञानोदयाचीं पहिलीं शंभर वर्षें—संपादक–भा. पां. हिवाळे; मुंबई, १९४२
A Century in India 1813–1913 (American Marathi Mission) W. Hazen; Ahmadnagar, 1913
Centennial Volume of the American Marathi Mission; 1913
History of the Missions of the Free Church of Scotland in India and Africa—R. Hunter; London, 1873
In Western India—Recollections of my early missionary life— J. M. Mitchell; Edinburgh, 1899
Life and times of Carey, Marshman and Ward, embracing the history of the Serampore Mission, 2 Vols. J. C. Marshman; London, 1859
Life of John Wilson—G. Smith; London, 1878
Life of William Carey—G. Smith; London, 1885
Memoir of Mrs. Margaret Wilson—J. Wilson; Edinburgh, 1838
Memoir of Rev. Robert Nesbit—J. M. Mitchell; London, 1858
Memoir of William Carey; (2nd-edition)—E. Carey; London, 1837
Miscellaneous Writings (1) Remarks on the Marathi Catalogue (2) A note on the growth of Marathi Literature—M. G. Ranade; Bombay, 1915
Nasik and the Gospel (1832–1932) Nasik, 1932
Selections from the minutes and other official writings of Mountstuart Elphinstone—Ed. G. W. Forrest; London, 1884
The History of Protestant Missions—M. A. Sherring; London, 1884
The Literary work of the American Marathi Mission (1813–1881) H. J. Bruce; Bombay, 1882

* * *

कोश–सूचि

भारतवर्षीय अर्वाचीन चरित्रकोश (१८१८–१९४५)—सिद्धेश्वरशास्त्री चित्राव; पुणें, १९४६

मराठी ग्रंथ-सूचि (१८००–१९३७) शं. ग. दाते; पुणें, १९४३

मराठी दोलामुद्रितें (मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांतील इ. स. १८६७ अखेरपर्यंतच्या मराठी मुद्रित ग्रंथांची वर्णनात्मक नामावलि;) प्रास्ताविक निबंध—अ. का. प्रियोळकर; मुंबई, १९४९
[दुसरी आवृत्ति, संपा.–सु. आ. गांवस्कर, मुंबई, १९६१]

मराठी नियतकालिकांची सूची–खंड १—संपा.–शं. ग. दाते, दि. वि. काळे व शं. ना. बर्वे, मुंबई, १९६९

महाराष्ट्रीय वाङ्मयसूचि (१८१०–१९१७)—य. रा. दाते; नागपूर, १९१९

A Catalogue of the Library of the Hon. East India Company; London, 1845

Catalogue of Native Publications in the Bombay Presidency upto 31st December 1864. (Ed.–A. Grant) Bombay, 1866

Catalogue of Native Publications in the Bombay Presidency from 1st January 1865 to 30th June 1867, and of some works omitted in the previous catalogue, (Ed.–J. B. Peile) Bombay, 1869

Catalogue of the Library of the India office Volume-II, Part V Marathi and Gujarati Books; London, 1908

A Catalogue of Marathi and Gujarati Printed Books in the Library of the British Museum (J. F. Blumhardt) London, 1892

A Catalogue of Marathi Christian Literature during eighty years, 1813–1892. Bombay Tract and Book Society; (J. E. Abbott) Bombay, 1892

Classified catalogue of Marathi Christian Literature, at the close ef the Ninteenth Century—J. S. Haig; 1902

लेख

संशोधन-संकलन-चिकित्सा

आचार्य बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर—त्र्यं. शं. शेजवलकर; नवभारत, मे १९५१

आद्य भारतीय प्राच्यविद्या संशोधक : बाळशास्त्री जांभेकर—स. का. दीक्षित, नवभारत, नोव्हेंबर, १९५३

आमच्या भाषांचा सांप्रत काळ—बा. आ. बिचू; विविधज्ञानविस्तार पु. १, पृ. २७

आरंभींचें मुद्रित मराठी गद्य—मराठी संशोधन-पत्रिका, जानेवारी-एप्रिल १९५४; जानेवारी १९५६

(१) केरीच्या व्याकरणांतील संभाषणें (१८०५)

(२) बालबोधमुक्तावलि (१८०६)

(३) ईश्वराच्या अवव्या गोष्टी (१८१२)

ईस्ट इंडिया कंपनीचें हेलिबरी कॉलेज—मराठी संशोधन-पत्रिका एप्रिल १९५५

एकोणिसाव्या शतकांतील मराठी भाषेची अभ्युन्नति—वि. कों. ओक; वि. ज्ञा. वि. पु. ४३, पृ. १७

कॅप्टन जर्व्हिसचे गणितविषयक ग्रंथ—श्री. म. पिंगे; मराठी संशोधन पत्रिका जानेवारी १९५६

केरी व फोर्ट विल्यम कॉलेज—श्री. म. पिंगे; मराठी संशोधन-पत्रिका जानेवारी १९५५

केरी व श्रीरामपूर मिशन—श्री. म. पिंगे; मराठी संशोधन पत्रिका— ऑक्टोबर १९५४

चिपळूणकर व त्यांचे टीकाकार—श्री. ना. बनहट्टी; रत्नाकर, मार्च १९२६

चिपळूणकर व त्यांचे आधुनिक आक्षेपक—श्री. ना. बनहट्टी; रत्नाकर, एप्रिल, मे, जुलै, ऑगस्ट १९२६

जांभेकरीय संशोधन ले. १-२—कृ. भि. कुलकर्णी; सह्याद्रि, डिसेंबर १९५१, जानेवारी १९५२

जुनी मराठी मासिकें व त्यांचे संपादक—रा. प्र. कानिटकर, मनोहर, सप्टेंबर, १९५३

जुन्या मराठी ग्रंथांचें आरंभींचें संपादन व प्रकाशन—अ. का. प्रियोळकर;
मराठी संशोधन पत्रिका ऑक्टोबर १९५३
टॉमस ग्रॅहॅम (मुंबईतील पहिले मराठी टाईप कोरणारे) सुं. भा. वैद्य;
नवयुग-जुलै १९१४

दंभहारक (मराठीतील मृत मासिकें) त्र्यं. अ. मेजरकर;
वि. ज्ञा. वि. पु. ५०, पृ. २४६

थॉमस कँडीची मराठी वाङ्मयाची सेवा—मराठी संशोधन पत्रिका,
ऑक्टोबर १९५६
जानेवारी १९५४
नवनीताची शताब्दी—मराठी संशोधन पत्रिका; ऑक्टोबर १९५४
परशुरामपंत तात्या गोडबोले—कृ. भि, कुलकर्णी; सह्याद्रि, नवभारत-जुलै १९५१
पहिलें मराठी वर्तमानपत्र—त्र्यं. शं. शेजवलकर; एप्रिल १९५२
ब्रिटिश राजवटीची पहिली घडी—चिं. ग. कर्वे, चित्रमय जगत्,
भाषांतर—वि. कृ. चिपळूणकर (निबंधमाला)
भाषापद्धति—वि. कृ. चिपळूणकर (निबंधमाला)
भाषाविषयक कॉलेज स्थापण्याचा एल्फिन्स्टनचा प्रयत्न—मराठी संशोधन
पत्रिका, जुलै १९५५

मराठी कथात्मक वाङ्मय-श्री. कृ. कोल्हटकर (कोल्हटकरांचा लेखसंग्रह; १९३२)
मराठींत छापिलेला पहिला ग्रंथ—बा. आ. गुप्ते; नवयुग-जानेवारी १९१४
मराठींत छापिलेला पहिला ग्रंथ—सुं. भा. वैद्य; नवयुग-फेब्रुवारी १९१४
मराठी प्रकाशनाचा उषःकाल—अ. ह. लिमये, सह्याद्रि दिवाळी अंक, १९७०
मराठी भाषेची सांप्रतची स्थिति—वि. कृ. चिपळूणकर (निबंधमाला)
मराठी मुद्रण कलेचा संशोधक कोण ? (पंडित वैजनाथ ऊर्फ वैद्यनाथ;
श्रीमंत गंगाधरराव गोविंद पटवर्धन) द. ब. पारसनीस; नवयुग
जून १९१५
नवयुग-जून १९१६
मराठी मुद्रणकलेचा संशोधक कोण ?—सुं. भा. वैद्य;
मराठी शास्त्रीय वाङ्मयाचा इतिहास—गं. ना. सहस्रबुद्धे;
वि. ज्ञा. वि. पु. ३९, पृ. १४१
महाराष्ट्रांतील बुद्धिमान्, प्रतिभावान् व कर्त्या लोकांची मोजदाद—
(संकीर्ण निबंध-१९३६)
वि. का. राजवाडे,

'मुंबापुर वर्तमानां'तील पहिली गोष्ट—त्र्यं. शं. शेजवलकर नवभारत, ऑगस्ट १९५१

मेजर टॉमस कॅन्डी—कृ. भि. कुलकर्णी; नवभारत, मार्च १९५५

मोलस्वर्थचें मराठी भाषेचें कार्य—श्री. म. पिंगे; मराठी संशोधनपात्रिका जुलै १९५६

मोलस्वर्थपूर्व कोशनिर्मितीचे प्रयत्न-श्री. म. पिंगे; मराठी संशोधनपत्रिका एप्रिल १९५६

युरोपियन लोकांची मराठी भाषेची परीक्षा—श्री. म. पिंगे; मराठी संशोधन पत्रिका, ऑक्टोबर १९५५

लोकहितवादी—वि. कृ. चिपळूणकर (निबंधमाला)

लोकहितवादी—वा. दा. ओक; वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. १६९, १९३, २३३

लोकहितवादी—श्री. के. क्षीरसागर; (व्यक्ति आणि वाङ्मय १९३७)

लोकहितवादी, ज्योतिराव आणि विष्णुशास्त्री—श्री. म. माटे; (विचार-शलाका, १९५०)

विविधज्ञानविस्तार आणि मराठी नियतकालिकें—नी. ब. भवाळकर; वि. ज्ञा. वि. पु. ५७, पृ. १८१

विष्णुशास्त्री चिपळूणकर--न. र. फाटक; वि. ज्ञा. वि. फेब्रुवारी-मार्च-एप्रिल-मे १९३०

ज्ञानसंग्रह (मराठींतील मृत मासिकें) वि. मो. महाजनि; वि. ज्ञा. वि. पु. ४९, पृ. २११

चरित्रें-मृत्युलेख

अनंत चंद्रोबा-बालबोध, जून १८८४

कृष्णशास्त्री चिपळूणकर--बालबोध, जुलै १८८६ सन ?

कृष्णशास्त्री चिपळूणकर--ह. म. पंडित; वि. ज्ञा. वि. पु. १६९ सन ?

केरो लक्ष्मण छत्रे--बालबोध, एप्रिल १८८४

केरो लक्ष्मण छत्रे--ज. बा. मोडक; वि. ज्ञा. वि. १४, पृ. ९१

केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले--केसरींतील निवडक निबंध, पुस्तक दुसरें, १८८८

गणेश जनार्दन आगाशे—वि. मो. महाजनी; वि. ज्ञा. वि. पु. ५० (सा.) पृ. १३७

गोपाळराव हरि देशमुख—बालबोध, नोव्हेंबर १८८६
गोपाळ शिवराम वैद्य—बालबोध, डिसेंबर १८९०
गोविंद नारायण माडगांवकर—बालबोध, नोव्हेंबर १८८७
गोविंद नारायण माडगांवकर—बा. ना. देव; वि. ज्ञा. वि. पु. ४९ (सा.) पृ. १०९
गोविंद शंकरशास्त्री बापट—बालबोध, मे १९०४
जनार्दन बाळाजी मोडक—बालबोध, एप्रिल १८९०
जनार्दन बाळाजी मोडक—ह. म. पंडित; वि. ज्ञा. वि. पु. २२, पृ. ८९
दादोबा पांडुरंग तर्खडकर—बालबोध, नोव्हेंबर १८८९
नीळकंठ जनार्दन कीर्तने—भा. इ. सं. मंडळ-त्रैमासिक (व. ११, अं. ३) पौष १८५२
परशुराम बल्लाळ गोडबोले—बालबोध, फेब्रुवारी १९०५
बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर—बालबोध, डिसेंबर १९०८
भाऊ महाजन—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. २२, पृ. २४ अ
भास्कर दामोदर पाळंदे—बालबोध, मार्च १८९४
महाराष्ट्राला चिरस्मरणीय अशा कांहीं विभूति—मनोरंजन, दिवाळी अंक, १९१०
मेजर टी. क्यांडी—बालबोध, फेब्रुवारी १९११
रामचंद्र भिकाजी गुंजीकर—बालबोध, जुलै १९०१
रामचंद्र भिकाजी गुंजीकर—वि. ज्ञा. वि. पु. ३२ अं. ३।४, पृ. १–४
रामचंद्र भिकाजी गुंजीकर—बा. ना. देव; वि. ज्ञा. वि. पु. ५८, पृ. १५७
विनायक कोंडदेव ओक—बालबोध, नोव्हेंबर १९१४
विश्राम रामजी घोले—बालबोध, ऑक्टोबर १९००
विश्वनाथ नारायण मंडलिक—बालबोध, जून १८८९
विश्वनाथ नारायण मंडलिक—रा. भ. पावगी; वि. ज्ञा. वि. पु. २९
विष्णु परशुरामशास्त्री पंडित—बालबोध, ऑगस्ट १८८४
विष्णुबावा ब्रह्मचारी—बालबोध, मार्च १८८८
विष्णुशास्त्री चिपळूणकर—बालबोध, एप्रिल १८८७
शंकर पांडुरंग पंडित—बालबोध, ऑक्टोबर १८८९
श्रीकृष्णशास्त्री तळेकर—वि. कों. ओक; वि. ज्ञा. वि. पु. १२, पृ. १६३

सखाराम अर्जुन—बा. आ. गुप्ते; वि. ज्ञा. वि. पु. १७ पृ. २३४
सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे—बा. ना. देव; वि. ज्ञा. वि. पु. ३१, पृ. ३१७

पुस्तकपरीक्षा

आभिज्ञानशाकुंतल (कृष्णशास्त्री राजवाडे)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. २, पृ. १४५
अवलिया (वि. वा. दामले)—पुणें पाठशालापत्रक; सप्टेंबर १८६९
आर्य लोकांच्या प्राचीन व अर्वाचीन रीति व त्यांची परस्परांशीं तुलना आणि द्विजांनीं नावेंतून विलायतेस जाणें निर्दोष आहे या विषयावर व्याख्यानें (वि. प. पंडित)—ज्ञानसंग्रह पु. १, अं. ६
केकादर्श (प. ब. गोडबोले)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. १, पृ. ६४
गुलामगिरी (ज्योतिराव फुले)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. ६, पृ. १२०
गोमांतकाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास (नाईक–वागळे)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. ६, पृ. १७८
घाशीराम कोतवाल (मोरोबा कान्होबा)—पुणें पाठशालापत्रक, फेब्रुवारी १८६६
चंद्रकांत (बा. रा. दोंदे)—पुणें पाठशालापत्रक, ऑक्टोबर–नोव्हेंबर १८६६
जयपाळ (वि. ज. कीर्तने)—पुणें पाठशालापत्रक, एप्रिल १८६५
तंतुवाद्य (महात्मे–वकील)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. ५, पृ. ३६
तंतुवाद्य (महात्मे–वकील)—ज्ञानसंग्रह पु. २, अं. ६
दादोबांच्या पूर्वीचें महाराष्ट्र भाषेचें व्याकरण–बा. मा. खुपेरकर, मराठी संशोधन पात्रिका, जानेवारी, १९५९
नरतनु (व्यं. रं. कट्टी, मुधोळकर)—डॉ. सखाराम अर्जुन; वि. ज्ञा. वि. पु. ४, पृ. ४९
निबंधसंग्रह (लोकहितवादी)—ह. म. पंडित; वि. ज्ञा. वि. पु. १०, पृ. १८
नीलदर्पण (मो. वि. वाळवेकर) ज्ञानसंग्रह, पु. १, अं. ८
पुणें शहराचें वर्णन (ना. वि. जोशी)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. २, पृ. ७८, १२७
प्रेमबंधन (ना. दा. योगी)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि., पु. ६, पृ. २१४, २३३
प्रेमबंधन (ना. दा. योगी)—ज्ञानसंग्रह पु. ३, अं. ३

बालरोगचिकित्सा (पां. गो. मंत्री) ज्ञानसंग्रह, पु. २ अं. ३
मनोरमा (म. बा. चितळे) रा. भि. गुंजीकर, वि. ज्ञा. वि., पु. ३, पृ. १४७
मराठ्यांच्या बखरीवर टीका (नी. ज. कीर्तने)—वि. ज्ञा. वि., पु. १८, पृ. १२९
मुंबईचें वर्णन––गंगाधर गाडगीळ, (' साहित्याचे मानदंड ') मुंबई, १९६२
वसंतमाला (केशव रघुनाथ)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. २; पृ. ११
विक्रमोर्वशीय (ताम्हनकर–अभ्यंकर)—रा. भि. गुंजीकर. वि. ज्ञा. वि.
पु. ४, पृ. २१८, पृ. २१८, पु. २

विनायक जनार्दन कीर्तने—(बा. ना. देव) वि. मो. महाजनी; वि. ज्ञा. वि.
पु. ३८, पृ. ८१

विलक्षण न्यायचातुर्य (स. प. पंडित)—पुणें पाठशालापत्रक; ऑगस्ट १८६८
विलक्षण न्यायचातुर्य (स. प. पंडित) रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि.
पु. २, पृ. १६

विश्वासराव (ना. स. रिसबुड) —रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. ३ पृ. ९१
शांकरदिग्जय नाटक (ब. पां. किर्लोस्कर) रा. रा. भागवत, वि. ज्ञा. वि.
पु. ३, पृ. १२१; पु. ७, पृ. २७, ४९

साहित्यशास्त्र (ग. स. लेले)—रा. भि. गुंजीकर; वि. ज्ञा. वि. पु. ६, पृ. ११९
सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध (विष्णुबावा ब्रह्मचारी)—रा. भि. गुंजीकर
वि. ज्ञा. वि. पु. ३, पृ. २४, ५५

सृष्टिज्ञानपरिभाषा (स. वा. दांडेकर)––रा. भि, गुंजीकर; वि. ज्ञा. वि.
पु. ४, पृ. १६४

हरि केशवजी (रामचंद्र हरि)––बा. ना. देव; वि. ज्ञा. वि.
पु. ४३, पृ. २७७, ३०७

पाठारे

* * *

संदर्भ-सूचि

१

व्यक्ति

† गणेश जनार्दन आगाशे (१८५२–१९१९)

$ महादेव चिमणाजी आपटे (१८४५–१८९४)

‡ विनायक कोंडदेव ओक (१८४०–१९१४)

* केनेडी व्हान्स (१७८४–१८४६)
‡ केपन डेव्हिड (१७९३–१८६९)
§ केरी विल्यम (१७६१–१८३४)
$ कृष्णाजी परशुराम गाडगीळ (१८४७–१८९६)

* रावजीशास्त्री गोडबोले (१८३४–१८९१)
¶ रावजी श्रीधर गोंधळेकर (१८३१–१९१०)

* जार्ज जर्व्हिस (१७९४–१८५१)

$ रामचंद्र भिकाजी जोशी (१८५६–१९२७).

¶ श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर (१८१६–१८८०)

* नारायणभाई दांडेकर (१८२९-१८९३)
$ शंकर पांडुरंग पंडित (१८४०-१८९४)

✦ पांडुरंग गोपाळ मंत्री (१८४२–१८९८)

✓ ✻ काशीनाथ बाळकृष्ण मराठे (१८४४–१९१८)

+ सूर्याजी सदाशिव महात्मे (१८३७–१८९९)

× गणेश बाबाजी माटे (१८३६–१८९०)

● माधव चंद्रोबा डुकले (१८२५–१८८५)

⋆ जनार्दन बाळाजी मोडक (१८४५–१८९०)

* बाळाजी प्रभाकर मोडक (१८४७–१९०६)

* महादेव गोविंद रानडे (१८४२–१९०१)

× मादाम मार्गारेट विल्सन (१७९५–१८३५)

* * *

* व्यंकटराव रामचंद्र (१८२०–१९१०)

संस्था

* * *

* स्थापना सन १८४५

दुरुस्ती

(१) पृ. १७१ वर ग्रँड मेडिकल कॉलेजची स्थापना १८३६ साली झाल्याचें छापलें गेलें आहे. त्याऐवजीं १८४५ हें साल वाचावें.

(२) पृ. १८ व पृ. १४१ वर बॉंबे बुक अँड ट्राक्ट सोसायटी या ऐवजीं बॉंबे ट्राक्ट अँड बुक सोसायटी अशी दुरुस्ती करावी.

* * *

किंमत १२ रुपये